# विविधविषयसंग्रह.

१००८

## भाग १ ला.

READING ROOM.
WAI.

गोपाळ गणेश आगरकर, एम्. ए.

'सुधारका'चे कर्ते व फर्ग्यूसन कालेजांतील प्रोफेसर

यांनीं तयार करून

पुणें येथें ' आर्यविजय 'छापखान्यांत छापविला.

सन १८९१.

( या ग्रंथासंबंधी सर्व हक्क कर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत. )

किंमत १२ आणे.

# प्रस्तावना.

---

'सुधारकांतील निवडक निबंध' पुस्तकरूपानें छापण्याविषयीं अनेकांकडून अनेक वेळां सूचना आल्यामुळें, ते वाचण्याची आणि पुस्तकरूपानें जवळ बाळगण्याची त्यांची इच्छा असावी, असें अनुमान करून, त्यांचा हा पहिला भाग प्रसिद्ध केला आहे. या भागाच्या वाचनामुळें कोणाचेंही मन दुखावलें जाऊं नये ह्मणून यांत कोणत्याही प्रकारच्या वादग्रस्त विषयाचा समावेश केला नाहीं. उपयुक्त माहिती आणि मनोरंजन हे दोनच हेतु पुढें ठेवून यांतील निबंधांची निवड केली असल्यामुळें, अगदीं जुन्या पद्धतीच्या लोकांनीं देखील हा भाग वाचण्यास कांहीं हरकत नाहीं असें मला वाटतें. **सुधारकां**तील निबंधांशिवाय याच लेखकानें पूर्वी **केसरी** पत्रांत लिहिलेल्या अनेक निबंधांपैकीं चार निबंध 'आर्यभूषण' छापखान्याच्या मालकांच्या परवानगीनें या भागांत छापिले आहेत. कादंबऱ्यांहून थोड्याशा वरिष्ठ प्रतीच्या वाचनाची ज्यांस गोडी लागली असेल त्या सर्व मराठी वाचकांस या भागाच्या वाचनानें आनंद किंवा बोध होईल, अशी मला आशा आहे. ती पूर्ण झाल्यास, ह्मणजे प्रस्तुत आवृत्ति लौकर खलास झाल्यास, याची पुनरावृत्ति काढण्याला, किंवा राजकीय, सामाजिक, व धार्मिक विषयांचा दुसरा भाग छापण्याला मला उमेद येईल हें उघड आहे. 'काय होतें पहावें!'

हें पुस्तक छापण्याच्या संबंधानें हरएक प्रकारचे श्रम आमचे मित्र रा० रा० हरि कृष्ण दामले यांनीं केले. मीं फक्त ही छोटेखानी प्रस्तावना लिहून तिच्याखालीं सही केली! या त्यांच्या दगदगीबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

पुणें, ता० २२ नवंबर १८९१. } गो. ग. आगरकर.

# अनुक्रमणिका.


| विषयाचें नांव. | पृष्ठें. |
|---|---|
| १. वाचन. .... .... .... .... .... | १–१२ |
| २. ज्ञान. .... .... .... .... .... | १२–२३ |
| ३. कवि, काव्य, काव्यरति. .... .... .... | २३–३५ |
| ४. कैं० रा० ब० केरो लक्ष्मण छत्रे. .... .... | ३५–४२ |
| ५. भारतीय कलांचें पुराणत्व. .... .... .... | ४२–६४ |
| ६. व्यापारवृद्धि. .... .... .... .... | ६५–७० |
| ७. सूर्याचें कवच. .... .... .... .... | ७०–७२ |
| ८. सूर्यावरील ठिपके. .... .... .... .... | ७२–७६ |
| ९. हिमालयवर्णन. .... .... .... .... | ७६–८२ |
| १०. महाबळेश्वरवर्णन .... .... .... .... | ८२–१११ |
| ११. स्वेझचा कालवा. .... .... .... .. | ११२–११९ |
| १२. नायगाराचा धबधबा. .... .... .. | १२०–१२३ |
| १३. शनी. .... .... .... .... .. | १२४–१२५ |
| १४. गुरु अथवा बृहस्पति. .... .... .. | १२५–१२८ |
| १५. धूमकेतु. .... .... .... .... .. | १२९–१३१ |
| १६. यूरेनस व नेपच्यून. .... .... .. | १३१–१३४ |
| १७. कडक थंडीचे अद्भुत चमत्कार. .... .. | १३४–१३९ |
| १८. पेकिन शहराचें वर्णन. .... .... .. | १४०–१४५ |
| १९. चीन देशाविषयीं कित्येक ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टी. .... .... .... .... .. | १४५–१५३ |
| २०. सशृंग मनुष्यें. .... .... .... .. | १५३–१५४ |
| २१. पेट घेणारा मासा. .... .... .... .. | १५४–१५६ |
| २२. शरीरांत फिरणाऱ्या सुया. .... .. | १५६–१५८ |
| २३. न्यूयार्क येथील हवेंत चालणाऱ्या आगगाड्या. | १५८–१६२ |
| २४. ऊंस व साखर. .... .... .... .. | १६२–१६६ |
| २५. झोंप. .... .... .... .... .. | १६६–१७० |
| २६. सिडने स्मिथ यांचे स्त्रीशिक्षणाविषयीं विचार. | १७१–१८४ |
| २७. आफ्रिकेंतील हिऱ्यांच्या खाणी. .... .. | १८५–१९१ |

READING ROOM,
WAI.

# विविधविषयसंग्रह.

## वाचन.

गुरुमुख, वाचन, विचार, अवलोकन, वाद इत्यादि ज्ञानसंपादनाचीं अनेक द्वारें आहेत. त्यांपैकीं वाचन हें अत्यंत महत्त्वाचें आहे. 'गुरु' शब्दांत अर्थात् सर्व वडील माणसांचा समावेश केला पाहिजे. बाल्यावस्थेंत गृह आणि शाला हीं दोन ज्ञानसंपादनाचीं स्थानें होत. घरीं मातापितरांनीं व इतर वडील माणसांनीं शिक्षण द्यावयाचें; शाळेंत शिक्षकानें द्यावयाचें. विद्यार्थी जसजसा मोठा होत जातो, तसतशी त्याला गुरुमुखाच्या साहाय्याची गरज कमी पडूं लागते. आणि खरोखरीच ज्यांना मुलांच्या कल्याणाची इच्छा असेल त्यांनीं त्यांना फार वेळ भरवून घेण्याची संवय लावूं नये. मनुष्यास मानसिक श्रमाचा जात्या कंटाळा आहे; कारण, मानसिक श्रम शारीर श्रमापेक्षां अवघड आहे. मनाला एकदा दुसऱ्यापासून मदत घेण्याची खोड लागली, म्हणजे त्याचें स्वावलंबन अगदीं सुटतें. व्यवहारांत घडोघडीं अडचणी येणार. प्रत्येक घटकेस सल्ला देण्यास भेटणारा गुरु कोठून मिळणार ? मनाची लोखंडासारखी स्थिति आहे. लोखंड वहिवाटींत नसलें ह्मणजे त्याला तांबेरा येऊन तें कुचकामाचें होतें. पण जर त्याच्यावर नित्य घर्षण घडत असलें तर तें सतेज राहून फार दिवस टिकतें. ज्याच्या मनाला श्रम करण्याची संवय लागलेली नाहीं, त्याचें मन लोखंडाप्रमाणें गंजून जाऊन कोणत्याही कामास निरुपयोगी होतें. वस्तऱ्याला जसा दगड, तशा बुद्धीला अडचणी आहेत. अडचणींच्या दगडावर बुद्धि लाविल्यानें ती अत्यंत तीव्र होते. जेव्हां तेव्हां गुरुमुखाची अपेक्षा केल्यानें हें घर्षण घडत नाहीं, व बुद्धीला

मांद्य येतें. सबब, विद्यार्थ्यांच्या शिक्षणास गुरुमुखांतून अगदीं अपरिहार्य असेल तेवढेंच साहाय्य व्हावें. कित्येक श्रीमंत लोक आपल्या मुलांस शिकविण्यासाठीं खासगी शिक्षक ठेवीत असतात. शाळेंतले शिक्षक अगदींच नादान असले, किंवा मुलांकडून वर्गाच्या मागें राहिलेली कांहीं बाकी मिळवून घ्यावयाची असली, किंवा त्यांच्याकडून एकाद्या इयत्तेवरून उडी मारवावयाची असली, तर असें करणें बरोबर आहे. तसें नसेल तर मात्र घरच्या शिक्षकापासून मुलांचा अखेरीस तोटा होतो असा आमचा समज आहे; कारण मुलांची स्वतः विचार करण्याची संवय मोडते. ग्रीक लोक शिक्षकाच्या कामाची तुलना नेहमीं सुईणीच्या कामाशीं करीत. साक्रेटिसाचें असें ह्मणणें असे कीं, जसा कुशींत गर्भ तसे विचार साऱ्यांच्या डोक्यांत आहेतच. शिक्षकानें सुईणीप्रमाणें त्यांचा बहिरागम मात्र आपल्या चातुर्यानें सुखावह करावयाचा. जसे हस्तपादादि अवयव व नेत्रकर्णादि इंद्रियें अभ्यासानें सुदृढ व चंचल होतात, त्याप्रमाणें अभ्यासानें बुद्धि ही सुदृढ व चंचल होते. बैलाचा खांदा, घोड्याची छाती, गाढवाची पाठ, व येडक्याचें शिंग—हीं उपयोगानें किती मजबूत होतात, हें सर्वांच्या पाहण्यांत आहेच. पहिलवानांचीं छाताडें, पोटऱ्या, व दंड, डांक घेऊन पळणारांचा दम व पाय, निशाण मारणारांचे हात व डोळे, मराठी कारकुनाची मांडी आणि पाठीचा कणा, गवयाचा कान, बजवय्याचीं बोटें, आणि बोलणाराची जीभ—याप्रमाणें ज्याला ज्या धंद्यांत जो अवयव किंवा इंद्रिय विशेष वापरावें लागतें, त्याचा तो अवयव किंवा तें इंद्रिय इतरांपेक्षां बळकट होतें. जशी शरीराची तशीच बुद्धीचीही गोष्ट आहे. अष्टावधान्यांचें स्मरण वाढलेलें असतें, कादंबरीकार व कवि होईल तितकी कल्पना वाढवितात, व तत्त्ववेत्त्यांस अनुमानप्रमाणांची विचक्षणा करण्याची संवय लागलेली असते. सारांश काय कीं, शरीराच्या अवयवांप्रमाणें मनाचे अवयवही अभ्यासानें आणि उपयोगानें मजबूत आणि चंचल होतात. यासाठीं ज्या शिक्षणपद्धतीनें विद्यार्थ्यांस ते वारंवार उपयोगांत आणावे लागतील अशी पद्धति योजणें फार हितावह

आहे. विद्यार्थ्यांच्या एका अवस्थेंत गुरुमुखाचें साहाय्य अत्यंत आवश्यक आहे. पण त्याची अवश्यकता जितकी लवकर कमी होईल तितकें बरें.

गुरुमुखाशिवाय ज्ञानसंपादनाचीं चार साधनें आहेत. त्यांपैकीं विचार, अवलोकन आणि वाचन हीं ज्याचीं त्याच्या स्वाधीन असूं शकण्यासारखीं आहेत. चवथा एक वाद राहिला, तो दुसरा कोणी तरी तोडीचा मिळाल्याशिवाय नीट होत नाहीं.

श्रेष्ठाशीं संवाद करण्यापासून नवीन ज्ञान प्राप्त होतें; समाशीं करण्यापासून संशयनिवृत्ति होते, व कनिष्ठाशीं करण्यापासून संपादिलेलें ज्ञान सुव्यवस्थित होतें. कुस्त्यांपासून मुलांच्या शरीरावर जो परिणाम होतो तो चांगल्या वादापासून बुद्धीवर होतो. कुस्तीप्रमाणें वादानें बुद्धीच्या सर्व अंगांचा आळस झडून त्यांस चलाखी येते. कुस्त्यांप्रमाणें वादापासून चांगले परिणाम नेहमीं व्हावे, पण कुस्त्यांत चुरस एकादे वेळीं, व वादांत दुराग्रह बहुशः असल्यामुळें तसें घडत नाहीं. यासाठीं ज्या प्रसंगीं योग्य प्रतिस्पर्धी मिळेल त्या प्रसंगींच वादास उभें रहावें. संतापजनक दुराग्रहाचा वाद होईल तितका टाळावा.

अवलोकनांत सर्व प्रकारच्या इंद्रियानुभवांचा समावेश होतो. हे अनुभव मनुष्य बुद्ध्या घेतो, किंवा त्यास ते सहज प्राप्त होतात. संसारांत पडलेल्या मनुष्यास निरनिराळ्या स्वभावांचे लोक भेटणें, पदार्थांचें सेवन करूं लागलें असतां त्यांचे धर्म समजून येणें वगैरे सहज अनुभव होत. भूगर्भ, वनस्पति, वैद्यक, रसायन इत्यादि विषयांत येणाऱ्या पदार्थांचे धर्म जाणण्यासाठीं शास्त्रशोधक जे प्रयोग करितात, त्यांपासून त्यांना येणाऱ्या अनुभवांस बुद्ध्या घेतलेले अनुभव ह्मणतां येईल. हे अनुभव अत्यंत शांतपणानें व काळजीनें घ्यावे लागतात.

इंद्रियद्वारा प्राप्त झालेल्या अनुभवांवरून कार्यकारणादिकांचा जो निश्चय त्यास विचार असें म्हणतात. भलत्याच कार्याचा भलत्याच कारणाशीं संबंध लावून देणें म्हणजे विचार करण्यांत चुकणें. विचारांत प्रमाद होऊं न देतां बिनचुक विचार करावा

कसा हा विषय अत्यंत गूढ आहे. याचा मानसशास्त्रांतील न्याय-संज्ञक शाखेंत समावेश होतो.

आतांपर्यंत ज्ञानसंपादनाच्या पांच साधनांपैकीं गुरुमुख, वाद, अवलोकन, व विचार या चोहोंचें स्वल्प दिग्दर्शन केलें. वास्तविक पहातां वाचनावरील निबंधांत त्यांचा इतका उल्लेख करायाला नको होता. परंतु त्यांचा वाचनाशीं अत्यंत निकट संबंध असल्यामुळें, व प्रस्तुत पुस्तकांत विषयविभागांपेक्षां विषयज्ञान करून देण्यावर विशेष कटाक्ष असल्यामुळें, विषयांतराबद्दल येणारा दोष पत्करून गुरुमुख, वाद, अवलोकन, व विचार, या चार ज्ञानसाधनांविषयीं थोडेंसें लिहिलें. आतां निबंधाचा मुख्य विषय जें वाचन त्याकडे वळूं.

वाचनाचे दोन प्रकार आहेतः एक दुसऱ्यासाठीं व एक स्वतःसाठीं. आपण जें वाचतों तें आपलें आपण लिहिलेलें असेल किंवा दुसऱ्यांनीं लिहिलेलें असेल. कोणतेंही पुस्तक किंवा लेख वाचण्यासाठीं हातांत घेण्यांत दोन हेतु असतातः माहिती किंवा करमणूक. पुस्तकें ज्या प्रकारचीं असतील त्या प्रकारचा परिणाम तीं वाचणारांच्या मनावर होईल. वाईट पुस्तकें वाचण्यापेक्षां कांहीं न करणें बरें; कारण कांहीं न करण्यानें मनाला निदान कोणताही वाईट नाद तरी लागत नाहीं. ज्यांनीं वाचनाचे पवाडे गाइले आहेत त्यांनीं ते चांगल्या वाचनाचे गाइले आहेत. या निबंधांतही वाचनाविषयीं जे दोन शब्द लिहिले आहेत, ते चांगल्या वाचनाविषयीं लिहिले आहेत. पुस्तकें एक प्रकारचे मित्र आहेत. कुमित्रांच्या संगतीप्रमाणें दूष्य पुस्तकांच्या वाचनापासून दुर्गुण जडतात. ह्मणून कुमित्रांप्रमाणें दूष्य पुस्तकांचा सहवास टाळला पाहिजे.

बहुश्रुत सन्मित्राच्या सहवासापासून होणारे बहुतेक फायदे चांगल्या वाचनापासून होऊन, शिवाय त्या सहवासापासून न होणारे असेही अनेक फायदे होतात. ज्ञानाच्या ज्या चार साधनांविषयीं वर थोडासा उल्लेख केला आहे, तीं सर्वांस प्राप्य असतील किंवा नसतील. वाचन मात्र स्वल्प खर्चानें किंवा थोड्याशा

अंगमेहनतीनें सर्वांस प्राप्त होण्यासारखें आहे. विद्वान् गुरु भेटेल किंवा न भेटेल; संवाद करण्यासारखा मित्र प्राप्य असेल किंवा नसेल; स्वतंत्रपणें बिनचुक विचार करतां येण्यासारखें शिक्षण मिळालें असेल किंवा नसेल; सहज घेतां येणारे किंवा बुद्ध्या घ्यावे लागणारे अनुभव घेऊन पाहण्याच्या सोई असतील किंवा नसतील; पण वाचनाची मात्र तशी स्थिति नाहीं. मुद्रणकला भरभराटीस आल्यापासून हें ज्ञानसाधन अत्यंत सुगम झालें आहे; किंबहुना कांहीं स्थितींत ज्ञान करून घेण्यास दुसरें कोणतेंही साधन उपयोगीं पडतच नाहीं. कोणत्याही विद्वानाला कोणत्याही विषयावरील आपले विचार सर्व ठिकाणीं स्वतः हजर राहून स्वमुखानें सांगतां येणें अशक्य आहे. पण तेच त्यानें लिहून काढले, व पुस्तकरूपानें प्रसिद्ध केले, तर त्यांच्यापासून पाहिजे त्याला फायदा करून घेतां येणार आहे. विचारांना ग्रंथग्रथित करणें ह्मणजे त्यांस जड स्वरूप देऊन अमरत्व आणण्यासारखें आहे. त्यांना जड स्वरूप आल्यानें ते आपल्या जनकापासून पाहिजे त्याच्या हातांत जाऊं शकतात. त्यांना अमरत्व आल्यानें मनुष्यांच्या प्रत्येक पिढीस त्यांच्यापासून फायदे करून घेतां येतात. व्यासवाल्मिकादि महाकवि आपले विचार लिहून न ठेवते, तर 'महाभारत' आणि 'रामायण' यांच्यापासून हिंदु लोकांना आज हजारों वर्षें जें ज्ञान व जी करमणूक होत आहे, ती कोठून होती? या महापुराणांप्रमाणेंच एतद्देशीय इतर ग्रंथांची व परदेशीय ग्रंथांची गोष्ट आहे. पुस्तकद्वारा पाश्चिमात्य एका इंग्रजी भाषेंतील ज्ञानभांडार आम्हांस खुलें झाल्यामुळें आम्हांस केवढा लाभ होत आहे? परकीय अमलापासून होणाऱ्या अनंत यातनांचा या एका लाभापासून विसर पडून भावी स्वातंत्र्याची आणि सुखाची आशा आम्हांस उत्पन्न होत नाहीं काय? अलीकडील पाश्चिमात्य भाषांत इंग्रजी भाषा व इंग्रज लोक पहिल्या वर्गांत असल्यामुळें, त्यांनीं त्या भाषेंत भाषांतराच्या साहाय्यानें इतर सर्व सुधारलेल्या भाषांतील उत्कृष्ट उत्कृष्ट विचारांचा संग्रह केला आहे, व प्रतिदिवशीं करीत आहेत; व ह्या एका भाषेंतील

ग्रंथ आम्हांस वाचनास मिळूं लागल्यामुळें युरोपांत फार प्राचीन कालापासून आजकालपर्यंत झालेल्या विद्वानांपैकीं ज्यांनीं आपले विचार लिहून ठेविले आहेत त्यांपैकीं निदान उत्तम उत्तमांचीं तरी इंग्रजी भाषांतरें आह्मी पैसा खर्च करण्यास तयार असलों तर आह्मांस वाचण्यास सांपडणार आहेत. सारांश काय कीं, महान् महान् तत्ववेत्ते, इतिहासकार, शास्त्रज्ञ, व कवि आपापले विचार पुस्तकरूपी नौकेंत घालून न ठेवते, तर ते कालमहार्णवांत कधींच बुडून जाते, व त्यांचा यत्किंचित्‌ही मागमूस आम्हांस न लागता! पण त्यांनीं तसें केलें नाहीं, यामुळें विचाररूपी मालानें भरलेल्या या ग्रंथनौका पाहिजे त्याला हव्या त्या किनाऱ्यावर उतरून घेऊन त्यांतील मालास हात घालतां येतो!

गुरुमुखापासून होणारा फायदा विद्यार्थ्यांस फार झालें तर शाळेंत किंवा विद्यालयांत करून घेतां येतो. एकदा शाळा सुटली, किंवा विद्यालयीन पदवी प्राप्त झाली म्हणजे गुरूला सोडून व्यवहारांत पडावें लागतें. व्यवहार पाठीमागें लागला म्हणजे ज्ञानसंपादनास पुस्तकांशिवाय दुसरें साधन रहात नाहीं. शिकलेल्या लोकांपैकीं शेंकडा पंचाण्णवांना नोकरींत किंवा उद्योगांत पडल्यावर वाचनाची इच्छा मुळींच रहात नाहीं, असें आमच्या सध्यांच्या स्थितीवरून दिसतें. शाळेंत किंवा विद्यालयांत जे मानसिक श्रम करावयाचे ते नोकरी किंवा धंदा मिळण्यासाठीं. तो मिळाला ह्मणजे अभ्यासाची सार्थकता झाली, व पुढें तो करण्याची गरज राहिली नाहीं, अशी पुष्कळांची समजूत असते. शाळेंत किंवा विद्यालयांत संपादिलेल्या भांडवलावर जन्मभर व्यापार करणारे असे अनेक लोक आहेत. यांना मानसिक श्रमाचा स्वाभाविकपणें फार कंटाळा असतो. धंद्यांत जाणाऱ्या वेळाशिवाय जर त्यांना थोडीबहुत फुरसूत सांपडत असली तर ते ती सोंगट्या, गंजिफा किंवा बुद्धिबळें खेळण्यांत, पुनः पुनः तंबाखू चोळण्यांत किंवा विड्या फुंकण्यांत, वेडेवांकडे हेल ओढीत बसण्यांत किंवा एकाद्या वाद्यावर उगीच तुण तुण करण्यांत घालवितात. कित्येकांची मजल याच्यापुढेंही जाते. कोणी गांजाचे शौकी बनतात;

कोणी बाहेरख्याली निघतात; कोणाला बाटलीच्या अमलांत गुंग होऊन पडण्याचा व आपलें हसें करून घेण्याचा नाद लागतो. असल्या दुर्व्यसनांनीं आपल्या अब्रूची, पैशाची, व शरीराची खराबी करून घेऊन शेवटीं अकालिक मृत्यूच्या जबड्यांत पडणारे व बायकापोरांस उघडीं पाडणारे विचारशून्य पढत मूर्ख प्रत्येक देशांत असतात. दुर्दैवानें तशांची संख्या या देशांत वाढत चालली आहे, ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट होय. या लोकांस असें कळत नाहीं कीं, व्यसनापासून होणाऱ्या यत्किंचित् सुखासाठीं त्यांना आपलें अतोनात नुकसान करून घ्यावें लागतें. ज्यांना सुदैवानें लहानपणापासून वाचनाची गोडी लागलेली असते, व जे प्रपंचांत पडले तरी फुरसूत सांपडेल तेव्हां कांहीं तरी वाचीत असतात, अशांची स्थिति वरील व्यसनी लोकांच्या स्थितीहून फार निराळी असते. विषयी लोकांप्रमाणें यांनाही आपल्या विषयापासून सुख-प्राप्ति होते. भेद इतकाच कीं, यांचें सुख दुर्व्यसनांच्या सुखाप्रमाणें अब्रूची, शरीराची, व पैशाची माती करणारें नसतें. चांगलीं चांगलीं पुस्तकें व वर्तमानपत्रें नित्य वाचीत असल्यानें ज्ञानाची एकसारखी वृद्धि होत असते, व त्याचा व्यवहारांत उपयोग होत असतो. मनुष्याला पोटासाठीं जो एक धंदा करावयाचा असतो त्याच्याशिवाय इतर गोष्टींचें ज्ञान त्यानें संपादिलें असतां तें त्याला मुळींच उपयोगीं पडणार नाहीं कीं काय? जे कोणी असें समजत असतील ते मोठा प्रमाद करितात असें म्हणण्यास हरकत नाहीं. नित्याच्या धंद्याशिवाय इतर गोष्टींचें ज्ञान संपादण्यांत कोणतेंही नुकसान नाहीं, पण तसें न करण्यांत मात्र फार नुकसान आहे. प्रपंचांत प्रतिदिवशीं लहानमोठ्या शेंकडों अडचणी येतात. त्यांचा परिहार कसा करावा हें ठाऊक नसलें तर किती पंचाईत पडते? कुटुंबांत आलें कोणाला पडसें कीं चालला वैद्याचे किंवा डाक्टराचे घरीं! पडली कांहीं भानगड कीं लागला वकिलाच्या घरीं खेटे घालायाला! आलें कांहीं सार्वजनिक काम कीं गेला भांबावून! ज्याला पूर्ववयांत थोडेंबहुत शिक्षण मिळालें आहे त्याची अशी दैन्यावस्था कां असावी? जो कोणी उपयुक्त वाचनाची संवय

नेहमीं सुरू ठेवील त्याला लहानसान अडचणींतून बाहेर पडण्याबद्दल कोणत्याही प्रकारचा खर्च पडणार नाहीं इतकेंच नाहीं, तर अशा अडचणींतून पार कसें पडावें हें चांगलें माहीत असल्यामुळें त्याला त्यांची पर्वा वाटेनाशी होईल.

संसारांत वारंवार येणाऱ्या अडचणींतून पार पडण्यास वाचनापासून साहाय्य होतें हा वाचनापासून होणारा अगदीं हलक्या प्रतीचा फायदा आहे. ज्यांना जिवंतपणीं आपणांस हे मागल्या पिढीचे असें म्हणवून घ्यावयाचें नसेल, त्यांनीं वाचनाची संवय नेहमीं जागृत ठेविली पाहिजे. जगांत प्रतिवर्षी नवीन कल्पना, नवीन शोध, नवीन युक्त्या निघून जुन्या कल्पना, जुने शोध, व जुन्या युक्त्या एकापाठीमागून एक मागें पडत आहेत. जे शाळेंत किंवा विद्यालयांत संपादिलेल्या ज्ञानासच चिकटून राहातात, व व्यवहारांत पडल्यावर वाचनाची संवय ठेवीत नाहींत, त्यांना आपल्या जुनेपणाबद्दल आपला उपहास करून घ्यावा लागतो. शिक्षक, वैद्य, कारागीर, नोकर, यांपैकीं ज्यांनीं वाचनाची संवय ठेविलेली नसते, त्यांना त्यांच्या धंद्यांत झालेल्या सुधारणा न कळल्यापासून होणारें नुकसान सोसावें लागतें इतकेंच नाहीं, तर ज्या तरुण लोकांचा आणि त्यांचा समागम होतो, त्यांत त्यांची थट्टा होऊं लागते. ठळक ठळक गोष्टींची चालू तारखेपर्यंत काय हालहवाल आहे हें माहीत नसणें ह्मणजे एकुणीसाव्या शतकांत जन्मास येऊन अठराव्या शतकांतल्या मनुष्याप्रमाणें वागणें होय !

कदाचित् पूर्वींच्या युगांत वाचनाची येवढी प्रौढी नव्हती असें मानिलें तरी चालेल. पण आतां मात्र वाचनाशिवाय चालावयाचें नाहीं. पूर्वी राज्यसत्ता राजांच्या किंवा त्यांच्या मंत्र्यांच्या हातांत असे. राज्यपद वंशपरंपरेनें प्राप्त होत असे. कायदे करणें, परराष्ट्रांशीं लढाई किंवा तह करणें, कोणताही प्रचंड खर्च करणें—वगैरे गोष्टींत पूर्वींचे अनियंत्रित राजे किंवा त्यांचे प्रधान लोकांचा सल्ला घेत नसत, व त्यांची इच्छा काय आहे हें जाणण्याची पर्वा करीत नसत. पण आतां तें मन्वंतर अगदीं बदलत चाललें. राजांची सत्ता कमी होऊन लोकांची सत्ता वाढत

चालली. कायदे करण्याचें काम लोकांवर किंवा त्यांनीं निवडलेल्या प्रतिनिधींवर पडूं लागलें; लढायांची व तहांची जबाबदारी लोकांवर पडूं लागली; व कोणताही प्रचंड खर्च करावा किंवा न करावा, याचा निकाल त्यांच्या तब्यतीवर अवलंबून राहूं लागला. अशा दिवसांत चहूंकडे वस्तुस्थिति कशी आहे हें त्यांना ठाऊक नसेल तर त्यांच्या हातून मोठमोठे प्रमाद होण्याचा संभव आहे. लोकांस राजसत्ता प्राप्त होण्यास ज्याप्रमाणें बऱ्याच अंशीं त्यांचें ज्ञान कारण झालें, त्याप्रमाणें त्यांच्याकडे ती राहण्यास व तिच्यापासून त्यांना आपला अधिकाधिक फायदा करून घेतां येण्यास त्यांच्यांतील ज्ञानप्रसारच साधन होणार आहे. शेंकडा नव्याण्णव लोक अल्प शिक्षण मिळालें न मिळालें तों धंद्यांत पडले, आणि कांहीं वाचीतनासे झाले, तर त्यांच्या हातून आपापल्या वांट्याची राज्यप्रकरणी कामगिरी नीट कशी बजावली जाणार ? इंग्लंडांतील न्हावी, परीट, तेली, तांबट यांच्या टेबलांवर सुद्धां नित्याचीं एकदोन वर्तमानपत्रें व कपाटांत दहापांच पुस्तकें पडलेलीं असतात, ह्मणून सांगतात. यावरून काय होतें कीं, तिकडील धंदेवाले सुद्धां राज्यप्रकरणी चळवळी कशा चालल्या आहेत हें लक्ष लावून पहात असतात, व त्या संबंधानें आपआपसांत वाद करून त्यांवर आपलीं मतें ठरवून ठेवितात. यामुळें जेव्हां पार्लमेंटांत कांहीं वादग्रस्त प्रश्न निघतो आणि प्रधानांत व प्रतिनिधींत विरोध उत्पन्न होऊन त्याविषयीं लोकांचें मत काय हें पहाण्याचें ठरतें, तेव्हां त्यांना भांबावल्यासारखें न होतां शांतपणें आपला अभिप्राय देतां येतो. ज्या लोकांना राजकीय सत्ता आपल्या हातांत रहावी, व राजांच्या, श्रीमंतांच्या, किंवा लढवय्यांच्या हातांत न जाऊन त्यांना आपणांवर जुलूम करतां येऊं नये, असें वाटत असेल, त्यांनीं होईल तितका ज्ञानाचा संग्रह केला पाहिजे. हा संग्रह करण्याचें प्रधान साधन वाचन आहे.

केवळ व्यक्तीच्याच दृष्टीनें पाहिलें तर व्यवहार आणि राज्यप्रकरण यासंबंधानें मनुष्यास वाचनापासून जे लाभ होतात ह्मणून वर सांगितले, त्याहीपेक्षां आणखी एक विशेष महत्वाचा लाभ

त्याला त्यापासून करून घेतां येतो. संसारांत मनुष्यावर प्रसंगोपात्त मोठमोठीं अरिष्टें गुदरतात. कोणाचा एकुलता एक कर्ता मुलगा अकस्मात् मरण पावतो; कोणाची रूपवती, सुशील, व प्रेम करणारी बायको मरते; कोणाचे एकाएकीं सारे पैसे बुडतात; कोणाला भयंकर अपघात होऊन आमरण व्यंगता येते; कोणाला एकादा महारोग जडतो. अशा प्रकारचें अरिष्ट कोसळलें, आणि मनाला त्याचा विसर पाडण्यास कांहीं नसलें, ह्मणजे मनुष्याला पराकाष्ठेचें दुःख होऊन कधीं कधीं तो वेडा देखील होतो. अशा प्रसंगीं विपद्ग्रस्ताला जर वाचतां येत असलें, व चांगल्या पुस्तकांची अनुकूलता असली, तर दुःखाच्या पहिल्या उत्कट लाटेचा लय झाल्यावर त्याला तीं पुस्तकें वाचण्यापासून पुष्कळ समाधान करून घेतां येईल. अशा वेळीं विशेषतः धर्मपुस्तकें आधार देण्यास फारच उपयोगीं पडतात. जड वस्तु नश्वर आहेत; आत्मा अविनाशी आहे; ज्यांचा मृत्युलोकांत एकाएकीं संबंध तुटला त्यांची भेट यापेक्षां चांगल्या जगांत पुनः होऊन चिरकाल तत्समागमसुख मिळेल; जन्मास आलेल्याची मरण हें प्रकृतिच आहे; प्रत्येकाला आज नाहीं उद्या हें मृण्मय शरीर ठेवायाचेंच आहे; ज्यांना या जगांत विनाकारण विपत्ति भोगावी लागते त्यांना परमेश्वर स्वर्गांत सुख देतो; सर्वशक्तिमान्, सर्वज्ञ, न्यायी, व दयालू परमेश्वराच्या इच्छामात्रेंकरून सर्व गोष्टी घडत असतात; त्याच्या सत्तेपुढें कोणाचा इलाज नाहीं; तो ठेवील त्या स्थितींत संतोषानें राहिलें पाहिजे—या व अशा प्रकारच्या धर्मांतर्गत अनेक विचारांनीं मनास धैर्य येऊन दुःखास उतार पडतो, व थोड्या दिवसांत मनुष्य उल्हासानें पुनः नित्यकृत्यांस लागतो. तात्पर्य, ज्याला एकदा चांगल्या वाचनाचा नाद लागला त्याच्या करमणुकेला सीमा नाहीं. ज्याला आपला काळ सोडून भूतकाळांत किंवा भविष्यकाळांत प्रवेश करावयाचा असेल; ज्याला पृथ्वीवर आजपर्यंत कोणत्याही देशांत झालेले मोठमोठे साधु, तत्त्ववेत्ते, कवि, व नाटककार यांचा समागम करून ज्ञानामृताचें सेवन करावयाचें असेल; ज्याला निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या काळांत कोणकोणत्या

प्रकारचे लोक होते, ते कशा प्रकारचे पेहराव करीत, त्यांची राज्यपद्धति कोणच्या प्रकारची असे, त्यांच्या धर्मकल्पना कशा होत्या, ते कोणते खेळ खेळत, ते न्याय कसा करीत, ते व्यापार कोणता व कसा चालवीत, त्यांच्यामध्यें धर्मक्रांति व राज्यक्रांति होण्यास काय कारणें झालीं, नंतर त्यांच्या स्थितींत कोणकोणते फेरफार झाले; ऐन संकटाचे प्रसंगीं मोठमोठे पुरुष कसे वागले; कोणाच्या बुद्धिसामर्थ्यानें जगावर केवढे उपकार झाले; अनीति, भित्रेपणा, यादवी इत्यादि दोषांनीं कोणतीं राष्ट्रें लयास गेलीं; उद्योग, न्याय, धर्मपरायणता, व एकी इत्यादि गुणांनीं कोणतीं राष्ट्रें उदयास आलीं—इत्यादि गोष्टी समजून घ्यावयाच्या असतील त्याला त्या समजण्यास वाचनाखेरीज दुसरें साधन नाहीं. तसेंच, वाचकास वर्तमानाचा विसर पाडून, तो ज्या युगाचा किंवा देशाचा इतिहास वाचीत असेल त्या युगांत व त्या देशांतच आपण आहों कीं काय असा भास त्याच्या वृत्तीवर क्षणभर उत्पन्न करून त्याला अनंत आनंद व ज्ञान देण्याचें सामर्थ्य वाचनाशिवाय दुसऱ्या कशाच्या अंगीं आहे? नित्य नित्य मोठमोठ्या पुरुषांचीं चरित्रें वाचण्यांत आल्यानें मनास तत्कालीन समाधान व ज्ञान होतें इतकेंच नाहीं, तर नकळत मनुष्याच्या स्वभावावर व वर्तनावरही तसल्या वाचनाचा परिणाम घडूं लागतो. ज्याप्रमाणें जगन्मान्य पुरुष वागले त्याप्रमाणें आपण वागावें, ते बोलले त्याप्रमाणें आपण बोलावें, व ते ज्या प्रकारच्या विचारांत गुंग होऊन रहात, त्या प्रकारच्या विचारांत आपणही गुंग होऊन रहावें, असें वाटूं लागतें. मोठ्यांचें अनुकरण करण्याची इच्छा एकवार झाली, व दिवसेंदिवस ती दृढ होत चालली, ह्मणजे वर्तनावर तिचा परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं. एका लॅटिन कवीनें या ज्ञानसाधनाचा महिमा मोठ्या चातुर्यानें एका वाक्यांत वर्णिला आहे. तो म्हणतो कीं 'वाचन मनुष्याचें वर्तन सुधारतें, व त्याला रानटीपणांत राहूं देत नाहीं.'

वर वाचनाचे प्रकार सांगतांना मनुष्य कधीं स्वतःसाठीं व कधीं दुसऱ्यासाठीं वाचतो, असें ह्मटलें आहे. दुसऱ्यासाठीं स्वतः किंवा

दुसऱ्यांनीं लिहिलेले लेख कसे वाचावे, या विषयाचें उद्घाटन या निबंधांत येऊं शकत नाहीं. तो विषय 'वक्तृत्व' या सदराखालीं येतो.

---

## ज्ञान.

रंगानें काळे, दिसण्यांत कुरूप, स्वभावानें दुष्ट, नीतीस अपरिचित, व बुद्धीनें मंद असे निग्रो जातीचे लोक सर्वांच्या पाहण्यांत आलेच असतील. या निग्रोहूनही विशेष रानटी जातीचे लोक कित्येक अप्रसिद्ध बेटांत आहेत, असें पुनः पुनः पृथ्वीपर्यटन करणाऱ्या शोधक प्रवाशांच्या लेखांवरून समजतें. उत्तर अमेरिकेंतील तांबडे इंडियन, सैबेरिया देशांतील खुजे व निःशक्त सैबेरियन, आरबस्थानांतील फिरते धनगर, हिंदुस्थानांतील गोंड वगैरे मूळचे रहिवाशी, राशियाच्या अमलांत आलेल्या मध्यएशियांतील मोंगलांच्या निरनिराळ्या जाति, राशियाच्या दक्षिणेचे कोसॅक्स वगैरे दुसऱ्या प्रतीचे लोक, निग्रोपेक्षां पुष्कळ सुधारलेले आहेत हें खरें; पण यांच्यांत व निग्रोंत जितकें अंतर आहे, त्यांहून फारच अधिक अंतर यांच्यांत व सुधारलेल्या अलीकडील युरोपिअन लोकांत आहे. तेजःपुंज शरीरें, मनोहर आकृति, सौम्य स्वभाव, स्थिर नीति व कुशाग्रबुद्धि ज्यांच्यापैकीं पुष्कळांच्या ठायीं वसत आहे असे अर्वाचीन युरोपिअन, एशियाटिक, किंवा अमेरिकन लोक कोणीकडे, आणि आफ्रिकेच्या किनाऱ्यावर उन्हांत तळणारे, किंवा उत्तरभूशिराच्या आसपास बर्फाच्या झोंपड्यांत रेन्डियरच्या मांसावर व कातड्यावर आयुष्य कंठणारे लोक कोणीकडे! या लोकांत व अलीकडील सुधारलेल्या लोकांत जमीन-अस्मानाचें अंतर आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. यांत हें अंतर कशानें पडलें, व तें कमी कशानें होत जाईल, हें या निबंधांत थोडक्यांत दाखविण्याचा इरादा आहे.

मनुष्यांमध्यें ज्ञानाचा जसजसा प्रसार होत जातो तसतशी त्यांची रानटी स्थिति सुटत जाऊन त्यांस उन्नतावस्था प्राप्त होते.

नीं राष्ट्रें सध्यां आपणांस सुधारलेलीं असें म्हणवून घेत आहेत तीं एकदा निग्रो लोकांच्या किंवा त्यांहूनही रानटी लोकांच्या स्थितींत असावीं, असें अनेक प्रमाणांवरून सिद्ध करतां येण्याजोगें आहे, व पुष्कळांनीं तें केलेंही आहे. ज्ञानाचा प्रसार होऊन रानटी स्थिति सुटत चालल्यानें, व उन्नतावस्था येऊं लागल्यानें, मनुष्यमात्राच्या सुखाची वृद्धि होत जाते किंवा नाहीं हा प्रश्न क्षणभर वादग्रस्त आहे असें जरी मानलें, तरी त्यावरून ज्ञानाचा प्रसार करण्याविषयीं परिश्रम करूं नये असें होत नाहीं. ज्ञानवृद्धि करण्यापासून मनुष्यमात्रास कोणत्याही प्रकारचा फायदा न होता तर ती करण्याकडे त्याची प्रवृत्ति कधींच झाली नसती. ती एकसारखी होत आहे, व दिवसेंदिवस क्षीण न होतां अधिकच वाढत जात आहे, यावरून तसें करण्यांत मनुष्यमात्रास कांहीं फायदा होत आहे, हें स्पष्ट दिसतें. जड वस्तूप्रमाणें सुखदुःखाची मापानें मोजणी करतां येती तर सर्व स्थितींत सुख व दुःख सारखें आहे असें प्रतिपादणाऱ्यांचें तोंड तेव्हांच बंद करतां येतें. ती करतां येत नाहीं ह्मणून त्यांना निरुत्तर करणें जरी कठिण झालें आहे, तरी येवढें खरें आहे कीं, ज्यांस आह्मी सुधारलेलीं राष्ट्रें म्हणतों, त्यांपैकीं कोणासही निग्रो लोकांच्या स्थितींत पुनः जाण्याची इच्छा नाहीं इतकेंच नाहीं, तर प्रस्तुत जी सुधारणा त्यांस प्राप्त झाली आहे तिची वृद्धि करण्याची उत्कंठा त्यांना लागली आहे, व ही उत्कंठा दूर करण्यास त्यांना ज्ञानाशिवाय दुसरें साधन दिसत नाहीं.

सुखाची प्राप्ति आणि दुःखाचा परिहार यांत समग्र जीवकोटि सर्वकाळ चूर झालेली दिसते. नश्वर ऐहिक वस्तूंचा कंटाळा करणारा योगी देखील सुखाच्या पाठीमागें लागलेला असतो. साधारण प्रापंचिकांत आणि त्याच्यांत भेद इतकाच कीं, प्रापंचिकाप्रमाणें ऐहिक सुखांनीं त्याचें समाधान होत नाहीं. त्याची महत्वाकांक्षा प्रापंचिकापेक्षां बलवत्तर असल्यामुळें तो ऐहिक सुखांहून भिन्न अशा अविनाशी सुखाच्या प्राप्तीसाठीं आत्मसंयमन करीत असतो. कोट मनुष्यांपैकीं नव्याण्णव लक्ष नव्याण्णव हजार

नऊशें नव्याण्णव मनुष्यांना ऐहिक सुखांचा पाठलाग सोडून योग्यांच्या अविनाशी सुखांमागें लागवत नाहीं, यामुळें हा सारा प्रपंच वाढत चालला आहे. तथापि अशा स्थितींतही एक गोष्ट निरंतर लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, जरी योगी आणि प्रापंचिक यांचीं सुखें भिन्न जातींचीं आहेत, तरी तीं संपादण्याचें दोघांचें साधन एकच आहे. तें साधन ज्ञान होय. प्रस्तुत निबंधांत ज्ञानप्रसारामुळें प्रापंचिकांच्या सुखांची वृद्धि कशी होत चालली आहे, हें विशेष स्पष्ट केलें पाहिजे.

मनुष्यास जो सुखानुभव होतो, तो सारा त्याच्या मनाच्या द्वारें होतो, म्हणून सारीं सुखें मानसिक सुखें आहेत असें तत्त्वदृष्ट्या म्हटलें पाहिजे. तथापि निबंधाच्या सोईसाठीं त्यांचे दोन तीन स्थूळ भाग करण्यास कांहीं हरकत नाहीं. साधारणपणें विचार करतां असें दिसून येईल कीं, प्रत्येक मनुष्य शारीरिक, सामाजिक, किंवा शुद्ध मानसिक या सुखांच्या तीन वर्गांपैकीं एकाच्या, दोहोंच्या किंवा साऱ्यांच्या पाठीमागें लागलेला असतो. या तीनही प्रकारच्या सुखांची आजपर्यंत त्याला जी जोड झाली आहे ती त्याच्या ज्ञानामुळें झाली आहे, व पुढें तींत भर पडणें किंवा न पडणें हेंही त्याच्या ज्ञानावरच अवलंबून आहे हें स्वल्प विचारा-अंतीं ध्यानांत येणार आहे.

रानटी लोक शिकारीवर उपजीविका करितात. थंडीवाऱ्यापासून शरीराचें रक्षण करण्यास उपजीविकेसाठीं मारलेल्या जनावरांच्या कातड्यांशिवाय त्यांच्यापाशीं दुसरें कांहीं नसतें. सूर्याचा प्रखर ताप दुःसह होतो तेव्हां वृक्षांच्या छायेशिवाय त्यांना दुसरा आश्रय नसतो. पर्वतांच्या गुहांशिवाय पर्जन्यधारांपासून आपलें संरक्षण करून घेण्यास त्यांस दुसरें कांहीं सांपडत नाहीं. एकादे वेळीं भूक लागली असून सावज सांपडलें नाहीं कीं उपाशीं मरण्याची पाळी. रानटी लोकांच्या असल्या कष्टमय स्थितीहून आमची स्थिति किती निराळी झाली आहे! सुधारलेल्या देशांत मांसाहार करण्याची रूढि आहे ही गोष्ट निराळी; पण उपजीविकेसाठीं प्राणिहत्या अशी करावयाची नाहीं असा जरी सर्व

सुधारलेल्या राष्ट्रांनीं निश्चय केला, तरी संकटावांचून उपजीविका चालविण्यापुरतें धान्य उत्पन्न करण्याची कला आम्हांस अवगत झाली आहे. इतकेंही करून धान्याची थोडी तूट आल्यास त्याच्या भरतीस घालण्यासारखीं शेंकडों प्रकारचीं फळें, मुळें, व कंद आहेत. मनुष्यांच्या चरितार्थास उपयोगीं पडत असलेल्या वनस्पतींच्या नांवांची यादी, आणि त्यांच्या लागवडीविषयीं थोडथोडी माहिती, यांचा एकाद्या पुस्तकांत संग्रह केला, तर तें निदान वेबस्टरच्या कोशाहून मोठें होईल यांत संशय नाहीं! याचप्रमाणें शीतोष्णापासून आपला बचाव करण्यासारखीं हजारों साधनें सुधारलेल्या मनुष्यांच्या हस्तगत झालीं आहेत. व्याधीला उतार पाडणाऱ्या वैद्यशास्त्राचें पाऊल प्रतिवर्षीं एकसारखें पुढें पडत आहे, व औषधींचा संग्रह वाढत आहे. सारांश, रानटी लोकांना ज्या शारीरिक सुखांचा उपभोग कधींही मिळावयाचा नाहीं, तीं सुधारलेल्या समाजांतील कनिष्ठ वर्गांतल्या प्रत्येक व्यक्तीच्या नित्योपभोगांत असतात. उच्च वर्गांतील लोकांस सर्व आवश्यक गोष्टींची अनुकूलता असून जीं सुखें रानटी लोकांच्या स्वप्नांत शुद्धां कधीं यावयाचीं नाहींत तीं ते प्रतिदिवशीं सेवितात. पदार्थांच्या धर्मांचा अभ्यास रात्रंदिवस चालला असल्यामुळें प्रतिवर्षी नवीन शोध होत आहेत, व त्या मानानें सुखाची वृद्धि होत आहे. वाफेची शक्ति मनुष्यांच्या कामीं लावितां येईल असें ज्यानें शोधून काढिलें त्यानें त्यांच्यावर केवढे उपकार केले? ज्याला विद्युत्प्रवाहास संदेशवाहक करण्याची युक्ति सुचली त्यानें मनुष्यमात्रास सदैव ऋणी केलें नाहीं काय? याचप्रमाणें भूगर्भ, रसायन, ज्योतिष, वैद्यक वगैरे शास्त्रांतील प्रत्येक महत्वाच्या शोधानें मनुष्यांच्या सुखांत जी भर पाडिली आहे तिचें यथार्थ परिमाण कोणाच्यानें होणार आहे? तसेंच पुढें जी पडणार असेल तिचें बिनचुक अनुमान आज कोण करूं शकेल? इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, युनायटेडस्टेट्स् वगैरे प्रमुख देशांत सुखांस जी बहुविधता आणि सुगमता आली आहे, ती खरोखरीच चकित करण्यासारखी आहे. असें असूनही त्या व इतर देशांतील लोक ती वाढवि-

ण्याच्या आणि सुलभ करण्याच्या शोधांत निमग्न झाले आहेत. हा त्यांचा व्यवसाय अव्याहत चालला तर कांहीं वर्षांनीं सुधारलेल्या देशांतील कोणत्याही व्यक्तीस शरीराचें संरक्षण उत्तम रीतीनें होण्यास अवश्य लागणाऱ्या सर्व वस्तु स्वल्प आयासानें मिळूं लागतील इतकेंच नाहीं, तर ऐषआरामाच्याही अनेक वस्तु अत्यंत सुसाध्य होतील, असा बळकट संभव आहे.

येथपर्यंत मनुष्यांच्या शारीरिक सुखाचा विचार झाला. याहींपेक्षां विशेष महत्वाचा विचार त्यांच्या सामाजिक स्थितीचा होय. रानटी स्थितींत मनुष्यांचा एकमेकांशीं जो व्यवहार चालतो त्यांत आणि सुधारलेल्या स्थितींतील त्यांच्या व्यवहारांत जमीनअस्मानाचें अंतर असतें. रानटी स्थितींत मनुष्य आपल्या सुखाची मात्र पर्वा करतो. आपलें सुख साधण्यासाठीं कोणास कितीही पीडा करावी लागली तरी ती करण्यास तो तयार असतो. दोनप्रहरच्या सुमारास भूक लागली, व अमक्यापाशीं कांहीं मांस आहे असें दिसलें किंवा ठाऊक असलें, तर तो तें त्याच्यापासून हिसकावून घेण्यास मागेंपुढें पहावयाचा नाहीं. अशा स्थितींत ‘बळी तो कान पिळी’ हा न्याय सर्वत्र जारीनें अमलांत असतो. कलत्र, पुत्र, कन्या इत्यादि संबंध त्या स्थितींत ठाऊक नसतात. एकादे वेळीं कांहीं सांथ येऊन पारधीच्या जनावरांचा फडशा झाला तर एकमेकांस आपलें भक्ष्य करण्यास त्यांना वाईट वाटत नाहीं. कांहीं रानटी लोक अशा स्थितींत म्हातारे पुरुष आणि बायका यांचा पाठलाग करून त्यांस पकडतात, आणि जनावरांप्रमाणें फाडून खातात ! अशा स्थितींत लढाईस उभें राहणें, जखमा करणें, जीव घेणें—इत्यादिकांची कोणासही भीति वाटत नाहीं ! तथापि कालांतरानें असल्या शोचनीय स्थितींतूनही मनुष्यें बाहेर पडतात, व प्रथम त्यांना कुटुंबाची कल्पना येऊं लागते. एकदा कुटुंब बनलें कीं, त्यांत राजा, प्रजा, हुकूम, ताबेदारी, आई, बाप, मुलगा, मालकी, वारस इत्यादि संबंधांचा उद्भव होऊन त्यांचें ज्ञान होऊं लागतें. पुढें कुटुंबांचा विस्तार होतां होतां जात उत्पन्न होते. कुटुंबव्यवस्थेच्या नियमांपैकीं कांहीं

नियम टाकून देऊन, व कांहींत थोडाबहुत फेरफार करून, ते जातीला लावण्यांत येतात; जातीचें पुढें खेडें होतें, व खेड्यांतून शहर निपजतें. ग्रीक लोकांच्या विद्वत्तेचा, नीतिविचारांचा व राज्यपद्धतींचा रोमन लोकांच्या द्वारें अलीकडील युरोपीय राष्ट्रांच्या आचारांवर व विचारांवर जरी पुष्कळ परिणाम झाला आहे, तरी या लोकांची राज्य ही कल्पना शहराच्या बाहेर कधीं फारशी गेली नाहीं हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. अॅथीनिअन्स, स्पार्टन्स, थीबन्स या प्रसिद्ध ग्रीक लोकांपैकीं प्रत्येकास अॅथेन्स, स्पार्टा, थीब्स—या शहरांबाहेर आपलें कांहीं नाहीं, असें नेहमीं वाटत असे. तथापि कालगतीनें ही कल्पनाही लयास जाऊन रोमन लोकांच्या वेळीं राष्ट्राची कल्पना उत्पन्न होऊन दृढ झाली. अलीकडे अनेक राष्ट्रें अन्योन्यांच्या कल्याणपाशानें सदैव एकत्र बद्ध करण्याच्या कल्पना निघूं लागल्या आहेत, व एका जर्मन इतिहासकारानें असें भाकीत करून ठेविलें आहे कीं, कालांतरानें प्रत्येक खंड एकेक राष्ट्र बनणार आहे, व या सर्व खंडराष्ट्रांत अज्ञातपूर्व अशी मैत्री, परोपकारबुद्धि, संपत्ति, ज्ञान आणि नीति यांचा प्रसार होणार आहे. रानटी स्थितींत ज्या ‘ स्व ’ ची येवढी प्रतिष्ठा वाटत असते, त्याची मातब्बरी हळूहळू कमी होऊन त्यावरील प्रेमाचा कांहीं भाग प्रथम कुटुंबांतील आप्तांस, व पुढें जातिबांधवांस, ग्रामबांधवांस, देशबांधवांस, व अखेरीस सर्व मनुष्यजातीस अर्पावा, असें वाटूं लागतें. कांहीं सानुकंप तत्त्ववेत्त्यांच्या प्रेमविषयांत समग्र मनुष्यजातीचाचसा काय, पण साऱ्या जीवसृष्टीचा सुद्धां समावेश होतो! कुटुंब, जात, खेडें, शहर, व राष्ट्र यांच्या प्रथमावस्थेंत समाजाच्या अवयवांच्या अन्योन्यसंबंधांत पराकाष्ठेचें काठिण्य असतें. गृहपति, जात्याग्रणी, ग्रामाधिकारी, नगरनायक, व राष्ट्राधिपति हे आपापल्या ताब्यांतील प्रजेवर अतिशय सक्तीचा अंमल करितात. अखंड स्वातंत्र्याचा अनुभव त्यांना मात्र मिळत असतो. पारतंत्र्याचें सारें दुःख आज्ञांकितांच्या कपाळीं येतें. तथापि रानटी स्थितींतील सततसंगरावस्थेपेक्षां ही अवस्था शेंकडोंपट बरी. कुटुंबांतील प्रधानपुरु-

षानें इतरांवर, व राजानें प्रजेवर कितीही जुलूम केला, तरी एकंदरीनें समाजावयवांस अशा स्थितींत रानटी स्थितीपेक्षां अधिक सुखोपभोग होतो. या स्थितींत कांहीं काल लोटल्यावर या अनियंत्रित एकाधिकाराच्या कडकपणास कांहीं उतार पडूं लागतो. कुटुंबांत बायकोस व वयांत आलेल्या मुलांस, आणि राज्यांत मोठमोठ्या घराण्यांस कांहीं हक्क मिळूं लागतात, व हळूहळू घरांतील कर्त्या पुरुषाच्या, आणि राष्ट्रांतील राजाच्या, अप्रतिहत सत्तेस त्यांच्या वजनाचा आळा पडूं लागतो. कुटुंबांत कुटुंबसंरक्षणाचा भार कर्त्या पुरुषाच्या डोकीवर पडत असल्यामुळें, राजसत्तेप्रमाणें त्याची सत्ता अगदीं संपुष्टांत येऊं शकत नाहीं, व ती येणेंही इष्ट नाहीं. कारण साधें कुटुंब आणि राज्यकुटुंब यांत एक जबरदस्त भेद आहे; तो हा कीं साध्या कुटुंबांतील प्रजा अल्पवयस्क आणि अज्ञान असते. राज्यकुटुंबाची तशी गोष्ट नाहीं. राजाला वयांत आलेल्या समजूतदार लोकांवर अंमल करावयाचा असतो; त्यामुळें त्याच्याकडून अधिकाराचा फारच दुरुपयोग झाला तर त्याबद्दल त्याला प्रायश्चित्त भोगावें लागतें. बहुतेक देशांतील राजांनीं आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केल्यामुळें कांहीं देशांनीं राजांचे अधिकार अतिशय मर्यादित केले आहेत, व कांहीं देशांनीं तर एकसत्तात्मक राज्यपद्धति मुळींच टाकून देऊन तिच्या ऐवजीं बहुसत्तात्मक किंवा लोकसत्तात्मक राज्यपद्धति स्थापिली आहे. सारांश, समाज सुव्यवस्थित चालण्यास पुरें इतकें पारतंत्र्य ठेवून बाकी होईल तितकें स्वातंत्र्य त्यांतील प्रत्येक व्यक्तीस अनुभवूं द्यावयाचें, असा मानवी सुधारणेचा स्पष्ट कल आहे; व या कलामुळें कुटुंबांत व राज्यांत प्रेम आणि सौजन्य यांची वृद्धि होत आहे. सध्यां सुशिक्षित आईबापें मुलांवर जी प्रीति करतात, सध्यां समाजावयवांत अन्योन्याविषयीं जी कळकळ दृष्टीस पडते, सुधारलेल्या राष्ट्रांतील प्रजेस सध्यां ज्या राजकीय हक्कांचा उपभोग घेतां येत आहे,—ती प्रीति, ती कळकळ, व ते हक्क अस्तित्वांत येण्यास मनुष्यांच्या ज्ञानवृद्धीहून दुसरें कांहीं कारण आहे, असें कोणी ह्मणूं शकेल काय? एकदा जब-

ळच्या आप्तांस किंवा शेजाऱ्यांस ठार मारणें, किंवा फाडून खाणें मनुष्यास अवघड वाटत नसे! आतां पोटच्या पोरास सुद्धां तीव्र शब्दांचा प्रहार करवत नाहीं! पूर्वी अपराध्यास ज्याचा तो मन मानेल तसा दंड करीत असे, व त्याच्यापासून होणाऱ्या बऱ्यावाईट परिणामांचें फळ भोगण्यास तयार असे. आतां क्षुल्लक अपराधाबद्दल देखील कोणी कोणास स्वतः दंडीत नाहीं. तंटा तोडून घेण्यासाठीं सरकारानें नेमिलेल्या तिऱ्हाईत न्यायाधिशाकडे जाण्याची चाल सर्वत्र पडत चालली आहे. परद्रव्याचा अपहार करण्याची बुद्धि, अविश्वास, दीर्घद्वेष, क्रौर्य, निष्कारण निंदा, मात्सर्य, कलहरति वगैरे समाजविघातक दुर्गुणांचा लोप झपाट्यानें होत चालल्यामुळें, प्रत्येकास शांतीचा आणि सुखाचा अधिकाधिक उपभोग मिळूं लागला आहे. हा सारा प्रताप ज्ञानाचा नव्हे तर कशाचा?

आतांपर्यंत ज्ञानापासून होणाऱ्या शारीरिक व सामाजिक सुखांचें दिग्दर्शन केलें. या दोहोंपेक्षांही श्रेष्ठतर असा सुखांचा आणखी एक वर्ग राहिला आहे; तो कोणता ह्मणाल, तर मानसिक सुखांचा. या सुखापुढें वरील सुखें अगदीं तुच्छ आहेत. इतकें खरें आहे कीं, या सुखाची गोडी मनुष्यास सहसा लागत नाहीं. पण जर त्याच्या सुदैवानें त्याला ती एकदा लागली, तर त्याच्यासारखा त्रिभुवनांत सुखी प्राणि मिळावयाचाच नाहीं! पृथ्वीवर ज्ञानाशिवाय अशी दुसरी कोणतीही वस्तु नाहीं, कीं जिचा कंटाळा न येतां, किंवा जिच्यापासून शरीरास किंवा मनास कोणताही व्याधि न जडतां, जिच्या योगानें वृत्ति आमरण आनंदमय राहूं शकेल. जे पुरुष ज्ञानसंपादनांत निमग्न झालेले असतात, त्यांसच या अमोलिक सुखाचा निरंतर लाभ होतो. अलेक्झान्डर, सीझर, नेपोलियन, तैमूरलंग, झांजिझखान इत्यादि जगत्प्रसिद्ध शूरांना ज्या सुखाचा अनुभव कधीं झाला नाहीं; तुर्कस्थान, इराण, चीन, हिंदुस्थान इत्यादि विस्तृत देशांच्या बादशहांस अमर्याद सत्तेपासून किंवा अगणित द्रव्यापासून जें सुख कधींही प्राप्त झालें नाहीं; रमणीय उद्यानें, विशाल मंदिरें यांत जें सांपडावयाचें नाहीं;

जें सुवासांत, सुग्रासांत, किंवा अत्यंत रूपवती स्त्रियांच्या सहवासांत नाहीं; जें दानानें दुणावतें; वार्द्धक्यानें ज्याची वृद्धि होते; अतिसेवनानें ज्याचा वीट न येतां अधिक क्षुत्क्षोभास जें कारण होतें, तें सुख विद्वानास मात्र प्राप्त होतें. लक्ष्मी आणि सरस्वती यांचा नित्य कलह आहे ; लक्ष्मीच्या आराधकांची संख्या अतिशय मोठी; सरस्वतीचा भक्तसमूह अत्यंत मर्यादित; सरस्वतीहून लक्ष्मी प्रसन्न करून घेणें विशेष सुलभ ; सरस्वतीच्या प्रसादापेक्षां लक्ष्मीच्या प्रसादाचें बाह्य स्वरूप अतिशय मोहक; सामान्यतः सरस्वतीपूजकांपेक्षां लक्ष्मीपूजकांस जगांत विशेष मान; असें असतां, एकंदरीनें लक्ष्मीपेक्षां सरस्वती जगाची विशेष उपकर्त्री झाली आहे, असें सुविचाराअंतीं कोणासही दिसून येईल. विश्वाच्या विशाल स्वरूपाच्या विचारांत जो गढून गेला व ज्याला ही पृथ्वी एकाद्या क्षुल्लक वारुळाप्रमाणें दिसूं लागली, त्याला तीवरील कांहीं मुंग्यांस दुसऱ्यांपेक्षां दाणे दोन दाणे अधिक सांपडले, किंवा कांहींस मुळींच न सांपडल्यामुळें रिकामें फिरावें लागलें, ह्मणून खेद होणार आहे काय? इराणची बादशाही पादाक्रांत करून डरायसाच्या सिंहासनावर पाय ठेवतांना वीरशिरोमणी अलेग्झान्डरास जो आनंद झाला असेल, त्यापेक्षां अखिलपरमाण्वंतरगत गुरुत्वाकर्षणधर्म शोधून काढतांना न्यूटनास कमी आनंद झाला असेल, असें आह्मांस वाटत नाहीं ! सीझर, फ्रेडरिक् धी ग्रेट, नेपोलिअन वगैरे अतुलप्रतापी नरसिंहांनीं जे विजयध्वज लाविले, त्यांहून साक्रेटीस, गौतमबुद्ध, शंकराचार्य, ख्रिस्त वगैरे नरपुंगवांचे विजयध्वज विशेष स्पृहणीय, विशेष कल्याणकारक व विशेष चिरस्थाई आहेत, असें आमचें मत आहे. शूर किंवा धनाढ्य पुरुष स्वतःचें किंवा फारच झालें तर आपल्या देशाचें कल्याण चिंतितो; ज्ञानी पुरुषाला समग्र वसुंधरा स्वकीय कुटुंबवत् वाटत असून त्याच्या ज्ञानाचा फायदा सर्व मनुष्यतेस होतो. ज्योतिष्यांनीं, पदार्थवेत्त्यांनीं, राज्यशास्त्रकर्त्यांनीं, व तार्किकांनीं केलेल्या शोधांचा प्रसार पृथ्वीच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत होऊन, त्यापासून होणारा फायदा थोड्या

कालांत सर्व राष्ट्रांस मिळतो; व अशा रीतीनें आपल्या हातून जगाचें कल्याण होत आहे असें मानण्याचा अधिकार ज्यांना प्राप्त झाला असेल, त्यांच्या मनास होणाऱ्या समाधानाची खरी थोरवी, आणि त्याचें खरें स्वरूप कोण सांगूं शकेल? द्रव्य, स्त्री, भूमि इत्यादिकांच्या प्राप्तीसाठीं अहर्निश अश्रांत परिश्रम करणाऱ्याच्या मनास जसें स्वास्थ्य असत नाहीं, त्याप्रमाणें एखादा बिकट शास्त्रीय प्रश्न सोडविण्यांत व्यग्र झालेल्याच्या मनासही स्वास्थ्य असत नाहीं. पण पहिल्याच्या आणि दुसऱ्याच्या अस्वास्थ्यांत विलक्षण अंतर असतें. पहिल्याच्या अस्वास्थ्यांत कधीं भीति, कधीं मत्सर, कधीं दुर्लौकिक, या दुष्ट मनोविकारांचें मिश्रण असतें. विद्वानाचें अस्वास्थ्य या विकृतींपासून अत्यंत निर्लेप असतें. ऐहिक वस्तूंस अविनाशी मानून त्यांवर अमर्याद प्रेम ठेवणाऱ्या अज्ञान प्रापंचिकास त्यांचा वियोग झाला असतां अनन्वित दुःख होतें. विद्वानास अशा वस्तूंचा संयोग आणि वियोग अपायकारक होत नाहीं; कारण त्यांच्या क्षणभंगुरत्वाविषयीं त्याची खात्री झाली असल्यामुळें, तो त्यांच्याविषयीं उदासीन असतो. गुरेंराखी गुरें हांकतात, पंतोजी मुलांस धाकांत ठेवितात, व जुलमी राजे प्रजेस आज्ञेंत ठेवितात. पण चाबकानें, काठीनें, किंवा तरवारीनें अंमल चालविण्यांत मनुष्यास फारसें भूषण आहे, असें नाहीं. ज्यानें आपल्या बुद्धिसामर्थ्यानें व साधुत्वानें जगास वश केलें, तो खरा शास्ता; व त्याचा अंमल खरोखर भूषणावह होय. तसेंच अंमल करणाऱ्यांस जें समाधान होतें, व जें मोठेपण वाटतें, तें ज्या तऱ्हेच्या प्रकृतींवर अंमल करावयाचा असेल त्यांच्या योग्यतेप्रमाणें कमीअधिक होतें. दुर्बुद्ध जनावरांवर, अज्ञान मुलांवर, व भित्र्या प्रजेवर अंमल करणारांची थोरवी काय, व त्यांना समाधान कसलें होणार? कॉमटी, मिल्ल, शंकराचार्य यांसारख्या पंडितांनीं राज्यविषयक, नीतिविषयक, व धर्मविषयक वादांत मिळविलेला जय, आणि व्यवहारज्ञ, शास्त्रज्ञ, व धर्मज्ञ यांच्या मनांवर बसविलेला अंमल—यांस मात्र जय आणि अंमल हीं नांवें यथार्थ आहेत. पण या सर्व पराक्रमांहून ज्ञानाचा

आणखी एक पराक्रम आहे, त्यापुढें बाकीचे सारे निस्तेज दिसूं लागतात! ज्ञानाच्या योगानें मनुष्यास मृत्यूचें भय नाहींसें होतें. अज्ञान मनुष्यास प्रत्येक बाह्य वस्तु अविनाशी वाटत असून तिजवर त्याचें उत्कट प्रेम जडलेलें असतें. यामुळें तिचा आणि त्याचा वियोग झाला, तर त्याला पराकाष्ठेचें दुःख होतें. कोणत्याही वस्तूच्या वियोगापासून होणारें दुःख त्या वस्तूवर असलेल्या प्रेमाच्या मानानें होतें. धनलोभ्यास पैसा बुडाला असतां, भार्यारतास भार्येचा वियोग झाला असतां, पुत्रवत्सलास पुत्राला मृत्यु आला असतां, अत्यंत दुःख होतें. पण ज्याला या सर्व वस्तु विनाशी आहेत असें ज्ञान झालें आहे, त्याला त्यांच्या वियोगापासून इतका खेद होत नाहीं. ज्याला आरंभ व वृद्धि आहे, त्याचा केव्हां तरी ऱ्हास झालाच पाहिजे, हें तत्व ज्याच्या मनांत पूर्णपणें खिळलें असेल, त्याला आप्तांच्या मरणाचेंचसें काय, पण स्वतःच्या मरणाचें सुद्धां भय वाटेनासें होईल. फुटणारें केव्हां तरी फुटणार, जळणारें जळणार, मोडणारें मोडणार, व मरणारें मरणार. मृत्तिकेचा घट फुटला म्हणून ज्याप्रमाणें शोक करीत बसणें नीट नाहीं, त्याप्रमाणें पंचभूतांपासून निर्माण झालेला देह फिरून पंचतत्वांस मिळाला, म्हणून शोक करण्यांत अर्थ नाहीं. ज्याप्रमाणें तेल सरलें कीं दिवा मालवलाच पाहिजे, त्याप्रमाणें ज्या कारणांच्या संयोगानें जीवित्वास आरंभ होऊन त्याचें वर्धन होत असतें, त्यांचा वियोग झाला कीं देहावसान झालेंच पाहिजे. ज्याच्या अंतःकरणांत कार्यकारणांचा अन्योन्य संबंध नीट बिंबून गेला, त्याला मृत्यूची फारशी भीति वाटावयाची नाहीं. हा संबंध समजण्यास ज्ञानाशिवाय दुसरें साधन नाहीं.

याशिवाय ज्ञानाचें आणखी एक असाधारण सामर्थ्य आहेः तें हें कीं, त्याच्या योगानें मनुष्यास एक प्रकारचें अमरत्व प्राप्त होतें. व्यासवाल्मीकि, मनुयाज्ञवल्क्य, बुद्धशंकराचार्य, ख्रिस्तसाक्रेटीस हे ज्ञानवान् सत्पुरुष होऊन गेल्यास अनेक वर्षें लोटलीं; पण त्यांच्या नांवांचा विसर जगास अजून पडला नाहीं, व पुढेंही पडेल असें वाटत नाहीं. कीर्तिरूपानें हे निरंतर रहाणार. जुने

ग्रीक लोक गेले; पण होमर, डिमॉस्थेनीस आणि आरिस्टॉटल हे अद्यापि आहेत. जुने रोमन लोक गेले; पण व्हर्जिल, सिसरो आणि जस्टीनिअन हे अद्यापि आहेत. पृथ्वीतलावर मनुष्याची उत्पत्ति झाली, त्याच वेळीं ज्ञाननदी उगमस्थानीं अतिसूक्ष्मरूपानें आविर्भूत झाली. तेव्हांपासून आतांपर्यंत तिचें पात्र, ठिकठिकाणचे प्रवाह त्यांत येऊन मिळाल्यामुळें, वाढत चाललें आहे, व त्यांत प्रत्येकाच्या विशिष्ट वर्णाची कांति मधून मधून स्पष्टपणें दृग्गोचर होत असल्यामुळें, त्याला अत्यंत स्पृहणीय वैचित्र्य व रमणीयत्व आलें आहे. कालांतरानें या ज्ञाननदीस महानदत्व प्राप्त होऊन ती अनंतसहस्रमुखांनीं मुखोदधीस जाऊन मिळेल, अशी विचारशील मनास भावना होते.

---

# कवि, काव्य, काव्यरति.

अहोरात्र मोठमोठ्या राजकीय प्रकरणांनीं ज्यांचें मन व्यग्र केलें आहे, अवाढव्य व्यापारविस्ताराची व्यवस्था पहातां पहातां ज्यांना जेवणास सुद्धां पुरेशी फुरसत सांपडत नाहीं, शास्त्राभ्यासांत गढून गेल्यामुळें प्रपंचसुखाविषयीं ज्यांना वैराग्य उत्पन्न झालें आहे, अथवा प्रपंचाच्या काळजींत जे अगदीं चूर होऊन गेले आहेत—अशांपैकीं प्रत्येकास केव्हां केव्हां सवडींत सवड करून घटकाभर एकादें नाटक किंवा काव्य हातांत घ्यावें, असें कां वाटतें? आपल्या आयुष्याचीं पूर्ण पन्नास वर्षें ज्यानें इंग्लंडच्या राजकीय घडामोडींत घालविलीं, त्या ग्लाडस्टनाला अजूनही एकादे दिवशीं ‘होमर’ वाचण्याची इच्छा कां होते? लढाईच्या सामानाबरोबर सफॉक्लीज वगैरेंचीं नाटकें आलेग्झांडर कां बाळगी? तास दोन तास कथाश्रवण करण्यासाठीं शिवाजी आपला जीव वारंवार धोक्यांत कां घाली? ‘उत्तररामचरिता’ च्या कर्त्याचें नांव संस्कृतज्ञ अद्यापि प्रेमानें कां स्मरतात? किर्लोस्करकृत ‘सौभद्रा’ ला झुंडीच्या झुंडी कां लोटतात? ‘नाटकें करावीं’ असा अभिप्राय कै० विष्णुशास्त्र्यांनीं कां दिला? पाश्चिमात्य पाठशालांत, व

इंग्रजांनीं या देशांत स्थापिलेल्या शाळांत प्राचीन व अर्वाचीन कवींचीं काव्यें विद्यार्थ्यांकडून वाचविण्याचा परिपाठ कां पडला आहे ?

वरील प्रश्नांचें समाधान होण्यासारखें उत्तर ज्यास देतां येईल, त्यास काव्यरसांचें इंगित समजलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

कोणी असें ह्मणतात कीं, काव्यांत जी पद्यरचना असते, ती कर्णमनोहर असते, ह्मणून काव्यवाचनापासून मनुष्यास आनंद होतो. यावर कित्येकांचा असा आक्षेप आहे कीं, 'अमरा' सारख्या ग्रंथांत पद्यरचना असतांही, त्यास कोणी काव्य ह्मणत नाहीं, तेव्हां पद्यरचनेंत काव्यात्मा नाहीं. कोणी असें ह्मणतात कीं, काव्य हें मनुष्यस्वभावाचें आणि सृष्टीचें हुबेहुब चित्र आहे, ह्मणून त्याचें वाचन मनुष्यास आल्हाद देतें. यावर कित्येकांचा असा आक्षेप आहे कीं, वैद्यकादि ग्रंथांत वनस्पत्यादिकांच्या गुणांचीं व धर्मांचीं जीं हुबेहुब वर्णनें आहेत, त्यांस कोणी काव्य ह्मणत नाहीं, त्याअर्थीं मनुष्याच्या किंवा सृष्टीच्या यथार्थ वर्णनांत काव्यात्मा आहे, असें ह्मणतां येत नाहीं. शिवाय काव्य हें मनुष्याच्या स्वभावाचें यथार्थ वर्णन असेल, तर त्यांत पद्यरचना कधींच उपयोगाची नाहीं. कारण सुखदुःखादि कोणत्याही मनोविकारांचा कितीही अतिरेक झाला तरी, तत्संबंधी उद्गार वृत्तबद्ध निघत नाहींत; आणि काव्यांत तर गद्यापेक्षां पद्यरचनाच विशेष आढळते. तेव्हां काव्य हें आहे तरी काय ? कवींना इतकें मोठेंपण येण्याचें कारण काय ? चांगल्या काव्यांच्या वाचनानें आनंद कां होतो ? हे प्रश्न पुनः निरुत्तर राहिल्यासारखे दिसतात.

आमच्या मतें जो कोणी क्षणभर अंतर्दृष्टि करून या प्रश्नांचा शांतपणें विचार करील, त्याला त्यांचें बरोबर उत्तर तेव्हांच देतां येईल. काव्यांत बहुशः पद्यरचना असते, तथापि कांहीं प्रकारच्या गद्यांतही काव्यगुण असतात; तसेंच 'काव्य' हें मनुष्याच्या स्वभावाचें आणि सृष्टीचें यथार्थ वर्णन आहे,—वगैरे 'काव्य' शब्दाच्या अर्थनिर्णायक प्रत्येक प्रयत्नांत थोडथोडें सत्य आहे.

त्यांत समग्र सत्य नाहीं, ह्मणून ते समाधानकारक होत नाहींत. त्यांत कांहीं तरी न्यूनता आहे असें वाटतें; पण ती कोठें आहे हें समजत नाहीं. काव्यवाचनापासून आनंद होतो, हें निर्विवाद आहे. तो ज्या कारणांनीं होतो, त्यांची मीमांसा मात्र संशयाकुल आहे.

काव्याचें खरें स्वरूप लक्षांत येण्यासाठीं मनुष्याच्या मनोधर्मांचा थोडासा विचार करणें जरूर आहे. जागृतावस्थेंत मन चंचल असतां त्यांत जे व्यापार चालतात, त्यांचे 'संवेदना,' 'इच्छा,' व 'ज्ञान' असे तीन वर्ग करतां येतील. या तीन अनुभवांस 'मन' ही संज्ञा आहे. या तिहींपैकीं पहिल्याशीं काव्याचा विशेष संबंध आहे. संवेदना दोन प्रकारची आहे: प्रतिकूल व अनुकूल. प्रतिकूल संवेदनेस आपण दुःख म्हणतों, व अनुकूल संवेदनेस सुख ह्मणतों. ज्यापासून प्रतिकूल संवेदना उत्पन्न होतात, तें आपणांस आवडत नाहीं; ज्याच्यापासून अनुकूल संवेदना होतात, तें आपणांस प्रिय होतें. कारण दुःखाचा कंटाळा आणि सुखाचा अभिलाष, या मनुष्याच्या मनाच्या स्वाभाविक वृत्ति आहेत. इतर सुखद वस्तूंप्रमाणें काव्यापासून आपणांस अनुकूल संवेदना होतात, ह्मणून तें आपणांस आवडतें. ज्या लेखरचनेपासून वाचकांस ज्ञान करून देण्याचा हेतु असतो, तींत काव्य नसतें. जी रचना वाचकांच्या अंतःकरणांत अनुकूल संवेदना उत्पन्न करण्याकरितां केलेली असते, ती काव्य होय. वास्तविक पाहतां कोणतीही लेखरचना केवळ अनुकूल संवेदना उत्पन्न करण्यासाठीं, किंवा केवळ ज्ञान करून देण्यासाठीं केलेली असत नाहीं. ज्ञान करून देण्यासाठीं लिहिलेलीं पुस्तकें मनोरंजक करण्याचा प्रयत्न केलेला असतो; मनोरंजक पुस्तकांत जातां जातां थोडेंसें ज्ञान देण्याचा प्रयत्न असतो. मृदुता किंवा रमणीयता हा काव्याचा प्रधान गुण; काठिण्य किंवा कर्कशता हा शास्त्रीय ग्रंथांचा प्रधान गुण. शास्त्रीय ग्रंथांस थोडी मृदुता आणल्यानें त्यांचें अध्ययन कष्टावह होत नाहीं. काव्यांत कोठें काठिण्य येऊं दि-

लेलें असतें, तें वाचकांस आनंदाबरोबर थोडें ज्ञानही करून देण्याच्या हेतूनें येऊं दिलेलें असतें.

पुढें जें सांगावयाचें आहे, त्यासंबंधानें गैरसमज होऊं नये ह्मणून येथें इतकें स्पष्ट करणें जरूर आहे कीं, 'काव्य' शब्दांत आह्मीं नाटकादि सर्व सुखोत्पादक लेखांचा समावेश केला आहे, व 'कवि' शब्दांत असले लेख लिहिणाऱ्या नाटककारादि सर्व लोकांचा समावेश केला आहे. मनुष्यांच्या विचारांत, प्रत्यक्ष अनुभवांत किंवा लेखांत बाह्य सृष्टि किंवा अंतःसृष्टि याशिवाय दुसरा कोणता विषय असूं शकणें शक्य नाहीं. कारण, या दोन सृष्टि सांगितल्या ह्मणजे कल्पनीय वस्तूंची परमावधि झाली. या दोन सृष्टींबाहेर आह्मी जाणार कोठें? व विचार कशाचा करणार? मनांतील अनंत व्यापार, यांपैकीं एक किंवा अनेक, हेच आमच्या सुखानुभवाचे आणि ज्ञानाचे विषय असले पाहिजेत. तसेंच, ज्याप्रमाणें ज्ञान म्हणजे अंतर्बाह्य सृष्टींतील वस्तूंचा यथार्थ निर्णय, त्याप्रमाणें काव्यही अंतर्बाह्य सृष्टींतील वस्तूंचा यथार्थ निर्णयच आहे. शास्त्रीह ग्रंथांतल्याप्रमाणें काव्यांतही वस्तूंचें हुबेहूबच वर्णन केलें पाहिजे. ज्याप्रमाणें शास्त्रीय ग्रंथांला, त्याप्रमाणेंच काव्यालाही याच गुणानें माहात्म्य, सारता, व महार्घता येते. ज्यांत सत्यनिरूपण नाहीं, तो शास्त्रीय ग्रंथ जसा कवडीच्या मोलाचा, त्याप्रमाणें ज्यांत सत्यनिरूपण नाहीं, असा काव्यग्रंथही कवडीच्या मोलाचा. दोघांचाही सत्यकथनावर, यथार्थ वर्णनावर, किंवा हुबेहूब चित्र काढण्यावर, सारा कटाक्ष आहे. भेद इतकाच आहे कीं, शास्त्रीय ग्रंथांतील विषय व त्यासंबंधानें सत्य सांगण्याची पद्धत, हीं काव्यांतील विषय आणि त्यासंबंधानें सत्य सांगण्याची पद्धत, यांहून निराळीं असतात.

मनुष्यांच्या दुःखांचा परिहार व सुखांची वृद्धि करण्याचें सामर्थ्य ज्ञानाच्या अंगीं आहे, ह्मणूनच मनुष्यें त्याच्या पाठीमागें लागलीं आहेत. तसें नसतें तर त्याचा नाद त्यांना कधींच न लागता. ज्ञान हें मनुष्यांच्या सुखाचें प्रधान साधन आहे. तथापि तें झाल्याबरोबर त्यापासून सर्वांस सुख होऊं लागेल असें नाहीं.

सुखावह होण्यास त्यास अनुकूल संवेदनोत्पादक व्हावें लागतें. जोंपर्यंत त्याला हें नूतन स्वरूप आलें नाहीं, तोंपर्यंत तें काव्यविषय होऊं शकत नाहीं; कारण अनुकूळ संवेदनोत्पादक असणें—हा काव्याचा प्रधान गुण आहे. आज ज्या कित्येक गोष्टींचें ज्ञान फक्त तत्त्ववेत्त्यांसच आनंद देत आहे, तें कालांतरानें सर्व जनास आनंददायक होईल. परंतु तें तसें होऊं लालागण्यापूर्वी बराच अवधि लोटला पाहिजे. तो लोटला कीं तें सुखोत्पादक होऊन कवीच्या मार्‍यांत सांपडणार! यावरून काय सिद्ध झालें कीं, आज ज्या गोष्टी शास्त्रीय ग्रंथांत कोंडून राहिल्या आहेत त्या, व तेथून पुढें ज्यांचा शोध शास्त्रवेत्ते करतील त्या, अवश्य काळ गेला म्हणजे काव्यविषय होऊं शकतील. आजपर्यंत असेंच होत आलें आहे. आंग्लभौम राजकवि लार्ड टेनिसन याचें "प्रिन्सेस" नामक काव्य, (ज्याचें डा० कीर्तिकर यांनीं मराठींत भाषांतर करून तें "इंदिरा" या नांवानें प्रसिद्ध केलें आहे,) या नियमाचें उदाहरण आहे. हा नियम खरा असेल तर, ज्ञानप्रसार होऊं लागला म्हणजे कवित्वशक्तीस मांद्य येतें असा जो कित्येकांनीं साहसाचा अभिप्राय दिला आहे, तो खोटा ठरतो. इंग्लंडांतील प्रसिद्ध ग्रंथकार डाक्टर जॉनसन् यानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, काव्य करण्याजोगे नामी नामी विषय जगांतील जुने कवि लाटून बसल्यामुळें, अर्वाचीन कवींस मनोरंजक काव्यें लिहिण्यासारखे विषयच राहिले नाहींत! शास्त्रप्रसार काव्यरचनेस घातक आहे, हें विलक्षण मत मेकालेनें कोठेंसें ठोकून दिलें आहे! काव्यास अलीकडे जें थोडेंसें मांद्य आल्यासारखें दिसतें, त्याचें कारण, अर्वाचीन ज्ञानप्रसार नव्हे, तर अर्वाचीन ज्ञानप्रसारामुळें काव्यवस्तु करण्याजोगे जे नवीन विषय उत्पन्न झाले आहेत, त्यांचा अर्वाचीन कवि काव्यरचनेंत उपयोग न करतां प्राचीन कवींच्या काव्यविषयांवर फिरून फिरून लिहितात, व त्यांच्या भाषेचें अनुकरण करतात, हें आहे. ज्यांनीं असें केलेलें नाहीं, त्यांचीं काव्यें वाचकांस प्रिय झालीं आहेत, व पुढें जे असें करणार नाहींत, त्यांचींही काव्यें

वाचकांस प्रिय होतील, याबद्दल आम्हांस मुळींच संशय नाहीं. शिवाय, प्रत्येक शतकांत महातत्त्ववेत्ता निघणें जसें संभवत नाहीं, त्याप्रमाणें महाकवि निघणें हेंही संभवत नाहीं. जसा इंग्लंडांत आजपर्यंत एकच शेक्सपियर होऊन गेला, त्याप्रमाणें बेकनही एकच होऊन गेला! हिंदुस्थानांतही अद्यापपावेतों भास्कराचार्यास किंवा कालिदासास प्रतिस्पर्धी भेटला नाहीं! हाताचीं बोटच घालून महाकवींची संख्या मोजूं लागलों तर भरतखंडांत अनामिकेपुढें, व इतर देशांत तर करांगुलीपुढें, जातां येणार नाहीं असें वाटतें!

वर जें सांगितलें आहे, त्यावरून शास्त्रीय ग्रंथांप्रमाणें काव्यांतही सत्यकथन असतें, हें वाचकांच्या ध्यानांत येईल, अशी आशा आहे. कवि जें सत्य सांगतो, तें शास्त्रीय सत्याप्रमाणें गूढ नसतें. शास्त्रीय सत्यांपैकीं कांहीं सत्यें इतकीं गूढ असतात कीं, तीं समजण्यास तपांच्या अध्ययनाची अवश्यकता असते. तसेंच शास्त्रांत कधीं कधीं विशेष कारणासाठीं अगदीं क्षुल्लक सत्यें सांगितलेलीं असतात. या दोन्हींही सत्यांचा काव्यांत उपयोग होत नाहीं. ‘उष्णता, प्रकाश, व विद्युत्—हीं गतीचीं निरनिराळीं रूपें होत,’ हें सत्य काव्यविषय होण्यास आणखी शेंकडों वर्षें लोटलीं पाहिजेत. तसेंच, ‘बाभळीला कांटे असतात,’ ‘मासे समुद्रांत राहतात,’ ‘पावल्याची उसळ फार खाल्ल्यानें अपचन होऊन वायु सरतो’—असलीं सत्येंही काव्याच्या कामाचीं नाहींत! काव्यांत जीं सत्यें गोंवायाचीं, त्यांची योग्य निवड करण्यास कवीस पराकाष्ठेचे श्रम पडतात. जीं समजण्यास मुळींच श्रम पडत नाहींत, अशीं उपयोगी नाहींत; जीं समजण्यास फार श्रम पडतात, अशींही पण उपयोगी नाहींत. तीं या दोहोंच्या दरम्यान असून, अनुकूल संवेदनोत्पादक असलीं पाहिजेत. यावर कोणी अशी शंका घेतील कीं, काव्यांत वर्णिलेलीं सत्यें नेहमीं अनुकूल संवेदनोत्पादक असलीं पाहिजेत, हें मत खरें असेल, तर काव्यांत दुःखपर्यवसायी नाटकांचा, किंवा अवर्षणादि अरिष्टांच्या वर्णनांचा समावेश कधींच करतां येणार नाहीं. का-

रण दुःखपर्यवसायी नाटकें पाहिल्यानें व अरिष्टांचीं वर्णनें वाचल्यानें मनास आनंद न होतां उलट दुःख होतें. कांहीं अंशीं ही शंका बरोबर आहे; पण थोड्या विचाराअंतीं तिचें निरसन होण्यासारखें आहे. दुष्काळांत अन्न न मिळाल्यामुळें होणाऱ्या यातनांचा प्रत्यक्ष अनुभव आणि त्या यातनांच्या वर्णणाचें वाचन किंवा श्रवण; कामिजनास होणाऱ्या क्लेशांचा प्रत्यक्ष अनुभव आणि त्यांच्या क्लेशांच्या वर्णनाचें वाचन किंवा श्रवण, या आणि याप्रमाणें इतर सर्व गोष्टींपासून होणाऱ्या सुखदुःखांचा प्रत्यक्ष अनुभव आणि त्यांच्या वर्णनांचें वाचन किंवा श्रवण—यांत फार अंतर आहे. प्रत्यक्षानुभवाची तीव्रता वाचनांत किंवा श्रवणांत कधींही येऊं शकणार नाहीं; आणि तसें होऊं लागलें तर प्रतिकूल संवेदनोत्पादक काव्यें कोणी हातीं धरणार नाहीं. उतार वयांत नवानवसांनीं झालेलें अपत्य मरण पावलें असतां मातापितरांस जें दुःख होतें, तेंच दुःख जर त्याच्या वर्णनापासून किंवा अभिनयापासून होऊं लागलें, तर तें वर्णन कोण हातांत घेईल ? किंवा तो अभिनय पहाण्यास कोण जाईल ? एकाद्या दुर्गम आणि निर्भय अशा उंच ठिकाणीं बसून खालीं चाललेली लढाई पाहण्यानें मनावर ज्या प्रकारचे विकार होण्याचा संभव आहे, त्या प्रकारचे विकार दुःखपर्यवसायी कथेच्या वाचनापासून होतात. सर्व मनुष्यांच्या मनोवृत्ति एकाच तऱ्हेच्या असल्यामुळें, एकास झालेलें दुःख किंवा सुख त्याच्या बाह्य चिन्हांवरून, वर्णनावरून, किंवा अभिनयावरून, दुसऱ्यास समजून येतें, हें खरें आहे. पण या समजून येण्यांत आणि प्रत्यक्षानुभवांत फार अंतर आहे. तरवारीसारख्या शस्त्राचें मर्मापर्यंत चरचर कांपीत जाणें आणि फक्त अंगाला चाटणें, यांत जो फरक आहे, तो प्रत्यक्ष सुखदुःखांत आणि त्यांच्या चित्रांत आहे. कवीची सारी करामत हुबेहूब चित्र काढण्यांत आहे; मूळ उत्पन्न करण्यांत नाहीं. ते मूळ उत्पन्न करूं लागतील तर त्यांच्या दुःखोत्पादक कृतीकडे कोणी ढुंकूनही पहाणार नाहीं. असो; पण हा सगळा वाचकांच्या किंवा प्रेक्षकांच्या सुखःदुखा-

विषयीं विचार झाला. दुःखपर्यवसायी काव्य लिहितांना खुद्द कवीच्या मनाची काय स्थिति होते, हा प्रश्न अजून राहिलाच आहे. कोणत्याही प्रकारचें काव्य रचतांना किंवा त्यांतील विषयांचा विचार करतांना कवीस जे आयास होतात, ते प्रत्यक्ष आयासांहून बरेच क्षीण असतात. सुखदुःखाचा प्रत्यक्ष अनुभव आणि सुखदुःखावर पुनः पुनः विचार करून तीं आपणांसच होत आहेत असा भास करून घेण्याचा प्रयत्न,—यांत पुष्कळ अंतर आहे. धनलोभ्याचें धन एकाएकीं नाहींसें झालें असतां त्याला ज्या यातना होतात, त्या प्रत्यक्ष यातना कवि आपणास धनलोभी समजून व आपलें सारें वित्त एकाएकीं नष्ट झालें आहे असें समजून, द्रव्यनाशानें खऱ्या धनलोभ्याला होणाऱ्या दुःखाचें प्रतिबिंब आपल्या मनावर उठवून घेण्यासाठीं त्या दुःखाचें एकसारखें चिंतन करतो, व त्यामुळें कांहीं वेळानें त्याच्या मनाची वृत्ति धनलोभ्याच्या वृत्तीसारखी होऊन धनलोभ्याला होणाऱ्या यातनांची बरीच छाया त्याच्या मनावरही पडूं लागते. अशा प्रकारें उत्पन्न केलेल्या दुःखाच्या छायेस अप्रत्यक्ष दुःख असें ह्मणतां येईल. ज्याला ही छाया हवी तितकी दाट पाडून घेतां येत असेल, त्याच्या अंगीं कवित्वगुणांपैकीं श्रेष्ठ गुण आहे, असें ह्मणतां येईल. विचारानें प्रत्यक्ष सुखदुःखाच्या तीव्रतेचें पूर्ण प्रतिबिंब आपल्यावर उठवून घेणें याचेंच नांव तादात्म्य, तंद्री, किंवा एकतानता. ज्याला सुखदुःखाचा प्रत्यक्ष अनुभव होत आहे, त्याच्या मनाप्रमाणें कवीच्या मनाची स्थिति झाल्याशिवाय त्याच्या काव्यांत तो तो रस पूर्णपणें उतरणार नाहीं. रसाची परिपक्वता अगोदर कवीच्या मनांत झाली पाहिजे. ती तशी झाली तरच त्याला ती काव्यांत आणण्याचा प्रयत्न करतां येईल; कारण, जर आडांतच पाणी नसलें, तर तें पोहऱ्यांत कोठून येणार? कवीला ज्या विषयाशीं आपल्या मनाची तंद्री लावून घ्यावयाची असते, तो विषय अनुकूल संवेदनोत्पादक असो, कीं प्रतिकूल संवेदनोत्पादक असो, त्याला जे कष्ट पडतात, ते उभयपक्षीं सारखेच असतात. कवीचें मन पोटोग्राफ घेण्यासाठीं तयार

१४८५० | विविध / ३३



केलेल्या भिंगाप्रमाणें असतें. ज्याप्रमाणें हवा तेवढा प्रकाश अनुकूल असला म्हणजे पाहिजे त्या पदार्थाचें हुबेहूब प्रतिबिंब त्या भिंगावर पाडतां येतें, त्याप्रमाणें ज्या कवीला आपली कल्पना हवी तितकी प्रज्वलित करतां येते, त्याला तिच्या रश्मींनीं आपल्या मनावर पाहिजे त्या विषयाची मुळाबरहुकूम छाया पाडतां येते. कल्पना प्रज्वलित होऊन कल्पनाविषयांशीं तादात्म्य होणें— यांतच कवींचा आणि काव्यवाचकांचा आनंद आहे. बीजगणितांतील किंवा भूमितींतील एकाद्या कूट प्रश्नांत बुद्धि व्यग्र होऊन गेली असतां तींत जें चांचल्य उत्पन्न होतें तें तत्त्वशोधकास जसें अत्यंत आनंददायक असतें, त्याप्रमाणेंच सुखदुःखोत्पादक विषयांचें हुबेहूब आकलन करण्यासाठीं भरधांव सोडलेल्या कल्पनेच्या चांचल्यापासून कवींना व काव्यवाचकांना अत्यानंद होतो. असें जर नसतें, तर दुःखपर्यवसायी काव्यें कवि मुळींच न लिहिते, व वाचक तीं मुळींच न वाचते. तेव्हां सिद्ध काय झालें कीं, काव्य दुःखपर्यवसायी असो कीं सुखपर्यवसायी असो, त्यांतील रसापासून उत्पन्न होणारा आनंद सारखाच असतो; आणि याच कारणामुळें कॉमेडी आफ एरर्स ( भ्रांतिकृत चमत्कार ) इतकींच आथेलो वाचण्याला, किंवा त्याचा प्रयोग पहाण्याला, आमचीं मनें उत्सुक असतात. तर मग दुःखपर्यवसायी आणि सुखपर्यवसायी काव्यांच्या वाचनांत किंवा प्रयोगदर्शनांत मुळींच भेद नाहीं कीं काय, असा प्रश्न सहज उत्पन्न होतो. त्यास इतकेंच उत्तर आहे कीं, भेद आहे; मुळींच नाहीं असें नाहीं; पण तो फार थोडा आहे. काव्यवाचनांत किंवा त्यांचा प्रयोग पाहण्यांत एकमेकांपासून अगदीं भिन्न असे दोन मानसिक व्यापार चाललेले असतात. एक, कल्पनाशक्ति प्रज्वलित होऊन ती मनाचें काव्यवस्तूशीं तादात्म्य करण्यासाठीं झटत असते; दुसरा, इंद्रियांपुढें प्रत्यक्ष असणाऱ्या, किंवा कल्पनेनें निर्माण केलेल्या काव्यवस्तु आपापल्या स्वभावाप्रमाणें वाचकांच्या व प्रेक्षकांच्या अनुकूल व प्रतिकूल संवेदनांस अंशतः कारण होत असतात. यामुळें दुःखपर्यवसायी काव्य वाचीत असतां किंवा त्याचा प्रयोग पहात असतां, वृत्तीला थोडीशी खिन्नता उत्पन्न

टिळक ग्रंथसंग्रहालय
दा.क्र. 14850

होते, आणि सुखपर्यवसायी काव्य वाचीत असतां वृत्तीला थोडा-सा आनंद होतो. अप्रबुद्ध लोकांना पहिल्या व्यापारापासून होणाऱ्या आनंदाची मुळींच कल्पना नसते. यामुळें दुःखपर्यवसायी नाटक पहाणें त्यांना आवडत नाहीं.

आतांपर्यंत जें सांगितलें आहे त्यावरून तत्त्वशोधकाप्रमाणें कवीचेंही, एका प्रकारच्या सत्यांचा निर्णय करणें, आणि तीं सांगणें, हें काम आहे. हें काम बजावण्यासाठीं कवीस आपली कल्पना प्रज्वलित करून काव्यवस्तूंशीं आपल्या मनाचें तादात्म्य करून घ्यावें लागतें. काव्यवस्तु कोणत्याही प्रकारची असो, या तादात्म्यापासून होणारा आनंद सारखाच असतो. कवींच्या यथार्थ वर्णनांनीं काव्यवस्तूंशीं वाचकांच्या आणि प्रेक्षकांच्या मनांच तादात्म्य झालें तर त्यांनाही कवींसारखाच आनंद होईल. काव्यवस्तु कोणत्याही प्रकारची असो, तिच्या चिंतनांत व्यग्र झालेल्या कवीच्या किंवा वाचकांच्या कल्पनेस जें चांचल्य येतें, तें आनंदमय आहे. काव्य वाचीत असतां किंवा त्याचा प्रयोग पहात असतां वृत्तींत कधीं कधीं जी खिन्नता उत्पन्न होते ती, वृत्ति एकीकडे एकताननतानंदांत गढली असतां इंद्रियांपुढें प्रत्यक्ष असणाऱ्या, किंवा कल्पनेनें निर्माण केलेल्या, भयंकर काव्यवस्तु दुसरीकडून तींत प्रतिकूल संवेदना उत्पन्न करीत असतात, ह्मणून होते. सारांश, काव्य दुःखपर्यवसायी असो किंवा सुखपर्यवसायी असो, तें रचण्यांत कवीला, आणि तें वाचण्यांत वाचकाला आनंदच आहे. या आनंदांत, काव्यवस्तूचें बाह्य स्वरूप रमणीय असल्यास थोडीशी भर पडते, व तें भयंकर असल्यास त्याला किंचित् छाट बसतो—इत्यादि गोष्टी वाचकांच्या ध्यानांत येतील अशी आशा आहे.

काव्याच्या वाचनापासून राजापासून रंकांस, तत्त्ववेत्त्यापासून अत्यंत अल्पशिक्षित मनुष्यास, सर्व स्थितींत आनंद होण्यास अनेक कारणें आहेत. एक तर कवींच्या वाणींतून जे बोल निघत असतात, त्यांच्या सत्यतेविषयीं प्रत्येक अंतःकरण साक्ष देत असतें. जीं सत्यें देशकालादिकांनीं मर्यादित, किंवा जीं सत्यें बहुश्रुतांस मात्र समजणार, अशीं सत्यें कवि कधींच सांगत बसत

नाहीं. ज्या मनुष्याची रानटी अवस्था सुटली आहे, ज्याला मानवी स्वभावाचें किंचित् ज्ञान प्राप्त झालें आहे, ज्याच्या मनावर बाह्य सृष्टीच्या सौंदर्याचा परिणाम होऊं लागला आहे, असा मनुष्य कोणत्याही देशांत रहात असो, किंवा कोणत्याही शतकांत जन्मास आला असो, महाकवींच्या सत्यमय रसाळ उद्गारामृताचें सेवन करण्यास तो योग्य असतो. काव्यापासून आनंद होण्याचें दुसरें कारण असें आहे कीं, साधारण मनुष्यास ज्या गोष्टी अव्यक्त असतात, त्या कवि त्यास व्यक्त करून देतो. 'जितक्या मूर्ति तितक्या प्रकृति' अशी आपल्या लोकांत म्हण आहे. या म्हणीचा अर्थ इतकाच कीं, प्रत्येक मनुष्याचा स्वभाव निराळा असल्यामुळें सर्वांच्या स्वभावांचें ज्ञान होणें अशक्य आहे. तथापि ज्याअर्थी सर्व मनुष्यांस आपण 'मनुष्य' या एका वर्गाखालीं मोडतों, त्याअर्थी त्या सर्वांत साधारण असे कांहीं गुण असलेच पाहिजेत. या साधारण गुणांचें अति स्वल्प ज्ञान बहुतेकांस असतें; व तें असतें म्हणून काव्यवाचनापासून त्यांस आनंद होतो. कित्येक मनुष्य पराकाष्ठेचे रागीट असतात, कित्येक शांत असतात, कित्येक मायाळू असतात, कित्येक लोभी असतात, कित्येक क्रूर असतात, कित्येक कामातुर असतात. तथापि राग, शांति, ममता, लोभ, क्रौर्य, व काम इत्यादि सर्वमनोवृत्तींची प्रत्येकास थोडीबहुत ओळख असते. विशिष्ट व्यक्तींत एखादा गुण फार असला म्हणून बाकीच्या गुणांविषयीं तो अगदीं अज्ञान असतो असें नाहीं. प्रत्येक मनुष्य सर्व मनुष्यतेचें सूक्ष्म प्रतिबिंब आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. असें नसतें तर एकाचे मनोविकार दुसऱ्याला न समजते. साधारण मनुष्यांत आणि कवींत भेद इतकाच आहे कीं, साधारण मनुष्यास ज्या प्रकृतिवैचित्र्याचें आणि विकारवैचित्र्याचें ज्ञान अगदीं मंद असतें, तें कवीस कल्पनासामर्थ्यानें स्वतःसच स्पष्ट करून घेतां येतें इतकेंच नाहीं, तर काव्यद्वारा तें दुसऱ्यासही स्पष्ट करून देतां येतें. कवि हा कामरूपधारी पटाईत बहुरूपी आहे! तो क्षणांत राजा बनून सिंहासनस्थ पुरुषांच्या अंतःकरणांतील विचार बोलूं लागतो; राजवेष घेऊन अ-

घंघटिका झाली नाहीं तों, तो वेष टाकून देऊन तो काळा पोषाख करतो, तोंडाला काजळ फासतो, वस्त्राखालीं पाजळलेलीं शस्त्रें लपवून घेतो, आणि मध्यरात्रीच्या निबिड काळोखांत जिकडे तिकडे सामसूम झालें असतां द्रव्यासाठीं कोणाचा तरी जीव घेण्याचा बेत करीत मारेकरी होऊन बाहेर पडतो! या स्थितींत पांचपन्नास पळें गेलीं न गेलीं तों, ती टाकून देऊन अभिसारिका बनतो, व अभिसारिकेस योग्य असा पेहराव चढवून मेघांच्या गडगडाटांची, विजांच्या लखलखाटांची, किंवा तुफान वाऱ्याच्या सोंसाट्याची पर्वा न करितां, पावसाच्या मुसळधारेंतून एका चेटासह विहारोद्यानांतील नेमलेल्या लतामंडपांत प्रियाची भेट घेण्यास जातो! आतां तो पर्वताच्या शिखरावर किंवा समुद्राच्या किनाऱ्यावर असला तर क्षणभरानें धनगराच्या परशापाशीं शेकत बसलेला किंवा न्यायासनारूढ होऊन न्याय करीत असलेला दृष्टीस पडेल! वायूप्रमाणें तो सर्वगामी आहे; मनाप्रमाणें तो चंचल आहे; हवी ती वस्तु उत्पन्न करणारा तो वस्ताद जादुगार आहे; कल्पनाशंकूच्या जिवावर कालोदधींत पाहिजे त्या दिशेस सुकाणूं लावण्यास न डगणारा तो जरठ झालेला तांडेल आहे; विश्वबीजांप्रमाणें त्याचे उद्गार अनंत व नित्य आहेत. कोणती वस्तु कितीही दूर असो, किंवा कितीही सूक्ष्म असो, त्यानें तिच्यावर आपली दुर्बीण किंवा सुक्ष्मदर्शक यंत्र लाविलें कीं त्याला ती संन्निध आणि स्थूल होऊन हवीतशी पहातां येते, व दुसऱ्यांना तिचें यथातथ्य आकलन होईल अशा तऱ्हेचें तिचें चित्र काढतां येतें. जर तुह्मांला पातालांतील किंवा स्वर्गांतील वस्तुस्थिति पहावयाची इच्छा असेल तर मिल्टनाचा किंवा कालिदासाचा हात घट्ट धरून ते नेतील तिकडे जाण्यास तयार व्हा! अनंत प्रकृतींच्या हृदयडोहांत बुड्या मारून त्यांच्या तळाशीं काय आहे, हें जर तुह्मांला पहावयाचें असेल तर मोलिअर, शेक्सपिअर,, गेटी, किंवा भवभूति अशा जगत्प्रसिद्ध पानबुड्यांच्या कमरेला मिठी मारा! सारांश, अंतर्बाह्य सृष्टींत अनुकूल किंवा प्रतिकूल संवेदना उत्पन्न करणारी अशी कोणतीही चीज नाहीं कीं, जिच्या सत्यस्वरूपाचें

ज्ञान आनंद होईल अशा रीतीनें कवीस तुह्मांला करून देतां येणार नाहीं. समजातीयांस हें ज्ञान करून देणें हा कवींचा व्यवसाय होय. या व्यवसायांतच त्यांचा आनंद आहे. या व्यवसायामुळें त्यांचें अंतःकरण अतिशय कोमल व दयार्द्र झालेलें असतें. या व्यवसायामुळें यांची अनुकंपा इतकी वाढते कीं, तिच्या व्याप्तीस सकल मनुष्यवर्ग किंवा जीवकोटी सुद्धां पुरेशी न होऊन ती अखेरीस अचेतनसृष्टि व्यापूं लागते; व हा व्यवसाय वाचकांस सुखावह व्हावा म्हणून पद्यरचना, प्रास, वृत्तें, अलंकार इत्यादि उपकरणांचा उपयोग कवि आपल्या काव्यरचनेंत करतात.

---

## कै० रा० ब० केरो लक्ष्मण छत्रे.

अलिबाग तालुक्यांत नांवांव येथें सन १८२४ त केरोपंतांचा जन्म झाला. त्यांचे वडील ते लहान असतांच वारल्यामुळें त्यांचें संगोपन करून त्यांना शाळेंत घालण्याचें काम त्यांच्या चुलत्याच्या अंगावर पडलें. गणितविद्येंत केरोपंतांचा जो एवढा लौकिक झाला त्याचीं पूर्वचिन्हें ते एल्फिन्स्टन कालेजांत विद्यार्थी असतांनाच स्पष्ट दिसूं लागलीं होतीं. पूर्वी या देशांत इंग्लंडाहून जे प्रोफेसर येत ते आतांच्या प्रोफेसरांहून अगदीं निराळ्या तऱ्हेचे असत. त्यांच्या तोडीचा नाहीं ह्मणण्यास या इलाख्यांत काय तो एकच प्रोफेसर आहे. प्रिन्सिपाल वर्ड्सवर्थ यांच्याप्रमाणें विद्यार्थ्यासंगांत सतत गढून असणारे व आपल्याप्रमाणें आपल्या शिष्यांचीं मनें विद्योपार्जनाकडे लावण्यासाठीं अंतःकरणपूर्वक रात्रंदिवस झटणारे त्या काळचे प्रोफेसर असत. अशा प्रकारच्या आरलेबार नांवाच्या एका प्रोफेसरापाशीं केरोपंतांनीं गणितशास्त्राच्या मूलतत्त्वांचा अभ्यास केला. त्यांची बुद्धि जात्या पराकाष्ठेची तीव्र असल्यामुळें व तिचा विकास होण्यास आरलेबारसारख्या गुरूचें साहाय्य मिळाल्यामुळें थोड्या दिवसांत शुद्ध व मिश्र गणितांत केरोपंतांस चांगली प्रवीणता आली, व ज्योतिषादि पदार्थविज्ञानाच्या अवघड शाखांत पुढें त्यांनीं जी असाधारण कीर्ति संपादिली,

तिचा आरलेखारच्या हाताखालीं बळकट पाया घातला गेला. या खंबीर पायावर टोलेजंग इमारत चढवितां येण्याजोगी केरोपंतांची नैसर्गिक बुद्धिमत्ता असल्यामुळें, व तिला अनुकूळ अशा बाह्य गोष्टींचें साहाय्य होत गेल्यामुळें, हा अमोलिक हिरा अज्ञातस्थानीं पडून वायां गेला नाहीं, हें आह्मां महाराष्ट्रीयांचें महत्‌भाग्य होय. कारण जगाची प्रस्तुत स्थिति इतकी शोचनीय आहे कीं, ऐहिक सुखांत परम श्रेष्ठ अशा स्वातंत्र्यसुखाचा ज्या देशांस प्रत्यहीं अनुभव घडत आहे, ज्या ठिकाणीं विद्योपार्जन, यंत्रकला, व व्यापार यांस उत्तम प्रकारचा राजाश्रय व लोकाश्रय मिळत आहे, व ज्या ठिकाणीं मानवी सुखवृद्धीचें आदिकारण जो शास्त्रप्रसार त्यास हरएक प्रकारचें उत्तेजन मिळत आहे, अशा देशांतहीं पिढ्यांच्या पिढ्या लोटल्या तरी केरोपंतांसारखा मोहरा पैदा होत नाहीं! असें असतां या हतभाग्य देशांत हा देदीप्यमान् विद्वन्मणि उदयास आला हें आमचें केवढें नशीब! तेजोनिधि भगवान् सूर्यनारायण आपल्या तेजानें मंडलांतील दूरदूरच्या तेजोहीन ग्रहांस प्रकाशित करतो, त्याप्रमाणें केरोपंतांसारख्या अद्वितीय विद्वन्मुकुटमणीच्या तेजानें अनेक लोकांच्या अज्ञानतिमिराचें निर्मूलन होऊन ते स्वतः प्रकाशित होतात इतकेंच नाहीं, तर परप्रकाशप्रकाशित शुक्रचंद्राप्रमाणें आपणांहून भिन्न अशा लोकांच्या अज्ञानतिमिराचा विध्वंस करूं लागतात. मानवी सुधारणा केवळ अशा प्रकारच्या तेजःपरंपरेवर सर्वथा अवलंबून आहे; आणि म्हणूनच केरोपंतांसारखा जगाचा मार्गदर्शक दीप मालवला ह्मणजे लोकांस आपला अगदीं जवळचा संबंधी गेल्यासारखें होऊन अनावर दुःख होतें!

केरोपंतांनीं कुलाबा येथील वेधशाळेंत नोकरी धरल्यापासून त्यांची उत्तरोत्तर बढती कशी होत गेली, व त्यांनीं कोणकोणत्या जागीं काम केल्यावर त्यांना डेक्कन कालेजांत प्रोफेसर नेमिलें हें येथें सांगत बसण्याची गरज राहिली नाहीं. कारण गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झालेल्या **ज्ञानप्रकाशा**दि येथील वर्तमानपत्रांच्या लेखांत यासंबंधाची कच्ची हकीकत पूर्णत्वानें दिली आहे, व या

ठिकाणीं ती फिरून देणें निरुपयोगी व कंटाळवाणें होणार आहे. आमच्या मतें केरोपंतांच्या ठायीं सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखे व अनुकरण करण्यासारखे दोन गुण होते. ते कोणते ह्मणाल तर अनुपमेय विद्याभ्यासंग व स्वभावसौजन्य हे होत. कदाचित् दुसरा गुण पहिल्याचा परिणामही असेल. तें कसेंही असो; आह्मांस केरोपंतांविषयीं जी पूज्यबुद्धि उत्पन्न झाली, तिचें कारण त्यांच्या अंगचे हे दोन गुण होते, व आम्हांस खात्रीनें असें वाटतें कीं, त्यांच्या पाठीमागें त्यांचें नांव अनेक वर्षें राहण्यास हेच गुण कारण होतील. मानसिक श्रमांपेक्षां शारीर श्रम लक्षपटीनें सोपे असल्यामुळें, व विद्यानंदापेक्षां विषयोपभोगाकडे शेंकडा नव्याणव लोकांच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति असल्यामुळें, केवळ निरपेक्षबुद्धीनें सारा जन्म विद्याभ्यासंगांत घालविणारा व विद्यानंदांत पूर्ण साधन मानून विषयसुखांत लुब्ध न होणारा ऋषि, कोटी दोन कोटी मनुष्यांत एकादाच निपजतो. केरोपंतांप्रमाणें ज्यांना विद्येचें वेड लागलेलें असतें त्यांचा इंद्रियसुखाचा मोह तुटलेला असतो इतकेंच नाहीं, तर त्यांना लौकिकाचीही पर्वा नसते. ते जे परिश्रम करीत असतात त्याबद्दल लोकांनीं आपणांस मान द्यावा, किंवा त्यांपासून आपणांस द्रव्यप्राप्ति व्हावी, ही गोष्ट त्यांच्या मनांत कधींच वागत नाहीं. प्लेटो, आरिस्टाटल, आरकीमिडीस, केप्लर, ग्यालीलिओ, कोपरनिकस, न्यूटन, टिंडाल, जूल, पाणिनी, कणाद, भास्कराचार्य यांसारख्या जगद्धितकर्त्या विद्याव्यसनी पुरुषांस आपापल्या विषयांत गर्क होऊन राहणें, व आपल्या शोधांनीं मनुष्यमात्राच्या सुखवृद्धीचा अभिलाष धरणें, याहून कांहींही इष्ट नसतें. असे पुरुष ज्या विषयांच्या मागें लागलेले असतात त्यांत गुंग होऊन गेले ह्मणजे त्यांस कशाचेंही भान रहात नाहीं. या गोष्टीची प्रतीति केरोपंतांच्या आचरणांत आह्मांस अनेक वेळां आली होती. एकदा एक कठिण उदाहरण त्यांच्या मनांत पांच दिवस घोळत होतें. त्या पांच दिवसांत त्यांना अन्नाची चव समजली नाहीं किंवा स्वस्थपणें त्यांचा डोळा लागला नाहीं. रात्रंदिवस डोळ्यापुढें

ब्राकेट्स ! सहावे दिवशीं सकाळीं एकाएकीं उदाहरण सुटल्या-बरोबर त्यांना जो अवर्णनीय आनंद झाला त्याची हकीकत सांगतांना सुद्धां त्यांचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून येत, व त्यांचा कंठ गहिंवरानें दाटून जाई. सूर्यावरील ठिपके आणि पाऊस यांच्यांत कांहीं कार्यकारणाचा संबंध असेल असें वाटल्यावरून तो सिद्ध करण्यासाठीं मी तीनचार वर्षें एकसारखी खटपट करीत होतों, व तींत जरी मला हवें तसें यश आलें नाहीं, तरी ती चालली असतां मला जें गणित करावें लागलें तें दुसऱ्या विषयांच्या संबंधानें फार उपयोगीं पडलें, असें ते आम्हांस वारंवार सांगत. नानांचीं अखेरचीं वर्षें एक मोठा विलक्षण शोध करण्याकडे लागलीं होतीं. त्यांच्या मनांत असें सिद्ध करावयाचें होतें कीं, आमच्या या भूगोलावर जी जमीन आहे, ती दुसरा एकादा ग्रह या भूगोलाच्या आकर्षणांत सांपडून याच्यावर तो जोरानें आपटल्यामुळें झालेल्या त्याच्या छकलांपासून झाली असावी. नाना आणखी कांहीं दिवस वांचते, व त्यांच्यानें ही कल्पना पूर्णपणें सिद्ध होती, तर त्यांची कीर्ति सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत अजरामर होती यांत बिलकुल संशय नाहीं. पण आमच्या कमनशिबामुळें तो मान या देशास मिळण्याची आशा आतां राहिली नाहीं. कारण ज्या क्षणीं सर्वघ्न निर्घृण कालानें पाश लावून त्यांचें प्राणहरण केलें त्याच क्षणीं असें गूढ प्रमेय सिद्ध करण्यास लागणारी सामुग्रीही आमच्यांतून समग्र काढून नेली असें आम्हांस वाटतें ! त्यांचा बहुश्रुतपणा, त्यांची शोधकता, त्यांचा अनुभव, हातीं धरलेल्या विषयाचा पिच्छा पुरविण्याविषयीं त्यांची दक्षता, त्यांची विद्वत्ता व त्यांची वेधशाळा या सर्वांचा त्यांच्याबरोबरच अंत झाला, असें म्हणण्यास हरकत नाहीं ! शिव ! शिव ! खऱ्या विद्वानांची या देशांत केवढी दुर्मिळता ही ! केरोपंतांनीं आरंभिलेले शोध पुढें चालविण्यासारखा चालू पिढींत एक मनुष्य सुद्धां आमच्या डोळ्यापुढें दिसत नाहीं ! जिकडे पहावें तिकडे पोकळ विद्येला, मिथ्या देशाभिमानाला, व लज्जास्पद अधिकारवर्गाला पूर आल्यासारखा दिसतो. अधिकारमदानें बेफाम होऊन नानाप्रकारें लोकांस पीडा

देणारे, किंवा स्वोन्नतीसाठीं श्वानाप्रमाणें श्रेष्ठ युरोपियन अधिकाऱ्यांचे हातपाय चाटणारे आमच्यांतील मोठमोठ्या हुद्यावरचे जुने सरकारी नौकर, नवीन छोटेखानी हापापलेले विद्वान्, पोटाला मिळविण्यांत, व दोन पैसे मिळाल्यास कालेजचे विद्येसाठीं केलेलें कर्जपाणी फेडून बाकीची माया बॅंकेंत टाकण्यांत, किंवा बायको बाहेर पडली ह्मणजे ती अक्कडबाज दिसावी म्हणून तिला दोन दागिने करून देण्यासाठीं ती तिकडे लावण्यांत सदा दंग! रहातां राहिलीं कांहीं ह्मातारीं खोडें; त्यांना तुमच्या विद्यावृद्धीची आणि देशोन्नतीची कल्पना सुद्धां नाहीं? ही आमच्या लोकांची प्रस्तुतचीं स्थिति! केरोपंतांसारखा दुसरा विद्याव्यसनी पुरुष होण्यास निदान शेंपन्नास वर्षें तरी लोटलीं पाहिजेत यांत बिलकुल संशय नाहीं!

केरोपंत सर्वकाळ विद्याव्यसनांत गढून गेले असल्यामुळें, व त्यांचें बहुतेक आयुष्य आकाशस्थ ताऱ्यांच्या समागमांत गेल्यामुळें ऐहिक सुखांचा जणुं काय त्यांना पूर्ण विसरच पडला आहे कीं काय असें दिसे. खरेंच आहे, योग्यांच्या समाधिसुखाप्रमाणें अत्यंत मधुर विद्यासुखाचा ज्याला नित्यशः अनुभव, त्याला विषयसुखांचा नाद कोठून असणार? व विषयसुखांवरून ज्याचें मन उडालें त्याची वृत्ति क्रोध, मद, मत्सर, अहंकार इत्यादि दूषित मनोविकारांनीं कलुषित कोठून होणार? वयाच्या मानानें केरोपंत जुन्या पिढींत गणले जात. पण जुन्या पिढींतील लोकांचीं धर्मसंबंधी किंवा समाजसंबंधी दुराग्रहाचीं मतें त्यांना कधींही शिवलीं नाहींत. पदार्थविज्ञानशास्त्रांत जो पट्टीचा विद्वान् झाला, व जड सृष्टीच्या गूढ तत्वांपासून मानसिक सृष्टीच्या अत्यंत गहन तत्वांपर्यंत खेळणाऱ्या कार्यकारणाचें व सामर्थ्याचें ज्याला आकलन झालें आहे, त्याची धर्मविषयक व समाजविषयक मतें विशिष्ट देशाचाराच्या किंवा रीतरिवाजांच्या पाशांत जखडून रहात नाहींत, हें सार्वत्रिक अनुभवावरून आतां पूर्णपणें सिद्ध झालें आहे. केरोपंतांच्या विचारांत, स्वभावांत, आणि वागणुकींत असें एक चमत्कारिक स्वरूप दृष्टीस पडे कीं, त्यामुळें ते जुन्यांस व नव्यांस, लहानांस व थोरांस, श्रीमंतांस व गरीबांस, समाज-

धर्मानुयायांस व वैदिकधर्मानुयायांस एकसारखे प्रिय होत. त्यांचा पोषाख, त्यांचें राहणें, बोलणें,—सारांश, त्यांचें हर-एक करणें अगदीं साधेपणाचें असे. ज्यांच्या अंगीं खरी विद्वत्ता नाहीं किंवा मोठेपणा नाहीं त्यांना असें वाटत असतें कीं, आपल्याहून खालच्या प्रतीच्या लोकांत आपण मिसळलों तर त्यांच्या संसर्गानें आपली योग्यता कमी होईल, व या भीतीनें ते त्यांच्यापासून नेहमीं दूर राहतात, व 'आपण मोठे आहों,' असें आपण आपल्याशीं मानून आपलें समाधान करून घेत असतात! केरोपंतांचें वर्तन अगदीं निराळ्या तऱ्हेचें असे. आपलें जें ज्ञान आहे तें ज्ञानोदधींतील एका अंबुकणाइतकें सुद्धां नाहीं अशी त्यांची समजूत असल्यामुळें, साक्रेतिसाप्रमाणें त्यांच्या वृत्तींत पराकाष्ठेची लीनता असे. चार वर्षांच्या मुलापासून एम. ए. च्या विद्यार्थ्यापर्यंत कोणीं कसलीही शंका काढली तरी ते तिचें समाधान करण्यास नेहमीं तत्पर असत. विद्यार्थ्यांस धमकावणी दाखवून अथवा अळंटळं करुन वेळ मारून नेणें हें काम ज्ञानाची वृथा घमेंडी बाळगणाऱ्या गांवठी पंतोजीबोवांचें, व युनिव्हर्सिटीचा छाप मिळाल्याबरोबर पुस्तकांस सोडचिठी देऊन एस्पिट व सोंगट्या यांस उदार आश्रय देणाऱ्या ग्राजुएटांचें होय! केरोपंतांच्या शिकविण्यांत लटपट ह्मणून कधीं असायाची नाहीं. अगोदर गणित किंवा पदार्थविज्ञान यांत अर्थशास्त्राप्रमाणें किंवा नीतिशास्त्राप्रमाणें कांकणभरसुद्धां लटपट खपण्याची सवड नसते. तशांत नानांसारखा अनुभविक, कुशाग्रबुद्धि, व बहुश्रुत शिक्षक भेटल्यावर शिकणारांच्या पोटांत गुदगुल्या होत यांत नवल नाहीं. सर्व विद्यार्थ्यांवर पोटच्या मुलांप्रमाणें त्यांची ममता असे, व ते वर्गांत बसले ह्मणजे त्यांना आपण आपल्या मुलांबाळांत बसलों आहों असें वाटे. सत्य भाषण व सत्य आचरण हें त्यांना फार प्रिय असे. गरीबगुरीबांस मदत करण्याविषयीं त्यांना मागें सारणारा अलीकडील विद्वानांत तर आह्मांस कोणी दिसत नाहीं. अनाथ विद्यार्थी त्यांच्या घरून पराङ्मुख कधींच गेला नाहीं. क्षमा हा त्यांच्या अंगीं अली-

कडील मंडळींत सहसा न सांपडणारा गुण पूर्णपणें वास करीत होता. स्वार्थासाठीं लोकांपुढें तोंड वेंगाडण्याचा त्यांना मोठा तिरस्कार असे. कांहीं विशेष कारणाशिवाय त्यांच्या मनाची आनंदवृत्ति कधींही ढळत नसे. वाचकहो, या महात्म्याचें खरें स्वरूप शब्दांनीं व्यक्त करणें दुरापास्त आहे! नाना पेन्शन घेऊन कालेजांतून बाहेर पडले, त्या दिवशीं त्यांच्या पायांवर डोकीं ठेवून त्यांना कडकडून भेटतांना गहिंवर न सांवरल्यामुळें, ज्या आम्हांस विलक्षण रडूं कोसळलें, त्या आम्हांस व त्या दिवशीं कालेजांत येण्यास घर सोडल्यापासून रडूनरडून ज्यांचे डोळे सुजून गेले होते त्या नानांस, गुरुशिष्यांमधील खऱ्या प्रेमाचा प्रत्यक्ष अनुभव झाला. भांडारकर, आक्सनाम, चाटफील्ड, पील वगैरे प्रेक्षक प्रोफेसर मंडळीस त्याचें स्पष्ट स्वरूप दिसून आलें.

असलें अद्वितीय मनुष्यरत्न पुण्यांतून नाहींसें झालें त्यामुळें सारें पुणें शोकानें हळहळलें यांत नवल तें कोणतें? हें दुःखकारक वर्तमान जों जों अधिकाधिक पसरत गेलें तों तों महाराष्ट्रदेशाच्या प्रत्येक भागांतून दुःखोद्गार बाहेर पडले. पुण्याच्या लोकांनीं दुकानें बंद केलीं, शाळांना सुट्या दिल्या, न्यायाच्या कचेऱ्या बंद केल्या, व या अप्रतिम पुरुषाच्या सदा हसतमुखाचें शेवटचें अवलोकन करण्यासाठीं नागरिकांचे थवेच्या थवे स्मशानापर्यंत गेले यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं झालें नाहीं. अध्ययन व अध्यापन हा ज्यांचा व्यासंग, परोपकार हा ज्यांचा व्यवसाय, व मानवजातीचें सुखवर्धन यांतच ज्यांचें समाधान व जीवितसाफल्य, अशा थोर पुरुषांविषयीं लोकांना कृतज्ञता उत्पन्न होणें हें अगदीं साहजिक आहे. केरोपंतांसारखी कष्टरहित जीवितयात्रा फार थोड्यांना घडते. संतति, संपत्ति, सद्विद्या, सद्गुण व सत्कीर्ति यांच्या प्राप्तीपासून होणारें समाधान सतत उपभोगून शरीरधर्माप्रमाणें साठीच्या सुमारास शक्ति क्षीण होऊं लागल्याबरोबर देहावसान होऊन या कष्टमय जगांतून बाहेर पडणें थोड्यांच्याच कपाळीं असतें! नाना आणखी कांहीं दिवस जगते तर त्यांना शरीरयातना मात्र सोसाव्या लागत्या. कारण

अलीकडे त्यांचीं सर्व बाह्येंद्रियें क्षीण होऊन गेलीं होतीं. डोळ्यानें दिसेनासें व कानानें ऐकवेनासें झालें होतें. दांत पडल्यास फार वर्षें झाल्यामुळें वर्णोच्चार स्पष्ट होत नसे इतकेंच नाहीं, तर खालेलें अन्नहीं नीट पचेनासें झाल्यामुळें फार त्रास होई. पायांस मोठमोठ्या भेगा पडल्या असल्यामुळें ते जमिनीवर टेंकण्याची मुष्कील पडे. अशा स्थितींत जीवंत रहाण्यापेक्षां मरणें हेंच बरें. ते गेले यांतच त्यांचें सोन्यापेक्षां पिवळें झालें. ते विचारी असल्यामुळें त्यांना मरणाची भीति बिलकुल वाटत नसे. ते मरण्यास पूर्णपणें सिद्ध झाले असल्यामुळें मरतांना त्यांच्या अंतःकरणाची अणुमात्र देखील चलबिचल झाली नाहीं. ज्या जगांत अनेक वर्षें घालविलीं, व शेंकडों मायापाश जोडले, त्याचा शेवटचा निरोप घेतांना इतकी शांत व समाधानवृत्ति फार थोड्यांच्या ठायीं दिसण्यांत येते. नानांचें शरीर पंचत्वाप्रत पावल्यानें ते तर सुखीच झाले, पण त्यांच्या देहावसानाबरोबर आह्मां महाराष्ट्रीयांत जें चांगलें ह्मणून आहे त्या सर्वांचा लोप झाला व पुण्याचें वैभव आणि महाराष्ट्रदेशाचा अभिमान धुळीस मिळाला, असें आह्मांस वाटतें. असो; परमेश्वरापाशीं आमची येवढीच प्रार्थना आहे कीं, केरोपंतांचें उदाहरण डोळ्यापुढें ठेवून त्यांच्याप्रमाणें वर्तन करणारे अनेक लोक या भरतभूमींत निपजोत; परोपकार, सद्गुण, आणि विद्याभ्यासंग यांत केरोपंतांसही मागें हटवून या महाराष्ट्रभूमीस जगांतील सुधारलेल्या इतर राष्ट्रांच्या बरोबरीस आणोत; आणि सत्कृत्यें करून मनुष्यजातीला सुखी करून ब्रम्हांडनिर्मात्री जी चिच्छक्ति ती संतुष्ट राखोत !

---

## भारतीय कलांचें पुराणत्व.

अलीकडे आह्मांस जी कारुण्यावस्था प्राप्त झाली आहे, व इंग्लिश लोकांसारख्या बलाढ्य लोकांपुढें आमची जी तेजोहीनता दृष्टीस पडूं लागली आहे, तन्मुळें आह्मी पूर्वीपासूनच सर्व बाबतींत असेच गचाळ होतों कीं काय, असें परकीयांसच नव्हे, तर

आमचें आह्मांस देखील वाटूं लागलें आहे. असें सांगतात कीं, इंग्लंडचा प्रसिद्ध बृहस्पति एडमंड बर्क जेव्हां वारन हेस्टिंग्सवि-रुद्ध पार्लमेंट सभेंत गर्जूं लागला, तेव्हां त्याच्या वाग्वज्रानें पार्ले-मेंटच्या सामान्य सभासदांचीं अंतःकरणें रागानें व शोकानें विदा-रून गेलीं येवढेंच नाहीं, तर ज्या हतभाग्य हेस्टिंग्सवर त्याच्या वाणीचे आघात होत होते, त्या खुद्द हेस्टिंग साहेबाचें पाषाणहृदय देखील उकलून जाऊन क्षणभर त्यास असें वाटलें कीं ' मी मोठा कर्मचांडाल दुरात्मा असलों पाहिजे ! ' बर्कच्या वाक्प्रभावामुळें हेस्टिंग्सची जशी दशा झाली तशीच आमचीही अलीकडे होऊं लागली आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. व्यापार, विद्या, कला, युद्धकौशल्य, धाडस, शरीरसामर्थ्य, मानसिक शक्ति वगैरे कोणत्याही गोष्टींत आह्मी आपली युरोपिअन लोकांशीं, मुख्य-त्वेंकरून इंग्लिश लोकांशीं तुलना करूं लागलों, कीं त्यांच्या आमच्यांत जमीनअस्मानाचें अंतर स्पष्टपणें निदर्शनास येऊन, त्यांचें पारडें पृथ्वीवर बसल्यासारखें व आमचें आकाशांत लोंबत असल्यासारखें दिसतें! इंग्लिश लोकांत व आम्हांत खरोखरीच येवढें अंतर असतें, तर आमच्या मनाची जी सध्यां स्थिति झाली आहे, व तीविषयीं दुसऱ्यांस जें वाटत आहे, त्याबद्दल इतका खेद करण्याची गरज नव्हती. अनेक गोष्टींत आह्मी आजमित्तीस इंग्लिश लोकांच्या मागें शेंकडों योजनें आहों, व आम्हीं त्यांपा-सून शिकण्यासारख्या अनेक वस्तु आहेत, हें निर्विवाद आहे. पण येवढ्यावरून असें सिद्ध होत नाहीं कीं, ज्याचा आह्मीं अभि-मान मानावा, किंवा ज्याच्या विचारानें पुढील वर्तन करतांना उत्साहावलंबन करावें, असें आमच्या इतिहासांत कांहींच नाहीं. जुन्या ग्रीक किंवा रोमन लोकांच्या इतिहासाइतका आमचा इतिहास आनंदजनक किंवा उत्साहजनक नाहीं, हें प्रत्येक निःप-क्षपाती हिंदूस कबूल केलें पाहिजे. पण यहुदी, मिसर, पारसीक, किंवा मुसलमान या लोकांच्या इतिहासापेक्षां आमचा इतिहास कमी मनोहर किंवा उपयुक्त आहे, असें मानण्याची गरज नाहीं, असें दाखविणें कठिण पडणार नाहीं. महंमदीय लढवय्यांप्रमाणें

धर्मवेडानें युरोप व आशिया खंडांतील मोठमोठाले देश आह्मीं उद्ध्वस्त केले नाहींत, व राज्यलोभानें लाखों लोकांचा प्राणसंहार करून आपली रुधिरभक्ति व क्रूर निष्ठुरता जगाच्या इतिहासांत अमर केली नाहीं ही गोष्ट खरी आहे. पण नीति, औदार्य, अनुकंपा, आप्तमित्रांचा परामर्ष वगैरे मानसिक गुणांचा; किंवा काव्य, चित्र, गान, वादन इत्यादि ललितकलांचा; अथवा दुर्गरचना, गृहरचना, मूर्तिघटना, पाषाणखनन इत्यादि शिल्पकलांचा येथें अभ्युदय होऊन त्यांची इतकी अभिवृद्धि झाली होती कीं, त्यासंबंधानें आजमित्तीस सुद्धां आह्मांस कोणापुढेंही खालीं पहाण्याची अवश्यकता नाहीं. शिल्पकलेकडे वाफेच्या शक्तीचा उपयोग करण्याची युक्ति सांपडल्यापासून त्या कलेंत प्रचंड क्रांति झाली आहे, व बाष्पप्रचोदित राक्षसी लोहयंत्रापुढें दीडफूट लांबीच्या हाडमासाच्या हाताचें कांहीं एक चालेनासें झालें आहे, हें खरें आहे. पण यंत्रानें केवढींही अचाट कामें केलीं तरी यंत्रें हातांनींच करावीं लागतात, व यंत्रांनीं जी करामत करावयाची ती प्रथम हातानें साधण्यासारखी लागते. यंत्रांत नाना प्रकारच्या वेलबुट्टयांचें काम निघतें; पण जर हातानें वेलबुट्या काढतां येत नसल्या व नकाशे तयार करतां येत नसले तर वेलबुट्टयांचें काम यंत्रावर काढतां येणार आहे काय? ज्याप्रमाणें दुर्बिणीनें डोळयाच्या दर्शनशक्तीस साहाय्य होतें, पण आंधळ्यास तिचा कांहीं एक उपयोग नाहीं, त्याप्रमाणें जे हस्तकलेंत प्रवीण असतील त्यांसच यंत्रकला साधणार आहे. ज्यांचे हात थोटे आहेत त्यांना यंत्रापासून ह्मणण्यासारखा फायदा होण्याचा संभव नाहीं. आतां येवढें खरें आहे कीं, यंत्रावर काम करणारीं बहुतेक मनुष्यें यंत्रांसारखींच असतात; नवीन यंत्रें तयार करण्याची किंवा तीं बिघडलीं तर दुरुस्त करण्याची कला फार थोड्यांसच साधलेली असते; पण हा विचार हस्तकलेसही तितकाच लागू आहे. चांगल्या कारागिरानें एकादा सुरेख नमुना घालून दिला ह्मणजे त्याचें अनुकरण करणारेच शेंकडा नव्याण्णव लोक असावयाचे. विशाल कल्पकता ही नैस-

गिक देणगी फार थोड्यांसच प्राप्त झालेली असेत. बहुतेक जनता तेल्याच्या घाण्याभोंवतीं डोळे बांधलेल्या बैलाप्रमाणें श्रेष्ठ लोकांनीं घालून दिलेल्या वाटांनीं भ्रमण करीत असते; आणि असें तिनें करणें हेंच फायदेशीर आहे. ज्यांना स्वतःची अक्कल नाहीं त्यांनीं अक्कलवंतांची कास धरून चालावें हेंच नीट आहे. तात्पर्य, अर्वाचीन विस्तृत यंत्रकला युरोपिअन लोकांप्रमाणें आम्हांस अवगत नाहीं, व ती त्यांपासून आह्मीं शिकली पाहिजे, हें जरी आम्ही प्रांजलपणें कबूल करतों, तरी ती साध्य होण्यास ज्या हस्तकलाप्राविण्याची अवश्यकता असते ती हस्तकलाही आम्हांस सर्वांशीं युरोपीअन लोकांपासून उचलली पाहिजे, हें मत आह्मांस मान्य नाहीं. तथापि आम्ही लौकर जागे झालों नाहीं, तर युरोपीय यंत्रकला आम्हांस साध्य होणार नाहीं इतकेंच नाहीं, तर सुमारें तीन हजार वर्षांच्या परिश्रमानें येथें भव्य उदयास आलेली जी आमची हस्तकला तिचाही लोप होईल, व एकदा तिचा लोप झाला म्हणजे अर्वाचीन यंत्रकलाही आम्हांस संपादितां येणार नाहीं, हें कबूल करणें भाग आहे. तेव्हां जे कोणी या देशांत यंत्रकलाप्रसार करण्याविषयीं झटत असतील त्यांनीं लाखों रुपयांचीं यंत्रें परक्या देशांत खरेदी करून, तीं येथें आणून मांडिलीं, आणि त्यांवर माल काढण्यास सुरवात केली म्हणजे त्यांच्या श्रमास पूर्ण यश आलें, असें आम्हांस वाटत नाहीं. यंत्रांचे कारखाने स्थापणें तर जरूर आहेच. पण त्यांबरोबरच त्यांनीं दुसऱ्या दोन गोष्टी केल्या पाहिजेत त्या ह्या: आपली जुनी हस्तकला टाकाऊ नाहीं तर अत्यंत रक्षणीय आहे, अशी लोकांची खातरी केली पाहिजे, व जे त्या कलेंत निष्णात आहेत त्यांच्याकडून अर्वाचीन यंत्रकलेचें ज्ञान संपादवून, तें त्या हस्तकलेच्या विस्तृत उपयुक्तत्वाला कारणीभूत होईल, अशा उपायांची योजना केली पाहिजे. तात्पर्य, ज्या वेळेस आमच्या जुन्या हस्तकलेस नवीन यंत्रकलेचें साहाय्य होऊं लागेल, व पूर्वीं जीं चतुरस्रपणाचीं कामें नामांकित कारागीर दीर्घ आयासानें, खर्चानें, व काळानें थोड्या श्रीमंतांच्या सुखासाठीं

व ऐषआरामासाठीं करीत, तींच कामें यंत्रांच्या साहाय्यानें स्वल्प आयासानें, खर्चानें, व काळानें होऊं लागून अनेक गरीबांस जेव्हां त्यांपासून सुख व ऐषआराम प्राप्त होऊं लागेल, तेव्हांच आमच्या जुन्या हस्तकलेचें रक्षण झालें, व पाश्चिमात्य यंत्रकलेनें या भूमींत बळकट मूळ धरलें, असें म्हणतां येणार आहे.

येथील श्रीमान् लोक, धनाढ्य शेटसावकार, किंवा पैसेवाले जहागीरदार व संस्थानिक पूर्वींच्या कामांसारखीं टोलेजंग कामें हिंदू कारागिरांकडून अलीकडे करवीत नाहींत, हें पाहून कित्येक पाश्चिमात्य लोक असें ह्मणतात कीं, हिंदू लोकांत हस्तकौशल्याची अभिवृद्धि कधींच झाली नाहीं. नांवाजण्यासारख्या ज्या थोड्याबहुत इमारती किंवा कोरींव लेणीं दिसतात त्यांवरून इतकेंच सिद्ध होतें कीं, कांहीं कारणांमुळें हस्तकौशल्यांत आम्हांहून फार श्रेष्ठ अशा ग्रीक, रोमन, व मुसलमान लोकांचा आणि आमचा संबंध घडून आल्यामुळें आह्मांस तीं कामें करतां आलीं. त्यांचा आमचा संबंध न घडता तर हिंदुस्थानाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत पहाण्यासारखें किंवा वाखाणण्यासारखें कांहीं एक नसतें. आमच्या मतें हें ह्मणणें फार चुकीचें आहे; व तें चुकीचें आहे, असें अनेक रीतींनीं सिद्ध करून देतां येणार आहे.

प्रथम असा विचार केला पाहिजे कीं, शिल्पकलेची व इतर कलांची उत्पत्ति व अभिवृद्धि होण्यास कोणत्या गोष्टींची अनुकूलता असणें जरूर आहे; व त्या गोष्टी इताली, ग्रीस, व तुर्कस्थान या देशांपेक्षां हिंदुस्थानांत पूर्वींपासून अधिक विपुलतेनें दृष्टीस पडत आहेत किंवा नाहींत? जो कोणी थोड्या बारकाईनें या प्रश्नांचा विचार करील त्याच्या लक्षांत हें तेव्हांच येईल कीं, कोणत्याही देशांत कलांची वृद्धि होण्यास त्यांतील लोकांस चरितार्थासाठीं अहोरात्र खपाव लागतां कामा नये; शिवाय अशीं कामें करण्यास लागणाऱ्या जड द्रव्यांचेंही वैपुल्य असलें पाहिजे. बर्फाच्छादित उत्तरध्रुवाकडील प्रदेशांतल्या खुज्या लोकांत किंवा सैबेरिया प्रांतांतील थंडीनें नित्य कांकडत असणाऱ्या लोकांत हस्तकौशल्याची वृद्धि कशी व्हावी, हें आम्हांस समजत नाहीं. ज्यांना

केवळ उदरपोषणासाठीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत समुद्रोदरस्थ मत्स्य जातींशीं, अरण्यवासी भक्ष्य जनावरांशीं, अथवा हवेंत संचार करणाऱ्या विहंगमांशीं झगडा करावा लागतो, व त्यांवर आपली उपजीविका चालवावी लागते, अशा लोकांस भव्य मंदिरें बांधण्यास, नानाप्रकारचे कपडे विणण्यास, व ऐषआरामाचे इतर तऱ्हांचे पदार्थ उत्पन्न करण्यास फुरसत कोठून सांपडणार ? अशा लोकांनीं कॉडसारख्या माशाच्या, रेनडिअरसारख्या जनावराच्या, किंवा कोंबड्यासारख्या गृहपक्षाच्या चरबीवर, मांसावर, व अंड्यांवर चरितार्थ चालवून संकटावह असें आयुष्यक्रमण करणें भाग आहे. शिवाय, ज्या ठिकाणीं सूर्य फारसा प्रकाशत नाहीं, मोठमोठ्या नद्या वहात नाहींत, ठरीव ऋतूंत पाऊस पडत नाहीं, व जमीन बहुधा उघडी असत नाहीं, अशा ठिकाणीं मृदु, कठिण, लवचिक, किंवा दाणेदार अशा वनस्पतींची वाढ होऊन, इमारतीस लागणारें सुरेख लांकूड मिळावें कसें ? तसेंच जिकडेतिकडे सफाईदार व टिकाऊ दगडाच्या खाणी लागत नसल्या, व लोखंडासारख्या अत्यंत उपयुक्त धातु सांपडत नसल्या, तर दगडी कामें व हत्यारें व्हावीं कशीं हा मोठा प्रश्न आहे. इजिप्तसारख्या स्वाभाविक सुपीक देशाची लॅपलंडसारख्या ओसाड भूखंडाशीं तुलनाच करतां येत नाहीं. एकांत मनुष्याच्या उपजीविकेस लागणाऱ्या गोष्टी सहज उत्पन्न होतात; दुसऱ्यांत त्या प्राप्त होण्यासाठीं तेथील लोकांस साऱ्या दिवसभर खपावें लागतें. नैल नदीच्या उथळ व रुंद पात्रांत जो गाळ वहात असतो तो तिच्या दोनही किनाऱ्यांवरील प्रदेशांत कित्येक मैल आपोआप पसरला जाऊन त्यांस खत घातल्याप्रमाणें सुपीकपणा आणितो! अशा प्रकारच्या क्षेत्रांत पूर येऊन गेल्यावर एकदा कसेंतरी थोडेंबहुत बीं फेंकून द्यावें, आणि सात आठ महिने लोटल्यावर खंडोगणती धान्य घेऊन यावें—असा प्रकार चालतो! अशा देशांतील लोकांत मनुष्यसुधारणेचा आरंभ झाला, निरनिराळीं शास्त्रें अस्तित्वांत आलीं, व काळाच्या विघातक सामर्थ्यास न जुमानणाऱ्या व आकाशाचें चुंबन करूं पहाणाऱ्या

पिरमिदी उठल्या, यांत कांहीं नवल आहे काय ? ज्या कारणांमुळें मिसर देशांत सर्वांआधीं सुधारणेस आरंभ झाला असें ह्मणतात, तींच कारणें हिंदुस्थानांत आलेल्या आर्यशाखेची सुधारणा प्रथम येथें होऊं लागण्यास पुरे होतीं, व त्याप्रमाणें ती येथें झाली, असें अंतर्बाह्य प्रमाणांवरून समाधान होण्यासारखें सिद्ध करून देतां येणार आहे. प्रथम हिंदुस्थानाच्या बाह्य स्वरूपाकडे क्षणभर लक्ष द्या. येथें कशाची तरी वाण आहे काय ? उष्ण, शीत, किंवा समशीतोष्ण कटिबंधांत पैदा होणारी प्रत्येक चीज येथें हवी तितकी सांपडते. थंड व डोंगरी प्रदेशांत होणाऱ्या जिनसा नगाधिराज हिमालय हव्या तितक्या देण्यास कालाच्या आरंभापासून एकसारखा उभा आहे ! नैल नदीच्या सुपीक व रेताड मैदानांत लीलेनें होणारीं धान्यें पाहिजे असतील तर सिंधूच्या व गंगेच्या दोन्ही थड्यांनीं त्यांची हवी तितकी विपुलता आहे. तांबड्या व काळ्या जमिनींतील व खारट आणि खडकाळ अशा प्रदेशांतील उत्पन्नें हवीं असतील तर दक्षिग हिंदुस्थानास वेष्टणाऱ्या समुद्रमेखलेपासून घांटापर्यंत पसरलेल्या पूर्वपश्चिम कोंकणपट्ट्यांकडे, व घांटावरील मोठमोठ्या नद्यांनीं चित्रविचित्र व सुपीक करून सोडलेल्या सुखावह भूमिकांकडे अवलोकन केलें म्हणजे झालें. हिंदुस्थानांतील उंच डोंगरी प्रदेश, वड, पिंपळ, खदीर, पळस, ताड, कळक वगैरे अत्यंत उपयोगी वृक्षांनीं आच्छादिलेले असून त्यांत व्याघ्र, सिंह, माकडें, व मोर वगैरे हिंस्र आणि याहून अहिंस्र प्राणी यथेच्छ संचार करितांना दृष्टीस पडतात. सखल प्रदेशांत हत्ती, कृष्ण सारंग, तांबडीं हरणें, रानडुकरें, सांळुंक्या, ससे, व चकोरादि पक्षी स्वेच्छेनें विहार करीत असतात. हे दोन प्रकारचे प्रदेश सोडून जेव्हां आपण सपाट मैदानांत येतों तेव्हां जिकडेतिकडे नानातऱ्हेच्या धान्यांचीं शेतें, उंसांचे फड, भाताचीं खाचरें, व नानाप्रकारच्या फळझाडांनीं, वेलांनीं, आणि फुलांनीं भरून गेलेल्या बागा दृष्टीस पडतात. अशा प्रकारच्या रम्य व संपन्न देशांतील लोकांस चरितार्थ चालविण्याची आरंभीं येवढी तरी पंचाईत पडली असेल काय ? व जर पडली नसेल तर

ज्ञानवृद्धि आणि कलावृद्धि करण्याकडे त्यांचें लक्ष सहज वेधलें नसेल काय ? पण हें सारें या पुण्य आर्यभूमीच्या बाह्य स्वरूपाच्या संबंधानें झालें. आतां पुढें हिच्या अंतःस्थितीचा विचार करून, मग आम्हांस येथील कलांच्या पुराणत्वाबद्दल जो अभिप्राय द्यावयाचा आहे, तो उघडपणें देऊं.

कोणत्याही देशांत कलांची उत्पत्ति व अभिवृद्धि होण्यास त्याची बाह्य स्थिति कोणत्या प्रकारची असली पाहिजे हें प्रथम सांगितलेंच आहे; व त्यानंतर या भरतखंडाची स्थिति पूर्वीपासून तशी आहे, हेंही सांगण्यांत आलें आहे. तेव्हां इजिप्त देशाप्रमाणें या देशांतही कलांचा अभ्युदय फार प्राचीन काळीं झाला असला पाहिजे असें अनुमान करण्यास कांहीं हरकत नाहीं. इंग्रज लोकांचा अंमल येथें स्थाईक होण्यापूर्वींच बाष्पशक्ति त्यांच्या हस्तगत होऊन गेल्यामुळें, व त्यांच्या अमलानें येथील कलांच्या पुरस्कर्त्यांची व आश्रयदात्यांची संख्या अत्यंत संकुचित झाल्यामुळें, येथील कारागिरी सांप्रतकाळीं अगदीं लयास गेल्यासारखी झाली आहे, हें निर्विवाद आहे. तथापि ज्यांचें अवलोकन वस्तूंच्या केवळ पृष्ठभागासच धरून रहात नाहीं, तर त्यांच्या खालीं व पलीकडे जातें, त्यांना अजूनही असें कबूल करावें लागेल कीं, आज जें कलाचातुर्य हिंदुस्थानांत उपलब्ध आहे, त्याची उत्पत्ति व अभिवृद्धि आजकालची नाहीं, तर फार जुनी आहे. हा त्यांचा जुनेपणा ज्या दोन प्रमाणांनीं सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात, त्यांपैकीं त्यांची सांप्रतस्थिति या प्रमाणावर आक्षेप घेणारे असे पुष्कळ लोक आहेत. या लोकांत अनेक शोधक यूरोपिअनांचा, व बिलकुल शोध न करतां दुसरे ह्मणतील त्यास 'हो' ह्मणणाऱ्या किंवा केवळ बाह्य स्थितीवरून सिद्धांत बांधणाऱ्या एतद्देशीयांचा समावेश केला पाहिजे. हिंदू लोकांची राजकीय व सामाजिक अनुकंप्य स्थिति पाहून कलाखात्यांतही ते पूर्वीपासून असेच असले पाहिजेत, व आजमित्तीस या देशांत जी थोडीबहुत कारागिरी दृष्टीस पडते ती त्यांनीं अन्य लोकांपासून उचलली असली पाहिजे, असें अनुमान करून तिचें सूत हे हेवेखोर लोक ग्रीक किंवा मुसलमान लोकां-

कडे लावूं पहातात! पण ही त्यांची मोठी चूक आहे, हें पुढील विवरणावरून सहज लक्षांत येईल.

मनुस्मृति हा ग्रंथ कमींत कमी ह्मटला तरी ख्रिस्ती शकाच्या अगोदर किंवा पाठीमागून जो दोनशें वर्षांचा काळ लोटला त्यांत लिहिला गेला असावा, ही गोष्ट आतां सर्व शोधक विद्वान् मान्य करतात. याविषयीं आतां मतभेद राहिलेला नाहीं. मनुस्मृतींत ज्या कलांचें व कारागिरांचें अप्रत्यक्ष रीतीनें वर्णनें आलें आहे त्याच प्रकारच्या कला व कारागीर अद्यापि उपलब्ध आहेत. तेव्हां जर कोणीं आम्हांस कलाशिक्षण दिलें असेल तर तें मनुस्मृति अस्तित्वांत येण्यापूर्वीं दिलें असलें पाहिजे, असें मानणें भाग आहे. परंतु मनुस्मृतींत पूर्वींच्या स्मृतींचा व इतर ग्रंथांचा कला व कारागीर यांच्या संबंधानें उल्लेख केला आहे. तेव्हां आणखी असें कबूल करणें भाग पडतें कीं, ज्या अर्थीं मनुस्मृतीच्या मित्तीपासून इतकीं शतकें लोटलीं असून व स्थित्यंतर करण्यास अत्यंत अनुकूल अशा अनेक गोष्टी घडल्या असून आमच्या कला व कारागीर त्या कालापासून आतांपर्यंत विशेष फेरफार न होतां एकाच स्थितींत दृष्टीस पडत आहेत, त्या अर्थीं मनूच्या पहाण्यांत ज्या कला व जे कारागीर आले ते तत्कालीन स्थितींत अनेक शतकें असले पाहिजेत; व हें अनुमान योग्य असेल तर भारतीय कलांचें पुराणत्व तीन हजार वर्षांवर नेऊन बसवितां येतें! मनुस्मृतींत अलेग्झांडराच्या ह्मणजे शिकंदराच्या स्वारीविषयीं बिलकुल उल्लेख नाहीं, तेव्हां ती स्वारी ती स्मृति झाल्यावर झाली असावी, असें ह्मणणें कांहीं वावगें नाहीं; तसेंच मनुस्मृति ख्रिस्ताच्या अगोदर दोनशें वर्षें लिहिली गेली असावी असें ह्मणा, किंवा त्यानंतर दोनशें वर्षांनीं लिहिली गेली असावी असें ह्मणा, कसेंही म्हटलें तरी ती अस्तित्वांत येण्यापूर्वीं मुसलमानांचा पाय या पुण्य भूमीस लागला होता, असें कोणासही ह्मणतां येणार नाहीं. तेव्हां आह्मीं आमच्या कला मुसलमान किंवा ग्रीक लोकांपासून उचलल्या असाव्या, असें सूक्ष्म विचाराअंतीं कोणाच्यानेंही प्रपादवणार नाहीं. आतां मनुस्मृतींत तरी अप्रत्यक्ष रीतीनें काय काय सांपडतें

READING ROOM, WAI.

तें पाहूं. अप्रत्यक्ष रीतीनें असें ह्मणण्याचें कारण असें आहे कीं, अर्वाचीन एंजीनीअरच्या ग्रंथासारखा मनुस्मृति कांहीं कलाग्रंथ नाहीं. तो धर्मग्रंथ आहे. तथापि निरनिराळ्या अध्यायांत निरनिराळ्या वर्गांच्या कर्तव्यांचा व बंधनांचा विचार करीत असतां तत्कालीन कलांचा व कारागिरांचा उल्लेख करणें त्यास भाग पडलें आहे. तेव्हां अशा प्रकारच्या ग्रंथांत प्रकृत विषयाच्या संबंधानें जें कांहीं सांपडेल त्यांत यत्किंचित्‌ही व्याज असण्याचा संभव नाहीं, हें उघड आहे. मनूस त्या संबंधाची जशी स्थिति दृष्टीस पडली तशीच त्यानें वर्णिली असावी, असें मानणें हेंच योग्य आहे. स्थलसंकोच नसता तर सबंध श्लोकच्या श्लोक येथें उतरून घेतले असते. पण जाग्याच्या अडचणीमुळें तसें करतां येत नाहीं. फक्त अध्यायाचा व श्लोकसंख्येचा उल्लेख करण्यांत समाधान करून घ्यावें लागत आहे. ( अध्याय ८ श्लोक २४८ व अध्याय ९ श्लोक २८०, २८९ ) यांत देवालयाविषयीं उल्लेख आहे. ( ४, ४६ )—येथून पुढें अध्यायाचा आंकडा जाडा व श्लोकाचा बारका असें समजावें—यांत मोडक्या देवळांचा उल्लेख आहे; आणि ( ४, ३९, १३० व ८, ८७, व ९, २८९ ) यांत मूर्तींचा उल्लेख आहे; ( ८, २४८, ९, २७९ ) यांत तळीं, हौद, विहिरी, व जिवंत टांकीं यांचा आहे; ( ९,२८९ ) यांत पुलांचा आहे; ( ७,७०,७६ व १,२९२ ) यांत भुईकोट किल्ल्यांचा व डोंगरी किल्ल्यांचा आहे; ( ७,७०,७६ व ९,२८९ ) यांत राजवाड्यांचा आणि त्यांवर मोठमोठ्या काठ्यांवर फडकणाऱ्या निशाणांचा आहे; ( ९,२८० ) यांत कोठारांचा आणि हत्यारखान्यांचा आहे; ( ४,१६० ) यांत धनुष्यबाणांचा आहे; ( ९, ९० ) यांत सर्व प्रकारच्या मारक शस्त्रांचा आहे; ( ९,२८० ) यांत रथांचा आहे; ( ४, २०२, २३२ व ८,२९१ ) यांत बसण्याच्या गाड्यांचा आहे; ( ८,२०९ ) यांत ओझ्याच्या गाड्यांचा किंवा खटाऱ्यांचा आहे; ( ८,२३१ ) यांत पांढऱ्या पोषाखांचा आहे; ( १०,८७, १२,६६ ) यांत लोंकर, कापूस व ताग यांच्या रंगित वस्त्रांचा आहे; ( ५,१२० व ११,१६९ ) यांत रेशमी कपड्यांचा

आहे; (४,६६,१८८,२३१, व ९,७०, २१९) यांत हरएक तऱ्हेच्या तंतुपटाचा आहे; (७,९०) यांत नीळ आणि (१०,८२) यांत लाख यांचा आहे; (४,६६) यांत जोड्यांचा आहे; (२,२४६ व ७,९६) यांत छ्य्यांचा आहे; (११,१६८,७,२१८,८,१००,३२३) यांत पोंवळीं, मोतीं, व इतर रत्नें यांचा आहे; (४,३६) यांत कानांतील सोन्याच्या दागिन्यांचा व (२,१९४,३,५९) यांत बाकीच्या दागिन्यांचा आहे; (३,२०९,४,२५०,१२,६५) यांत निरनिराळ्या अत्तरांचा आहे, (४,२०२) यांत आसनांचा व (४,२५०) यांत मंचकांचा आहे; (३,२३४) यांत नेपाळच्या शय्यास्तरणांचा आहे; (४,२२९) यांत दिव्यांचा, (७,१३२) यांत दगडांच्या वस्तूंचा, व (७,१२१) यांत हस्तिदंत आणि शिंगें यांचा आहे; (४,२३०,५,११२ व ११,११८) यांत रुप्याच्या साध्या आणि कोंदणांच्या दागिन्यांचा आहे; (५,१११) यांत चमच्यांचा, (२,६४,७,१३२,८,३१९) यांत पाण्याच्या भांड्यांचा, (४,७४, ७,५०) यांत फाशांचा, (४,२०२, २३२) यांत बिछान्यांचा व (५,१२०) यांत घोंगड्यांचा आहे. ही मनुस्मृतींत आढळणाऱ्या वस्तूंची अध्यायवार व श्लोकवार याद झाली. याचप्रमाणें कारागिरांचीही याद देऊं लागलों तर वाचकांस ती कंटाळवाणी होईल, ह्मणून इतकेंच सांगतों कीं, मनुस्मृतींत सुतार, बुरूड, लोहार, सोनार, शिंपी, कोष्टी, तेली, साळी वगैरेंचा उल्लेख केला आहे; व जरी या सर्वांस त्यानें खालच्या वर्णांत गोंविलें आहे, तरी त्यांच्या धंद्यांची उपयुक्तता ध्यानांत आणून असा अभिप्राय दिला आहे कीं, कारागीर कोणत्याही जातीचा असला तरी ज्या हातानें तो उपयुक्त वस्तु बनवितो तो हात कांहीं अपवित्र नाहीं! तसेंच, विवाहित स्त्रियांनीं कारागिरांशीं भाषण करणें निषिद्ध नाहीं. यावरून निवृत्तिमार्गाकडे ज्याचा विशेष ओघ त्या मनूला सुद्धां या कारागिरांचें महत्व आणि त्यांपासून जीवित सुखावह करण्यास होणारें साहाय्य यांची किती उत्कृष्ट कल्पना होती, हें सिद्ध होतें. तसेंच मनूच्या अमदानींत नाणें चालत होतें असेंही स्पष्ट दिसतें. कारण या वैराग्यभक्तानें एका ठि-

काणीं असें म्हटलें आहे कीं, ‘ तांबें, रुपें, आणि सोनें यांच्या ज्या विशिष्ट वजनांस नाणें अशी पारिभाषिक संज्ञा आहे, व ज्यांच्या योगानें जगाचा व्यवहार सुकर होतो, तीं नाणीं अगदीं निर्दोष आहेत, असें माझें मत आहे.’ याच रीतीनें त्यानें दुसऱ्या एका स्थळीं ऋण, करार, सारा, परमुलखांतल्या मालावरील कर, समुद्र-प्रयाण, व परदेशांशीं व्यापार यांविषयीं उल्लेख करून, शेवटच्या दोन गोष्टी ब्राह्मणांस निखालस वर्ज्य आहेत, असें ह्मटलें आहे ! यावरून काय उघड होतें कीं, परदेशांशीं हिंदुस्थानाचा व्यापार मोठ्या झपाट्यानें चालत होता, व त्यामुळें जें दळणवळण सुरू झालें होतें त्यामुळें ब्राम्हण धर्मास लागलेली उतरती कळा व बौद्ध धर्माचा प्रसार यांच्या योगानें त्याचें चित्त उद्विग्न होऊन जाऊन, ब्राह्मण धर्माची पूर्वपदावर स्थापना करण्यासाठीं तो आपणाकडून होतील तेवढे निर्बंध घालीत होता. प्रस्तुत स्थळीं आह्मांस या संबंधांत विशेष पडण्याची गरज नाहीं. तथापि मनुस्मृतीवरून येवढें सिद्ध करण्यास हरकत नाहीं कीं, मनूच्या कारकीर्दींत ह्मणजे ख्रिस्ती शकाच्या अव्वल कारकीर्दींत किंवा त्याच्या पूर्वी पांचसातशें वर्षें म्हणजे आज सुमारें तीन हजार वर्षें हिंदुस्थानच्या कला आणि कारागीर बहुतेक अंशीं आहेत तसे आहेत; त्यांना ग्रीक लोकांनीं किंवा मुसलमान लोकांनीं विशेषसें दुखावलेंही नाहीं, व सुधारलेंही नाहीं, व थोडी काळजी घेतल्यास आणखी अनेक शतकें त्या कला आणि ते कारागीर तसेच तगून राहतील ! पण हें घडावें कसें ? इंग्रजांनीं आणिलेल्या बाष्पशक्तीपुढें व राक्षसी यंत्रशक्तीपुढें आमच्या हातकारागिरांनीं टिकाव धरावा कसा ? आणि आमच्या कलांचें नांव चालावें कसें ? अथवा आमच्या कारागिरांचा उदरनिर्वाह व्हावा कसा ? याला एकच उपाय दिसतो तो हा कीं, आमच्या हस्तकौशल्याचा युरोपीय बाष्पशक्तीशीं व यंत्रशक्तीशीं विवाह होऊन त्यांच्या समागमापासून उत्पन्न झालेलीं संतानें जिकडेतिकडे फडकूं लागलीं पाहिजेत !

मनुस्मृतीच्या साहाय्यानें आमच्या कलांचें पुराणत्व सिद्ध

करण्यास अप्रत्यक्ष जातीचा किती पुरावा मिळतो, याचें दिग्दर्शन वर केलें आहे. आमचीं महापुराणेंही या संबंधानें बरींच उपयोगीं पडण्यासारखीं आहेत. मनुस्मृति आणि रामायण व महाभारत हे अगदीं निराळ्या प्रकारचे ग्रंथ आहेत. तथापि त्यांमध्यें कालदूरता विशेष नसल्यामुळें, कलादि मुख्यविषयबाह्य गोष्टींचे जे उल्लेख त्यांत आढळतात, ते परस्परांशीं सदृश असून एकमेकांचें समर्थन करणारे आहेत. आमच्या शोचनीय स्थितीमुळें, या महापुराणांचा अभ्यास आमच्या हातून जसा व्हावा तसा मुळींच होत नाहीं. पूर्वपद्धतीचे कांहीं लोक तीं पोथीपुढील तांदुळांसाठीं, व्यासपूजेच्या प्राप्तीसाठीं, सप्ताहाच्या फायद्यासाठीं, किंवा बिदागीसाठीं वाचतात! अलीकडील तरुण लोक तीं परीक्षा पास होण्यासाठीं वाचतात! इतिहासदृष्टीनें त्यांच्याकडे अवलोकन करून ज्यानें त्यांच्या वाचनास आरंभ केला आहे, व तें तडीस नेलें आहे, असा बहुधा एकही अर्वाचीन विद्वान् सांपडणार नाहीं. एकादा बुद्धिवान् व कल्पक विद्वान् या दोन ग्रंथांचा यथास्थित रीतीनें अभ्यास करील तर भारतीय आर्यांच्या पौराणिक कालांतील स्थितीचें प्रत्येक बाबतींत विश्वसनीय, मनोरंजक व बोधावह असें चित्र त्यास काढतां येणार आहे! पण असलें काम नीट रीतीनें होण्यास लागणारा राजाश्रय किंवा लोकाश्रय आम्हांस मिळत नसल्यामुळें, यांचें जितकें मंथन व्हावयाला पाहिजे आहे तितकें अद्यापि कोणींही केलेलें नाहीं, व पुढेंही तें अशाच स्थितींत करण्यास कोणी झटेल, असें आह्मांस वाटत नाहीं. इंग्लिश लोकांनीं असलीं कामें हातीं धरल्यास, त्यांस खुद्द सरकाराकडून व सरकारी अधिकाऱ्यांकडून साक्षात् किंवा परंपरेनें पुष्कळ मदत होते. इतिहासदृष्टीनें या ग्रंथांकडे पाहून त्यांच्या मदतीनें, येथील जुनी स्थिति कशी असावी; राज्यपद्धति कोणत्या प्रकारची असावी; राजा आणि प्रजा यांचे अन्योन्य संबंध कसे होते; वर्णावर्णांत द्वेषभाव असे कीं संतोषवृत्ति असे; राजावर लोक प्रीति करीत किंवा त्याला नाखुष असत; कायदे कोण करी; कर कोणत्या प्रमाणानें, कशावर, व केव्हां घेत;

सैन्याची व्यवस्था कशी काय ठेविली जात असे; स्वदेशी व्यापाराला उत्तेजन देऊन परकी देशाचा माल स्वदेशांत येऊं न देण्याबद्दल निर्बंध करीत असत किंवा नाहीं; व्यापाराचीं मुख्य ठिकाणें कोणतीं होतीं; कोणकोणत्या जिनसा विशेष पिकत, अथवा कोणता जिन्नस कोणत्या ठिकाणीं विशेष सुबक होत असे, आणि त्याला काय किंमत पडे; लोकशिक्षणाची व स्त्रीशिक्षणाची सामान्य स्थिति कशी होती; स्त्रियांस, नोकरांस, व इतर परोपजीवी लोकांस कोणते हक्क असत, व त्यांचा सांभाळ कोणत्या रीतीनें होत असे—वगैरे गोष्टींविषयीं उत्कृष्ट माहिती या दोन पुराणांत खचित सांपडेल, अशी आमची समजूत आहे. पण इतका शोधक व सुखवस्तु वाचक येथें कोठून पैदा होणार? व झाला तरी तो आम्हांस लाभणार कसा? फट्दिशीं तो एकादे ठिकाणीं रावसाहेब होऊन बसावयाचा, किंवा कोठें वकीलीचा 'प्रॅक्टीस' करूं लागावयाचा, अथवा एकाद्या नेटिव संस्थानिकाच्या पदरीं चारदोनशें रुपयांवर पडून राहावयाचा! सध्यां आमच्या संबंधाचें हें बिकट काम युरोपिअन लोक करीत आहेत, व तें आमच्या हातून नीट होऊं लागे तोंपर्यंत युरोपिअन लोकांच्या शोधांवर, व कांहीं अंशीं त्यांच्या कल्पनांवर, आह्मांस अवलंबून असलें पाहिजे. प्रस्तुत निबंधही **सर जॉर्ज बर्डवूड** यांनीं हिंदुस्थानच्या कलांच्या पुराणत्वाचें जें मंडन केलें आहे त्याच्या अनुरोधानें लिहिला जात आहे. ज्यांना सर जॉर्ज यांचा इंग्रजींत लिहिलेला अस्सल लेख पहावयाचा असेल त्यांनीं बांबे ग्याझेट पत्राचा १३ जून १८९० चा अंक पहावा; असो.

रामायण आणि भारत हीं इतिहासाचीं पुस्तकें नाहींत हें जरी खरें आहे, तरी जो ऐतिहासिक दृष्टीनें त्यांकडे पाहील त्याला त्यांपासून तत्कालीन व त्यापूर्वींच्या समाजाच्या अंतर्बाह्य स्थितीविषयीं बरीच माहिती मिळणार आहे. प्रस्तुत विषयाच्या समर्थनासाठीं सर जॉर्ज यांनीं रामायणांतून एकच उदाहरण घेतलें आहे. पण तेवढ्यावरून सुद्धां पौराणिक कालांत आमच्या कलांची व कारागिरांची स्थिति कशी होती, हें सहज समजण्यासारखें

आहे. रामायणाच्या दुसऱ्या कांडांतील एकोणीसाव्या अध्यायांत अयोध्येंतील लोक भरतासह जो रामाचा शोध लावण्यास निघाले आहेत त्याचें वर्णन आहे. रामशोधार्थ काढलेली ही भरताची स्वारी मोठ्या थाटानें व व्यवस्थेनें निघाली होती. हींत प्रत्येक धंद्याचे लोक असून, धंद्यांच्या महत्वाच्या अनुरोधानें त्यांच्या रांगा लाविल्या होत्या, व त्या त्या धंद्यांतील प्रमुख इसमांना त्यांचे पुढारी किंवा नायक नेमिलें होते. या प्रसंगीं हजर असलेल्या लोकांत अग्रस्थान जवाहिऱ्यांस दिलें होतें. जवाहिऱ्यांच्या पाठीमागून कासार चालले होते, व कासारांच्या मागून हस्तीदंती काम करणारे, गंधी, सोनार, कोष्टी, लोंकर विणणारे, सुतार, पितळेचें काम करणारे, चितारी, गायनाचीं वाद्यें करणारे, शस्त्रें करणारे, लोहार, तांबट, पुतळे करणारे, स्फटिक कांपणारे, कांच करणारे आणि असेच इतर कारागीर अनुक्रमानें जात होते. ही यादी पाहून रामायणकालीं हे धंदे हिंदु लोकांस माहीत नव्हते असें कोण ह्मणूं शकेल ! हिंदुस्थानास मुसलमानांचा वारा सातव्या शतकापर्यंत मुळींच लागला नाहीं. रामायण व भारत यांतील राजे ख्रिस्ती शकाच्या पूर्वींचीं पांचशें आणि त्यानंतरचीं पाचशें वर्षें यांच्या दरम्यान होऊन गेले असावे, असें हिंदू लोकांच्या सुधारणेविषयीं ज्यांचें म्हणण्यासारखें अनुकूल मत नाहीं, असे पंडित देखील कबूल करतात. तसेंच, रामायणांत धंद्यांची जी यादी दिली आहे तीच कोणी ञ्चाला तरी आज करील. फार तर काय, पण एकादा सेन्सस रिपोर्ट घेतला आणि त्यांतील वर्गीकरणाकडे पाहिलें, तर धंद्यांच्या कोष्टकांत म्हणण्यासारखा फरक करावा लागणार नाहीं ! तेव्हां काय सिद्ध झालें कीं, रामायणकालीं या भरतभूमींत जे धंदे चालत होते तेच अद्यापिही चालत आहेत, व ग्रीक लोकांच्या आणि मुसलमान लोकांच्या स्वाऱ्यांनीं त्यांत म्हणण्यासारखा फरक झालेला नाहीं. आणि वास्तविक पाहिलें तर हा फरक त्या लोकांकडून होण्याचा संभवही नव्हता. ग्रीक लोक तर येथें एकाद्या सांथीसारखे, वावटळीसारखे, किंवा टोळधाडीसारखे आले आणि गेले ! हिंदुस्थानांत

त्यांनीं कायमचें ठाणें कधींही दिलें नाहीं, व त्यामुळें त्यांच्याकडून येथील कलाकौशल्यांत म्हणण्यासारखा फेरफार झाला नाहीं. ' म्हणण्यासारखा ' असें बुद्ध्या लिहिण्याचें कारण असें कीं, ग्रीक लोकांनीं आम्हांस जिंकून आपली सत्ता येथें कायम केली, असें जरी उपलब्ध इतिहासावरून म्हणतां येणार नाहीं, तरी त्यांचें आमचें दळणवळण मुळींच होत नव्हतें असें नाहीं. कांहीं लोकांची जिज्ञासा आणि कांहींचा व्यापार यांच्या योगानें या उभय देशांत बरेंच दळणवळण होत असावें, असें मानण्यास हरकत नाहीं. पण या दळणवळणावरून हिंदुस्थानांतील कारागिरी हिंदू लोकांनीं ग्रीक लोकांपासून उचलली असावी, असें अनुमान करण्यास पुरेसा पुरावा मिळत नाहीं. उलट, हिंदू व ग्रीक या उभयतांनींही आपापल्या कारागिरीचीं मूलतत्त्वें आपल्याहून जुन्या अशा तिसऱ्याच आर्यशाखेपासून संपादिलीं असावीं, असें मानण्यास बराच आधार आहे; तसेंच हिंदुस्थानांतील कलाकौशल्याचे अनेक पदार्थ ग्रीस देशांत व इतर देशांत जात असून, त्यांची तेथें मोठी तारीफ व अनुकरण होत असे, याबद्दलही बराच पुरावा आहे. तेव्हां कारागिरीच्या संबंधानें जर ग्रीक लोकांचें सुद्धां आह्मी कांहीं कर्ज लागत नाहीं, तर त्यांच्या पाठीमागून ज्यांनीं या देशांत बऱ्याच शतकांनीं पाय ठेवला त्या मुसलमानांचें लागतों, असें ह्मणणें शुद्ध साहस आहे ! शिवाय मुसलमान लोकांनीं आपल्या कसबानें किंवा विद्येनें आमच्या कारागिरींत किंवा विद्येंत प्रचंड क्रांति करून त्यांचा मागमूस नाहींसा करावा, असा त्यांचा अधिकारही नव्हता. मुसलमान लोक आम्हांहून विशेष कडवे, विशेष शूर, विशेष मिजासी, व विशेष धर्माभिमानी आहेत, हें क्षणभर कबूल करतां येईल; पण इंग्रज लोकांप्रमाणें ज्ञानांत, कलाकौशल्यांत, राजकारणांत किंवा कल्पकतेंत आम्हांहून ते श्रेष्ठ होते, असें ह्मणण्यास बिलकुल आधार नाहीं. त्यांनीं येथें पांचसहाशें वर्षें आपली बादशाही चालविली हें कबूल आहे; पण इंग्रजांनीं आपल्या शंभर वर्षांच्या अमलानें आमच्या अंतर्बाह्य स्थितींत जें जमीनअस्मानाचें अंतर पाडिलें आहे, तें मुस-

लमानांस सहाशें वर्षांच्या एकछत्री अमलानें पाडितां आलें नाहीं, हें निर्विवाद आहे. आणि असेंच होणें स्वाभाविक होतें. वर निर्दिष्ट केलेल्या गुणांत आम्हांहून मुसलमान लोक खरोखरीच श्रेष्ठ असते तर त्यांच्या सहाशें वर्षांच्या अमलांत आमच्या घरच्या सुधारणेचा मागमूसही न रहाता. आपणांहून कमी सुधारलेल्या ज्या ज्या लोकांस त्यांनीं जिंकून पादाक्रांत केलें, व ज्या ठिकाणीं त्यांनीं आपलीं कायमचीं राज्यें स्थापिलीं त्या ठिकाणच्या जुन्या सुधारणेचा आतां पत्ताही लागत नाहीं. तात्पर्य काय कीं, कोणत्याही कमी सुधारलेल्या लोकांनीं आपणांहून अधिक सुधारलेल्या राष्ट्रास जिंकून तेथें आपली गादी स्थापिली, व अनेक वर्षें त्याचें अव्याहत राज्य केलें, तरी त्यांच्या हातून तेथल्या लोकांच्या वरिष्ठ सुधारणेचा बीमोड होऊं शकत नाहीं, हा जो इतिहासज्ञांनीं नियम काढिला आहे तोच आह्मांसही लागूं होतो. याच गोष्टीचा दुसरा प्रत्यय असा आहे कीं, दक्षिण हिंदुस्थानांत ह्मणजे कर्नाटक, म्हैसूर वगैरे प्रांतांत मुसलमान लोकांचा स्थाईक अंमल कधींच झाला नाहीं, व पश्चिम हिंदुस्थानांत तो फार स्वल्पकालीन होता. यामुळें पश्चिम हिंदुस्थानांतील कलाकौशल्यावर मुसलमानांच्या अमलाची झांक यत्किंचित् दिसते, पण कर्नाटकांतील व म्हैसूर प्रांतांतील कारागिरीला म्लेंछस्पर्श कधींही झाला नाहीं, असें त्या त्या प्रांतांतील कारागिरीच्या आजच्या स्थितीवरून म्हणणें भाग पडतें. उलट, अमदाबाद, हैदराबाद ( दक्षिण ) अशा थेट मुसलमानी शहरांत सुद्धां आमची कारागिरी माशिदीपर्यंत व जनानखान्यापर्यंत जाऊन भिडली आहे, असें दिसून येईल !

याप्रमाणें मनुस्मृति, महाभारत, व रामायण या तीन ग्रंथांच्या साहाय्यानें भारतीय कला किती जुन्या आहेत, हें थोडक्यांत दाखविलें. आतां याहूनही एका जुन्या ग्रंथाच्या मदतीनें त्याच गोष्टीचें पुष्टीकरण करून, मग थोडासा बाहेरचा पुरावा देण्याचा मानस आहे.

सर्व ग्रंथांत वेद हा अत्यंत पुराण ग्रंथ आहे, असें आह्मी

हिंदू लोक ह्मणतों इतकेंच नाहीं, तर युरोपांतील अत्यंत शोधक अशा प्रत्येक देशांतील विद्वानांचें मत आहे. यासंबंधानें **मॅक्स-म्यूलर** साहेबांनीं कोठेंसें असें म्हटलें आहे कीं, पृथ्वीवरील मनुष्यांचा, निदान आर्यशाखेंतील मनुष्यांचा, आद्य इतिहास दुसऱ्या कोणत्याही पुस्तकांत मिळण्याचा संभव नाहीं. आपल्या मनांतील विचार दुसऱ्यास कळविणें हा भाषेचा मुख्य उपयोग होय. अशा प्रकारची भाषा आर्यशाखेंतील मनुष्यांमध्यें अस्तित्वांत येऊन, चिरस्थाई होण्यासारखे जे विचार त्यांनीं **छान्दस** वृत्तांत प्रथम गोंविले ते वेदांत दृष्टीस पडतात. वेदांतील ऋचा ज्या वेळेस रचल्या गेल्या त्या वेळेस आर्य लोकांस लेखनपद्धति माहीत नसावी, असें अंतर्बाह्य प्रमाणांवरून कित्येक पंडित अनुमान करतात. तात्पर्य, मनुष्यांच्या बुद्धीचा विकास होऊं लागला; बाह्य सृष्टीचा चमत्कार त्यांस वाटूं लागला; सूर्यचंद्रादि आकाशस्थ तेजोमय गोलक एका दिशेनें दिसूं लागतात, व कांहीं वेळ आकाशपंथ आक्रमून पुनः नाहींसे होतात; कधींकधीं नभोमंडल अभ्रांनीं व्याप्त होऊन जिकडेतिकडे पर्जन्यवृष्टि होऊं लागते; पर्वतांच्या बाजूवरून पाण्याचे मोठमोठे लोट वाहूं लागतात; विजा चमकतात; गडगडाट होतात; फिरून वृष्टि थांबते; आकाश निरभ्र होतें; गगनस्थ कोट्यावधि लहानमोठे तारकापुंज चमकूं लागतात; प्राणिमात्रांची भीति नाहींशी होऊन ते पुनः जिकडेतिकडे संचार करूं लागतात; नद्यांचें, सरोवरांचें, व सागरांचें उदक फिरून स्वच्छ होतें; झाडांस पालवी फुटून तीं टवटवीत दिसूं लागतात; व पुनः कांहीं महिन्यांनीं सृष्टि आपलें उग्र स्वरूप धारण करते—असा विलक्षण चमत्कार पाहून कधीं भयानें, कधीं आनंदानें, व कधीं आशेनें आणि निराशेनें चकित होऊन सृष्टींतील भव्य वस्तूंस प्रबुद्ध प्राणी कल्पनाऱ्या, व त्यांचा कोप शांत होऊन त्यांची मर्जी आपणांवर सुप्रसन्न करून घेण्यासाठीं त्यांची प्रार्थना करणाऱ्या बाल्यावस्थेंतील मनुष्यजातीचे वेद हे अव्याज उद्गार होत, ही कल्पना कांहीं वावगी नाहीं. तथापि जडसृष्टींतील चमत्कारांचें इतकें कौतुक व आश्चर्य वाटून, त्यांचे ठायीं बुद्धिमत्तेची, शक्ति-

मत्तेची, व मनुष्याला सुखदुःख देण्यास सामर्थ्य असल्याची कल्पना येण्यापूर्वी, व त्यांचें स्तवन करण्याची मनांतून स्फूर्ति होऊन ती करतां येऊं लागण्यापूर्वी, बरीच सुधारणा झाली असावी, असें अनुमान करणें अवश्य आहे. इंद्र, चंद्र, वरुण, सूर्य इत्यादिकांस देवता कल्पून 'अमक्या देवा, तूं आम्हांस पाऊस दे; तमक्या देवा, तूं आमच्या गाईचें संरक्षण कर; अमुक देवा, तूं आमचा राजा आहेस; तूं आमचा पिता आहेस; तूं आमचा पालक आहेस; तूं चोरांस दंड करतोस; तूं मित्रांचें पालन करतोस, तूं सज्जनास मरणोत्तर सद्गति देतोस; तूं औषधींचा स्वामी आहेस; तूं धातूंचा उत्पादक आहेस; तूं मनुष्यास कलाज्ञान देतोस; तुझ्या कृपेनें आमचा व्यवहार व्यवस्थित चालतो '—अशा प्रकारचे स्तव ज्यांनीं केले त्यांना अनेक वस्तूंचे धर्म समजले असावे, व वन्यावस्थेंतून पार पडून राज्य, धर्म, व समाज या संस्थांची उत्पत्ति व अभिवृद्धि त्यांत बरीच झाली असावी, असें ह्मटल्याशिवाय रहावत नाहीं. वेदरूपदर्पणांत अशा प्रकारच्या प्रथमावस्थेचें उत्कृष्ट प्रतिबिंब आहे, व जो कोणी इतिहासदृष्टीनें त्यांकडे पाहील त्यास तें सहज स्पष्टपणें दिसण्यासारखें आहे. अशा दृष्टीनें ज्यानें रा. ब. शं. पां. पंडितकृत **वेदार्थयत्नाचे** कांहीं अंक पाहिले अशा आमच्या एका शोधक व कलाभिज्ञ मित्रानें केलेलें एक टिपण मेहेरबानी करून आमच्याकडे पाठवून दिलें आहे, त्यावरून वेदकालींही या भरतखंडांत कलांचा किती प्रसार झाला होता, हें सहज दिसून येणार आहे. निदान वेद तरी आम्हीं कोणापासून मागून किंवा चोरून आणिले नाहींत, हें आमच्या दीर्घशत्रूसही कबूल केलें पाहिजे! तसेंच, वेदाहून जुना असा दुसरा ग्रंथ जगांत उपलब्ध नाहीं हेंही अजूनपर्यंत निर्विवाद आहे. तेव्हां वेदांत ज्या कलांचा व कारागिरांचा उल्लेख आहे, त्या कला व ते कारागीर तरी आर्यशाखेंत निर्माण झाले असले पाहिजेत, असें प्रत्येक विचारी मनुष्यास कबूल करणें भाग आहे.

## वेदार्थयत्न.

| वस्तूचें नांव. | वे. य. पान. | श्लोक. | ऋचा. |
|---|---|---|---|
| पेले ... ... ... | १०४ | ४ | १५ |
| ,, ... ... ... | ११२ | २ | ५ |
| भांडीं ... ... ... | ११४ | ५ | १५ |
| मातीचीं भांडीं ... | ११६ | ९ | १५ |
| सोनें ... ... ... | १६८ }<br>११८ } | ५ }<br>५ } | २२ }<br>३५ } |
| सोन्याचे रथ ... ... | ३०६ | १६ | ३० |
| होमाच्या पळया ... | ३२२ | ५ | ३१ |
| खिलखतें ... ... | ३३ | १५ | ३१ |
| ,, ... ... ... | ८५० | ९ | ५८ |
| वज्र ... ... ... | ३४६ | १ | ३२ |
| ,, ... ... ... | ६ | ३ | ५१ |
| बाणांचे भाते ... ... | ७२६ | ६ | ९२ |
| धनुष्यें ... ... ... | ३७२ | ३ | ३३ |
| सोन्याच्या खिळा ... | ३७२ | ४ | ३३ |
| मोत्यांचे हार ... ... | ४१६ | ४ | ३५ |
| सोन्याचें वस्त्र ... | ४१६ | ४ | ३५ |
| नांगर ... ... ... | ८२४ | २ | ५७ |
| वस्त्रें ... ... ... | ४६ | १५ | २३ |
| चुना ... ... ... | २४८ | १ | २६ |
| ,, ... ... ... | २७ | २-३ | ४ |
| घुसळण्याची रवी ... | ५ | ७ | २८ |
| नगारा ... ... ... | २७० | ४ | २८ |
| घागरी ... ... ... | २७६ | ५ | २८ |
| मांस व चाकें ... | २८ | ९ | २८ |
| मध ... ... ... | ३०४ | १४।१५ | ३० |
| तांबें ( कलश ) ... | ३९४ | २ | ३० |
| हातोडा ... ... | ४०४ | ८ | ३४ |
| हत्यारें ... ... ... | ४५६ | १६ | ३६ |
| भाले, कुऱ्हाडी ... | ३१ }<br>५०६ } | ५ }<br>२ } | ६३ }<br>३९ } |
| चाबूक ... ... ... | ४६८ | २ | ३७ |
| लगाम ... ... ... | ४७० | ३ | ३७ |
| कोयता ... ... | ४९८ | १२ | ३८ |
| सुतार ... ... ... | ८४ | ४ | ५८ |
| आयुधें ... ... ... | ८८० | ४ | ६१ |
| घरें आणि वाडे ... | ८९६ | १३ | ६१ |
| शहरें व किल्ले... ... | ५२८ | ७ | ४७ |
| फासे ( शंखाचे ) ... | ४३४ | ३ | ४१ |
| ध्वज ( निशाण ) ... | ५४५ | ९ | ४१ |

वर जी यादी दिली आहे तीवरून वेदकाळीं आर्य लोकांना सोनें, रुपें, लोखंड वगैरे धातूंचा उपयोग समजला होता; ते शेतकी

करूं लागले होते; गाई, घोडे वगैरे जनावरें माणसाळवून त्यांनीं त्यांस आपल्या कामास लाविलें होतें; धनुष्यबाण, खड्ग, रथ वगैरे जिनसा त्यांस करतां येत होत्या; गरीब व श्रीमंत आपापल्या मगदुराप्रमाणें लहानमोठीं घरें बांधून रहात होते; यज्ञयागादि क्रिया होऊं लागल्या होत्या; शहरें व किल्ले बांधण्यास आरंभ झाला होता—इत्यादि गोष्टी चांगल्या रीतीनें सिद्ध होतात. तेव्हां सांप्रतकालीं आपल्या देशांत ज्या जुन्या कला दृष्टीस पडत आहेत त्यांचा उगम आर्यशाखेंतील लोकांत वेदांच्या पूर्वी झाला असावा, असें अनुमान होतें. ह्मणून भारतीय कलांच्या पुराणत्वास कमींत कमी पांच हजार वर्षें झालीं असावीं, असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं.

आतां याच संबंधानें बाहेरून जो विपुल पुरावा मिळतो, त्याचा स्वल्प उल्लेख करूं. शके १३० त जन्मलेला ॲप्युलीअस ग्रंथकार 'फ्लारिडा' नांवाच्या ग्रंथांत असें ह्मणतो कीं, 'हिंदुस्थानांतून युरोपांत हस्तीदंताच्या राशी, मिऱ्याच्या गोण्या, दालचिनीचे गठ्ठे, आणि सोन्यारुप्याचे ढीग येत असत'! पहिल्या शतकांतील 'परिप्लस' नांवाच्या ग्रंथांत असें ह्मटलें आहे कीं, केप गार्डाफ्यूच्या आसपासचे लोक हिंदुस्थानांतून तांदूळ, तूप, तीळ, साखर, सुटा व विणलेला कापूस आणि रेशमी कापड आणीत असत. अरबस्थान व तुर्कस्थान यांतील लोक हिंदुस्थानचें केशर, हळद, निळें कापड, शेवरीचा कापूस, मलमल, रेशमी कापड, आणि आरबी तऱ्हेचे पेहराव घेऊन जात. इराणांत हिंदुस्थानांतून साग, शिसवी, शिंगें वगैरेंचें कोरींव सामान जात असे. बार्बेरी संस्थानांतील लोक कराचीशीं व्यापार करीत, आणि तेथून पश्चिम व दक्षिण हिंदुस्थानांतील उत्तम प्रकारचें सुती कापड, नानाप्रकारचे अंबरस्फटिकादि मौल्यवान् पाषाण, कांचेचीं भांडीं, व सोन्यारुप्याचीं ताटें व तबकें नेत. भडोच आणि मच्छलीपट्टण या ठिकाणीं फार मोठा व्यापार चालत असे. कोणी असें ह्मणतात कीं, मुसलमानांनीं मच्छलीपट्टण येथें चिटाचा कारखाना प्रथम सुरू केला. पण हें म्हणणें बरोबर दिसत नाहीं. कारण,

परिछसमध्येंच असें ह्मटलें आहे कीं, ख्रिस्ती शकाच्या पहिल्या शतकांतच मच्छलीपट्टण सुताच्या कारखान्यांत पहिल्या प्रतीचें होऊन बसलें होतें. आणि त्यापूर्वी बरींच वर्षें इराणचें आखात आणि तांबडा समुद्र यांशीं त्याचा कापडाचा व्यापार चालत होता, असें दिसतें. तेव्हां जे हिंदू लोक बाहेरच्या पुराव्यावरून सुद्धां ख्रिस्ती शकाच्या आरंभाच्या सुमारास इतके कलानिपुण होऊन बसले असें सिद्ध होतें, त्या हिंदू लोकांस, मध्यआशियांतून रानटी मुसलमान लोकांच्या ज्या झुंडी हिंदुस्थानांत आल्या त्यांनीं कोणत्या प्रकारचें कलाज्ञान दिलें असेल, हें समजणें अशक्य आहे.

खरोखरीच पाहिलें तर युरोपखंडाशीं हिंदुस्थानाचा व्यापार सुरू झाल्यास किती वर्षें झालीं, याचा बरोबर निर्णय करणें फार कठिण आहे. एका जर्मन शोधकास ट्रॉय येथें एक शिश्वीचें कोरींव लांकूड सांपडलें. विचार करतां तें हिंदुस्थानचें असावें, असें त्याचें म्हणणें आहे. ह्मणजे ख्रिस्ती शकापूर्वीं सुमारें हजार वर्षें आह्मी भूमध्य समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील शहरांशीं व्यापार करूं लागलों होतों, असें सिद्ध होतें. क्याल्डिआ प्रांतांतील ऊर येथील जुन्या देवालयाच्या पडक्या मालमसाल्यांत हिंदुस्थानच्या सागाच्या तुळया सांपडल्या आहेत, व त्यांसंबंधानें इतकाच प्रश्न निघाला आहे कीं, ख्रिस्ती शकाच्या पूर्वीं दोन हजार वर्षें हें देऊळ प्रथम बांधलें गेलें त्या वेळेस त्या ( तुळया ) हिंदुस्थानांतून नेल्या असाव्या, किंवा ख्रिस्ती शकापूर्वीं सहाव्या शतकांत प्रसिद्ध **नेबुचाड्नेझर** नांवाच्या राजानें त्याचा जो जीर्णोद्धार केला त्याकरितां नेल्या असाव्या. ख्रिस्ती शकाच्या पूर्वीं १८ व्या शतकांत इजिप्त देशांत ज्या घराण्यांतील राजे राज्य करीत होते त्यांच्या थडग्यांत हिंदुस्थानांतील नीळ, कापूस, व चिंचेच्या पेट्या सांपडतात ! नोहाचें गलबत हिंदुस्थानच्या सागाचें बांधलें असावें, असें अलेग्झांड्रिआच्या एका जुन्या शोधकाचें ह्मणणें आहे. बायबलांत सांगितलेले ऊस वगैरे जुने पदार्थ हिंदुस्थानांत व ब्रह्मदेशांत उत्पन्न होणारे आहेत. कोंबडा हा ख्रिस्ती-

शकाच्या पूर्वीं ९०० किंवा ६०० वर्षें युरोपांत गेला असावा, असें दिसतें. आमचा मोर ग्रीस देशांत ख्रिस्ती शकापूर्वीं ४४० वे वर्षीं गेल्याबद्दल बेमालूम पुरावा आहे. सालोमन नांवाच्या राजानें या भव्य व रमणीय पक्ष्यास ख्रिस्ती शकाच्या पूर्वीं १००० व्या वर्षीं यरूशलेम येथें दक्षिण हिंदुस्थानांतून आणविलें असावें, असें वाटतें. कारण, 'टोकी' हें त्याचें तामील भाषेंतील मूळचें नांव बराच अपभ्रंश होऊन युरोपांतील निरनिराळ्या देशांत पसरलें आहे, असें मानण्यास पुष्कळ आधार आहे.

पूर्वपश्चिम समुद्राचें वेष्टण; सह्य, विंध्य, व हिमालय अशा पर्वतांच्या रांगा; कृष्णा, नर्मदा, सिंधू, भागीरथी, व ब्रम्हपुत्रा अशा नद्यांचे प्रवाह; वसंतग्रीष्मादि ऋतूंची अस्खलित परंपरा; सर्व प्रकारच्या धातूंचें, पाषाणांचें व वनस्पतींचें अस्तित्व; प्रचंड अरण्यें; विस्तृत व सपाट मैदानें; शीत, उष्ण, व समशीतोष्ण हवांचे प्रदेश—इत्यादि कारणांनीं कलांच्या उत्पत्तीस व अभिवृद्धीस अत्यंत अनुकूल अशा या भरतखंडांत त्यांचा आरंभ केव्हां झाला, आणि हिंदुस्थानचा इतर देशांशीं व्यापार किती वर्षें सुरू आहे, याचा निर्णय करणें बऱ्याच अंशीं अशक्य आहे. जितकें मागें जावें तितकें कमीच गेलों असें वाटतें. तात्पर्य, भारतीय कलांच्या उत्पत्तीचा कालनिर्णय कल्पनाबाह्य व शोधातीत आहे असें मानून, ज्या साधनांनीं ही आपली वडिलोपार्जित कमाई आपणांस व इतरांस अत्यंत हितकारक होईल अशांची योजना करावयास लागणें, हेंच आपलें आजमित्तीस मुख्य कर्तव्य आहे, हें ध्यानांत धरणें फार अवश्य आहे. तसें आपण केलें नाहीं, तर काळाच्या झपाट्यांतून इतकीं सहस्र वर्षें तगून राहिलेल्या आमच्या कलांचा मागमूस नाहींसा होऊन, आह्मी अन्नास मोताद होऊं, व अखेरीस त्यांच्याप्रमाणेंच आमचीही दशा होईल, हें रात्रंदिवस डोळ्यापुढें ठेवून जें करणें असेल तें समंजस व सुशिक्षित लोकांनीं करावें.

# व्यापारवृद्धि.

आपल्या भाषेंतील ‘ व्यापार ’ शब्द अत्यंत व्यापक आहे. शरीराच्या व मनाच्या कोणत्याही चलनावस्थेस व्यापार ह्मणतात. ‘ व्यापारा ’च्या या मूळ अर्थापासून बाकीचे अर्थ निघालेले आहेत. सांप्रत निबंधांत त्याचा सार्वत्रिक अर्थ घेऊन तत्संबंधानें कांहीं विचार वाचकांपुढें आणण्याचा इरादा आहे.

ज्यांनीं सामाजिक स्थित्यंतरांचा लक्षपूर्वक विचार केलेला नसतो त्यांस असें वाटत असतें कीं, मृगयेवर चरितार्थ करून राहणारे रानटी लोक, पशुपालन किंवा कृषिकर्म करून राहणाऱ्या लोकांपेक्षां विशेष उद्योगी असतील. पण ही त्यांची चुकीची समजूत आहे. मांस, स्तन्य, आणि धान्य हीं मनुष्यांच्या उपजीविकेचीं मुख्य साधनें होत. यांपैकीं कोणत्याही एकावर, दोहोंवर किंवा साऱ्या तिहींवर मनुष्यास आपला चरितार्थ करतां येतो. शिकार करणें, मेंढरें, गाई, ससे, कोंबडीं, डुकरें वगैरे जनावरें पाळणें, व दूधदुभतें करणें, आणि जमीन तयार करून तींत धान्य, भाजीपाला, फळफळावळ उत्पन्न करणें—या तीन गोष्टींपैकीं पहिलीपेक्षां दुसरीस, व दुसरीपेक्षां तिसरीस, अधिक श्रम, अधिक आत्मसंयमन व अधिक दूरदृष्टि लागतात, हें सहज समजण्यासारखें आहे. तेव्हां ज्या लोकांत उपजीविकेचीं हीं तिन्ही साधनें अस्तित्वांत आलीं असून त्यांची अवश्यकता पडूं लागली असेल, ते लोक पहिल्या, किंवा पहिल्या आणि दुसऱ्या, साधनानें उपजीविका करणाऱ्या लोकांपेक्षां अधिक उद्योगी असले पाहिजेत हें उघड आहे.

मनुष्यांशिवाय इतर प्राण्यांपैकीं कांहीं केवळ मांसाहारी, कांहीं केवळ उद्भिज्जाहारी, व कांहीं मांसोद्भिज्जाहारी असे आहेत. फक्त मनुष्य मात्र या तीन प्रकारच्या आहारांपैकीं पाहिजे तो आहार करून राहूं शकतो. पण जसजशी त्याला उन्नतावस्था येत जाते, तसतसा त्याचा मांसाहार कमी होत जाऊन उद्भिज्जाहार वाढूं लागतो, व शेवटीं तो केवळ उद्भिज्जाहारी होईल किंवा

होणें त्यास भाग पडेल, असें कित्येकांचें मत आहे. पण येथें आपणांस त्याची चर्चा करीत बसण्याची गरज नाहीं. येथें इतकेंच ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, मनुष्याशिवाय इतर प्राण्यांचे जे तीन वर्ग आहारभेदावरून वर केले आहेत, त्यांपैकीं कोणत्याही वर्गांतील प्राण्यास आपलें भक्ष्य 'गोपालवृत्ती'चें किंवा 'कृषिवलवृत्ती'चें अवलंबन करून संपादितां येत नाहीं. अशा रीतीनें आपला चरितार्थ करण्याची बुद्धि व सामर्थ्य फक्त मनुष्यांतच आहे. मनुष्याशिवाय इतर प्राणिसंख्येची बुद्धि नैसर्गिक प्राण्युत्पत्तीवर व भूमिगत उद्भिज्जोत्पत्तीवर अवलंबून असते. ती कमी झाली कीं त्यांची संख्या कमी होते, व अधिक झाली कीं अधिक होते. मनुष्याची तशी गोष्ट नाहीं. त्याच्या शरीराच्या व मनाच्या विशिष्ट रचनेमुळें त्याला आपल्या उपजीविकेस लागणाऱ्या वस्तु हव्या तितक्या उत्पन्न करतां येतात. यामुळें मनुष्यांची संख्या आणि त्यांस लागणारें अन्न हीं एकसारखीं वाढत आहेत.

मनुष्यांत व इतर प्राण्यांत दुसरा आणखी एक भेद आहे तो हा कीं, मनुष्यांची उपभोगेच्छा इतर प्राण्यांच्या उपभोगेच्छेसारखी मर्यादित नाहीं. इतर प्राण्यांस उदरपोषण आणि स्वजातिवर्धन यांशिवाय इतर सुखांची कल्पनाही नसते, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. यामुळें त्यांच्या या दोन क्षुधांचें समाधान होत असलें ह्मणजे ते सुखी असतात. मनुष्यांची तशी गोष्ट नाहीं. इतरांप्रमाणें या दोन क्षुधांची पीडा त्यांच्या पाठीमागें लागली असून, शिवाय त्यांस अनेक प्रकारचे मानसिक व शारीरिक उपभोग घेतां येण्यासारखीं मनें व शरीरें प्राप्त झालीं आहेत, व या अनेकविध उपभोगांकडे त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति आहे. हे अनेक उपभोग घेण्याचें त्यांचे अंगीं जें सामर्थ्य आहे त्यामुळें ते इतर प्राण्यांपेक्षां अधिक सुखी आहेत किंवा नाहींत, हा वादग्रस्त प्रश्न आहे, व याचें समाधानकारक उत्तर देतां येईल, असेंही वाटत नाहीं. थोड्या वासना आणि थोडी तृप्ति, व पुष्कळ वासना आणि पुष्कळ तृप्ति—या दोन स्थितींपैकीं इष्टतर कोणती,

याचा निर्णय करण्यास कोण समर्थ होणार आहे ! या वादांत समंजस मनुष्यानें कधींही पडूं नये. मनुष्यांस विचार करतां येऊं लागल्यापासून, कांहीं पहिला, व कांहीं दुसरा, पक्ष घेऊन भांडत आहेत, व तदनुरोधानें **निवृत्ति व प्रवृत्ति** असे दोन विचार व आचार पंथ झाले आहेत. फलमूलाशन करून रहावें, पूर्ण वैराग्याचें अवलंबन करावें, पर्वतांच्या गुहांत वास करावा, आणि संसाराच्या भानगडींत पडूं नये, असें **निवृत्ति** पंथाचे प्रचारक आज शेंकडों वर्षे सांगत असतां, व बऱ्याच अंशीं वागून दाखवीत असतां, प्रवृत्तिमार्गाकडे जग अधिकाअधिक जात चाललें आहे. तेव्हां सामान्य विचाराअंतीं असें दिसून येईल कीं, अनेक उपभोग भोगल्यापासून आपण इतर प्राण्यांपेक्षां अधिक सुखी होवो किंवा न होवो, त्या गोष्टीचा निर्णय करण्याच्या भरीस मुळींच न पडतां, अनेक उपभोगांची वांछा करावी, ते प्राप्त होण्यासाठीं रात्रंदिवस झटावें, आणि त्यांपासून होईल तितकें सुख करून घ्यावें, असा मनुष्यांचा सामान्य स्वभाव आहे, व याच स्वभावामुळें मनुष्यांच्या व इतर प्राण्यांच्या वर्तनांत इतकें अंतर पडलें आहे.

मनुष्यांच्या आहारवस्तु कष्टसाध्य आहेत, व त्यांची उपभोगेच्छा अमर्याद आहे, येवढ्या दोन गोष्टी स्पष्टपणें ध्यानांत आल्या ह्मणजे त्यांस इतर प्राण्यांपेक्षां शेंकडोंपट अधिक उद्योग कां केला पाहिजे, हें सहज समजणार आहे. हें ज्यास पक्कें समजून येईल तो सहसा निरुद्योगी होणार नाहीं. याशिवाय, निरुद्योगी लोकांस उद्योगी लोकांच्या वश होऊन किती त्रास सोसावा लागतो, हें ज्यास कळलें असेल तो तर स्वतः उद्योगी होईल इतकेंच नाहीं, तर इतरांसही उद्योग करण्यास प्रवृत्त करील. विशेष उद्योगी मनुष्यांचें सान्निध्य नसल्यास सामान्य उद्योग करून आयुष्य घालविणें शक्य आहे. पण कोणत्याही कारणानें उद्योगी मनुष्याशीं गांठ पडल्यास, एक तर त्याच्याप्रमाणें उद्योग करण्यास, किंवा त्याच्या आधीन होऊन तो ठेवील त्या स्थितींत राहण्यास, तयार झालें पाहिजे. सध्यां

आह्मा निरुद्योगी हिंदू लोकांची उद्योगी इंग्रज लोकांशीं गांठ पडली आहे. तेव्हां एक तर आह्मी त्यांच्यासारखा उद्योग करण्यास राजी झालें पाहिजे, किंवा ते ज्या स्थितींत ठेवतील त्या स्थितींत राहण्यास सिद्ध असलें पाहिजे. **आमचें भावी स्वातंत्र्य, अथवा आमचें निरंतर दास्य, सर्वथैव आमच्या उद्योगावर अवलंबून आहे.**

मनुष्यांच्या उद्योगाचे किंवा प्रवृत्तिप्रणीत मानसिक व शारीरिक चलनावस्थेचे दोन भेद आहेतः एक नियामक व दुसरा उत्पादक. नियामक उद्योग ह्मणजे ज्या उद्योगामुळें मनुष्यांस आपल्या समाजांत व्यवस्था ठेवतां येते. राजे, मंत्री, लष्करी शिपाई, न्यायाधीश, पोलीस, सामान्य नीतिशिक्षक वगैरे लोकांचा उद्योग पहिल्या प्रकारचा आहे—म्हणजे हे समाजयंत्राचे फक्त चालक किंवा व्यवस्थापक आहेत. शेतकरी, कोष्टी, सुतार, गवंडी वगैरे सर्व प्रकारचे कारागीर व धंदेवाले लोक दुसऱ्या वर्गांत येतात, म्हणजे त्यांचा उद्योग उत्पादक आहे. सुधारलेल्या राष्ट्रांतील कांहीं लोक पहिल्या प्रकारचा, कांहीं दुसऱ्या प्रकारचा, व कांहीं दोनही प्रकारचे उद्योग करीत असतात. देशाच्या विशिष्ट स्थितीप्रमाणें या निरनिराळ्या वर्गांतील लोकांचें प्रमाण कमीअधिक होत असतें. केवळ नियामक उद्योग करणारांची संख्या अगदीं स्वल्प असून, थोडासा नियामक व पुष्कळ उत्पादक उद्योग करणारांची मोठी संख्या ज्या देशांत असते, तो विशेष सुखी असतो. अमेरिकेंत सध्यां अशी स्थिति आहे. त्यामुळें तेथील लोक इतर देशांतील लोकांपेक्षां प्रत्येक बाबतींत फार पुढें सरसावले आहेत. अमेरिकन लोकांस उत्पादक उद्योग करण्याचें जणूं काय वेड लागून गेलें आहे, व त्यामुळें **संयुक्त संस्थानें** इंद्रलोकतुल्य होऊन गेलीं आहेत ! या संस्थानांच्या खालोखाल इंग्लंड व फ्रान्स हे देश आहेत. सगळ्याच देशांतील लोकांस सारखा उद्याग करण्याचीं स्वाभाविक व कृत्रिम साधनें असतील, व साऱ्यांस सारखें वैभव प्राप्त करून घेतां येईल, असें आमचें ह्मणणें नाहीं. तथापि एक गोष्ट आम्हांस पक्की ठाऊक

आहे कीं, कोणत्याही देशांतील लोकांस प्राप्त होण्यासारखें जें सुख असेल तें त्यांना वर सांगितलेल्या पद्धतीनें उद्योग केल्याशिवाय कधींही प्राप्त होणार नाहीं. ज्या लोकांस उत्पादक उद्योगाचा कंटाळा, व कांहीं हौस असली तर नियामक उद्योगाची—असे लोक मोठेपणास कधींही चढणार नाहींत. पण सध्यां तर आमची तशी स्थिति होऊन गेली आहे. ज्याला त्याला अंमलदार व्हायाला पाहिजे. सगळ्यांनींच अंमलदार होऊन चैन करण्याची इच्छा धरल्यावर चैनीचे पदार्थ तरी उत्पन्न करणार कोण? उत्पादक उद्योग करण्याची हौस सार्वत्रिक होऊन संपत्ति व व्यापार वाढल्याशिवाय सर्वांस चैन तरी कोठून करतां येणार? अंमलदार मुळींच नकोत, असें आमचें म्हणणें नाहीं; पण शेरभर मसाला आणि मूठभर तांदूळ, अशी स्थिति काय कामाची? सन १७८९ सालीं फ्रान्स देशांत जी मोठी राज्यक्रांति झाली तिच्या अनेक कारणांपैकीं फाजील अंमलदार हें एक मुख्य कारण होतें. जिकडेतिकडे अंमलदारांचा सुळसुळाट होऊन गेल्यामुळें, देशांतील वार्षिक संपत्तीचें उत्पन्न अगदीं संपुष्टांत आलें होतें इतकेंच नाहीं, तर जे थोडे उत्पादक लोक काबाडकष्ट करून थोडीबहुत संपत्ति उत्पन्न करीत, त्यांवर पराकाष्ठेचा जुलूम होऊं लागला होता. अंमलदार वाजवीपेक्षां अधिक झाल्यानें उत्पादक रयतेचें दोन प्रकारांनीं नुकसान होतें. एक, त्यांच्या पगारांसाठीं तिला आपल्या प्राप्तीचा बराच वांटा द्यावा लागतो; व दुसरें, त्यांच्या जुलमामुळें, केलेलें उत्पन्न आपल्या हातीं लागेल किंवा नाहीं, अशाविषयीं तिला संशय येऊं लागतो. या दोन कारणांमुळें उत्पन्न करण्याची इच्छा मंदावते, आणि तसें झालें म्हणजे सर्वांचेंच नुकसान होतें. हाच परिणाम सरकारी अंमलदारांशिवाय इतर प्रकारचे अनुत्पादक लोक वाढल्यानेंही होतो. फाजील धर्माधिकारी, फाजील नीतिप्रसारक, फाजील शिक्षक, फाजील अडते, फाजील लेखक ( पत्रकर्ते, पुस्तककर्ते, वगैरे ), फाजील वकील, फाजील राजकारस्थानी—या सर्वांच्या फाजीलपणांत म्हणजे त्यांची वाजवीपेक्षां जास्त संख्या होण्यांत, कष्टाळू रयतेचा फार तोटा

आहे. अशा प्रकारचे लोक मुळींच नसावेत, असें आमचें म्हणणें नाहीं. तसें झाल्यास समाज मुळींच सुरळित चालावयाचा नाहीं. पण त्यांचें कमीपण त्याला जितकें विघातक आहे तितकेंच त्यांचें अधिकपणही विघातक आहे. आमच्या इकडील अलीकडल्या सुशिक्षित लोकांनीं सरकारी नोकरीवर सगळा जीव ठेविल्यामुळें आपली किंमत किती कमी करून घेतली आहे बरें ! हाडांचीं काडें करून, व शेंकडों रुपये खर्च करून, बी. ए. पर्यंत अभ्यास करावा, आणि पुढें फळ काय तर रेव्हिन्यू खात्यांत, किंवा शाळाखात्यांत २०।२५ रुपयांची नोकरी ! चांगला सुतार सुद्धां तुमच्या शाळेचा उंबरठा न चढतां २५।३० रुपये सहज मिळवितो, हें या ग्राजुएटांस समजूं नये काय ? तसेंच कोठें १०।१२ रुपयांची जागा रिकामी झाली कीं, तीबद्दल शेंपन्नास मॅट्रिक्युलेशन पास झालेल्या उमेदवारांचे अर्ज ! धिक् तुमची विद्या आणि तुमचें कर्तृत्व ! कष्टानें संपादिलेल्या विद्येचा असा सवंग विक्रय करावयाचा काय ? विद्यार्जनानें विकसित झालेलीं मनें स्वतंत्र धंदे स्थापण्याकडे लावाल, तर तुम्हांस अन्नाची किंवा मानाची काय वाण पडणार आहे ? पण खांदा देऊन काम करण्याची, व दुसऱ्याचे गुलाम न होतां स्वतःच्या करामतीवर चरितार्थ संपादण्याची, धमक आतां कोठें राहिली आहे !

---

# सूर्याचें कवच.

आकाशांत जो प्रतिदिनीं प्रखर तेजाचा पुंज दिसतो त्यासच आपण सूर्य ह्मणतों. सूर्याचा एकंदर प्रचंड देह व अतिविस्तीर्ण कवच हीं ध्यानांत आणिलीं ह्मणजे सूर्यबिंब हें अगदीं लहान आहे, व त्यावरून या अवाढव्य तेजोराशीची साधारण सुद्धां कल्पना येणार नाहीं असें वाटतें. दृग्गोचर बिंबाभोंवतीं अत्यंत रमणीय वर्णाचें विशाल कवच आहे, व यासच पूज्य ज्योतिर्विद तेजोजलधि म्हणतात. या कवचांतील पहिला भाग ( क्रोमा स्फिअर )

याची उंची बिंबापासून ९००० ते १०००० मैलपर्यंत आहे. बिंबाजवळ याचा वर्ण चकचकित शुभ्र मौक्तिकाप्रमाणें असून वर लाल होत गेला आहे. येथें सूर्याचें कवच संपलें नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें हा कवचांतील पहिला प्रांत झाला. याचेवर सुमारें एक लक्ष मैल उंचीचा प्रदेश आहे यास ( कोरोना ) मुकुटाचा अंतर्भाग ह्मणतात. पृथ्वीच्या वातावरणाची उंची सुमारें ९० मैल आहे, म्हणून शाळांतील पुस्तकांत बरेच दिवसांपासून लिहिलेलें आहे. पण सूर्याचे आवरणाचा अजमास आपणांस आतांशा लागलेला आहे. वरील प्रदेश क्वचित् दिसतात. वेधशाळेंत नलिकायंत्रानें हे दृक्पथांत आल्याचा नुसता भासच होतो; पण सूर्यग्रहणाचे वेळीं हे दिसतात. या वेळीं सूर्याजवळ अतिशय मौज दिसते. वर सांगितलेला लखलखित प्रदेश व मधून झळकणाऱ्या ज्वाला किंवा उष्णतेचे लोट फार गमतीचे दिसतात.

येथेंच सूर्याचें कवच संपलें काय ? नाहीं. यावर आणखी मोठा विस्तीर्ण प्रांत आहे. याची उंची अजमासें लक्ष दीड लक्ष मैल आहे. या उंचीविषयीं सध्यां मोठमोठ्या विद्वानांचे शोध चालले आहेत. हा उंचीचा अजमास सूर्यगृहणाचे वेळीं घेतलेल्या वेधांवरूनच केवळ करितां येतो. वेध घेण्यास योग्य अशीं ग्रहणें थोडीं येतात, व तेव्हांही ग्रासकाल थोडा असल्यानें घेतलेला वेध बिनचूक आहे कीं नाहीं, हें पाहण्यास वेळ मिळत नाहीं. तथापि सर्वानुमतें वर सांगितलेला उंचीचा अजमास ग्राह्य आहे. बिंबापासून जसजसें वर पहावें तसतसा वर्तुलपरिघ नाहींसा होतो. अनियमित वक्राकार व कोठें उंच सखल असा परिघ दिसूं लागतो.

इ० स० १८७८ तल्या सूर्यगृहणाचे वेळीं, सूर्याभोंवतीं जो एक मुकुट किंवा तेजःपरिवेष आहे, तो फार चांगला दिसला. या परिवेषाची रुंदी अगदीं अनियमित आहे, व यामुळें अपूर्ण व्यासाची लांबी फारच भिन्न आहे. सूर्याचे व्यासाचे दोन्ही टोंकांस चापटलेला आकार असल्यानें एकंदर चौकोनी आकृति दिसते.

वर सांगितलेल्या आवरणांस सूर्याचीं वातावरणें ह्मणतां येतील. किरणपृथक्करणशास्त्रावरून असें समजतें कीं, पहिलें ‘ क्रोमा स्फि-

अर ' आवरण यांत हैड्रोजन ओतप्रोत भरला आहे. हा हैड्रोजनचा समुद्र कधीं कधीं खवळलेला दिसतो, व अशा वेळीं वरचे बाजूस ज्वाला दिसतात व त्यामुळें विशाल वृक्षांचे वनाप्रमाणें शोभा दिसते.

सूर्याची उष्णता १ कोटी ८० लक्ष पासून तों ३ हजार डिग्रींपर्यंत आहेः म्हणजे अत्यंत उष्ण प्रदेश व अत्यंत थंड प्रदेश यांचे उष्णतेंत एवढा भेद आहे. वरचे बाजूस उष्णता कमी असल्यानें १०० वर्षांपूर्वी असें मत होतें कीं, सूर्याचे पृष्ठभागावर प्राणिवर्ग वास करीत असावेत. यास सबळ कारण असें दाखविलें होतें कीं, वरील प्रचंड कवचानें उष्णतेचें ग्रहांकडे परावर्तन होऊन खालील प्राण्यांचें रक्षण होतें. पण हल्लीं ही कल्पना खोटी आहे असा समज झाला आहे.

सूर्यबिंबाची त्रिज्या चार लक्ष मैल आहे. पण या विशाल बिंबाभोंवतीं वर सांगितलेलें विस्तीर्ण कवच आहे. या कवचांत एकंदर कोणकोणते पदार्थ आहेत याबद्दल शोध चालले आहेत, व आणखी कांहीं वर्षांनीं ज्योतिःशास्त्रज्ञांच्या दीर्घ व सयुक्तिक प्रयत्नांनीं आपणांस रविमंडलाची बरीच चांगली कल्पना करितां येईल.

---

## सूर्यावरील ठिपके.

बिचाऱ्या चंद्राचें तेज सौम्य असल्यामुळें कविजनांनीं त्याचें पुनः पुनः निरीक्षण करून त्यास ‘ शशांक ’ अथवा ‘ मृगलांछन’ करून सोडिलें! पण सौम्य प्रकृतींतील छिद्रांचा अन्वेष करण्यांत काय पुरुषार्थ आहे ? औषधींवर अमृतसेक करणारा, अखिल सचेतन सृष्टीस आनंद देणारा, व कामिजनांचा ताप हरण करणारा असा चंद्र आम्हांस आपणाकडे हवें तितकें न्यहाळून पाहूं देतो, व तसें केल्यानें आमच्या डोळ्यांस इजा न होतां, उलट गारवा येतो, याबद्दल उपकृत होऊन आम्हीं त्याच्या दोषांचें गोपन करावें कीं आविष्करण करावें ? पण खरी कृतज्ञता या अपूर्ण जगांत आहे कोठें ? जो शांत असेल त्याविषयीं चर्चा करीत

बसावयाचें, व जो खरमरीत असेल त्याविषयीं ब्र सुद्धां काढावयाचा नाहीं, अशी जगाची रीत आहे! चंद्र गरीब ह्मणून निऱ्याएवढीं पोरें देखील त्याची चेष्टा करतात, आणि—

चांदोबा, चांदोबा, भागलास का? *रुईच्या झाडावर बसलास का?
रुईचें झाड करवंदी ॥ मामाचा वाडा चिरेबंदी ॥

अशा प्रकारचा असंबद्ध प्रलाप त्याच्या संबंधानें करतात. फार तर काय, पण कुत्रीं सुद्धां त्याच्याकडे पाहून भोंकत सुटतात, हें नवल नव्हे काय? पण तेंच सूर्याचें पहा कसें आहे तें! या प्रखर स्वारीकडे डोळे वटारून पहाण्याची कोणाची छाती आहे काय? कोणी अविचारी असलें साहस करण्यास प्रवृत्त होईल तर निमिषमात्रांत त्याची दृष्टि खाक होऊन जाऊन, त्यास आमरण अंधत्व येणार, अशी भीति असल्यामुळें, कोणीही त्याच्या वाटेस जात नाहीं! उलट त्याची मर्जी खप्पा न व्हावी, ह्मणून त्रिकाल त्याच्यापुढें नाकें घांसून, 'बाबा, आम्ही तुझे किंकर, तूं आमचा अधिस्वामी, प्राणरक्षक, अन्नदाता, व्याधिविनाशकर्ता' अशा प्रकारें त्याची स्तुति करून, जेणेंकरून त्याची मर्जी आपणांवर सुप्रसन्न राहील, अशा प्रकारचें वर्तन आपण करीत असतों! असें असल्यामुळें, त्याच्या प्रकृतींतील छिद्रान्वेष करण्यास आजपर्यंत कोणाचीही प्राज्ञा झाली नाहीं, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. तथापि कोणी केवढाही पराक्रमी झाला तरी त्याला त्याच्या पराक्रमाचा फाजील गर्व होऊं नये, म्हणून सृष्टिकर्त्यानें प्रत्येकांत एकेक गोम ठेवून दिलेली आहे. चंद्रास आपल्या आल्हादकत्वाचा फार अभिमान झाला असता, ह्मणून त्याच्या पाठीमागें क्षयवृद्धि लावून ठेविली आहे; व सूर्यास आपल्या तेजोमय शरीरलावण्याची प्रतिष्ठा वाटून तो कदाचित् शिरजोर झाला असता, म्हणून त्याच्या त्या द्युतिपूर्ण शरीरांत कज्जलांकसदृश रंध्रपरंपरा निर्माण केली आहे! आणि हीमुळें आपण जेव्हां दुर्बिणींतून ह्याच्याकडे पहातों तेव्हां

---

* देशपरत्वें 'लिंबुणिच्या झाडाखालीं लपलास का' असेंही पाठांतर आहे.

त्याचें सर्व शरीर तेजोमय न दिसतां, त्यावर कांहीं ठिकाणीं कांतिपुंज आणि कांहीं ठिकाणीं कज्जलपुंज असावेत, असा भास होतो. या कांतिपुंजांस इंग्रजी भाषेंत 'फॅक्यूली,' व कज्जलपुंजांस 'सन्स स्पॉट्स,' ( ह्मणजे सूर्यावरील ठिपके किंवा सूर्यरंध्रें, ) असें ह्मणतात. हे 'ठिपके' असावे तरी काय, याविषयीं बराच वाद आहे. या ठिपक्यांचें सूक्ष्म निरीक्षण प्रथम प्रसिद्ध **ग्यालिलीओनें** केलें. त्याच्या दुर्बिणींतून त्याला असें दिसलें कीं, हे ठिपके सूर्याच्या एका अंगानें नाहींसे होऊन दुसऱ्या अंगास दिसूं लागतात; ह्मणजे आरपार नळींत लहानसा खडा घातला असतां जसा तो एका तोंडानें आंत शिरून दुसऱ्या तोंडानें बाहेर पडतो, तसें ह्या ठिपक्यांचें होतें, असें **गालिलीओस** आपल्या वेधांवरून वाटलें, आणि या गोष्टीवरून, सूर्यास आपल्या आंसासभोंवतीं फिरण्यास किती वेळ लागतो, हें काढावें, असा त्याचा विचार होता. अलीकडे ह्यासंबंधानें जे शोध लागले आहेत, त्यांवरून असें दिसून आलें आहे कीं, सूर्याच्या गतीशिवाय या ठिपक्यांस स्वतंत्र गति आहे. सूर्यकक्षेच्या आसमंतात् असणारे ठिपके त्याच्या ध्रुवांजवळ असणाऱ्या ठिपक्यांपेक्षां विशेष वेगानें फिरतात; यामुळें या ठिपक्यांच्या गतीवर सूर्याच्या गतीचें प्रमाण बसवितां येत नाहीं. दुसरें असेंही दिसून आलें आहे कीं, एका विवक्षित वेळीं यांची जेवढी संख्या दृष्टीस पडते, तेवढीच प्रतिवर्षी त्यावेळीं दिसते असा नियम नाहीं; उलट सुमारें दहा वर्षांनीं असा एक वेळ येतो कीं, त्याच्या सुमारास या ठिपक्यांची अतिशयच गर्दी होऊन गेलेली असते. जनरल **सेबाईन** नांवाच्या ज्योतिष्याचें असें ह्मणणें आहे कीं, सूर्यावर जेव्हां जेव्हां या ठिपक्यांची एकच गर्दी होऊन जाते, तेव्हां तेव्हां पृथ्वीवरील लोहचुंबकावस्थेंत पराकाष्ठेचें अस्थैर्य उत्पन्न होतें. यावरून सूर्यप्रकृतींत फेरफार झाले असतां ते आमच्या पृथ्वीच्या प्रकृतींतील फेरफारांसही कारण होतात, हें वाचकांच्या नजरेस येईल. या ठिपक्यांच्या संख्येशीं आपल्या पृथ्वीवर पडणाऱ्या पर्जन्याचें प्रमाण कदाचित् बसवितां येईल, व वायुविद्येच्या साहाय्यानें कोणत्या वर्षी कोणत्या देशांत अदमासें

किती पाऊस पडल, याचें अनुमान करतां येईल, असें आपले कै० प्रसिद्ध ज्योतिषी केरूनाना छत्रे यांचें ह्मणणें होतें. ते आज जिवंत असते तर या वर्षीं अवर्षण पडणार कीं नाहीं, हें कदाचित् त्यांस निश्चयात्मकपणानें सांगतां येतें. पण अशा प्रकारचा अपूर्व शोध लावण्याचें श्रेय या देशास यावें, असें त्याचें भाग्य कोठें आहे ? असो.

आतां मुख्य मुद्याचा प्रश्न असा आहे कीं, हे ठिपके आहेत काय, आणि हे उत्पन्न होतात कसे ? अलीकडे ज्योतिषज्ञांनीं या शास्त्राविषयीं फार काळजीनें शोध केले आहेत, त्यामुळें प्रस्तुत विषयावर पुष्कळच उजेड पडला आहे. या ठिपक्यांच्या स्वरूपांत एक विशेष गोष्ट अशी आहे कीं, यांचा मध्यभाग यांच्या परिवापेक्षां विशेष काळा दिसतो, यावरून गेल्या शतकांतील ज्योतिष्यांनींच अशी कल्पना केली होती कीं, हे ठिपके सूर्यगोलकास वेष्टणाऱ्या तेजांत मोठमोठीं रंध्रें, विवरें, किंवा खळगे असावेत. अलीकडील शोधांवरून व प्रयोगांवरूनही या कल्पनेचें कांहीं अंशीं दृढीकरणच झालें आहे. दुसरें असें सिद्ध होत आलें आहे कीं, वर ज्यांस ‘ कांतिपुंज ’ किंवा ‘ फॅक्यूली ’ असें ह्मटलें आहे, ते तेजोमय ढग किंवा अभ्रें असून तीं सूर्यगोलकाच्या मध्यापासून रंध्रस्थानापेक्षां थोडींशीं दूर असावींत. दिसण्यांत हे ‘कांतिपुंज’ या ठिपक्यांच्या पाठीमागें दिसतात, व तसे ते दिसणें स्वाभाविक आहे; कारण सूर्यमध्यापासून ठिपक्यांपेक्षां ते बरेच दूर असल्यामुळें, व ठिपक्यांपेक्षां त्यांची गति मंद असल्यामुळें, ते त्यांच्या मागेंच दिसले पाहिजेत. ज्या वेधांवरून वरील प्रकार दिसून येतो, त्याच वेधांत दुसरें असेंही दिसतें कीं, सूर्यगोलकास वेष्टणारा जो तेजःपट आहे, त्याच्याखालीं हे ठिपके उद्भवतात, आणि हे कांतिपुंज त्यांत तरंगत असतात. हें जर खरें असेल, तर हे ठिपके आणि हे कांतिपुंज, सूर्यगोलकाभोंवतीं जें वाय्वास्तरण आहे त्यांत ऊर्ध्वाधर गति उत्पन्न होऊन तिच्यामुळें, सूर्यास वेष्टणाऱ्या तेजःपटापेक्षां कांहींसा जाडा पदार्थ त्या पटाच्या तळाशीं जात असल्यानें व वर येत असल्यानें,

उत्पन्न होतात किंवा दिसूं लागतात, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. अशा प्रकारचा एक कांतिपुंज किंवा 'फॅक्यूली' तेजःपटांत बुडतां बुडतां त्याच्याच आकाराचा ठिपका बनत गेला, असें एका वेधवाल्याच्या दृष्टीस नुकतेंच पडलें. प्रत्येक वीस महिन्यांनीं या ठिपक्यांपैकीं कांहीं ठिपके पुनः दिसूं लागतात; व त्या सुमारास पृथ्वी, शुक्र, बृहस्पति, आणि सूर्य हे एकमेकांपासून एका विवक्षित अंतरावर येतात, असें पाहण्यांत आलें आहे. यावरून सूर्याशीं आणि इतर ग्रहांशीं, येवढालीं अंतरें असूनही, आपल्या पृथ्वीचा किती निकट संबंध आहे, हें वाचकांच्या ध्यानांत येणार आहे, व त्यामुळें फलज्योतिष केवळ थोतांड नसेल, असें क्षणभर वाटणार आहे.

---

# हिमालयवर्णन.

अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा । हिमालयो नाम नगाधिराजः ।
पूर्वापरौ तोयनिधीवगाह्य । स्थितः पृथिव्या इव मानदंडः* ॥

भव्य अशा सृष्ट किंवा कृत्रिम वस्तूंचें अवलोकन करून जिज्ञासा तृप्त करण्याची हौस सर्वांस असते. पण अतिपरिचयामुळें संनिध असलेल्या प्रेक्षणीय व वर्णनीय वस्तूंची आपल्या हातून अनेक वेळ अवज्ञा होते, आणि त्या अवज्ञेमुळें, त्या वस्तूंच्या दर्शनापासून होणाऱ्या ज्ञानास व आनंदास आपण अंतरतों. हिमालय, सिंधू, गंगा, विंध्य, ब्रह्मपुत्रा, सह्याद्रि वगैरे प्रचंड गिरिनद्या अत्यंत प्रेक्षणीय व वर्णनीय असून, आमचें लक्ष त्यांकडे जात नाहीं, हा

---

*आहे उत्तर दिशेस नग तो नाम हिमालय ज्याला ।
देव जयाचा आत्मा, ह्मणती पर्वतराज जयाला ॥
प्रसार ज्याचा पूर्वापर ते जलधी स्पर्शुनि राहे ।
पृथ्वीच्या जो विस्ताराचा मानदंड जणुं आहे ॥

कृ० शा० दातारकृत कुमारसंभवाचें भाषांतर.

चमत्कार नव्हे काय? किंवा राजे सर टी माधवराव म्हणतात त्याप्रमाणें—

वस्तू हस्तीं असतां किंमत तीची उणीच मानवती।

हेंच खरें आहे. उदाहरणार्थ, कवीनें आर्येच्या उत्तरार्धांत जें ह्मटलें आहे कीं, 'निजपत्नी सुंदर असून परांगना रूपवती भासते,' हें किती खरें आहे? सृष्टींतील भव्य वस्तूंच्या अवलोकनानें व त्यांचें वर्णन वाचण्यानें मनोवृत्तींवर फार उत्कृष्ट परिणाम होतात, हें सर्वांस ठाऊक आहे; व आमच्या सुदैवानें या भरतखंडांत व त्याच्या सीमेवर तसल्या अनेक वस्तु आहेत. पण आमच्या शालोपयोगी क्रमिक पुस्तकांत किंवा येथील वर्तमानपत्रांत त्यांचें वणन कधीं येईल तर ज्याचें नांव तें! तसेंच, रमणीय कृत्रिम वस्तूंचीही येथ कांहीं वाण आहे, असें नाहीं. रायगडप्रतापगडांसारखे किल्ले; ताजमहाल व गोलघुमट यांसारख्या इमारती; अजिंठावेरूळ वगैरे ठिकाणच्या लेण्यांसारखीं कोरींव कामें; व दक्षिण हिंदुस्थानांतील देवालयांची आश्चर्य करण्याजोगीं शिखरें—यांकडे कोणी कधींच नजर फेंकीत नाहीं! पृथ्वीवरील इतर स्थळीं पाहण्यासारख्या चिजा नाहींत, असें आमचें म्हणणें नाहीं. तसेंच, त्या पहाण्यांत द्रव्यव्यय करूं नये, किंवा त्यांचीं वर्णनें वाचण्यांत वेळ घालवूं नये, असेंही आमचें म्हणणें नाहीं. इंग्लंडचा प्रवास, चीनचा प्रवास, नायगाराचा धबधबा, गिरसाप्पाचा प्रताप, स्वेझचा कालवा वगैरे गोष्टी त्याज्य आहेत असें कोण ह्मणूं शकेल? त्या साधतील तितक्या साधाव्याच. पण त्यांच्या रंगांत घरच्या वस्तूंची अवहेलना मात्र करूं नये, असें आमचें सांगणें आहे. परक्या लोकांनीं येथ येऊन येथील वस्तूंच्या आल्हादजनक दर्शनानें तल्लीन होऊन जावें, आणि हजारों रुपये खर्च करून व नानातऱ्हेच्या मजा मारून परत फिरावें, आणि आम्हांस त्यांच्या अस्तित्वाचेंही भान असूं नये, ही मात्र अत्यंत शोचनीय स्थिति होय! ही लौकर नाहींशी झाली पाहिजे. लहान मुलांच्या व मुलींच्या हातांत पडणाऱ्या पुस्तकांत व

पत्रांत येथील दर्शनीय वस्तूंचीं वर्णनें येऊन, त्या पहाण्याविषयीं त्यांच्या अंतःकरणांत तीव्र उत्कंठा जागृत झाली पाहिजे. असें न होईल तर आम्हांपाशीं त्या वस्तु असून नसल्यासारखेंच होणार आहे! सुधारकासारख्या स्वल्पमोली व स्वल्पावकाशी पत्रांत असल्या वस्तूंचीं सचित्र खुलासेवार वर्णनें देतां येणें अशक्य आहे. तथापि 'कांहींच नसण्यापेक्षां थोडें तरी असणें बरें '( Something is better than nothing ) या इंग्रजी म्हणीप्रमाणें आह्मीं जीं येथील कित्येक वस्तूंचीं वेडींवांकडीं वर्णनें करणार आहों, त्यांचा सुदाम्याच्या पोह्यांप्रमाणें वाचक आदर करतील, अशी आशा आहे.

हिंदुस्थानाच्या नकाशाकडे पाहिलें असतां, सर्वांआधीं डोळ्यांत भरणारी हिमालय पर्वताची आकृति होय. या पर्वतामुळें आमचें जें हित होत आहे, त्याची खरी कल्पना फारच थोड्यांस असेल. हा आमच्या उत्तर सीमेवर नसता तर सिंधू, गंगा, ब्रह्मपुत्रा वगैरे आमच्या मोठमोठ्या नद्या आमच्या कधींच दृष्टीस न पडत्या, व कदाचित् बंगाल प्रांतही अस्तित्वांत न येता. ज्याप्रमाणें अरबी समुद्र आणि बंगालचा उपसागर यांच्या सांनिध्यामुळें भरतखंडाच्या दक्षिण त्रिकोणार्धाचें नैसर्गिक परिघानें संरक्षण होत आहे, त्याप्रमाणें या त्रिकोणाच्या पायाचें ह्मणजे उत्तरेचें, आणि या पायाच्या वायव्य व ईशान्य कोनांचें संरक्षण या हिमालयरूप प्रचंड सृष्ट तटानें होत आहे! हिंदुस्थानच्या उत्तर प्रदेशाची लांबी कमींत कमी १५०० मैल आहे, व तितक्या लांबीचा दुर्गम तट आमच्या सुदैवानें आम्हांस प्राप्त झाला आहे. असा तट चीन देशाच्या उत्तरेस नसल्यामुळें तेथील लोकांस पुरातन काळीं किती त्रास झाला असावा, हें त्यांनीं तेथें बांधलेल्या विलक्षण भिंतीवरूनच व्यक्त होतें! आमचा हिमालय आम्हांस नसता, तर चिनी लोकांप्रमाणें आम्हांसही लाखों गुलाम शेंपन्नास वर्षें आमच्या उत्तर सीमेचा बंदोबस्त करण्याकरितां राबवावे लागले असते! पण तितका त्रास, निर्दयपणा, व खर्च करूनही जितकी निर्भयता आतां आहे तितकी आम्हांस कधींही प्राप्त झाली नसती इतकेंच

नाहीं, तर हवा, सुपीकता इत्यादिकांच्या संबंधानें हिमालयाकडून आम्हांवर हजारों वर्षें जे उपकार होत आहेत, तसले त्या मनुष्यकृत भिंताडाकडून कधींच न होते! हिमालय हें एका पर्वताचें नांव आहे व तो हिंदुस्थानाच्या उत्तरेस आहे, येवढेंच ज्यास ठाऊक आहे, त्यास सह्यविंध्यादि इतर पर्वतांच्या घटनेवरून असें वाटणार आहे कीं, पृथ्वीच्या त्या विशाल 'मानदंडा'ची रचनाही सामान्य पर्वतांसारखीच असावी. पण वास्तविक स्थिति तशी नाहीं. ज्याप्रमाणें हिमालयाचा विस्तार, त्याची उंची, त्यावरील प्राणी, वनस्पति व जमिनी—हीं सारीं इतर पर्वतस्थ वस्तूंपेक्षां भिन्न आहेत, त्याप्रमाणें त्याची रचनाही इतरांच्या रचनेहून फार निराळी आहे. हिमालय हा एक पर्वत नाहीं, तो दोन पर्वतांच्या रांगांनीं झालेला प्रचंड गिरिद्रोण आहे! विमानांत बसून फार उंच गेल्यावर, त्याकडे खालीं वांकून पाहिल्यास तो केळीच्या पानाच्या अफाट दुटाकी द्रोणाप्रमाणें दिसेल! या द्रोणाची एक बाजू हिंदुस्थानाकडे आहे व दुसरी तिबेटाकडे आहे. हिंदुस्थानाकडील बाजू दुसऱ्या बाजूपेक्षां अधिक उंच आहे. हिंदुस्थानाकडूनच या पर्वताची कल्पना मनांत आणिली, तर ज्याची धार हिंदुस्थानच्या दक्षिणेकडे टेंकविली आहे असा हा एक अतिविशाल अमरखड्ग किंवा खंजीर आहे, असें वाटेल! या बाजूस साहेब लोक हिमालयाची दक्षिण भिंत व दुसऱ्या बाजूस उत्तर भिंत ह्मणतात. दक्षिण भिंतींत किंवा बाजूंत जीं शिखरें आहेत त्यांची उंची पृथ्वींतील कोणत्याही शैलशिखराच्या उंचीहून अधिक आहे. हीं शिखरें या बाजूच्या मध्याच्या सुमारास आहेत. सर्वांत उंच शिखरास आमचे लोक **गौरीशंकर** व इंग्रज लोक **मौंट एव्हरेस्ट** असें म्हणतात. गौरीशंकराची उंची समुद्रपृष्ठभागापासून २९,००० फुटांहून अधिक आहे. याच्या खालोखाल **कांचनगंगा** नांवाचें जें दुसरें शिखर आहे त्याची उंची देखील २८,००० फुटांपेक्षां अधिक आहे. तेव्हां यांपैकीं कोणत्यावरही जाण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे वातावरणांत ओळंब्याच्या दोरीस धरून पांचसहा मैलांचा प्रवास करण्यासारखें होय! वाता-

वरणांत जों जों वरवर जावें तों तों अधिकाधिक थंडी लागते, हें सर्वांना ठाऊक आहेच, व थंडीनें पाणी गोठतें हेंही कोणास ठाऊक नाहीं, असें नाहीं. तेव्हां हीं शिखरें नेहमीं हिमाच्छादित ह्मणजे बर्फावृत कां असतात, हें सहज लक्षांत येणार आहे. आतां कोणी अशी शंका घेतील कीं, इतक्या उंचीवर येवढा विस्तार बर्फानें झांकण्यासारखें पाणी तरी कोठून येतें ? थोडासा विचार केला असतां या शंकेचें समाधान ज्याचें त्यास सहज करतां येणार आहे. बंगालचा उपसागर बंगाल्यास लागून आहे, व या उपसागराच्या विस्तीर्ण विस्तारावर भगवान् सूर्यनारायण आपल्या सहस्त्ररश्मींनीं नित्य प्रकाशून, त्याच्या पाण्याची वाफ करतो. ही वाफ वायुरूपानें बंगालच्या उपसागरापासून हिमालयापर्यंत वातावरणांतील उच्च प्रदेशांत भटकत असते. वैशाखमास उलटून गेला, आणि दक्षिणध्रुवाकडून सोंसाट्याचा थंड वारा वाहूं लागला, म्हणजे या आकाशस्थ बाष्पराशींचे सजल जलद होतात, आणि ते त्याच वाऱ्यांच्या वेगानें बंगालप्रांतावर पर्जन्यवृष्टि करीत करीत, हिमालयाच्या दक्षिण भिंतीवर धडाधड आदळूं लागतात. त्यांतल्या त्यांत जे बरेच वर असतात ते पलीकडे निसटून निघतात, आणि दक्षिण भिंतीच्या तिबेटाकडील बाजूवर थोडासा वर्षाव करून पुढें पळ काढतात ! द्रोण्युदराचें उल्लंघन होईतोंपर्यंत त्यांस आपण आपला रस्ता अडविणाऱ्याच्या कचाट्यांतून सुटलों, असें वाटत असतें ! पण त्यांचा हा भ्रम लौकरच नाहींसा होतो ! द्रोणीच्या दुसऱ्या बाजूस जाऊन पोहोंचल्याबरोबर दक्षिण भिंतीसारखीच तिकडेही प्रचंड आडवी भिंत लागते, व तिचा भेद करून निघून जाण्यासाठीं ते तीवर मत्तमतंगजाप्रमाणें टकरा देऊं लागतात ! पण तिच्या अभेद्य स्थाणुत्वापुढें त्यांचें कांहींएक न चालून, ते रडकुंडीस येतात, आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा चालूं लागून, त्यांच्या वर्षावानें त्या बाजूवर वाहूं लागणाऱ्या अश्रुजलांचे लोट द्रोणींत पडूं लागतात ! पुढें निसटून जाणाऱ्या ढगांची ही दशा झाली ; पण ज्यांच्या आड मोठमोठीं शिखरें येतात त्यांची त्यांच्या इतर

बंधुंहूनहीं विशेष कष्टमय स्थिति होते! या शिखरांवर जी कडक थंडी असते तीमुळें या शिखरांच्या आसमंतात् येणाऱ्या ढगांची जलावस्था नाहींशी होऊन त्यांस पाषाणघनता येते, आणि शिखराभोंवतीं ते बर्फाचा थर करून रहातात! पुढें सुदैवानें उष्णमासांत सूर्यास त्यांची कींव आली तर, तो त्यांस तेथून सोडविण्याचा प्रयत्न करतो, आणि या त्याच्या प्रयत्नास थोडें-बहुत यश आल्यास, ते या किंवा त्या बाजूस घसरत जाऊन इकडील नदीप्रवाहांत, अथवा तिकडील द्रोण्युदरांत जाऊन पडतात, व तेथें नद्युदकाशीं एकरूप होऊन आपला जनक जो नदीपति त्यापाशीं रूपांतरानें येऊन दाखल होतात!

हिमालयाच्या उत्तर भींतीस लागून असलेले काराकोरम वगैरे तिबेटाचे दक्षिण डोंगर आणि सैबेरिआच्या व त्याच्या दरम्यान असलेले क्युएनल्युएन नांवाचे डोंगर, चीनचे पर्वत, व हिंदुकुश वगैरे पर्वत आणि खुद्द हिमालय—या सर्वांचा मध्यबिंदु, काश्मीरच्या वायव्येस पामीर नांवाचा जो अत्युच्च घांटमाथा आहे, तो आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या मध्यबिंदूपासून या पर्वतांच्या रांगा विषम त्रिज्यांप्रमाणें आशियाखंडरूप वर्तुलाच्या परिघापर्यंत जाऊन भिडतात. बंगालच्या उपसागरांत व बंगाल-प्रांतांत जेवढ्या पाण्याची वाफ होते तेवढी सारी वर गेल्यावर, पर्जन्यरूपानें बंगालच्या मैदानांत किंवा हिमालयाच्या दक्षिणोत्तर भींतींच्या तीन बाजूंवर फिरून उतरते, किंवा त्यांपैकीं कांहींचें बर्फ होऊन तेंही उन्हाळ्यांत पुनः हिंदुस्थानाकडे वहात येणाऱ्या नद्यांतच पडतें, यामुळें हिमालयावर जितका पाऊस पडतो, तितका पृथ्वीवर दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं पडत नाहीं. अलीकडे या पावसाच्या संबंधानें जी बिनचुक मापें घेतलीं आहेत, त्यांवरून या पर्वतावर प्रतिवर्षी सरासरीनें ९२३ इंच पाऊस पडत असावा, असें दिसून आलें आहे, व १८६१ त कांहीं विशेष कारणामुळ ८०९ इंच पाऊस पडल्याचा सरकारी दप्तरांत दाखला आहे! लंडन येथें सरासरी दोन फूट पाऊस पडतो व हिंदुस्थानांत स्थलां-तराप्रमाणें १ फुटापासून ६ फुटांपर्यंत पडतो. हिमालयांतील

चेरापुंजासारख्या ठिकाणीं ३० पासून ४० फुटापर्यंत धारासंपात होतो, आणि एके वर्षी तर ६७ फुट झाला, हें सिद्ध आहे. येवढा वर्षाव, ज्यांत शहर वसलें आहे अशा एकाद्या सपाट प्रदेशांत होईल, तर त्यानें जमलेल्या पाण्याखालीं तीन किंवा चार मजली वाड्यांचा देखील मागमूस नाहींसा होईल हें उघड आहे !

---

## महाबळेश्वरवर्णन.

पृथ्वीवरील भव्य वस्तु पाहून मनुष्याच्या चित्तास इतका आनंद व समाधान कां होतें, अशी एका कवीस शंका येऊन त्यानें पुष्कळ विचार केल्यानंतर, त्या शंकेचें असें समाधान केलें कीं, भव्य वस्तूंच्या निरीक्षणापासून विश्वास उत्पन्न करणारी जी अगम्य शक्ति तिचा प्रेक्षकाच्या मनास क्षणभर बोध झाल्यासारखा होऊन, तें एका प्रकारच्या अनिर्वचनीय आनंदसुखांत गढून जातें, व त्याच्या डोळ्यापुढें असलेल्या भव्य वस्तूच्या भव्यतेपासून विश्वाच्या आदिकारणाच्या अनंतत्वाची निदान अस्पष्ट कल्पना तरी त्याच्या मनांत येऊन जाते. प्रचंड पर्वत, विशाल नद, किंवा अफाट समुद्र यांचा अवाढव्य विस्तार एकसमयावच्छेदेंकरून दृष्टिगोचर झाल्यामुळें मनास जो आल्हाद होतो, तो कविनिर्दिशित वरील कारणामुळें होतो, किंवा दुसऱ्या कशानें होतो याचा येथें निर्णय करीत बसण्याची गरज नाहीं. येवढें खरें आहे कीं, ज्यांचा काल अशा भव्य वस्तूंच्या सांनिध्यांत गेलेला नाहीं, अशांस अशा वस्तूंच्या दर्शनानें एका प्रकारचा अवर्णनीय आनंद होतो, यांत कांहीं संशय नाहीं. तेव्हां ज्यास अनुकूळ असेल, व ज्याला अशा वस्तूंच्या प्रेक्षणापासून होणाऱ्या आनंदाची चव घेण्याची योग्यता आली असेल, त्यानें केव्हां तरी त्या पहाण्यास चुकूं नये, असें आमचें सांगणें आहे. अशा वस्तु सर्वच देशांत असतात, असें नाहीं. कित्येकांना त्यांच्या अवलोकनासाठीं आपले देश सोडून फार दूरचे प्रवास करावे लागतात. सुदैवानें आमची स्थिति तशी नाहीं. या भरतखंडांत

हवा तसला देखावा पाहून त्यापासून होणारा आनंद करून घेण्याची सोय आहे. आमच्या देशाच्या उत्तरेस जो पर्वत आहे त्याच्या तोडीचा पर्वत पृथ्वीवर दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं नाहीं. तसेंच, भागीरथी, सिंधू, ब्रह्मपुत्रा वगैरे मोठमोठ्या नद्यांस मागें सारणाऱ्या नद्याही दुसरीकडे फार नाहींत. फिरून, कोणाला दर्याची मौज पहावयाची असेल तर त्याचीही येथें वाण नाहीं; कारण दक्षिणहिंदुस्थानच्या दोनही बाजू समुद्रमेखलेनें वेष्टिलेल्या आहेत. सारांश, जड सृष्टीच्या भव्यतेपासून किंवा सौंदर्यापासून होणारा आनंद करून घेण्याची अनुकूलता येथें विपुल आहे. तथापि गोरगरीबांस हिमालयापर्यंत किंवा भागीरथीपर्यंतही जातां येणें सोपें नाहीं. अलीकडे आगगाड्यांची भाडीं बरींच कमी झाल्यामुळें व प्रवासाच्या सोई वाढल्यामुळें, अगदीं सामान्य मनुष्यासही इच्छा असेल तर भागीरथीची, हिमालयाची, किंवा पश्चिम समुद्राची ह्मणजे मुंबईची यात्रा सहज करतां येणार आहे. पण ज्या महाराष्ट्रीयांच्या हातून तीही घडण्यासारखी नसेल त्यांनीं निदान महाबळेश्वरासारखीं स्थानें तरी एक वेळ पाहिल्याशिवाय राहूं नये, असें आमचें त्यांस सांगणें आहे. पूर्वीच्या लोकांनीं यात्रा करण्यांत जें पुण्य मानिलें होतें तें साधण्यासाठीं प्रतिवर्षी हजारों लोक आपापलीं जन्मस्थानें सोडून काशी, प्रयाग, गया, जगन्नाथ, रामेश्वर वगैरे पुण्यक्षेत्रांस जात असत, व त्यामुळें त्यांना आपल्या पापाचें क्षालन झालें असें वाटून जें एक समाधान होत असे तें होतच असे; पण त्याशिवाय अशा भव्य ठिकाणीं गेल्यापासून बाह्येंद्रियांवर जे उत्कृष्ट परिणाम होतात, तेही त्यांच्या इंद्रियांवर होत असत. तात्पर्य, कोणत्या तरी निमित्तानें ज्यांना अनुकूलता असेल त्यांनीं केव्हांना केव्हां तरी असलीं स्थानें पहाण्यास निघावें अशी आमची फार इच्छा आहे. आतां मागें केलेल्या हिमालयाच्या वर्णनाइतकें महाबळेश्वरवर्णन रम्य होण्याचा संभव नाहीं; कारण तो पृथ्वीचा 'मानदंड' कोणीकडे आणि सह्याद्रीचा हा एक फांटा कोणीकडे! तथापि प्रत्यक्ष अवलोकन आणि पुस्तकी ज्ञान यांत जो फरक आहे, तो हिमा-

लयाचें वर्णन आणि महाबळेश्वराचें वर्णन यांत पडण्याचा संभव आहे, व ह्मणून कदाचित् हें महाबळेश्वराचें वर्णन हिमालयाच्या वर्णनाइतकें वाचनीय होण्याचा संभव आहे. तथापि या सर्व लिहिण्यांत एक गूढ गर्वोक्ति येऊन गेली आहे ती ही कीं, आमचें हिमालयाचें वर्णन तरी वाचकांस मनोरंजक झालेंच असलें पाहिजे. पण हा समज अगदीं चुकीचा असण्याचाही संभव आहे! व खरोखरीच तो तसा असेल, तर हें महाबळेश्वरचें चऱ्हाट लोकांपुढें आणणें हा मोठा प्रमादच होय! कसेंही असो, दुकानदाराप्रमाणें आपल्यापाशीं असतील त्या चिजा गिऱ्हाइकापुढें मांडून ठेवणें हें पत्रकर्त्याचें काम आहे! ज्याप्रमाणें अनेक वस्तूंनीं शृंगारलेल्या ताटांतील प्रत्येक वस्तु प्रत्येक जेवणारास आवडणें अशक्य आहे, त्याप्रमाणें या पत्ररूपी ताटांत वाढलेल्या साऱ्या वस्तु प्रत्येकास आवडणें हेंही अशक्य आहे. तेव्हां दुकानदाराप्रमाणें किंवा मेजवानी देणाऱ्या मालकाप्रमाणें सर्व वस्तु पुढें कराव्या, आणि गिऱ्हाइकांस किंवा जेवणारांस त्या कशा काय रुचतात हें उत्कंठेनें पहात बसावें, हेंच पत्रकर्त्यास योग्य आहे. असो; आतां ही दीर्घसूत्री प्रस्तावना बस करून, मुख्य विषयाकडे एकदम वळतों.

वाचकवृंदास महाबळेश्वरीं कोणत्या वाटेनें घेऊन जावें, ही पहिली मोठी नड आहे. बेळगांवधारवाडाकडील वाचकांस साताऱ्यापर्यंत प्रवास करून जावळी पेट्यांतील मेढें खोऱ्यानें केळघर नांवाचा घांट चढून या रम्य शैलावर येणें सोईचें वाटेल. कोंकणपट्टींतील लोकांस बाणकोटापर्यंत समुद्रपर्यटण करून, व पुढें लहानशा होडींत बसून दासगांव–महाड यांच्या वाटेनें प्रतापगडाची शोभा पहात पहात थेट सरकारी बंगल्यापाशीं येऊन ठेपणारा फिट्झरल्ड घांट चढून यावेंसें वाटेल, व आह्मां पुण्याकडील लोकांस एक तर कातरज व खंडाळा हे लहानसे दोन घांट वलांडून सुरुळाहून वांई पहावी, किंवा फार झालें तर चांगल्याशा टपालाच्या गाडीच्या वेगानें चालणारी जी सदर्न मराठा रेल्वे तिनें वाठारापर्यंत अग्निरथांतून प्रवास करून, पुढें भाडोत्री टांग्यानें किंवा बैलगाडीनें वांईस येऊन दाखल व्हावें, हेंही बरें

वाटण्याचा संभव आहे. पण कसेंही केलें तरी इकडून जाणाऱ्या पथिकांस वांईपाशीं कृष्णा उतरल्याबरोबर लागणारा आठ मैलांचा घांट चढल्यावांचून गत्यंतर नाहीं. जावळी, वांई, व महाड या तीन ठिकाणांहून महाबळेश्वरीं येऊन दाखल होणाऱ्या तिन्हीही सडका आपापल्यापरी फार उत्तम आहेत; पण त्यांतल्या त्यांत महाडचा रस्ता विशेष रमणीय आहे, येवढें येथें ह्मटल्यावांचून रहावत नाहीं. तसें कां, हें मात्र येथें सांगण्याची सवड नाहीं; कारण तें सांगूं लागलों तर थेट महाबळेश्वराचें वर्णन किती दुरावेल, हें सांगणें कठिण आहे. वाचक तर तेथें जाऊन पोहों-चण्याविषयीं अत्यंत उत्कंठित झाले असतील. तेव्हां सटरफटर गोष्टींच्या हकीकतीनें त्यांची इतराजी होण्याचा संभव आहे, व ती न होऊं देणें हें तर आमचें आद्य कर्तव्य आहे !

महाबळेश्वरास पाहिजे त्या ऋतूंत जा, तो आपला सदा रमणीय आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पण छऱ्यांवर पावसाळा काढणाऱ्या घांटावरील लोकांनीं पावसाळ्यांत तेथें जाण्याचें धाडस करूं नये, हेंच आह्मांस बरें दिसतें. महाबळेश्वरची पाहण्या-सारखी सारी मौज जो कोणी आक्टोबरच्या आरंभापासून जूनच्या मध्यापर्यंत आठ साडे आठ महिने तेथें काढील त्याला खचित दिसेल, असें आह्मांस वाटतें. विशेषतः आक्टोबर महिन्यांत सह्या-द्रीचा हा बाहू फारच रमणीय दिसतो. या महिन्यांत या पर्वता-वरील सारी सपाट जागा हिरव्या गार गवतानें किंवा नानाप्रकारच्या रानफुलांनीं आच्छादून गेलेली असते. प्रत्येक कडयावरून शुभ्र ऐरावतांच्या शुंडांसारखे अच्छोदकाचे प्रवाह खालच्या दऱ्यांत धडा-धड उडया घेत असल्यामुळें, त्यांच्या आघातांपासून उत्पन्न होणारा प्रचंड स्वन कर्णविवरांत एकसारखा भरत असतो, व कोठें कोठें गिरणींतील कापसाच्या ढिगासारखी तुषारांची शोभा दिसत असते; उभ्या पावसाळाभर अतोनात पाऊस अंगावर घेऊन शेंवाळलेलीं जांभळीचीं व पिशाचीं झाडें, आपल्या शरीरांत मावेनासें झालेलें पाणी बाहेर टाकीत आहेत कीं काय असें वाटतें; व पाण्यांत हात घातला तर तत्क्षणीं तो बधिर होईल, व तें तोंडांत घातलें तर

बर्फाचा तुकडा जिभेवर ठेवल्यासारखें वाटेल, इतकें तें गार असतें. संध्याकाळचे सहाचेपुढें बाहेर पडल्यास, शरीराचा जो भाग उघडा पडेल तो थोड्या वेळांत कालासारखा गार होऊन जाऊन त्यांत वेदना होऊं लागतात, व विस्तवापाशीं येऊन तो शेकण्यास केव्हां सांपडेल, असें होतें! तात्पर्य, या महिन्यांत येथील वनशोभेची आणि थंडीची विलक्षण मौज दृष्टीस पडते. या दिवसांत पारा बहुतकरून अठ्ठावन्नापासून पांसष्टापर्यंत कोणत्या तरी अंशावर असतो. महाबळेश्वरचा खरा उन्हाळा इतर ठिकाणांप्रमाणें **मे** व **जून** या महिन्यांत नसतो. **मार्च** व **एप्रिल** हे महिने येथें फार कडकीचे वाटतात. या दिवसांत पारा कधीं कधीं नव्वद अंशांप-यंत चढतो. **मे** व **जून** महिन्यांत तो बहुधा पंचाहत्तर व पंचा-ऐंशीं यांच्या दरम्यान कोठें तरी असतो. पण किती झाला तरी तो महाबळेश्वरचा उन्हाळा! बारापासून दोन वाजेपर्यंत तास दोन तास फलाणीची बंडी घालूं नये असें वाटणें, आणि ओलें चिरगुट सगळ्या आंगभर गुंडाळून घेऊन ज्या ठिकाणीं कालत्रयीं सूर्याच्या किरणांचा प्रवेश होणार नाहीं अशा एकाद्या भुयारांत किंवा लादणींत जाऊन दडी मारावी अशी इच्छा होणें, यांत केवढें अंतर आहे बरें! एके वर्षी वऱ्हाडांतील उन्हाळ्याचें मान एकशेंसोळा डिग्रींपर्यंत गेल्याबरोबर, चार घटकेंत सारे ढेंकूण पटापट मरून गेले, कित्येक गर्भिणी स्त्रियांचे गर्भपात झाले, व अनेक लोक चकवा लागून वेड्यासारखे भटकूं लागले, अशी हकीकत आमच्या एका तिकडील मित्रानें जेव्हां सांगितली, तेव्हां चौऱ्याण्णव पंचाण्णव अंशांपर्यंत पारा चढूं देणारें आमचें पुणेंच आह्मांस महाबळेश्वरासारखें वाटलें! तथापि ज्याप्रमाणें पुण्याची हवाही उन्हाळ्यांत असह्य वाटणारे असे पुष्कळ लोक आहेत, त्याप्रमाणेंच महाबळेश्वरचा उन्हाळाही असह्य म्हणणारे कांहीं लोक सांपडतात. अशा लोकांस महाबळे-श्वरच्या हवेची खरी प्रौढी समजण्यासाठीं **मे** किंवा **जून** महि-न्यांत आठचार दिवस वऱ्हाडांत किंवा खानदेशांत पाठविलें पाहिजे! अशा लोकांवर अरबस्थानांत किंवा साहाराच्या आसपास

उन्हाळा काढण्याचा प्रसंग गुदरला तर त्यांची काय गति होईल कोण जाणे! दुसरी काय होणार? नेपोलीयनच्या फौजेची रशियांत जी थंडीनें झाली ती यांची तेथें उष्णतेनें होईल, येवढाच फारक! मोस्कोशहरापासून परत निघालेल्या तीस हजार फ्रेंच फौजेपैकीं पुरते सहा हजार लोक देखील फ्रान्स देशांत परत आले नाहींत, असें म्हणतात! असो.

महाबळेश्वरचा उन्हाळा कितीही कडक असला तरी जो कोणी पुण्याकडून पित्ताचे फोड किंवा गांधी घेऊन तिकडे जाण्यास निघेल, त्याला महाबळेश्वरच्या घांटमाथ्याची हवा लागल्याबरोबर बरें वाटूं लागेल, व बहुशः एक दोन रात्रीं तेथें काढल्यावर त्याच्या त्वचेवर उष्णापासून आलेली त्रासदायक विद्रूपता नाहींशी होईल, याविषयीं स्वानुभवावरून आम्हांस बिलकुल शंका नाहीं. खुद्द महाबळेश्वरीं किंवा त्याच्या वाटेवर वर सांगितलेली आक्टोबर महिन्यांतील वनश्रीची शोभा उन्हाळ्यांत दृष्टीस पडत नाहीं, हें जरी खरें आहे तरी या दिवसांतही हा प्रदेश अगदींच रूक्ष असतो, असें कोणी समजूं नये. कारण, एक तर वसंत ऋतूंत झाडांस आलेली पालवी जून होऊन त्यांची गर्द छाया जिकडेतिकडे पडली असल्यामुळें, भर दुपारीं देखील कोठेंही सावलींत उभें राहिलें असतां बिलकुल उकडत नाहीं, व सकाळीं संध्याकाळीं तर लोंकरीचीं वस्त्रें घेतल्याशिवाय बाहेर पडूं नयेसें वाटतें. महाबळेश्वरच्या थंड हवेमुळें दुपारचें जेवण झाल्याबरोबर प्रत्येकास थोडीसी वामकुक्षी घेण्याची इच्छा सहज उत्पन्न होते, व ज्या अर्थीं बहुतेक लोक तेथें आरामासाठींच जाणारे असतात त्याअर्थीं ती इच्छा टाळण्याबद्दल कोणी फारशी धडपडही करीत नाहीं! शिवाय, सकाळीं व संध्याकाळीं कोणत्या तरी प्रकारचा बराच व्यायाम केला असतां, ही दुपारची झोंप झणण्यासारखी बाधक होत नसल्यामुळें, युरोपीअन लोक देखील तिचा थोडाबहुत आदर करण्यास मागेंपुढें पहात नाहींत! महाबळेश्वरचें पाणी जात्या स्वच्छ पण जड आहे. चांगला व्यायाम केला तर त्यासारखें पाचक पाणी दुसरें नाहीं. पण जो कोणी व्यायाम न करील त्याला तें

भोंवल्याशिवाय कधींही रहावयाचें नाहीं. ज्याला महिना दीड महिना महाबळेश्वरीं काढून पांचचार शेर मांस काबीज करून परतावयाचें असेल त्यानें तेथें हिंडणें, खाणें, व विश्रांति घेणें या 'णें' कारांत तीन धातुसाधित नामांच्या बाहेर फारसें जातां कामां नये! अकरा महिने कष्ट करून बारावा महिना खूप चैनींत घालविण्यास अत्यंत योग्य असें हें ठिकाण आहे. बाहेरून कितीही थकून आला असलांत, तरी थोडा चहा घेतल्याबरोबर किंवा स्वल्प उपहार करून गार पाण्याचे चारदोन घोंट घेतल्याबरोबर, पहिल्याप्रमाणें ताजेतवाने व्हाल, व बिझिक वगैरे कांहीं तरी खेळ खेळावा, किंवा एकादें सुंदर नाव्हेल हातीं घ्यावें, असें वाटेल!

महाबळेश्वरास कितीही श्रम केले तरी फार शीण येत नाहीं, व आला तरी तो थोडा वेळ टिकतो, याचें कारण तेथील थंड हवा हें होय, हें सांगायाला पाहिजे असें नाहीं. तेव्हां, येथें ही इतकी थंडी कशानें उत्पन्न होते, असा प्रश्न चौकस वाचकांच्या मनांत सहज उत्पन्न होणार आहे. आमचा हिंदुस्थान देशच शीतकटिबंधांत नाहीं, तेव्हां महाबळेश्वर तर मुळींच असण्याचा संभव नाहीं. तेव्हां उत्तर ध्रुवाकडील किंवा दक्षिण ध्रुवाकडील प्रदेशांत थंड हवा असण्याचीं जीं कारणें आहेत, तीं तेथें मुळींच नाहींत, हें उघड आहे. तर मग ही थंडी आली तरी कोठून? अर्थात् कांहीं स्थानिक कारणांपासून हिचा उद्भव होत असावा, हें उघड आहे. या स्थानिक कारणांपैकीं पहिलें कारण या ठिकाणाची उंची हें होय. समुद्राच्या पृष्ठभागापासून महाबळेश्वराची उंची सुमारें पांच हजार फूट आहे. डोंगराच्या माथ्यावर वारा मोठ्या सोसाट्यानें चालतो, आणि ह्मणून मैदानांतील प्रदेशाप्रमाणें तेथें उष्णता भासत नाहीं, याचा अनुभव पुष्कळांस असेल. सिंहगड, पुरंदर, तोरणा, प्रतापगड, पन्हाळा, यवतेश्वर, जरांडा, माथेरान वगैरे लहानसान डोंगरांवरही बराच गारवा असतो, हें पुष्कळांच्या पहाण्यांत आलें असेल. तेव्हां महाबळेश्वराची उंची हें एक तेथील थंड हवेचें कारण झालें. यावर कोणी अशी शंका घेतील कीं, उंची हें थंडीचें कारण असेल तर, महाबळेश्व-

राहूनही उंच अशीं दुसरीं ठिकाणें आहेत, पण तेथें इतकी थंडी नाहीं, याचें कारण काय ? या शंकेवर असें उत्तर आहे कीं, महाबळेश्वरास थंडी असून झाडी फार आहे. पण यावर प्रतिशंका अशी निघणार आहे कीं, झाडी होण्यास थंड हवा लागते, व थंड हवा असण्यास उंची लागते, तर ज्या ठिकाणीं उंची आहे, त्या ठिकाणीं थंड हवा आणि झाडी असलीच पाहिजे, आणि तशी तर पुष्कळ ठिकाणीं दृष्टीस पडत नाहीं. हा महाराष्ट्रदेश साधारणपणें डोंगराळ मुलुखच आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं; व घांटावरील सारा प्रांत समुद्रपृष्ठभागापासून बराच उंच आहे, हेंही कोणास नाहीं म्हणतां येणार नाहीं; तेव्हां घांटावरील प्रदेशांत जेथें जेथें उंच डोंगर किंवा डोंगरांच्या रांगा असतील, तेथें तेथें उंचीच्या मानानें थंडी व झाडी असलीच पाहिजे, असा अनुगम बेधडक काढण्यास न्यायशास्त्राचा प्रतिबंध नसून, त्याच्या उलट स्थिति अनेक डोंगरांवर अनुभवास येते, याचें कारण काय? याचें उत्तर फार सोपें आहे. लोकांनीं झाडी तोडली नाहीं तर या साऱ्या डोंगरावर झाडी होईल व तिच्या प्रमाणांत तेथील थंडीचें मानही कमीअधिक होईल ! याशिवाय दुसरी एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे ती ही कीं, झाडी होण्यास डोंगराच्या माथ्यावर झाडांचीं मुळें खोल जाण्यासारखी मोखर व मातट अशी बरीच सपाट जागा पाहिजे. त्रिकोणासारखा काळ्याठिक्कर पाषाणाचा सुळका चंद्रसूर्यांच्या मार्गांत आड येण्याइतक्या उंचीचा जरी असला तरी त्यावर झाडी कोठून होणार ! महाबळेश्वरचा माथा फार विस्तृत आहे, व त्यावर झाडें रुजण्यासारखी तांबड्या मातीची जमीन आहे. साहेब लोकांनीं महाबळेश्वरच्या आसपासांत पांच मैलपर्यंत झाडी तोडूं न देण्याविषयीं मोठ्या सक्तीचे नियम केले आहेत. यामुळें सुमारें एकोणीसवीस चौरस मैलांचें क्षेत्र हिरव्यागार झाडांनीं नेहमीं आच्छादून गेलेलें दृष्टीस पडतें. ह्या विस्तीर्ण झाडीचा पावसावरही विलक्षण परिणाम घडतो अगोदर उंच डोंगर आपल्या उच्चत्वामुळें पर्जन्योदकवाहक ढगांचें आपल्याकडे आकर्षण करतात, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. त्यांतही

अशा डोंगरावर झाडांची गर्दी असली म्हणजे, हें आकर्षण मोठ्या झपाट्यानें चालतें; व हें आकर्षण मोठ्या झपाट्यानें चालून पुष्कळ पाऊस पडला ह्मणजे झाडांचें जीवन जें उदक तें त्यांस यथेच्छ मिळून त्यांची वाढ चांगली होते, व त्यांची संतति झपाट्यानें वाढत जाते ! यावरून वाचकांच्या लक्षांत आतां ही गोष्ट स्पष्टपणें येईल कीं, थंड हवा उत्पन्न होण्यास उंच डोंगराचा सपाट माथा, झाडें, आणि पाऊस यांची फार अवश्यकता आहे. महाबळेश्वरास या सार्‍या गोष्टींची पूर्ण अनुकूलता आहे, आणि म्हणून येथील हवा या प्रांतांतील इतर ठिकाणांहून फारच नामी आहे. अगदीं उष्ण प्रदेशांतही या तीन कारणांमुळें मधून मधून रम्य ठिकाणें दृष्टीस पडतात. म्हैसूर प्रांतांतील **नीलगिरी** हें स्थान महाबळेश्वरापेक्षांही रमणीय आहे, असें सांगतात. त्याप्रमाणेंच वर्‍हाड, खानदेश, गुजराथ, रजपुताना, माळवा, नागपूर वगैरे सर्वप्रसिद्ध उष्ण प्रांतांतही उन्हाळ्यांत उन्हाळा न वाटण्यासारखीं ठिकाणें आहेत. पण यांपैकीं कोणत्याही ठिकाणीं महाबळेश्वराइतकी पर्जन्यवृष्टि होत नाहीं. येथें कमींत कमी १७० इंच पाऊस पडतो व कधीं कधीं तो साडेतीनशें इंचांवर पडल्याचे दाखले सांपडतात. साहेब लोकांनीं काढलेल्या सरासरीवरून येथें प्रतिवर्षी २८० इंच पाऊस पडतो, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

महाबळेश्वराची हवा इतकी थंड आहे, यावरून कोणीं असा तर्क करूं नये कीं, "गगनचुंबी" प्रचंड वृक्षांच्या रायावर राया येथें लागून गेल्या असल्यामुळें, हा थंडपणा तींत आला असेल. तें कांहीं नाहीं. महाबळेश्वराच्या झाडांइतकी भिकार झाडें कोठेंही नसतील ! आंबा, वड, चिंच, कवठ, पिंपळ, उंबर, लिंब, वगैरे आकाशास भेदून जाणारीं कमीअधिक दाट छायेचीं झाडें येथें बिलकुल नाहींत. येथें जांभळीचें पीक फार मोठें आहे ! पण ह्या जांभळी आणि त्यांचीं फळें यांचें त्यांच्या देशावरील जातभाईंशीं कुलनामसमतेशिवाय दुसर्‍या कोणत्याही प्रकारचें साम्य नाहीं. पानें लहान, फळें लहान, झाडें लहान, फार तर काय येथील जांभळांची रुचि देखील लहान आहे ! कोणी असें ह्मणतील कीं,

जांभळांची 'रुचि देखील लहान,' ह्मणजे काय समजावें ! तर त्यावर आमच्या प्रयोगदक्ष वाचकांस येवढेंच सांगणें आहे कीं, त्यांनीं मैदानांतील चांगल्या जांभळांचा पावशेर रस काढून त्यांत एक शेर गोडें पाणी मिसळावें, आणि अशा प्रकारें तयार केलेलें मिश्रण जसें लागेल तसें महाबळेश्वराचें रानजांभळ लागतें असें समजावें ! चविणी ऊर्फ रानकेळी आणि गांवकेळी उर्फ देवकेळी यांत जेवढा फरक आहे, तेवढा येथील जांभळींत आणि मैदानांतील जांभळींत आहे. कोणत्याही वाटेनें हिंडावयास निघालें तरी, थोड्याशा पोरकटपणाच्या वृत्तीचें अवलंबन केलें असतां, पाहिजे त्याला एकसारखें तोंड हालवीत जाण्यास व घोंसावर घोंस शोधून काढण्याच्या नादांत लागून कर्मणूक करून घेण्यास या जांभळींपासून अवश्य मदत होते ! ज्यांना अगदींच हातपाय हालवायास नको असतील ते खालीं वाकले तरी बस होणार आहे; कारण रस्त्यावरही या डोंगरी फळांचा सडा झालेला असतो. पण हेंही कोणाच्यानें होण्यासारखें नसेल तर त्यानें ' आ ' करून आकाशाकडे पहात जावें ! असें केलें असतां मैल दोनमैलांच्या आंत निदान दहापांच जांभळें तरी त्याचे तोंडांत अचानक येऊन पडतील, यांत संशय नाहीं ! श्रम न पडतां तोंडांत येऊन पडलेलीं जांभळें दातांनीं किंचित् दुखवून त्यांतील येवढासा रस आणि तुरट साल हीं घशाखालीं जाऊं देण्यापुरती व बिया बाहेर टांकण्यापुरती मेहनत मात्र ज्याची त्यासच करणें भाग आहे ! पण तीही करण्यास जो तयार नसेल त्यानें कोठा जी त्यांची वाट लावील ती पतकरण्यास तयार असलें पाहिजे !

जांभळीसारखेंच ' पिसा ' या नांवाचें दुसरें एक भिकार झाड आहे. पुष्कळ दिवस याचा जळणाशिवाय दुसरा कांहीं उपयोग होत असेल, असें आम्हांस वाटलें नाहीं. केव्हां केव्हां असा तर्क मात्र करावासा वाटे कीं, याच्या स्पर्शानें किंवा रससेवनानें वेडेपण येत असेल म्हणूनच यास ' पिसा ' हें नांव देण्यांत आलें असेल ! पण नुकताच आमचा हा भ्रम दूर झाला. मुंबईचे एक प्रसिद्ध नेटिव डाक्तर प्रकृतीच्या आरामासाठीं गेल्या मे महिन्यांत

येथें आले होते. त्यांचे घरीं या झाडाच्या पानांच्या बंग्या करून, मुंबईस रवाना करण्याची धूम तारंबळ जेव्हां आम्हीं पाहिली, व रा. ब. महादेव वासुदेव बर्वे यांसारख्यासही या पानांच्या बंग्या करून बाहेर पाठवाव्या लागतात, असें आमच्या नजरेस आलें, तेव्हां मात्र या टाकाऊ दिसणाऱ्या 'भिकार' झाडांत कांहीं औषधिगुण असावा असें आम्हांस वाटलें, आणि सृष्टींतील कोणतीही वस्तू निरुपयोगी असण्याचा संभव नाहीं, ती निरुपयोगी समजणें हें आपलेंच अज्ञान होय, हा तत्वविचार आम्हांस मग सुचला! चौकशीअंतीं असें समजून आलें कीं, पिशाचीं पानें वाळवून त्याचें चूर्ण करून ठेविलें, आणि त्याची थोडी थोडी नित्य लापशी करून घेतली, तर शक्ति वाढविण्याचे कामीं तिची बरीच मदत होते. पिशाच्या ओल्या पानांच्या रसाची भेंडीच्या रसासारखी तार निघते, हाताला तो चिकट लागतो, आणि चवीलाही भेंडीच्या रसासारखाच तो गिळगिळीत व बेचव आहे!

या दोन झाडांशिवाय आणखी दुसरीं पुष्कळ झाडें आहेत. शिकेकई, बिबा, हिरडा वगैरेचीं झाडेंही वाटेनें जातांयेतां दृष्टीस पडतात. महाबळेश्वरीं सारक औषधाप्रीत्यर्थ डाक्तरास पैसे भरण्याची गरज नाहीं. पण ही गोष्ट ज्यांचे कोठे हिरड्यांस किंवा बाळहिरड्यास दाद देईनासे झाले आहेत, त्यांस मात्र लागू नाहीं! येथें एका प्रकारचें रानटी 'ॲरोरूट' विपुल आहे. गरीब लोक याच्या मुळाचें पांढरें स्वच्छ सत्व काढून त्यावर कांहीं पैसे कमवितात, असें ऐकतों. महाबळेश्वरीं म्हणजे फ्रीअरहॉल मध्यबिंदू कल्पून पांच मैलांच्या त्रिज्येनें होणाऱ्या वर्तुलावकाशांतील प्रदेशांत बोटा येवढी झाडाची खांदी, सरकारच्या परवानगीशिवाय, तोडण्याची जरी सक्त मनाई आहे, तरी रानटी फळें व मुळें हवीं त्यानें हवीं तितकीं गोळा करावीं, आणि त्यांवर हवी तितकी संपत्ति मिळवावी, अशी सरकारानें उदारपणानें सदर परवानगी देऊन टाकलेली आहे! या सरकारदत्त हक्कामुळें येथील लोकांस प्रतिवर्षीं सुमारें हजार रुपयांची संपत्ति संपादितां येत असावी, असा आमचा तर्क आहे! असो, याप्रमाणें नानाप्रकारचीं झाडें,

वेल, वेली, झुडपें, व गवतें यांनीं अवगुंठिलेली अशी ही भव्य शैलमाळा आहे. उन्हाळ्यांत थोरल्या झाडांशिवाय बाकीच्यांची पानें वाळून जातात. कै. डाक्तर भाऊ दाजी किंवा त्यांचे बंधू नारायण दाजी यांच्या तोडीच्या शोधक वैद्यानें येथील झाडांच्या शोधांत चारदोन वर्षें घालविलीं तर त्यापासून कांहींच फायदा होणार नाहीं, असें नाहीं.

ज्या ठिकाणीं दोनतीन महिन्यांच्या अवकाशांत तीनशेंपासून चारशें इंच पाऊस पडतो, त्या ठिकाणच्या पावसाळ्याची कल्पना करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां तो फार जंगीं असेल असें मानून स्थ रहाणें बरें दिसतें! मे महिन्याच्या दहाव्या बाराव्या तारखेपासून येथील लोक या स्वारीच्या आगमनसत्काराच्या तयारीस लागतात, व जूनच्या दहावे तारखेपर्यंत बहुतकरून सगळे सज्ज झालेले असतात! मुख्य तयारी धान्य व लांकडें घेऊन ठेवण्याची. महाबळेश्वरीं जळाऊ लांकडें सामान्य ऋतूंत पुष्कळ सवंग मिळतात खरीं, पण पावसाळ्यांत दसपट किंमत दिली तरी तीं मिळणार कशीं, व मिळालीं तरी जळणार कशीं! तेव्हां प्रथम चरू आणि इंधन यांचा पुरेसा सांठा केल्यावर, ज्या घरांत हा भयंकर पावसाळा काढावयाचा, त्याचा तरणोपाय कसा लागेल, हें पहावें लागतें. पावसाच्या संतत धारेनें घराच्या भींति वाहून जाऊं नयेत, व बुरशानें आणि शेवाळीनें त्यांची नासाडी होऊं नये, ह्मणून येथील लोक आपलीं घरें मागल्या दारांपासून पुढल्या दारापर्यंत, व आढ्यापासून जोत्यापर्यंत लांब लांब गवताच्या व पानांच्या जाड ताट्यांनीं कुडून टाकितात, आणि ज्या दिशेनें फारच थोडा वारा किंवा धुकें घरांत भरण्याचा संभव असेल, अशा ठिकाणीं एक लहानसें गवाक्ष ठेऊन पावसाळ्यांत त्या वाटे अपरिहार्य कामासाठीं बाहेर पडतात, व आंत परत जातात! साहेब लोकांची छावणी उठली, आणि ते डोंगराखालीं उतरले ह्मणजे त्यांचे माळी बागेंतल्या कुंड्यांतील झाडें काढून टाकतात, आणि बागेंतील व कुंड्यांतील माती एकाद्या कोंपऱ्यांत रचून ठेऊन, व तीवर पाल्यापाचोळ्याची 'शाकारणी' करून,

बंगल्यांच्या व्हेरंड्यांत ऊर्फ पडव्यांत कुंड्यांच्या रांगा लावून ठेवतात. बंगल्यांच्या आसपासची माती व सडका अगदींच नाहींशा होऊं नयेत, ह्मणून त्यांवर झाडाचा पाला दाबून बसविण्याची चाल आहे. पावसाळ्यास आरंभ होऊन आठपंधरा दिवस झाले कीं, कोणत्याही झाडावर एक पान किंवा फूल दिसेल तर शपथ! साहेब लोकांच्या बंगल्यासमोरच्या बागांतील दिखाऊ, पण वासानें आणि सामर्थ्यानें अगदीं नादान, फुलझाडें तर एक दोन सरीबरोबरच जमीनदोस्त होऊन जातात! लिली, लॅरेल, कौझलिप, डेलिआ, डेझी वगैरे आंग्लप्रियांचें खुंट जमिनींतल्या जमिनींत कशाच्या तरी आश्रयानें तगून राहिले तर मोठें भाग्य! पण बहुधा तें कोणाच्या वाट्यास येत नाहीं! आठ महिने रचावें आणि चार महिने मोडावें—असा या ठिकाणचा सामान्य क्रम आहे. घरें दगडाचीं असोत किंवा पत्र्यांचीं असोत; त्यांवर कौलें घातलेलीं असोत, किंवा पत्रे घातलेले असोत, पावसाच्या तडाक्यांतून त्यांचा बचाव होण्यासाठीं त्यांच्या सर्व अंगभर **ग्रासकोट** अथवा गवती सकलादीची टोपी चढवावी लागते! हवा खाण्यास जाणारे मैदानांतील लोक पावसाच्या सरी दोन सरी आल्याबरोबर आपला मोरचा फिरवितात, आणि त्या अरिष्टांतून बाहेर पडतात; पण पोटाच्या खळीसाठीं तें ठिकाण ज्यांना सोडतां येत नाहीं अशी साहेबलोकांच्या नोकरचाकरांचीं, श्री महाबळेश्वर येथील देवस्थानच्या भटभिक्षुकांची, दहापांच वाण्याउदम्यांची, एकदोन दारूविक्या पारशांची, व धावड, धनगर, कुणबी वगैरे आणखी कांहीं लोकांची मिळून सुमारें एक हजाराची येथली कायमची वस्ती आहे. उन्हाळ्यांत ती तीन हजारांपर्यंत होते. बंगल्यांच्या रखवालीकरतां ठेवलेल्या माळ्यांचें मुख्य काम हें कीं, त्यांनीं आठचार दिवसांनीं बंगल्यांत जपून प्रवेश करून, आंत जागोजाग आकट्या कराव्या, आणि सर्व सामानसुमानास वरचेवर धग द्यावी. असें न केल्यास पावसाळ्याच्या अखेर एकही वस्तू नीट हातीं लागण्याचा संभव नाहीं, व भींतीवर तर शेवाळ व बुरसा वाढून त्यांत बारीकसारीक झाडांचीं हिरवींचार लहानशीं रोपेंही

येण्याचा संभव असतो! कोणास या लिहिण्यांत अतिशयोक्ति आहे असें वाटेल. पण सत्य स्मरून आह्मी खचित सांगतों कीं, हा कांहीं थापेबाजीचा प्रकार नाहीं! पर्जन्याच्या अतिशयत्वामुळें येथील झाडांवर व दगडांवर किती शेवाळ जमते, याची कल्पना सुद्धां आम्हां मैदानांत रहाणाऱ्या लोकांस करतां येणार नाहीं. कोणत्या पाहिजे त्या झाडापाशीं जा, आणि त्याला बोट लावा, कीं तें इंच अर्ध इंच तरी शेंवाळीच्या लेपांतून आंत जाईल. एकाद्या भांड्यांवर ज्याप्रमाणें मातीचा जाड लेप चढवावा, त्याप्रमाणें झाडाच्या सर्व काष्ठभर या शेवाळीचा लेप झालेला असतो व कित्येक फांद्यांवरून हे शेवाळींचे लोंबणारे पुंजके, तपसाचरणांत फार दिवस गढून गेल्यामुळें स्मश्रू करण्यास संधि न सांपडलेल्या तापसांच्या रांठ दाढ्यांप्रमाणें दिसतात! परंतु वास्तविक पहातां गोगलगांईइतकी ही शेवाळ मृदु असते! साहेब लोक इचे मोठे चहाते आहेत. दुसऱ्या झाडावर हींत जीं लहान लहान फुलझाडें होतात, तीं गोळा करण्याचा या लोकांस मोठा नाद आहे. या झाडांस हे लोक ऑर्चिड्स म्हणतात. साहेब लोकांस शेवाळ व ऑर्चिडें आणून देऊन महाबळेश्वरचे गरीब कुणबी चारदोन आणे मिळवितात.

महाबळेश्वरास जे **पॉइंटस** किंवा शैलबाहू पहाण्यासारखे आहेत, त्यांत **बॅबिंगटन**, **लॉडवुइक**, व **एल्फिस्टन** हे प्रमुख आहेत. बॉंबे, कारनॅक, ससून वगैरे दुय्यम प्रतीच्या शाखा आहेत. यांशिवाय कनॉटपीक, मौंट मालकम, रे व्हिला, गव्हर्मेंट हौस वगैरे ठिकाणें पहाण्यासारखीं आहेत. या सर्व ठिकाणीं उभें राहिलें असतां येथील दऱ्यांची, झाडींची, व डोंगरांची अप्रतिम शोभा दृष्टीस पडते. आकाश निरभ्र असल्यास मौंट मालकम येथील बंगल्याच्या गच्चीवरून सूर्यास्ताच्या सुमारास पश्चिम समुद्राचा किनारा आणि बदकाप्रमाणें त्याच्या पृष्ठभागावर क्रीडा करणारीं जहाजें स्वच्छ दिसतात, असें येथें नेहमीं रहाणारे लोक सांगतात. धुकें नसल्यास मोठ्या दुर्बिणींतून सुमारें पन्नास मैल लांबीची अर्धचंद्राकृति समुद्ररेषा स्पष्ट दिसते, असें कित्येक आंग्ल प्रेक्षकांचें ह्मणणें आहे, तेव्हां तें खरें मानिल्याखेरीज

गत्यंतरच नाहीं! आमच्या दुर्दैवामुळें आह्मीं मात्र जेव्हां जेव्हां हें समुद्रदर्शन घेण्याचा प्रयत्न केला तेव्हां तेव्हां क्षितिजाच्या जवळच्या वातावरणांत कांहीं तरी विघ्न उत्पन्न होऊन तो निष्फळ झाला, आणि त्यामुळें आह्मीं निराश झालों, हें सांगण्यास आम्हांस फार वाईट वाटतें! तथापि पुनः एकादे प्रसंगीं एकाद्या उंच पॉइंटावर उभें राहून आरबी समुद्रांतील क्षारोदकाचा भव्य विस्तार आह्मी पाहूं शकूं, अशी आशा धरून आह्मी आपले दिवस कंठीत आहों! तथापि महाबळेश्वरची यात्रा करणारास तेथें पहाण्यासारखी ही येवढीच गोष्ट नसल्यामुळें, ती नजरेस न पडली तरी त्याबद्दल इतका खेद करण्याची गरज नाहीं. महाबळेश्वरापासून दहापांच मैलांत पहाण्यासारखीं जीं तीनचार ठिकाणें आहेत तीं पहाण्याची तकलीफ घेतली असतां धर्मश्रद्धा, सृष्टिसौंदर्यावलोकनाकांक्षा, व ऐतिहासिकस्थानदर्शनेच्छा तृप्त झाल्यावांचून रहाणार नाहींत. मौज पहा कीं, साहेब लोकांना हवेच्या चांगलेपणामुळें ज्या शैलमाला अत्यंत आदरणीय झाल्या आहेत, त्या त्यांनींच शोधून काढल्या आहेत असें नाहीं. हिमालय, विंध्य, सह्याद्रि, निलगिरी वगैरे पर्वतांच्या रांगांतील उत्तम उत्तम स्थानें शोधून काढून तेथें कोणत्या तरी निमित्तानें जाण्याचा प्रघात आमच्या लोकांनीं कधींच घालून ठेविला आहे. भेद इतकाच कीं, अशा आरामाच्या ठिकाणीं आमच्या लोकांचें जाणें एका हेतूनें असतें, व साहेब लोकांचें दुसऱ्या हेतूनें असतें. फार कशाला? साहेब लोकांनीं अलीकडे मोठमोठ्या पहाडांतून, जंगलांतून, दऱ्यांतून, सपाट व डोंगरी प्रदेशांतून, आणि पूर्वपश्चिम कोंकणपट्टींतल्या खाड्यांनीं व लहानसान तरींनीं जागोजाग खंडिलेल्या काताळमय मुलखांतून लहानमोठे साधे व आगगाड्यांचे रस्ते बांधण्याचा जो क्रम चालविला आहे, तो सारा आमच्या पूर्वींच्या वाटांच्या व घांटांच्या धोरणानें चालविला आहे, हें स्वल्प अवलोकनानें ध्यानांत येण्यासारखें आहे. किती झालें तरी आम्हीं या देशांत पांचचार हजार वर्षें काढलीं आहेत; चांगलीवाईट राज्यें केलीं आहेत; वेडींवांकडीं सैन्यें इकडून तिकडे व

तिकडून इकडे नेलीं आणिलीं आहेत; ओबडधोबड किल्ले व गढ्या बांधिल्या आहेत; लहानमोठ्या लढाया मारल्या आहेत; थोडाबहुत दर्यावर्दीपणा दाखविला आहे—तेव्हां हवाशीर जागा कोणत्या, लढाईच्या सोईचे डोंगर कोणते, द्रव्यसंरक्षणास उपयोगीं पडण्यासारखीं ठिकाणें कोणतीं, अंतःकरणांतील धर्मश्रद्धा वाढविण्यास अनुकूल स्थानें कोणतीं—तीं आमचीं आह्मीं शोध लावून काढलीं, आणि त्यांसंबंधानें यूरोपिअन लोकांनीं आम्हांस शिकविण्यासारखें कांहीं राहूं दिलें नाहीं, यांत फारसें नवल नाहीं! आमच्या हातून येवढेंही झालें नसतें तर मात्र मोठी आश्चर्य करण्यासारखी गोष्ट झाली असती खरी! आतां महाबळेश्वरासारख्या किंवा धवलागिरीसारख्या अवघड ठिकाणीं बग्यांत, शिग्रामांत, व फैटणींत बसून निर्भयपणें फिरण्यासारखे रुंद व सोपे रस्ते आम्हीं बांधिले नाहींत, व मोठमोठे बंगले उठवून देऊन ग्रीष्म ऋतूचा उष्मा टाळण्यासाठीं वारंवार त्यांत जाऊन राहिलों नाहीं, हें मात्र खरें आहे. पण यास आमचा इलाज नाहीं. असलीं सुखें घेण्याची अक्कल व दिवस हीं आम्हांस कधींच आलीं नाहींत. दिल्लीचे बादशहा हवा पालटण्यासाठीं कधीं कधीं काश्मीर प्रांतांत जात असत, असें ह्मणतात. पण दक्षिणेंतील राजे किंवा पेशवे अशा निमित्तानें कधीं कोठें जात होते किंवा नव्हते हें आम्हांस ठाऊक नाहीं. बहुधा त्यांनीं तसें केलें नसेल. कारण एक तर त्यांना तसें करण्यास फुरसुतच मिळाली नाहीं! स्वप्नाप्रमाणें आमच्या स्वराज्याची स्थिति झाली! तें आलें केव्हां आणि गेलें केव्हां, हें देखील आम्हांस पुरतें समजलें नाहीं! ज्याप्रमाणें फक्त विवाहसंस्कारापुरतें एकाद्या अल्पवयस्क कन्येला एकाद्या मुलापुढें आणून उभें करावें, आणि तो संस्कार आटपल्याबरोबर त्या मुलास देवाज्ञा होऊन त्या दुर्दैवी कन्येच्या कपाळीं वैधव्य यावें, त्याप्रमाणें आमच्या स्वतंत्रतावधूची दशा झाली! तेव्हां आमचे राजे लोक किंवा बडे लोक मिजासीसाठीं रम्य अशा शैलप्रदेशांत सुंदर वाडे बांधून फारसे राहिले असतील, असें आम्हांस वाटत नाहीं. अशा ठिकाणचा जो काय थोडाबहुत सुखानुभव घेतला तो आमच्या श्रद्धालु सामान्य

लोकांनीं घेतला, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानांतील पाहिजे तें रमणीय स्थान घ्या, तेथें आमच्या लोकांनीं एकाद्या देवालयाची स्थापना करून यात्रा भरविण्याचा परिपाठ पाडलेला नाहीं, असें सहसा दिसून येणार नाहीं! निर्जन अरण्य, ओसाड माळ, किर्र झाडी, खोल दरी, उंच डोंगर—असल्या सर्व ठिकाणीं खंडोबा, टेंबलाई, ह्मसोबा, मारुती, अथवा शंभु—यांपैकीं कोणाची तरी स्थापना झालेली असावयाचीच! प्रस्तुत वर्णनाचा प्रधान-विषय असलेला डोंगरही या सामान्य नियमास अपवाद नाहीं. या डोंगराच्या ज्या भागांत नवीन वस्ती झाली आहे, त्यास वास्तविकपणें **नहर** ( थंड प्रदेश ) ह्मटलें पाहिजे. नहरापासून सुमारें चार मैलांवर महाबळेश्वर नांवाचें एक लहानसें खेडें आहे. याच खेड्यांत **श्रीमहाबळेश्वराचें** जुनें, फार मजबूत, व विस्तीर्ण दगडी देवालय आहे. या देवालयाचे गाभाऱ्यांत सांबाची पिंडी आहे. गाभाऱ्याचे दाराबाहेर दगडी पडवींत गटारवजा एक आडवी मोरी आहे. या मोरींत डोंगरांतील जिवंत झऱ्यांचें पाणी सर्वकाळ झिरपत असतें. हें झिरपणारें पाणी एक उभी मोरी काढून तींतून गायमुखाच्या वाटे पडवीच्या दगडी जोत्यापुढें बांधलेल्या कुंडांत सोडिलें आहे. हें या क्षेत्रांतील तीर्थ होय. येथें जी यात्रा भरते ती या कुंडांत बुचकळी मारून गायमुखांतल्या पाण्याच्या पुण्य सिंचनानें पापक्षालन करून घेण्याकरतां भरते. या गायमुखांतील पाण्यांत थंडीचे दिवसांत बोट घातलें असतां तें गळून न पडलें तर निदान बधिर तरी होईल, अशी आम्हांस पक्की खातरी आहे! भर उन्हाळ्यांत करकरीत बारा वाजतां देखील या गायमुखाखालीं उभें राहिलें असतां, वायूचा झटका होईल कीं काय, अशी भीति वाटते! स्नानाच्या कुंडाला लागून चिरगुटेंपांघरुणें धुण्याचें गचाळ पाण्याचें दुसरें एक कुंड आहे. दोन्ही कुंडांतील पाण्याचा निकाल जमिनीखालून देवळाच्या बाहेर करून दिलेला आहे. या खेड्याच्या हद्दींत पाय घातल्यापासून खाकेंत जुन्या चोपड्या घेतलेल्या येथील भटांचा जो घोळका पाठीमागें लागतो तो पाहून पारसीकांच्या **मूकदुर्गस्थ** प्रेतावर झडप घालणाऱ्या

बुभुक्षित गृध्रगणाचें स्मरण होतें! अल्पस्वल्प तरी जकात दिल्याशिवाय यांच्या तडाक्यांतून कोणी सुटत असेल असें वाटत नाहीं! पूर्वी या भिक्षुकांस बरीच प्राप्ति होत होती. पण अलीकडे सर्व ठिकाणीं जें धर्मौदासिन्य बळावत चाललें आहे त्यामुळें यांच्या वृत्तीसही बराच धक्का पोहोंचूं लागला आहे. या द्रव्यलोलुप भिक्षूंनीं मागचा लेख काढण्यासाठीं एका गृहस्थास आपलें आडनांव सांगण्याविषयीं इतकें भंडावून सोडिलें कीं, त्या रागांत त्यानें गिरिधर शिताराम पेड्रो, असें माझें नांव आहे, असें त्यांस सांगितलें! हें नांव कानीं पडतांच ही मंडळी आपापल्या बाडांत 'पेड्रोचें' घराणें हुडकूं लागली! पेड्रोच्या वंशांतील पुरुष महाबळेश्वरची तीर्थयात्रा करण्यास कोठून येणार? व त्याचें नांव येथल्या वह्यांत कोठून सांपडणार? पण त्यांच्या लक्षांत ही थट्टा कोठून यावी? बिचारे पेड्रोचें घराणें हुडकतां हुडकतां कामावास झाले, पण त्याचा कांहीं पत्ताच लागेना! अखेरीस आमच्या विनोदी मित्रास त्यांची कींव येऊन, त्यानें त्यांच्या हातावर पांच रुपये काढून ठेविले, आणि महाबळेश्वराचें दर्शन घेऊन देवळांतून आपला पाय काढता घेतला! महाबळेश्वराच्या देवळांतील मोरींत वेण्या, सावित्री, कृष्णा वगैरे पंचगंगांचा उगम झाला आहे, असें म्हणतात!

महाबळेश्वराच्या देवळापासून तीनचार मैलावर एक विस्तीर्ण झाडी आहे, तिला ब्रह्मारण्य म्हणतात. हें ब्रह्मारण्य मात्र खरोखरीच फार पहाण्यासारखें ठिकाण आहे. महाबळेश्वरावरील इतर ठिकाणच्या देखाव्यांपेक्षां येथील देखावा फारच भव्य आहे. भर दुपारीं या झाडींतून जात असतां अंगावर कांटा उभा रहातो! डाव्या-उजव्या बाजूस झाडींत डोकाऊन पाहिलें तर कोठें बैलाची तंगडी व कोठें रेडक्याचा पाय—असल्या विलक्षण चिजा कधीं कधीं दृष्टीस पडतात, व त्या पाहिल्याबरोबर पोटांत धस्स होतें. साहेब लोक या बाजूला बरोबर बंदूक घेतल्याशिवाय हिंडावयास निघत नाहींत. या भयंकर झाडींतून डोंगराच्या कडेपर्यंत साहेब लोकांनीं एक पाऊलवाट काढिली आहे, व ज्या ठिकाणीं

ही वाट संपते तेथें चारदोन माणसांस उभें रहाण्यापुरती जागा केलेली आहे. या जागेस ते लोक **आर्थर्स सीट** असें म्हणतात. जो कोणी छाती करून या **आर्थर** सीटवर जाऊन बसेल, व तेथून पुढल्या व खालच्या प्रदेशाकडे नीट न्यहाळून कांहीं वेळ पाहील, त्याच्या अंतःकरणांत विचार व भीति यांचा अननुभूतपूर्व संकर झाल्यावांचून रहाणार नाहीं! जणूं काय ओळंब्यांत असलेल्या दोन हजार फूट उंचीच्या सुळक्यावर दोन हात रुंद व दोन हात लांब येवढ्या जागेंत उभें राहून पुढें असलेल्या मृत्युमुखाच्या तळाकडे किंवा त्याच्या दोन बाजूंस कित्येक मैल पसरलेल्या प्रचंड दाढांकडे निर्भयपणें व निश्चलपणें पहाणारा मनुष्य सहसा सांपडणार नाहीं. रांगत रांगत या प्रचंड गर्तेच्या कांठावर येऊन ठेपल्यावर एक वेळ मागें वळून पाहिलें, आणि डोंगराच्या मुख्यांगास सोडून आपण अंतराळीं असलेल्या कड्यावर उभे आहों असें मनांत आलें कीं डोकें भ्रमल्यासारखें होतें, काळीज धडाधडा उडूं लागतें, सर्व अंगास कांपरें सुटतें, आणि सारें शरीर घामानें डबडबून जाऊन डोळे मिटून खालीं बसावें, आणि बसल्या जागेस पालथें पडून घट्ट धरावें, असें वाटतें! थोडा वेळ दम खाऊन भीति थोडी कमी झाली, आणि आजूबाजूस नजर टाकतां येऊं लागली, म्हणजे विचार आणि विकार यांची एकच गर्दी होऊन जाते! हा कळपा एकदम तुटला तर एका क्षणांत मी दोन हजार फूट खोलीच्या दरीच्या तळाशीं जाऊन पडेन, व त्या ठिकाणीं चूर्ण होऊन पडलेल्या माझ्या अस्थि गोळा करण्यास माझे आप्त किंवा मित्र कांहीं केलें तरी येऊं शकणार नाहींत, असा विचार मनांत आल्यावांचून रहात नाहीं! असल्या भयप्रद विचारांचा लय होण्यास कांहीं काळ लागतो. तो होऊन दरीच्या पलीकडे नजर फेंकण्यास धीर होतो तेव्हां नाटकगृहांत मांडलेल्या बांकांप्रमाणें एकाहून एक उंच अशा डोंगरांच्या रांगा आकाशास भिडण्यासाठीं एकमेकांची स्पर्धाच करीत आहेत कीं काय अशा भासतात! या रांगांचे विचित्र आकार, विस्तार, व रंग पाहून शास्त्रज्ञांनीं यांच्या उत्पत्तीविषयीं जे अनेक तर्क केले आहेत ते

डोळ्यापुढें येऊं लागतात, सृष्टीचें महत्व व पुराणत्व हें स्थूलरूपानें नजरेपुढें उभें आहे कीं काय असा भ्रम होतो, आणि मनुष्योत्पत्तीचें अर्वाचीनत्व आणि मनुष्यांच्या सामर्थ्याचें क्षुद्रत्व हीं मूर्तिमंत पुढें उभीं रहातात! सारांश, सुशिक्षणरूप रासायनिक द्रव्यांनीं ज्यांचें अंतःकरणरूप काचफलक अशा भव्य वस्तूंच्या अवलोकनापासून उत्पन्न होणारे संस्कार घेण्यासारखें झालें असेल, त्यांनीं एकेक वेळ तरी अशीं स्थानें पाहिल्याशिवाय राहूं नये, अशी आमची शिफारस आहे!

महाबळेश्वराच्या पश्चिमेस सुमारें बारा तेरा मैलांवर इतिहासप्रसिद्ध प्रतापगडचा किल्ला आहे. महाबळेश्वरास गेलें असतां हा किल्ला पाहून आल्याशिवाय सहसा कोणीही रहात नाहीं, आणि म्हणूनच येथें त्याविषयीं दोन शब्द लिहीत आहों. ज्याला ह्या किल्ल्याची चढण चढण्याचें सामर्थ्य नसेल त्याला खुर्चींत बसून जाण्याची सोय होते. फक्त मावळ्यांच्या पोटाला दोन अडीच रुपये देण्याचा उदारपणा केला ह्मणजे झालें! शिवाजीच्या हातांखालीं ज्या अडाणी लोकांनीं तोंडांत बोटें घालण्यासारखे जिवावरच्या धाडसाचे पराक्रम करून मुसलमानांची खोड मोडली, व इतिहासांत आपलें नांव चिरायु करून सोडिलें, त्या मावळ्यांस पोटाची वीतभर खळी भरण्यासाठीं मडमांस पार्शिणींस, साहेबांस, आणि रावसाहेबांस खुर्च्यांत घालून खांद्यावर वहावें लागत आहे, यावरून दैवाची गति मोठी विचित्र आहे, असा विचार या प्रामाणिक, कृश, व गरीब लोकांकडे पाहिल्याबरोबर मनांत आल्यावांचून रहात नाहीं! प्रतापगडाच्या तटाबाहेर एका लहानशा टेंकडीवर थडग्यासारखी एक इमारत आहे तींत अफजुलखानाचें डोकें पुरलें आहे ह्मणून सांगतात. प्रतापगडाचे तटावर उभें राहिलें असतां, एकीकडे महाबळेश्वरच्या डोंगरांची आणि दुसरीकडे कोंकण-घांटमाथ्यापर्यंत पसरलेल्या विस्तृत मावळ प्रांताची विलक्षण शोभा दिसते. खुद्द किल्ल्याचे टिकाऊ व मजबूत बांधकाम पाहून जुन्या लोकांनीं हीं येवढालीं अवाढव्य कृत्यें कशीं केलीं असावीं, असा चमत्कार वाटतो, आणि ज्यांच्या पूर्वजांनीं असे

टोलेजंग किल्ले बांधले त्यांच्या वंशजांत मर्दुमकी अशी मुळींच राहिली नाहीं, हें पाहून पराकाष्ठेचा विस्मय होतो! प्रतापगडावरील देवीच्या अंगावरचें जवाहीर पहाण्यासारखें आहे. एकंदरींत असले किल्ले पहाण्यास जाण्यांत आनंद किंवा दुःख यांपैकीं कोणत्या विकाराचें प्राबल्य क्षणभर अधिक होईल, हें सांगतां येणें कठिण आहे! तथापि प्राणोत्क्रमण झालें असतांही ज्याप्रमाणें स्नेहाळू जननीस अपत्यकलेवर सोडवत नाहीं, त्याप्रमाणें सहृदय महाराष्ट्रीयांस अशा वस्तूच्या आममंतात् प्राप्त झाल्यावर प्रेमपूर्वक एकवार तरी तिचें संनिकट दर्शन घेतल्यावांचून रहावत नाहीं!

महाबळेश्वरीं दाट झाडी असल्यामुळें बसल्याठिकाणीं फार वारा मिळत नाहीं. हवेच्या थंडपणामुळें वारा घेण्याची इच्छाच होत नाहीं ही गोष्ट निराळी; पण एकादे वेळीं बंगल्यांतल्या बंगल्यांत किंवा घरांतल्या घरांत सोंसाठ्याची झुळूक पाहिजे, असें कोणी ह्मणेल तर त्याला ती सहसा प्राप्त व्हावयाची नाहीं. याचें कारण उघडच आहे. झाडें हीं पंखे खरीं; पण हे सजीव पंखे हालूं लागून त्यांपासून वारा सुटण्यास त्यांमध्यें बरेंच अंतर असलें पाहिजे. पण येथें तर ते एकमेकांस लागून गेले असल्यामुळें, अगोदर ते मोठ्यानें हालत नाहींत, व थोडेबहुत हालले तरी त्यापासून मोठा वारा सुटत नाहीं. तसेंच, बाह्य प्रदेशांतून आलेला वाराही या झाडांत गुरफटून जातो, आणि क्षणोक्षणीं लहान लहान टेकड्यांचा आणि वृक्षराजींचा त्यास प्रतिबंध होत असल्यामुळें त्याची गति खुंटते, आणि सर्वत्र साममूप होते! ज्याला वहाता वारा पाहिजेच असेल त्यानें आपला बंगला किंवा घर सोडून एकाद्या उंच व मोकळ्या ठिकाणीं गेलें पाहिजे. अशीं ठिकाणें येथें पुष्कळ आहेत, व तेथें जाण्यासाठीं गाड्यांचे, घोड्यांचे व पायांचे रस्ते केलेले आहेत. अशा ठिकाणांस पॉइंटस ह्मणतात. ज्याप्रमाणें एकाद्या मोठ्या किल्ल्याच्या तटांत भिंतीस सोडून पुढें आलेले बुरूज असतात, त्याप्रमाणें पर्वताच्या मुख्य रांगेपासून उजव्या व डाव्या बाजूस कांहीं कांहीं अंतरावर फुटलेल्या ज्या शाखा किंवा बाहु त्यांस **पॉइंटस** असें म्हणतात. अशा प्रका-

रच्या दोन पर्वतशाखांत किंवा बाहूंत मोठी थोरली दरी असते, व या बाहूंच्या टोंकास येऊन उभें राहिलें असतां समोरचा डोंगराळ प्रदेश साफ दिसतो, आणि प्रतिबंधाच्या अभावामुळें जोरानें वहाणारा वारा मिळतो. साहेब लोकांनीं या पॉइंटांवर हवा खात बसण्यासाठीं फार चांगल्या सोई केल्या आहेत. आसपासची झाडी तोडून व जमीन साफ करून गाड्या फिरविण्याजोगें मैदान केलेलें असतें, आणि पॉइंटाच्या शेवटास येऊन उभें रहाणाऱ्या जिज्ञासु प्रेक्षकाचा, सृष्टिसौंदर्याचें अवलोकन करण्याच्या नादांत, तोल जाऊन कडेलोट होऊं नये, म्हणून पॉइंटाच्या सभोंवतीं बहुधा दगडी भिंत घातलेली असते. अशा या रम्य स्थळीं अनेक युवयुवती सकाळसंध्याकाळ आपली करमणूक करण्यासाठीं येत असतात. तथापि या ठिकाणीं कोणास जी कांहीं करमणूक करून घ्यावयाची असेल ती त्यानें सकाळीं सहा तासांच्यापुढें व संध्याकाळीं सहा तासांच्या अगोदर करून घेतली पाहिजे. महाबळेश्वरीं सकाळीं सहांच्या पूर्वीं सहसा कोणी बाहेर पडत नाहीं, व संध्याकाळीं सातांचेपुढें सहसा कोणी बाहेर रहात नाहीं. कारण उघड आहे. सुर्योदयाचे पूर्वीं आणि सूर्यास्तानंतर थंडी असते. अशा थंडींत हवा खात फिरण्यानें उपकार न होतां उलट अपकार होतो. शिवाय अशा वेळीं बाहेर जाण्यापासून किंवा बाहेर रहाण्यापासून आणखी एकदोन प्रकारच्या धोक्यांत येण्याचा संभव असतो! कोंकणाप्रमाणें महाबळेश्वरीं विषारी जिवाणूंची बरीच भीति आहे. साप, घामणी, मण्यारी, फुरशीं, रातीं वगैरे दंश करणारीं जनावरें अंधारांत तुमची निदान केव्हां केव्हां तरी भेट घेतल्याशिवाय रहावयाचीं नाहींत! ज्यांना यांचें सप्रेम भेटणें नको असेल त्यांनीं जिकडेतिकडे स्वच्छ उजेड पडल्यावर बाहेर निघालें पाहिजे, व दाट अंधार पडण्यापूर्वीं घरीं परत आलें पाहिजे. पण या क्षुद्र जिवाणूंपेक्षांही एका फार मोठ्या गृहस्थाची रात्रीच्या निबिड अंधारांत येथें मुलाखत होण्याची भीति असते! या स्वारीचा सामना झाल्यास असलेल्या जागेवरून हालतां येत नाहीं, व यांचा अपमान करून कोणी आपला मार्ग सुधारला, तर त्याबद्दल

त्याला हे शीघ्रकोपी जमदग्नि काय दंड करतील हें सांगतां येत नाहीं! एके दिवशीं आमच्या एका स्नेह्यास आपल्या मित्रांचें उशीरां उठणें आणि चहाकाफी आटोपून उशीरां बाहेर पडणें पसंत न पडून, त्यानें भल्या पहाटेस एका दूरच्या पॉइंटावर सडी मोहीम केली. दहापंधरा मिनिटें सकाळची थंड हवा खाल्ल्यावर स्वारी परत निघाली! सूर्योदय होऊन जिकडेतिकडे नुकतेंच ऊन पडूं लागलें होतें, व आसपासच्या खेड्यांतील कांहीं जिन्नस घेऊन वर येणारा एकादा धनगर किंवा कुणबी दृष्टीस पडेल अशी आशा उत्पन्न होत होती, तों आमचे एकांतप्रिय स्नेही दोहों बाजूंनीं झाडांची आणि वेलांची खूप गर्दी होऊन गेली आहे, अशा एका थोडी भीति वाटण्यासारख्या ठिकाणीं येऊन पोहोंचले! इतक्यांत डाव्या हाताकडील झाडींत कांहीं खुसबुसल्यासारखें वाटलें! त्या-सरशी स्वारी दचकल्यासारखी होऊन थोडी मागें सरली. आणि काय खुसबुसलें असेल तें मान फिरवून पहावें किंवा आपलें तडक चालतें व्हावें, अशा घोंटाळ्यांत क्षणमात्र गढून गेली आहे तों सुमारें पंचवीस हातांच्या अंतरावर एक प्रचंड गृहस्थ डाव्या हाताकडील झाडींतून बाहेर पडले आणि रस्ता ओलांडून उजव्या हाताकडील झाडींत अंतर्धान पावले! जातां जातां त्यांनीं आमच्या मित्राकडे एक निष्काळजीचा नेत्रकटाक्ष फेंकण्याहून दुसरें कांहीं-एक केलें नाहीं! पण तेवढ्यानें या राजश्रींची किती गाळण होऊन गेली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी! कांहीं म्हणा, आमचा स्नेही धैर्याचा सागर खरा! दुसरा एकादा असता तर बोबडी वळून तेथल्या तेथेंच पडला असता. पण नखशिखांत घामानें डबडबलेल्या, हातापायांस कांपरें सुटलेल्या, व मोठ्या कष्टानें हळहळू श्वास टाकणाऱ्या आमच्या मित्रानें अंगीं असलेलें सारें धैर्य गोळा केलें, जोडा काढून हातांत घेतला, आणि ज्या ठिकाणीं वाघोबाची पावलें लागलीं होतीं तेथपर्यंत जिवाचा धडा करून कसें तरी येऊन ठेपल्यावर, स्वारीनें मागें न पहातां जो पोबारा केला तो कांहीं पुसूं नये! एक-दोन तीन आडवे उभे रस्ते जाऊन डाव्या उजव्या हातास बंगले दिसूं लागले, व वाटेनें

जाणारीयेणारीं मनुष्यें दृष्टीस पडूं लागलीं, तेव्हां बिचाऱ्याच्या जिवांत जीव आला, आणि पंचाननाच्या जबड्यांतून सुटून आपण आपल्या घरीं खचीत पोहोंचतों, व आपल्या प्रिय पत्नीची आणि कन्येची भेट निःसंशय होते, असा त्यास भरंसा आला ! ही घामाघूम, लाल, व भयभीत झालेली मूर्ति घरीं येऊन ठेपली तेव्हां खुशालपणें चहाकाफी घेत बसलेल्या बाकीच्या मंडळीस, व विशेषतः आमच्या या स्नेह्याच्या प्रिय पत्नीस, त्याची ही हकीकत ऐकून काय वाटलें असेल, व लौकर उठून एकटें बाहेर पडण्याबद्दल त्यांनीं त्याची किती तारीफ केली असेल, याची वाचकांनींच कल्पना करावी ! हे गृहस्थ आंग्लविद्याविभूषित लोकमान्य तरुण वकील आहेत. तात्पर्य, महाबळेश्वरीं सकाळीं सहांचेपूर्वीं एकट्या दुकट्यानें बाहेर पडणें, व संध्याकाळीं सातांचेपुढें कंदिलाशिवाय व सोबतीशिवाय बाहेर रहाणें चांगलें नाहीं. विशेषतः काळोख्या रात्रीं तर शहाण्या मनुष्यानें दिव्याशिवाय बाहेर राहूं नये, किंवा बाहेर जाऊं नये. कित्येक झाडीमुळें जिकडेतिकडे इतकें अंधारगुडूप होऊन गेलेलें असतें कीं, तुमचा बंगला किंवा तुमचें घर देखील तुह्मांस सांपडण्याची मारामार पडते. बाहेरून येणारास ही पंचाईत न पडावी, ह्मणून येथें सामान्य अशी चाल पडली आहे कीं, बंगल्यावरच्या गड्यानें कंदील घेऊन बंगल्याच्या फाटकापाशीं, किंवा त्यापासून रस्त्यावर थोड्याशा अंतरावर बाहेर गेलेल्या माणसाची वाट पहात बसावें, आणि तो आला म्हणजे त्यास बंगल्यांत घेऊन जावें. आपले माजी गव्हर्नर **लॉर्ड रे** यांस फार दूर एकटें फिरण्याचा मोठा नाद होता एके दिवशीं दिल विशेष खुष असल्यामुळें ह्मणा, किंवा कांहीं गूढ राजकारणाच्या चिंतेंत मन व्यग्र होऊन गेल्यामुळें ह्मणा, आपण कोणीकडे व किती चाललों आहों, याचें त्यांस भान राहिलें नाहीं, व ते फिरतां फिरतां फार लांब झुकले. पुढें बरीच रात्र झाली असें पाहून परत यावयास निघाले. पण रात्रीच्या अंधारामुळें दिशाभूल होऊन वाट सांपडेनाशी झाली. इलाखाधिपति झाला तरी त्याला जिवाची भीति आहेच ! कारण **लॉर्ड रे** यांस हें पक्कें

ठाऊक होतें कीं, रानांतील क्रूर श्वापदांपुढें किंवा जिवाणूंपुढें आपण मुंबईचे गव्हर्नर आहों असें सांगितलें असतां कांहीं रदबली होईल, व तीं आपणांस त्रास न देतां निमुटपणें चालतीं होतील, असें कांहीं नाहीं ! अशा स्थितींत साहेबमजकूर इकडेतिकडे बरेच फिरले, पण खात्रीची वाट सांपडेना. इतक्यांत सुदैवानें एक धनगर त्यांस भेटला. पण त्याशीं बोलावें कसें, याची पंचाईत पडली ! साहेबांना मराठी समजावयाचें नाहीं, धनगराला इंग्रजी कळावयाचें नाहीं ! अखेरीस कधीं कधीं कानावर आलेल्या दहा-पांच हिंदुस्थानी व मराठी शब्दांपासून नेक नामदारांनीं आपलें काम करून घेतलें ! 'बेला व्हेस्टा,' 'सरकारी बंगला,' 'गव्हर्नर साहेब,' 'मालकम पेठ,' 'चलो,' वगैरे साहेबाच्या तोंडून निघालेले शब्द ऐकून, धनगर बोआंनीं इतकें ताडलें कीं, हे साहेब वाट चुकले आहेत, व यांस गव्हर्नराच्या बंगल्यावर जावयाचें आहे. गव्हर्नराच्या बंगल्याचें ठिकाण बहुतेक लोकांस ठाऊक असतेंच, व त्याप्रमाणें या अडाणी वाटाड्यासही ठाऊक होतें. लागलीच त्यानें आपल्या गांवाचा मार्ग सोडिला, आणि तो पुढें व साहेब मागें—याप्रमाणें उभयतां **बेलाव्हेस्टां**त येऊन पोहोंचले ! साहेबांनीं व्हेरँड्यांत पाय टाकल्याबरोबर, खिशांतून दोन रुपये काढून आपल्या वाटाड्याच्या हातावर ठेविले ! दुसरे दिवशीं या आनंदलेल्या धनगराकडून ही सारी मौज बाहेर पडली ! यापुढें **लॉर्ड रे** यांनीं आपला फिरावयास जाण्याचा क्रम सोडिला, असें नाहीं. पण संध्याकाळ झाल्यावर बाहेर पडावयाचें झाल्यास ते एक कंदिलवाला पोलिस शिपाई बरोबर घेतल्याशिवाय रहात नसत, असें सांगतात ! आणखी दोघां गृहस्थांवर एके दिवशीं असाच प्रसंग गुदरला होता. हे दोघे मागें सांगितलेल्या दीक्षितांचे घरीं उतरले होते. रात्रीचे आठ वाजून गेले तरी परत येत नाहींत, असें पाहून दीक्षितांच्या अनुभवशीर वृद्ध मातुश्रीस चैन पडेनासें झालें, आणि तिनें आपल्या दोनही मुलांस व घरच्या गड्यास या भटकणाऱ्या पुणेकर पाहुण्यांच्या शोधाकरितां कंदील घेऊन बाहेर पाठविलें. पण त्यांचा कोठेंही पत्ता लागेना. **आगर-**

करं आणि टिळक रा० ब० महादेव वासुदेव बर्वे यांच्या बंगल्यावर सांपडण्याचा कांहीं तरी संभव ? पण वेडावलेल्या दत्तोपंतानें त्यांचा तेथें जाऊन सुद्धां तपास केला ! अखेरीस निराश होऊन ही शोधकमंडळी घरीं परत आली ! इकडे आमचे भटकणारे दोघे प्रोफेसोरिअल एडिटर्स किंवा एडिटोरिअल प्रोफेसर्स वादाच्या भरांत वाघाच्या घळींत जाऊन पडण्यापूर्वीं किंवा एकाद्या कड्यावरून घसरण्यापूर्वीं शुद्धीवर आले, आणि मोठ्या प्रयासानें नऊ वाजण्याच्या सुमारास दीक्षितांच्या ओटीवर येऊन दाखल झाले, हें मोठें भाग्यच ह्मणावयाचें ! आतां पुढें महाबळेश्वरचीं पहाण्यासारखीं एक दोन ठिकाणें वाचकांस दाखवून, ही बरीच लांबलेली यात्रा पुरी करूं.

महाबळेश्वरीं सर्व कांहीं चांगलें आहे; पण एक मात्र चांगलें नाहीं. तें काय ह्मणाल तर राहण्याची सोय. ही गोष्ट इंग्रज लोकांना किंवा हजारों रुपये खर्च करणाऱ्या राजे लोकांना लागू नाहीं. ती मध्यम स्थितींतल्या ब्राह्मण व इतर लोकांना लागू आहे. साहेब लोक काय ? जेथें जातील तेथें पिशाचभुवनाचें इंद्रभुवन करून सोडणारे ! त्यांचें येथें कांहीं एक कमी पडत नाहीं ! त्यांना हवे तितके बंगले आहेत; त्यांचीं एक दोन मोठीं हॉटेलें आहेत; मोठें पुस्तकालय व पत्रकालय आहे; उघड्या हवेंत खेळण्याचीं कोर्टें आहेत; टांग्यांत बसून हिंडण्यासारखे, घोड्यावर स्वार होऊन दौड करण्यासारखे, किंवा श्रेष्ठ अर्धांगांच्या बाहूस स्वबाहूचा आधार देऊन त्यांच्याबरोबर हितगुजाच्या गोष्टी बोलत सकाळसंध्याकाळ हवा तितका व्यायाम करण्यासारखे लहानमोठे, निर्भय, व एकांत असे रस्ते आहेत; प्रार्थना करावयाची झाल्यास ख्रिस्तालय आहे; कोणास देवाज्ञा झाल्यास त्यासाठीं शांत कबरस्तान आहे; जिमखाना आहे; नाटकगृह आहे; शर्यतीचें ‘ सरकस ’ आहे; होड्या फिरविण्यासारखें तळें आहे; व कोठें कांहीं कमी पडलें तरी तें भरून काढण्यासारखें गव्हर्मेंट हौस ह्मणजे सरकारी बंगला आहे, आणि सध्यां त्यांत सर्व खेळांस उदार आश्रय देणारा, सर्व स्वजातीस स्वादु अन्नानें, स्वादु स्वभावानें, आणि स्वादु भाषणानें संतुष्ट करणारा इलाखाधिपति आहे. लॉन

टेनिसकरितां कांहीं जागा कमी पडत होती ती लॉर्ड ह्यॉरिस यांनीं सरकारी बंगल्याच्या हद्दींतील कांहीं झाडी तोडवून नुकतीच तयार करविली असें ह्मणतात. तसेंच, पुरुषांनीं डाव्या हातांनीं काठ्या घेऊन व बायकांनीं उजव्या हातांनीं ब्यॉटें घेऊन एकमेकांशीं एका प्रकारच्या खेळाचा संग्राम उन्हाळ्यांत केला, असेंही आम्ही ऐकतों. याप्रमाणेंच कांहीं अंशीं येथें येणाऱ्या जहागिरदारांची व राजेरजवाड्यांची चैन असते, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पण या लोकांस चैन कशी करावी, हेंच आमच्या मतें नीट समजत नसल्यामुळें, महाबळेश्वरीं येण्यापासून साहेब लोकांस प्रकृतीच्या संबंधानें जे फायदे होतात, ते या लोकांस होत असतील किंवा नाहीं याची शंका आहे. अथवा हे लोक येथें प्रकृतीच्या फायद्यासाठीं येत असतील, असें तरी कां समजावें? येथें येण्यांत बऱ्या बड्या साहेब लोकांच्या भेटी घ्याव्या, व त्यांशीं आपापल्या संस्थानाच्या संबंधानें एकादी दुसरी गोष्ट बोलणें असेल तर बोलावी, कांहीं बातमी काढणें असेल तर काढण्याची खटपट करून पहावी, कोणी एकादा नवीन साहेब आला असेल त्याची ओळख करावी—अशा प्रकारच्या कामगिरीसाठीं आमचे संस्थानिक बहुधा येथें येत असावेत, असा आमचा तर्क आहे. ज्याप्रमाणें पेशवाईंत कामाधामाच्या निमित्तानें दक्षिण महाराष्ट्रांतील व उत्तरेकडील सरदारांस पुण्यास नेहमीं यावें जावें लागे, म्हणून ते उतरण्यासाठीं आपल्या मालकीचा एकादा वाडा बांधून ठेवीत, त्याप्रमाणें कित्येक संस्थानिकांनीं आपल्या मालकीचे बंगले बांधून ठेविले आहेत, व कित्येक आले तर अमुक बंगल्यांतच उतरावयाचे असें ठरून गेलें असल्यामुळें ते बंगले त्यांचेच होऊन गेल्यासारखे झाले आहेत, व त्यांच्या मालकांस प्रतिवर्षीं नवीन भाडेकरी पहाण्याची गरज उरलेली नाहीं. पण ही सारी अंमलवाल्या व पैसेवाल्या इंग्रज लोकांची आणि फक्त पैसेवाल्या हिंदूंची, पारशांची, व मुसलमानांची गोष्ट झाली. पण गरीब लोकांनीं काय करावें? गरीब लोकांनीं अशा ठिकाणीं मुळींच जाऊं नये! पण यांच्याखेरीज अंमलदारांचा आणि श्रीमंत लोकांचा

निभाव तेथें कसा लागेल? साहेबाला शिरस्तेदार पाहिजे, कारकून पाहिजेत, पटेवाले पाहिजेत—सारांश, बहुतेक त्याचें हपिस पाहिजे! संस्थानिकांना त्यांचे कारभारी, त्यांचे शिक्षक, त्यांचे कारकून, त्यांचे चारदोन स्नेही, हुजरे, पाणक्ये, आचारी वगैरे लोक पाहिजेत. या लोकांची व्यवस्था नीट रीतीनें लागत नाहीं. संस्थानिकांच्या आश्रितांची स्थिति थोडी तरी बरी असते. कारण हे आपल्या मालकाच्या बंगल्यांत कोठें तरी पडून रहातात. पण साहेब लोकांच्या हपिसांतील नोकरांची फार त्रेधा उडून जाते! सरकारांतून कितीही मोठें भाडें मिळालें तरी तेवढ्यानें उन्हाळ्यांत येथें रहाण्यास चांगलें घर मिळत नाहीं. महिन्या दीड महिन्यासाठीं पंचवीस, तीस, किंवा चाळीस रुपये देऊन, कोणाला एकाद्या वाण्याच्या अंधाऱ्या माजघरांत, कोणाला एकाद्या भिक्षुकाच्या धुरकट स्वयंपाकघरांत, कोणाला एकाद्या कुणबटाच्या खोपटांत व कोणाला एकाद्या धनगराच्या खोपटांत गुजारा करावा लागतो. महाबळेश्वरास पाण्याची मोठी पंचाईत पडते. पाणी लांब असून खोल असतें! ह्मणजे रहाणें बहुधा उंचवट्याच्या जागेवर असून विहीर खोलगट जागेंत खणावी लागत असल्यामुळें, व वरचा कातळ फोडून त्याच्या खालच्या काळ्या दगडाच्या थरापर्यंत वीस पंचवीस फूट खणल्याशिवाय पाणी सहसा लागत नसल्यामुळें, विहिरींतून एक घागर किंवा हंडा वर काढून घरीं आणून टाकीतोंपर्यंत हातापायांस आणि पाठीच्या कण्यास चांगलाच व्यायाम होऊन जातो! कोणी विशेष वातबद्ध स्त्री असेल तर तिच्याकडून येथील विहिरीच्या दहाबारा घागरी रोज आणवाव्या, ह्मणजे एका पंधरवड्याच्या आंत तिचा बहुतेक वात झडून जाईल, असें आह्मांस वाटतें! जाग्याचे इतके हाल सोसून देखील येथें महिना दीड महिना काढणें फायदेशीर आहे. ज्याप्रमाणें तरुण स्त्रीला सासूसासऱ्याचा, नणंदाजावांचा किंवा दुसऱ्या कोणाचा कितीही जाच असला तरी जर तीवर नवऱ्याचें पूर्ण प्रेम असेल तर त्याची फिकीर वाटत नाहीं; उलट माहेरापेक्षांही सासरच अधिक सुखावह वाटतें, त्याप्रमाणें अवांतर गोष्टींपासून कितीही त्रास झाला तरी एका हवेच्या सुंदरपणामुळें बाकीच्या गैरसोई-

विषयीं येथें कांहीं वाटत नाहीं! बर्फ न घालतां गार व गोड पाणी; कोठेंही पडलें तरी गार व स्वच्छ हवा; गोठ्यांत पडा कीं पडवींत पडा, जमिनीस आंग लागल्याबरोबर निद्रेची मिठी; अतिशय भिकार जागेंत देखील एक ढेंकूण, डास, किंवा पिसू दिसण्याची मारामार; कितीही श्रम झाले तरी सदरा काढून टाकून जरासें हश्श हुश्श केलें, पाण्याची एकादी चूळ भरून टाकली, पानसुपारीचा एकादा बार भरला, किंवा चिलमीचे—साध्या चिलमीचे—चारदोन झुरके घेतले, कीं पुनः आपले पहिल्यासारखे हुशार! कांहीं खाल्लें तरी साफ पचावयाचें आणि कितीही खाल्लें तरी अधिकच खावेंसें वाटावयाचें—अशी जेथील हवा; तेव्हां अशा ठिकाणीं जागेच्या अडचणीपासून होणाऱ्या त्रासाकडे कोणी फारसें लक्ष देत नाहीं. तथापि मुंबईचे किंवा पुण्याचे सावकार जागा खरेदी करून तेथें लहान लहान घरें किंवा चाळी बांधतील तर त्यांचा तोटा न होतां, सामान्य स्थितीच्या लोकांची मोठी सोय होणार आहे. पण पैसेवाले लोक आपल्या रकमा येथें गुंतवून ठेवण्यास धजत नाहींत याचें मुख्य कारण असें आहे कीं, उभ्या वर्षाचें भाडें येथें एप्रिल व मे या दोन महिन्यांत उभें करावें लागतें, म्हणजे बारा महिन्यांचें भाडें या दोन महिन्यांच्या सीझनवर किंवा ऋतूवर लादावें लागतें, व त्यामुळें दिसण्यांत त्याची रक्कम फार जबर दिसते. पण वास्तविक पहातां इतकें भाडें घेऊन घराच्या मालकास म्हणण्यासारखा फायदा होत नाहीं. बाकीच्या ठिकाणांप्रमाणें घरांत कोणी रहात नसल्यास येथें त्यास कुलूप लावून ठेवणें पुरे होत नाहीं. पर्जन्याति-शयामुळें पावसाळ्यांत घराचा बचाव करण्यास गवताचा वगैरे बराच खर्च लागतो, व त्यावर नेहमीं नजर ठेवावी लागते. तथापि ज्याप्रमाणें बाजारांत येणारा माल आणि तो घेणाऱ्या ग्राहकांची संख्या यांचा एकमेकांवर परिणाम घडतो, त्याप्रमाणें येथें जसजशीं अधिकाधिक सोईचीं घरें मिळूं लागतील तसतशी महाबळेश्वरास आरामासाठीं जाणाऱ्या लोकांची संख्या वाढत जाईल, व ही संख्या वाढत जाईल तों तों असलीं घरें बांधणारे भांडवलवाले पुढें येऊं

लागतील! याचा प्रत्यय पहाण्यास दूर जावयास नको. रा० दत्तात्रय कमलाकर दीक्षित ह्मणून येथें रहाणारे एक घरंदाज गृहस्थ आहेत त्यांचेंच उदाहरण बस आहे. यांची वृत्ति मूळ भिक्षुकीची होती. पण अलीकडील अश्रद्धावान् पिढीपासून त्या वृत्तींत म्हणण्यासारखा फायदा होत नाहीं, असें पाहून या गृहस्थानें तिला रामराम केला, आणि जेवढी माया जवळ होती तेवढीनें एक लहानसें टुमदार घर किंवा बंगला उठवून दिला. या बंगल्यास गेल्या सीझनबद्दल आ. रा. ब. रानडे यांनीं पावणे दोनशें रुपये भाडें दिलें, असें ऐकतों! या रकमेवरून रा० दिक्षितांस मूळ रकमेवर निदान पंचवीस टक्के तरी व्याज पडलें असेल असें मात्र कोणीं समजूं नये. कां तें वर सांगितलेंच आहे. रा० दत्तोपंत हे हुशार, प्रामाणिक, उद्योगी, आणि मनमिळाऊ गृहस्थ आहेत. यांनीं महाबळेश्वरीं अलीकडे एजन्सीचा धंदा सुरू केला असल्यामुळें मध्यम स्थितीच्या लोकांची मोठी सोय झाली आहे. दत्तोपंतापाशीं घरापासून टांचणीपर्यंत पाहिजे ती वस्तु, भाड्यानें देण्यासारखी भाड्यानें, व विकत देण्यासारखी असेल तर किंमत देऊं करून मागा, ती थोड्या वेळांत फार माफक कमिशन घेऊन ते तुह्मांस आणून देतात, आणि तुमचा परामर्श घेण्याविषयीं नेहमीं तत्पर असतात. आज दोनतीन वर्षें महाबळेश्वरीं मधल्या स्थितीचे जे खासगी गृहस्थ किंवा मोठमोठे नेटिव अंमलदार गेले, त्यांनीं दत्तोपंतांस दिलेल्या सर्टिफिकिटांचें एक लहानसें पुस्तक झालें आहे, व या पुस्तकांतील बहुतेक सर्टिफिकिटांत दत्तोपंतांचे अंगीं वर सांगितलेले गुण असल्याबद्दल दाखला सांपडण्यासारखा आहे. या गृहस्थांनीं या धंद्याची सुरवात येथें केल्यापासून वरिष्ठ वर्णांतील कोणत्याही नेटिवास महाबळेश्वरीं गेल्यावर पहिल्याप्रथम चंबुगबाळें कोणाच्या घरीं टाकूं, व मला थारा कोठें मिळेल, अशी काळजी करण्याची गरज उरली नाहीं. गाडीवानास किंवा टांगेवाल्यास मालकम पेठेंत दीक्षितांचें घरीं घेऊन चल असें सांगावें, आणि दारापाशीं येऊन गाडी किंवा टांगा सोडावा, ह्मणजे तुमची सारी व्यवस्था लागेल! फक्त कशाचें तोंड थोडेंसें खुलें ठेवा ह्मणजे झालें!

# स्वेझचा कालवा.

एम्. डी. टॉक्व्हील् ह्मणून एक फ्रेंच ग्रंथकार व राजमंत्री नुकताच होऊन गेला. त्यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, ' पृथ्वीवर कोणतीही अघटित कल्पना निघायाची झाली तर ती प्रथम फ्रान्स देशांत निघाली पाहिजे, व कोणतेंही अचाट कृत्य करावयाचें झालें तर तें प्रथम **फ्रेंच** लोकांकडूनच झालें पाहिजे. फ्रेंचलोकांसारखे साहसी व काल्पनिक दुसरे लोक नाहींत, आणि ह्मणून इतर राष्ट्रें माझ्या देशबंधूंचा कधीं तिरस्कार करतील, कधीं त्यांजविषयीं आश्चर्य करतील, व कधीं त्यांचा हेवा करतील. पण कोणत्याही वेळेस माझ्या देशाविषयीं त्यांना बेपर्वा किंवा उदासीन होतां येणार नाहीं. ' वरील ग्रंथकारानें आपल्या देशबांधवांविषयीं लिहून ठेविलेला हा अभिप्राय अलीकडे यूरोपांतील बहुतेक ठळक राष्ट्रांस मान्य झाला आहे. हिंदुस्थानांतील लोकांस युरोपखंडापैकीं इंग्लिश लोकच वारंवार दृष्टीस पडत असल्यामुळें, व येथील शाळांत व कालेजांत त्याच लोकांच्या इतिहासाचें पठण होत असल्यामुळें, युरोपांतील इतर लोकांच्या सुधारणेविषयीं व पराक्रमाविषयीं त्यांस मुळींच माहिती नाहीं, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पण वास्तविक पहातां **फ्रेंच, जर्मन** वगैरे लोक अनेक गोष्टींत इंग्रजांच्या बरोबरीचे व कांहीं गोष्टींत त्यांहून श्रेष्ठ आहेत, असें ज्यांनीं त्या देशांत प्रवास केला आहे, किंवा त्यांचा इतिहास वाचला आहे, त्यांच्या नजरेस आल्यावांचून रहात नाहीं. ज्याप्रमाणें इंग्लंडच्या इतिहासांत शिकण्यासारख्या व अनुकरण करण्यासारख्या पुष्कळ गोष्टी आहेत, त्याप्रमाणें या देशांच्या इतिहासांतही आहेत; आणि ह्मणून या देशांतील लोकांनीं इंग्लंडच्या इतिहासाप्रमाणें **फ्रान्स** व **जर्मनी** या देशांच्या इतिहासाचाही अभ्यास करणें जरूर आहे. हा अभ्यास येथें व्यवस्थित रीतीनें चालू होण्यास आमच्या लोकांत **जर्मन** व **फ्रेंच** भाषांचा अभ्यास करण्याचा परिपाठ पडला पाहिजे. पण तो केव्हां पडेल हें सांगवत नाहीं. दोन वर्षांपूर्वीं आमच्या युनिव्ह-

सिटीच्या भाषाभ्यासक्रमांत **फ्रेंच** भाषेचा समावेश करण्यांत आला; पण अजून कोणत्याही नेटिवानें तिचा अभ्यास करण्यास आरंभ केल्याचें आमचे ऐकिवांत नाहीं. कदाचित् ती शिकण्याची सोय नसल्यामुळें, किंवा दुसऱ्या कांहीं अडचणींमुळें तसा परिणाम झाला असेल. पण जर आम्हांस मोठमोठ्या युरोपीय राष्ट्रांची खरी स्थिति समजून घ्यावयाची असेल, तर आज नाहीं उद्यां, आह्मीं त्या भाषांचा अभ्यास करूं लागलें पाहिजे. तो आह्मी करूं लागेतोंपर्यंत, त्या देशांविषयीं जेवढी व जसली माहिती इंग्रजी ग्रंथांत सांपडेल तेवढीवर व तसलीवर आम्हांस आपला निर्वाह केला पाहिजे, हें उघड आहे. आतां येवढें खरें आहे कीं, प्रस्तुत स्थितींत कोणत्याही देशांतील शेंकडा नव्वद लोकांस आपल्याच भाषेचा अभ्यास करतां करतां पुरे होतें. हिंदुस्थानांतील शिक्षणेच्छु लोकांस देशभाषेचा व इंग्लिशभाषेचा अभ्यास करणें विशेष अगत्याचें आहे. तो झाल्यावर पुढें **फ्रेंच** व **जर्मन** या भाषांचा विचार! तथापि कितीही अडचणी असल्या तरी त्या न जुमानतां, या लोकांच्या इतिहासांविषयीं, सुधारणेविषयीं, व भाषांविषयीं आम्हांस माहिती झाली पाहिजे. ती करून घेण्यास आमचे लोकांना उत्तेजन यावें, एतदर्थ त्या देशांतील मोठमोठ्या राजकीय घडामोडींविषयीं, व त्यांतील प्रसिद्ध पुरुषांनीं केलेल्या अद्भुत पराक्रमांविषयीं इंग्रजी ग्रंथद्वारा मिळविलेली मनोरंजक व उपयुक्त माहिती आह्मीं वाचकांपुढें मांडण्याचा इरादा केला आहे.

ज्या प्रसिद्ध फ्रेंच गृहस्थाविषयीं वर उल्लेख केला आहे, त्याचें नांव **एम्. डी. लेसेप्स्.** हा एन्जिनीअर असून आजमित्तीस जिवंत आहे. जोंपर्यंत भूमध्यसमुद्र आणि तांबडा समुद्र यांस जोडणारा स्वेझचा कालवा चालू राहील तोंपर्यंत याचें नांव ज्याच्या त्याच्या तोंडून निघत राहील! ज्याप्रमाणें हिंदुस्थानांत राज्य स्थापित करण्याची कल्पना इंग्लिश लोकांस सुचवून देण्यास डुप्ले नांवाचा फ्रेंचमनच मागें कारण झाला, त्याप्रमाणें आतां त्यांचा आमच्यावर पक्का अंमल बसवून देण्यासही फ्रेंचमनच कारण झाला आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं!

कारण आजमित्तीस या प्रचंड कालव्यापासून इंग्लिश लोकांस जितका फायदा होत आहे, तितका दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रास होत नसेल. **स्वेझ**ची संयोगीभूमि फोडून कालवा करण्याची कल्पना **लेसेप्स** यासच प्रथम सुचली, असें नाहीं. असलीं अवाढव्य कामें उठवून देण्याची छाती पूर्वीच्या लोकांसही होत असे. **भगीरथानें** खणलेल्या कालव्यांत भागीरथी वहात आहे, असें आमच्या पुराणांवरून निघतें! चिनी लोकांनीं आपल्या देशाच्या पश्चिमोत्तर सीमेवर बांधलेली पर्वतप्राय भिंत अजून उभी आहे! तथापि अशा प्रकारचीं कामें करण्याबद्दल जुन्या **मिसर**-देशांतील लोकांची फार प्रसिद्धि होती. ख्रिस्ती शकापूर्वी सुमारें सहाशें वर्षें कोणीं राजानें भूमध्यसमुद्र व तांबडा समुद्र यांच्या दरम्यान एक कालवा बांधला होता. हें काम बहुशः मिसर देशांतील एकाद्या अमरत्वचिंतक राजानें केलें असावें अशी कल्पना आहे. हा जुना कालवा सन ७०० किंवा ८०० पर्यंत वहात राहून पुढें भरून आला असावा, अशी अटकळ आहे. याच कालव्याचा जीर्णोद्धार करावा, असा **नेपोलिअनानें** बेत केला होता, पण तो त्याच्या हातून तडीस गेला नाहीं. जें काम साऱ्या युरोपास भारी झालेल्या वीराच्या हातून घडलें नाहीं, तें त्याच्याच देशांतील एका एन्जिनीअराकडून दहा वर्षांत तडीस गेलें! एका प्रसंगीं इजिप्त देशाच्या नकाशाकडे काळजीनें पहात असतां **लेसेप्स** यास असें वाटलें कीं, भूमध्यसमुद्र व तांबडा समुद्र यांचे दरम्यान असलेली संयोगीभूमि नाहींशी करून, तिच्या जागीं सामुद्रधुनी करून टाकली तर यूरोप व आशिया या दोन खंडांमधील व्यापार व प्रवास किती सुलभ व सुखावह होणार आहे! एकदा कल्पना मात्र आली, मग काय पुसतां? त्या दिवसापासून **लेसेप्स**ला झोंप नाहींशी झाली! अहोरात्र डोळ्यापुढें दोन्ही समुद्र आणि त्यांस जोडणारी संयोगीभूमि! पूर्वीचा एक कसलाबसला तरी कालवा होताच; तेव्हां नवीन कालवा करण्याची कल्पना केवळ अशक्य नाहीं, अशी **लेसेप्स**ची खात्री होऊन, तो लागलीच इजिप्तच्या संयोगीभूमीवर येऊन

दाखल झाला, व तिची मोजणी करूं लागला! ही संपाविण्यास त्याला पक्कीं चार वर्षें लागलीं. हीं चार वर्षें त्यानें या वालुकामय उष्ण प्रदेशांत किती कष्टानें काढलीं असतील तें त्याचें त्याला ठाऊक. पण तो जातीचा **फ्रेंचमन** असल्यामुळें कोणत्याही प्रकारच्या अडचणीस डगला नाहीं! संयोगीभूमीची मोजणी होऊन कालव्याची रेघ मारल्यावर अशा शंका निघाल्या कीं, कदाचित् भूमध्यसमुद्र तांबड्या समुद्रापेक्षां अधिक उंचीवर असेल; तसें असल्यास कालवा वाहून जाईल! तसेंच, दुसरे कोणी असा आक्षेप घेऊं लागले कीं, संयोगीभूमीची जमीन बळकट नसल्यास दलदल होईल, आसपासच्या प्रदेशांतील वाळू आंत भरून तो जागोजाग भरून येईल, किंवा त्याच्या बाजू ढांसळतील! या सर्व शंकांचें निरसन करण्यासाठीं **लेसेप्सनें** भूमध्यसमुद्र व तांबडा समुद्र यांच्या दरम्यान एकोणीस ठिकाणीं **ट्रायल होल्स** (प्रतीति पहाण्यासाठीं खोदलेलीं भोंकें,) पाडून पाहिलीं, व त्यांवरून आपली व आपल्या मित्रांची अशी खात्री करून घेतली कीं, वरील अडचणींपैकीं पहिली अडचण मुळींच येत नाहीं, कारण दोन्ही समुद्रांची उंची सारखी आहे, व बाकीच्या अडचणी सहज दूर करण्यासारख्या आहेत.

इतकी तयारी झाल्यावर पुढें भांडवलाची व मजूरांची काय सोय करावी, ही काळजी पडली. **लेसेप्स** यानें फ्रेंच लोकांपुढें हें प्रकरण आणिलें तेव्हां त्यांनीं तें मोठ्या वीरश्रीनें हातीं धरून पार पाडण्यासाठीं बराच पैसा व माणसें उभीं केलीं. पण हें प्रचंड कृत्य **फ्रान्स** देश कितीही दिलदार व साहसी झाला तरी त्याच्या एकट्याच्यानें होण्यासारखें नव्हतें. त्यामुळें **लेसेप्स** याला दुसऱ्या देशांची पायधरणी करावी लागली. प्रथम त्यानें इजिप्तच्या खेदिवास या कामीं मदत करण्याविषयीं विनंति केली, व सुदैवानें **सय्यद महंमदास** **लेसेप्सच्या** परिश्रमांचें आणि शोधकपणाचें कौतुक वाटून, त्यानें कालवा खणण्याविषयीं ताबडतोब परवानगी दिली इतकेंच नाहीं, तर तीस हजार मजूर देण्याचेंही अभिवचन दिलें! येवढें झाल्यावर फक्त पुरेसें भांडवल

उभें करण्याची काळजी राहिली. फ्रेंच लोकांनीं बरेंच भांडवल थोड्या दिवसांत गोळा केलें; पण आणखीही बरेंच पाहिजे होतें. जर्मनी तर बोलूनचालून कंगाल! टर्की कर्जबाजारी! स्पेन व इटली गतवैभव! बाकी सारी चिलीपिली मंडळी! राहतां राहिला एक इंग्लंड देश. त्यांत मात्र असले दहा कालवे बांधावयाचे झाले तरी त्यांना पुरेसें भांडवल पैदा होण्याची पंचाईत नव्हती! पण ते लोक पक्के मारवाडी! भांडवल दिलें आणि फायदा झाला नाहीं तर मग **लेसेप्स**चें काय घ्यावयाचें? बूड आली तर ती फ्रेंच सरकार भरून देणार आहे काय? अशा शंका त्या देशांत निघूं लागल्या. त्या वेळचे मुख्य प्रधान **लार्ड पाल्मर्स्टन्** या प्रकरणास अगदीं प्रतिकूल होते. ते असें म्हणूं लागले कीं, हे फ्रेंच लोक कांहीं तरी अकटोविकट कृत्य आरंभून आपणांला आणि दुसऱ्याला भिकेला लावायाचे! जहाजें आणि आगबोटी जाण्यासारखे कालवे कधीं कोणीं बांधिले आहेत? असले कालवे करतां आले तर मग पृथ्वीला भोंक पाडून अमेरिकेंत कां उतरतां येऊं नये? अथवा चंद्रावर आगगाडीनें कां जातां येऊं नये? पण या शंका केवळ राजकार्यकुशलांच्या होत्या, शास्त्रज्ञांच्या नव्हत्या, ह्मणून त्याबद्दल **लेसेप्स** यास फारसें वाईट वाटलें नाहीं. पण जेव्हां इंग्लंडांतील प्रसिद्ध एंजिनीअर **राबर्ट स्टिफन्सन्** असें ह्मणूं लागला कीं, हा कालवा बांधणें कांहीं अशक्य नाहीं, पण तो व्यापारदृष्ट्या फायदेशीर होईल कीं नाहीं याचा संशय आहे, तेव्हां मात्र **लेसेप्स** यास थोडी भीति वाटली, आणि आपण होऊन इंग्लंडची सफर करून तेथील पैसेवाल्यांची खात्री करून दिल्याशिवाय हवें तितकें भांडवल मिळणार नाहीं, असें त्यास पक्कें दिसून आलें. तेव्हां अर्थातच वादाची उत्तम तयारी करून **लेसेप्स** इंग्लंडास गेला, आणि पांचचार महिन्यांच्या आंत त्यानें तेथील मोठमोठ्या व्यापाऱ्यांची व शास्त्रज्ञांची, हा कालवा फायदेशीर झालाच पाहिजे, अशी खात्री करून दिली! ती केल्यावर मग भांडवलाला काय तोटा! थोड्या दिवसांत तें हवें होतें त्याहून अधिक मिळेल असें दिसूं लागलें!

याप्रमाणें सर्व अडचणी दूर झाल्याबरोबर **लेसेप्स** यानें एका दिवसाचा सुद्धां विलंब न लावतां १८५९ च्या आगस्ट महिन्याच्या २५ वे तारखेस या कामास आरंभ केला. कालव्याची एकंदर लांबी ८८ मैल असून त्यांपैकीं ६६ मैल खोदीव काम होतें. १४ मैल सरोवरांतील गाळ व भर काढून तीं हवीं तितकीं खोल व रुंद करावयाचीं होतीं, आणि ८ मैल मात्र जसेच्या तसेच ठेवायाचे होते. पाण्याच्या पृष्ठभागाखालीं कमींत कमी २६ फूट खोली, व तळाशीं कमींत कमी ७२ फूट रुंदी, ठेविली आहे. या कालव्याचें काम जारीनें सुरू करण्यापूर्वी दोन गोष्टी कराव्या लागल्या. अगोदर भूमध्यसमुद्राचा एक लहानसा पाट काढून त्याच्या तोंडाशीं समुद्रास लागून एक बंदर करावें लागलें. हें केल्याशिवाय पुढें काम चालविणें शक्य नव्हतें; कारण चोंहोंकडून जें सामानसुमान आणावयाचें तें उतरून घेण्यासाठीं, व समुद्रावर केवढेंही वादळ सुरू असलें तरी गलबतांस बिलकुल धक्का न पोंचेल अशा रीतीनें त्यांस आंत घेतां येण्यासाठीं, रुंद तोंडाच्या बंदराची पहिली अवश्यकता होती. ती दूर करण्यासाठीं सुमारें एकेक मैल लांबीच्या दोन प्रचंड भिंती समुद्रांत बांधीत नेल्या. या भिंतींच्या समुद्राकडील दोन टोंकांमध्यें १५०० यार्डांचें, व कालव्याकडील दोन टोंकांमध्यें ११०० यार्डांचें अंतर ठेविलें आहे. या भिंती इतक्या उंच व मजबूत बांधिल्या आहेत कीं, वादळामुळें समुद्राच्या लाटांचा केवढाही कल्होळ चालला असला तरी जें जहाज पहिल्या तोंडांतून बंदरांत शिरतें त्याला पुढें कशाचीही भीति रहात नाहीं! या कृत्रिम बंदरास **पोर्ट सय्यद** असें नांव ठेविलें आहे. हें बंदर तयार झाल्यावर पुढें अशी काळजी पडली कीं, कालव्याच्या कामावर जें लाखपन्नासहजार मनुष्य लावावयाचें त्याच्या पिण्याच्या पाण्याची काय सोय करावी! जागोजाग विहिरी खणाव्या तर जिकडेतिकडे वाळू व खारें पाणी! ही अडचण दूर करण्यासाठीं **लेसेप्सनें नैल** नदीचा एक कालवा अगोदर बांधून आणून जिकडेतिकडे मुबलक गोडें पाणी करून सोडिलें, आणि कालवा खणण्याचें काम झपाट्यानें

चालू केलें! प्रथम बरेच दगड जहाजांतून आणून बसविले; पण पुढें अशा रीतीनें दगडांचा पुरवठा करणें अशक्य आहे, असें दिसल्याबरोबर लेसेप्स यानें एक विलक्षण तोड काढिली. त्यानें वाळूचे दगड करण्यास आरंभ केला! कालव्यासाठीं खणून काढलेली वाळू 'सिमिटांत' कालवून लांकडांच्या सांच्यांत भरून द्यायाची, व ती थोडी सुकली म्हणजे सांचे काढून घ्यावयाचे, आणि वाळूचे चिरे जागच्या जागीं वाळूं देऊन जेथल्या तेथें बसवून टाकावयाचे, असा क्रम सूरू झाला! हा वाळूचा एकेक दगड सुमारें २८ खंडी वजनाचा आहे! कांहीं काम झाल्यावर खेदिव साहेबांची लहर फिरल्यामुळें, त्यांनीं एकाएकीं आपले तीस हजार मजूर काढून नेले! या पोरकटपणाचा लेसेप्स याला फार संताप आला! पण बिचारा करतो काय? कांहीं विशेष अडचण आली कीं मेंदूस संकट घालावें म्हणजे तींतून पार पडण्याचा उपाय सुचतो, हें त्याला चांगलें कळून आलें होतें! खेदिवानें आपले लोक काढून नेल्याबद्दल त्यानें त्याला यत्किंचित् सुद्धां विषाद दाखविला नाहीं. पण मनांतल्या मनांत त्यानें असा बेत केला कीं, सढळ मजूरी देऊं करून जितके मजूर मिळतील तितके तर लावायाचेच; पण तसें करूनही जितके कमी पडतील तितक्यांच्या जागीं यंत्रांची योजना करावयाची! ही युक्ति सुचल्याबरोबर यंत्रें ओतण्यास काय उशीर? १९ पासून ७९ घोड्यांच्या सामर्थ्याचीं अनेक एंजिनें त्यानें तयार करविलीं, व त्यांकडून जमीन, वाळू व दगड खोदण्याचें, खोदलेली माती, वाळू व दगड वर उचलण्याचें, व वर उचलून आणलेली माती, व वाळू किनाऱ्यावर वाहून नेण्याचें काम तो झपाट्यानें करवूं लागला! या यंत्रांपैकीं वाळू वाहून नेण्यासाठीं जें सर्वांत मोठें एक यंत्र केलें होतें त्याला २ लक्ष रुपये खर्च आला होता! या यंत्राला ९ फूट रुंद व २ फूट खोल अशा आकृतीचा एक उघडा पन्हळ लावून दिला होता. ज्याप्रमाणें तारायंत्राची तार नदीच्या दोन किनाऱ्यांवर दोन भले मोठे खांब पुरून त्यांवर टाकून दिलेली असते, त्याप्रमाणें या पन्हळाचें एक तोंड एंजिनाच्या धक्क्यावर

व दुसरें कालव्याच्या किनाऱ्यावर टेंकविलें होतें ! मध्यंतरी त्याला बांक न यावा ह्मणून कालव्यांत नांगरलेलीं जहाजें उभीं करून त्यांत उभ्या केलेल्या लोखंडी खांबांचा त्याला खालून आधार दिला होता. वरतीं चढविलेली वाळू एंजिनास लागलेल्या पऱ्हळाच्या तोंडांत ओतली कीं पाण्याच्या जोरानें व पऱ्हळाच्या ढाळानें ती सहज किनाऱ्यावर जाऊन पडे ! या युक्तीमूळें स्वल्प खर्चांत पुष्कळ काम होऊं लागलें ! या यंत्रानें एका महिन्यांत किनाऱ्यावर आणून टाकलेल्या गाळाचा आणि मातीचा एक चौकोनाकृति ढीग केला असता तर तो १४०० यार्ड लांब, १४०० यार्ड रुंद, आणि १४०० यार्ड ओंढ ह्मणजे सुमारें पाऊण मैल उंच अशा बऱ्याच मोठ्या टेंकडीसारखा झाला असता! हें राक्षसी यंत्र व याच्याच तोडीचीं दुसरीं कांहीं यंत्रें, प्रतिवर्षीं कालव्याची दुरुस्ती करण्यासाठीं कालव्यापाशीं जशींचीं तशीं ठेविलीं आहेत.

या कालव्यास एकंदर १७,९१,८७,२९० रुपये लागले ! आणि बरोबर दहा वर्षांनीं म्हणजे १८६९ च्या आगस्ट महिन्याचे १९ वे तारखेस त्याची परिसमाप्ति झाली ! इ० स० १८६९ सालच्या नोवेंबर महिन्याच्या सतराव्या तारखेस व्यापाराचीं आणि प्रवाशांचीं गलबतें व आगबोटी कालव्यांत वावरूं लागल्या! १८७० सालीं या कालव्यांतून ४९१ जहाजें सुमारें ६ लक्ष खंडींचा माल घेऊन गेलीं. १८८१ सालांत जहाजांची संख्या २,७२७ झाली आणि त्यांतील जिनसांचें वजन सुमारें ७९ लक्ष खंडी भरलें ! तेव्हां या कालव्यामुळें व्यापारास किती उत्तेजन आलें आहे, याचा विचार आम्ही आमच्या वाचकांवरच सोंपवितों ! १८८१ सालीं जहाजांवरील जकातीचें एकंदर उत्पन्न २,२०,००,००० रुपये झालें ! १८८१ पासून आजपर्यंत सतरा कोटींच्या मूळ भांडवलावर दोन कोटी वीस लक्षांहूनही अधिक फायदा होत आहे; व कांहीं झालें तरी येथून पुढें बारा टक्क्यांची मित्ती पडण्याबद्दल कोणत्याही भागीदारास भीति बाळगण्याचें कारण उरलें नाहीं !

# नायगाराचा धबधबा.

आकर्षणशक्ति, उष्णता, तेज, आकार, व परिमाण यांचें प्राचंडय लक्षांत भरण्यास नभोमंडलांत कालोत्पत्तीपासून परिभ्रमण करणाऱ्या सूर्यबिंबाचें आणि तदवलंबी ग्रहमालेंतील मण्यांचें वर्णन वाचलें पाहिजे. त्यावरून मनुष्याच्या सामर्थ्याची, बुद्धीची, आणि कर्तृत्वाची क्षुद्रता सहज अंतःकरणांत उतरेल यांत संशय नाहीं. आकाशस्थ कोणत्याही गोलाचें अवलोकन व चिंतन केलें असतां, मनाची तशी वृत्ति झाल्याशिवाय रहाणार नाहीं. पण अशी लीनता उत्पन्न होण्यास नेहमीं खगोलाचाच आश्रय केला पाहिजे असें नाहीं. या आपल्या भूगोलावरही अशा अद्भुत सृष्ट वस्तु आहेत कीं, त्यांच्या साक्षात् अवलोकनानें किंवा चिंतनानें मनावर तसा परिणाम घडूं शकेल. **नायगाराचा धबधबा** तशा प्रकारची वस्तु आहे. अशा वस्तूंच्या प्रत्यक्ष अवलोकनापासून होणाऱ्या आनंदाचा एकदशांशही त्यांच्या वर्णनापासून होईल किंवा नाहीं, याची शंका आहे. तथापि ज्यांना अशा वस्तु पाहण्यास मिळण्याचा संभव नाहीं, अशांनीं त्यांच्या वर्णनांतच समाधान करून घेतलें पाहिजे, हें उघड आहे.

उत्तर अमेरिकेच्या उत्तरप्रदेशांत जो प्रसिद्ध कासारसमूह आहे, त्यांत **इरी** आणि **आंतेरिओ** अशीं दोन विशाळ सरोवरें आहेत. यांपैकीं पहिलें समुद्रपृष्ठभागापासून ५७३ फुटांच्या उंचीवर असून, **नायगारा** नदीचें जनकत्व त्याच्याकडे आहे. **नायगारा** नदी **इरी** सरोवरापासून उगम पावून, सुमारें ३३ मैल भूम्याक्रमण केल्यावर **आंतेरिओ** सरोवरास जाऊन मिळते. उगमापाशीं नायगाराचें पात्र सुमारें तीनचतुर्थांश मैल रुंद आहे. या स्थितींत दोन मैल प्रवास केल्यावर, ती दोन शाखांनीं **ग्रांड आयलंड** नांवाच्या बेटास प्रदक्षिणा करून झपाट्यानें पुढें निघते, व पुनः एकत्र झालेल्या पात्राचा संकोच करून मोठ्या वेगानें वाहूं लागते. **ग्रांड आयलंड** बारा मैल लांब व दोनपासून सात मैल रुंद आहे. या बेटापासून धबधब्याचें अंतर

सुमारें दीड मैल आहे, व तेवढ्यांत त्याला साठ फुटांचा उतार आहे. कड्यावरून खालीं पडूं लागण्यापूर्वी **अजाद्वीप** ( गोट आयलंड ) नांवाच्या सुमारें ४० फूट उंचीच्या व १००० फूट रुंदीच्या लहानशा बेटानें तिचे पुनः दोन भाग होतात. यांपैकीं **क्यानड्या**कडील भागाची रुंदी सुमारें २८००० फूट असून त्याला घोड्याच्या नालाचा आकार आला असल्यामुळें **हॉर्सशू** म्हणतात. अमेरिकेकडील भागाची रुंदी सुमारें १४००० फूट असून तो सरळ शाहे. यावरून कड्याच्या माथ्याशीं दिसण्यांत दोन धबधबे दिसतात, हें वाचकांच्या ध्यानांत येईलच. **क्यानड्याच्या** बाजूचा धबधबा १९० फूट खोल आहे, व अमेरिकेच्या बाजूचा १६४ फूट आहे. प्रत्येक मिनिटास या ठिकाणीं पाण्याच्या १,८०,००,००० घनफुटांचा अधःपात होत असावा, व त्याचें वजन सुमारें २९,००,००० खंडी असावें, असा दीर्घोद्योगी गणितज्ञांचा अजमास आहे ! कड्यावरून खालीं उतरल्याबरोबर पात्राची रुंदी अगदीं संकुचित होऊन, तें १००० फुटांच्या रुंदीच्या खोल दरींतून वाहूं लागतें. धबधब्यापासून सात मैलांच्या आंत या दरीची रुंदी ७९० पासून १२०० फुटांपर्यंत आहे व हिच्या किनाऱ्याची उंची २०० पासून ३९० फूट आहे. पाण्याच्या घर्षणामुळें दरीचें तोंड नित्य थोडथोडें घांसून जात असल्याकारणानें, तें प्रतिवर्षी मागें हटत चालल्याचीं चिन्हें कांहीं ठिकाणीं स्पष्ट दिसतात. १८४१ पासून तें सुमारें १०० फूट मागें सरलें आहे. या दरीमुखावरून कित्येकांनीं असें काढलें आहे कीं, ही नदी कमींत कमी १० लक्ष वर्षें वहात असावी ! धबधब्याच्या तळा-जवळचा दगड वरच्या दगडापेक्षां मोखर असल्यामुळें पाण्याच्या आघातानें तो घांसून जाऊन त्यांत मोठमोठीं वायुविवरें ( caves of winds ) झालीं आहेत. धबधब्यापासून २९० यार्डांवर पादचारी लोकांसाठीं १८६९ त बांधलेला एक झुलता पूल आहे. हा १२६८ फूट लांब व पाण्यापासून १९० फूट उंच आहे. याशिवाय सुमारें दीड मैलाच्या अंतरावर दुसरे दोन आगगाडीचे झुलते पूल आहेत. त्यांपैकीं पहिला १८९९ त बांधला व दुसरा

१८८३ त संपविण्यांत आला. पहिल्याची लांबी ८२१ फूट, रुंदी ४० फूट व पाण्यापासून उंची २४९ फूट असून, रेलवेच्या खालीं १८ फूट रुंदीचा माणसें व साध्या गाड्या जाण्याच्या सोईचा रस्ता केला आहे. दुसऱ्या पुलावर दोन आगगाड्या चालण्यासाठीं चार रेल घातले आहेत! तेव्हां आतां नदीच्या सामर्थ्याची विशेष तारीफ करावी कीं अमेरिकन लोकांच्या अकलेची आणि परिश्रमाची विशेष तारीफ करावी, अशी शंका उत्पन्न होते!

येणेंप्रमाणें या जगत्प्रसिद्ध धबधब्याची कच्ची हकीकत आहे. ती वाचून ज्यास जेवढी करमणूक होईल तेवढींत त्यानें संतोष मानून घेतला पाहिजे. पण ज्यास तो प्रत्यक्ष पहाण्याचा लाभ होतो त्यास त्याच्या दर्शनानें अत्यानंद होऊन कृतकृत्यता वाटते. इरी सरोवरापाशीं नायगारेची जी मंदगति आहे ती पाहून मनांत असा तर्क येतो कीं, माहेराहून सासरीं जाणें हिला अगदीं नकोसें असल्यामुळें ही अशी रेंगाळत आहे कीं काय कोण जाणे! पण हें तिचें रेंगाळणें फार वेळ टिकत नाहीं. थोड्या वेळांत पतिसमागमाच्या आनंदलहरी तिच्या हृदयांत येऊं लागून तिचें पाऊल वेगानें पुढें पडूं लागतें, व प्रत्येक पावलास पुढें जाण्याची तिची उत्कंठा अधिकच तीव्र होते. मनाच्या अशा स्थितींत असणाऱ्या स्त्रीस कोणीं अडथळा केला असतां तिचा क्षोभ होऊन ज्याप्रमाणें ती अडथळा करणारावर मोठ्या रागानें चवताळून जाते, त्याप्रमाणें अजाद्वीपाचा प्रतिरोध या उतावीळ झालेल्या चपलेस दुःसह होऊन ती क्रोधानें इतकी फणफणूं लागते कीं, तिचें तें भयानक स्वरूप पाहून व गर्जना ऐकून प्रेक्षकांच्या अंगावर कांटा उभा रहातो! अजाद्वीपास हिसडा देऊन जेव्हां ती दीडशें फूट उंचीच्या कड्याखालीं उडी घेते, तेव्हां तिला जे रागाचे कल्होळ येतात त्यामुळें दशदिशा भरून जाऊन आसमंतांतील इतर ध्वनि पंचत्वाप्रत पावल्यासारखे भासतात! क्रोधाग्नीनें सर्व उदकसंचय अत्यंत तप्त होऊन त्यास उसळ्या येत आहेत कीं काय, व त्यांतून स्फटिकासारख्या शुभ्र,

व हिऱ्यासारख्या तेजोमय, अंबुकणांच्या बाष्पांचे अनंत लोळ निघत आहेत कीं काय, असा भास होतो !

कित्येक विचित्र जिज्ञासूस या धबधब्याची शोभा तळाशीं कशी दिसत असेल, हें जाणण्याची उत्कंठा उत्पन्न होऊन क्यानड्याच्या बाजूनें ते साठसत्तर फूट उंचीच्या शिड्यांवरुन खालीं उतरतात, आणि काठाकाठानें कांहीं अंतर क्रमून ज्या ठिकाणीं धबधबा पडत असतो त्या ठिकाणीं येऊन ठेपतात. या ठिकाणीं उभें राहून वर पहाणाराच्या अंगीं असामान्य धैर्य असलें तरच त्याचा निभाव लागतो. कित्येकजण घेरी येऊन पडतात, व तेथूनच परत निघून जातात ! तथापि ज्यांचें धैर्य दगडासारखें असतें ते जिवावर उदार होऊन आपली उत्कट जिज्ञासा परिपूर्ण करण्यासाठीं, आपले जीव आपल्या वाटाड्यांच्या हवालीं करतात, आणि ते नेतील तिकडे जाण्यास सिद्ध होतात. हे वाटाडे तेथले कोळी असतात. यांना नित्यसहवासामुळें या धबधब्याच्या कांहीं भागांत होडी ढकलण्याची बिलकुल भीति वाटत नाहीं ! ते आपल्या उतारूंस होडींत बसवून घेऊन, थोड्या वेळांत धबधब्याच्या मागें घेऊन जातात, आणि वर ज्या वायुविवरांचा उल्लेख केला आहे त्यांत त्यांस नेऊन उतरतात. या ठिकाणीं वारा नसल्यामुळें श्वासोच्छ्वास करण्याची मुष्कील पडते; व कांहीं कारणांमुळें हवेंतील वारा एकदम पडला, तर कित्येक प्रवाशांचे जीव गुदमरून जाऊन त्यांवर तेथल्या तेथें देह ठेवण्याची पाळी येते ! अशा ठिकाणीं उभें राहून पुढें पडणाऱ्या प्रचंड वारिप्रपाताकडे पहात असतां व कर्णरंध्रांस भेदून जाणारा वारिनिर्घोष ऐकत असतां मनाची जी स्थिति होत असेल तिची वाचकांनींच कल्पना करावी ! अशा ठिकाणाहून जे सुरक्षितपणें परत येत असतील त्यांस मृत्युमुखांतून बाहेर पडल्यासारखें होऊन, आपला पुनर्जन्म झाला, असें वाटत असेल यांत कांहीं शंका नाहीं!

---

## शनी.

हा भूगोल सोडून जर आपण शनीवर गेलों तर येथें आपल्या मनाची जी स्थिति कधींच होत नाहीं ती तेथें होईल; कां तर शनी हा केवळ असामान्य ग्रह आहे. आम्हांपासून त्याचें अंतर १०,००,००,००० मैल आहे, व आमच्या पृथ्वीसारख्या ७३४ पृथिव्या एके ठिकाणीं कराव्या, तेव्हां त्याच्या विस्ताराची कल्पना होणार आहे! हा इतका मोठा आहे तरी आपल्या आंसाभोंवतीं इतक्या झपाट्यानें फिरत असतो कीं, त्याची दिनप्रदक्षिणा **दहा तासांत** संपते! शनीच्या विषुववृत्तापासून सुमारें २०,००० मैलांवर त्याला वेष्टणारीं चापटींशीं व चकाकणारीं तीन वळीं किंवा वेढीं आहेत. या वेढ्यांस चापटी असें ह्मटलें आहे, कारण यांची जाडी दहापांच मैलांहून अधिक असेल असें वाटत नाहीं! इंग्रजींत या त्रिविध चक्रमालेस किंवा प्रभामंडलांस **रिंग्ज** ह्मणजे आंगठ्या ह्मणतात. या आंगठ्यांचा व्यास १,६६,००० मैल आहे! या आंगठ्या स्थिर नाहींत. शनीच्या बिंबाबरोबर त्याही मोठ्या वेगानें परिभ्रमण करतात. या तीन विशाल प्रकाशपरिधींनींच शनीचा परिवार संपला असें नाहीं. आपणांस काय तो एकच चंद्र आहे. शनीच्या निरनिराळ्या भागांस निरनिराळ्या रात्रीं प्रकाशमय करणारे कमींत कमी आठ चंद्र आहेत! या आठ चंद्रांपैकीं जो शनीपासून अगदीं जवळ आहे तो त्याच्या मध्यापासून १,२०,००० मैलांवर आहे, व जो सर्वांत दूर आहे तो २२,९३,००० मैलांवर आहे. यावरून काय सिद्ध झालें कीं, कमींत कमी ४९ लक्ष मैलांचे व्यासाच्या वर्तुलांत जें कांहीं सांपडेल त्यास शनी आपल्या आकर्षणपाशानें बद्ध करून, आपल्या सभोंवतीं अनंत काळ घिरट्या घालण्यास लावतो!

भारतीय फलज्योतिष्यांनीं **गुरूस** ब्राह्मण व **शनीस** तेली, असें ह्मटलें आहे, यावरून जुन्या ज्योतिर्विदांपाशीं अलीकडील दुर्बिणीच्या भिंगांसारखी 'लहान वस्तु थोर' दिसवणारीं भिंगें

असावीं, असा तर्क होतो. कारण अलीकडील मोठ्याशा दुर्बि- णींतून गुरूकडे (Jupiter) पाहिलें असतां, त्याच्या बिंबावर तीन पदरी जानव्यासारखे तीन पट्टे दिसतात, व शनीवर (Saturn) तर तेजाचा सारखा घाणा चालला असावा, असें दिसतें! शनीवर इतकें तेज व त्याच्या भोंवतीं फिरणारे इतके चंद्र असून, त्याच्या दूरत्वामुळें तो तेल्यासारखा निस्तेज दिसतो, व मंदपणानें फिरतो, हें उघड आहे. **मिक्रोगेमस** नांवाचा कोणी एक प्रवासी शनी- वरून पृथ्वीवर उतरला, तेव्हां त्याला ती वारुळाप्रमाणें दिसली, अशी जी ख्रिस्ती पुराणांत गोष्ट आहे, तीवरून या दोन गोलांच्या आकारांचें प्रमाण ध्यानांत येतें. सूर्याभोंवतीं शनीच्या प्रदक्षिणेस तीस वर्षें लागतात, ह्मणजे आमच्यापेक्षां शनीवरील वर्ष तीसपट मोठें आहे, व त्याच मानानें तेथील ऋतुही मोठे आहेत. सात वर्षें चार महिनेपर्यंत पर्जन्यकाळ झाल्यावर, तितक्याच लांबीचा हिंवाळा येतो, व तो आटपल्यावर, सुमारें सव्वासात सव्वासात वर्षें वसंत आणि ग्रीष्म यांचा अंमल असतो. शनी कन्याराशीस आला असतां अतिशय पीडा देतो, अशी युरोपांतील अडाणी लोकांचीही समजूत आहे.

---

## गुरु अथवा बृहस्पति.

सूर्याला प्रदक्षिणा घालणाऱ्या बुधशुक्रादि ग्रहांची जी मालिका आहे त्यांत वरील विषयाचा जो नायक गुरु अथवा बृहस्पति हा स्थूल देहाच्या मानानें सर्वांत श्रेष्ठ आहे. कारण सूर्याशिवाय इतर सर्व ग्रहांचा एक गोळा करून त्याची ह्याच्याशीं तुलना केली तर हा २½ पटीनें त्या सर्वांच्या गोळ्यापेक्षां मोठा आहे, असें दिसून येईल. आमच्या पूर्वजांनींही याची स्तुति करतांना ह्मटलें आहे कीं:—

देवानां च ऋषीणां च गुरुं कांचनसंनिभम् ॥
बुद्धिभूतं त्रिलोकेशं तन्नमामि बृहस्पतिम् ॥

ह्यावरून त्यांनाही ह्याच्या मोठेपणाबद्दल कदाचित् कल्पना असावी असें वाटतें.

अलीकडे याजविषयीं अद्यापि सर्व जरी नाहींत तरी पुष्कळ शोध लागले आहेत. सूर्यापासून ह्याचें अंतर अजमासें ४७५६९२००० मैल आहे. म्हणजे आमची पृथ्वी व सूर्य यांजमध्यें जें अंतर आहे त्याच्या पांचपट ह्या दोहोंमध्यें आहे. गुरूमध्यें व सूर्यामध्यें निरनिराळ्या वेळीं निरनिराळें अंतर असतें. उदाहरणार्थ गुरु जेव्हां सूर्यापासून अतिदूर असतो त्यावेळीं हें अंतर ४९८६००००० मैल, व अतिजवळ असतो त्या वेळीं तें ४५२७४५००० मैल असतें. व ह्याच कारणामुळें सूर्यावरून किंवा पृथ्वीवरून हा ग्रह लहानमोठा दिसतो. बृहस्पतीला सूर्याभोंवतीं प्रदक्षिणा घालण्यास बारा वर्षें लागतात व हा दररोज ६८०००० मैल ह्मणजे एका तासास सुमारें २९००० मैल चालतो. आपण आपल्या भोंवतालचे हिमालयादि महान् महान् पर्वत किंवा पासिफिक महासागरासारखा महासमुद्र पाहिला ह्मणजे त्यांच्या विशालतेचें आपल्यास फारच आश्चर्य वाटतें. परंतु ज्या पृथ्वीवर असले महान् महान् पर्वत किंवा महासागर वाळूच्या मैदानांतील एका कणाप्रमाणें होऊन राहिले आहेत त्या पृथ्वीपेक्षां हा बृहस्पति १२३३ पटीनें मोठा आहे, असें जर आपल्याला कोणीं सांगितलें व सिद्ध करून दिलें, तर आपल्याला केवढा अचंबा वाटेल बरें? ह्याचा व्यास पृथ्वीच्या व्यासापेक्षां ११ पटीनें व चंद्राच्या व्यासापेक्षां ३३ पटीनें मोठा आहे, व ह्याच्या आकाराएवढा आकार होण्यास एक हजार चंद्र लागतील. ह्याची आकृति अंडाकृति असून ह्याच्या मध्यभागाच्या व्यासापेक्षा ध्रुवाजवळील व्यास २५०० मैल कमी आहे व ह्याच कारणामुळें हा ग्रह दोन्ही ध्रुवांकडे चापट झाला आहे. हे चापट भाग दुर्बिणींतून अगदीं स्पष्ट दिसतात.

पृथ्वीप्रमाणें बृहस्पतिही आपल्यासभोंवतीं फिरतो. पूर्वीं **बिअर मॅडलर** वगैरे ज्योतिषज्ञांनीं याच्यावर असलेल्या दोन काळ्या डागांचें कांहीं एक काळामध्यें जें स्थित्यंतर काढिलें होतें त्याजवरून हा ग्रह आपल्या सभोंवतीं फिरतो असें सिद्ध केलें. ह्याला आपल्या सभोंवतीं फिरण्यास ९ तास, ५५ मिनिटें, व २६ सेकंद लागतात. ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, ह्याच्या

मध्यरेषेवर असलेला बिंदु दर सेकंदास आठ मैलप्रमाणें चालतो—म्हणजे पृथ्वीच्या मध्यरेषेवर असलेल्या बिंदूपेक्षां तो २७ पटीनें अधिक चालतो.

ह्याची प्रदक्षिणा पुरी होण्यास बारा वर्षें लागतात हें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां ह्याच्या ध्रुवाजवळ सहा वर्षें दिवस व सहा वर्षें रात्र असते हें उघडच आहे. ह्याच्या ऋतूंमध्यें विशेषसा फरक होत नाहीं. मध्यरेषेजवळच्या प्रदेशांत सर्वदा पावसाळा असतो, समशीतोष्ण कटिबंधांत नेहमीं वसंत ऋतु व ध्रुवांजवळ सदैव हिंवाळा असतो. ह्या प्रदेशांतील हवेसंबंधानें अद्यापि विशेषसे शोध लागले नाहींत. सूर्यापासून हा ग्रह फारच लांब असल्यामुळें त्याला सूर्यापासून जी उष्णता व उजेड मिळतो तो फारच कमी आहे. परंतु ही उणीव त्याच्या अतिदाट वातावरणामुळें व तो ज्या द्रव्यांनीं झालेला आहे त्यांच्या प्रकाशजनकत्वामुळें भरून काढली जाते असें कांहीं लोकांचें ह्मणणें आहे. परंतु ह्यासंबंधानें फारसे शोध अद्यापि लागले नाहींत. ह्याच्याकडे बारकाईनें पाहिलें असतां ह्याच्या उत्तर व दक्षिण बाजूंस निरनिराळ्या रंगांचे पट्टे दिसतात, व मध्यें उष्ण कटिबंध स्वच्छ दिसतो. ह्याच्या ध्रुवांजवळ प्रकाश अगदीं अंधक दिसतो. ह्या पट्टयांचा आकार निरनिराळ्या वेळीं निरनिराळा दिसतो व कधीं कधीं तर एकादा पट्टा कांहीं काळपर्यंत मुळींच दिसेनासा होतो. १८३४-३९ मध्यें ह्याच्या मोठ्या दोन पट्टयांपैकीं एक पट्टा दिसेनासा झाला होता. ह्यावरून असे चमत्कार होण्यास वातावरणच कारण असावें असें वाटतें. आमच्या पृथ्वीवरील ट्रेडविंड्स प्रमाणें ह्याच्या मध्यभागीं हवेचे एकसारखे प्रवाह चालले आहेत. फरक एवढाच कीं, याची गति मात्र ट्रेडविंड्सच्या उलट असते. पृथ्वीपेक्षां हा ग्रह वजनानें ३०१ पट अधिक आहे व याचा आकार किंवा देह पृथ्वीपेक्षां १२३३ पट मोठा आहे असें पूर्वीं सांगितलेंच आहे. यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, याजवरील द्रव्यें पृथ्वीवरील द्रव्यांपेक्षां चतुर्थांशाहूनही कमी दाट आहेत. ह्या गोष्टी मनांत आणल्या असतां अद्यापि ह्याजवरील द्रव्यें प्रवाहा-

वस्थेंतच आहेत कीं काय असा प्रश्न सहज उत्पन्न होतो. परंतु ह्यासंबंधानें अद्यापि विश्वसनीय शोध कांहींच लागला नाहीं.

बृहस्पतीवरील सर्वांत रमणीय असा देखावा ह्मटला ह्मणजे त्याजवरील चंद्रांचा होय. हे चंद्र चार आहेत. व ते लहानशा दुर्बिणींतूनही स्पष्ट दिसतात. कधीं कधीं ते दोनदोन तीनतीनही एकाच वेळीं दिसतात. व कधीं कधीं असेंही होतें कीं, चारही मुळींच दिसत नाहींत. हा देखावा १८४३ मध्यें दृष्टीस पडला होता. हे उपग्रह अथवा चंद्र आपापल्या अंतराच्या मानानें खालीं दिल्याप्रमाणें बृहस्पतीला प्रदक्षिणा घालतात.

| | दिवस. | तास. | मिनिटें. |
|---|---|---|---|
| [ १ ] | .... १ | १८ | २८ |
| [ २ ] | .... ३ | १३ | ४३ |
| [ ३ ] | .... ७ | ३ | ४३ |
| [ ४ ] | ... १६ | १६ | ३२ |

ह्यांपैकीं पहिल्या दोन चंद्रांचे भ्रमणमार्ग बहुतेक वर्तुलाकृति असून दुसऱ्या दोहोंचे पसरट आहेत; व हे सर्व मिळून जितक्या जागेंतून भ्रमण करीत आहेत त्या जागेचा व्यास २३०००० मैल आहे. ह्या चार उपग्रहांपैकीं पहिल्या तीन चंद्रांस वरचेवर ग्रहणें लागतात, व चवथ्यालाही तें कधीं कधीं लागतें. पहिल्या चंद्रास गुरूवरील प्रत्येक चार दिवसांनीं, दुसऱ्यास ८½ दिवसांनीं, व तिसऱ्यास १७⅓ दिवसांनीं ग्रहण लागतें. भ्रमण करीत असतांना ते सूर्य व गुरूमध्यें येऊन गुरूवर सूर्यग्रहणें करितात. ह्या चार चंद्रांचे व्यास पुढें दिल्याप्रमाणें आहेत. ( १ ) २३५२; ( २ ) २०९९; ( ३ ) ३४३६; ( ४ ) २९२९ मैल. ह्यांपैकीं सर्वांत मोठा चंद्र बुधापेक्षां मोठा आहे. हे तेजानेंच केवळ भिन्न आहेत असें नव्हे, परंतु रंगानेंही भिन्न आहेत. पहिल्याचा व दुसऱ्याचा रंग निळा आहे. तिसऱ्याचा पिंवळा व चवथ्याचा तांबूस आहे.

# धूमकेतु.

या अनंत अंतरिक्षमंडळांत धूमकेतु केवळ स्वेच्छाचारी आहेत. जोतिःशास्त्राचे नियम व नलिकायंत्राचे वेध यांस न जुमानून एकादी स्वारी अकस्मात् आकाशांत प्रकट होऊन व आपलें पुच्छ पिंजारून थेट सूर्याचें दर्शन घेते, व बेधडक पुनः परत संचार करीत अंतर्धान पावते. अशा स्वारीचें काम नेहमीं तारांगणांत नक्षत्रापासून नक्षत्रापर्यंत भ्रमण करणें हेंच होय. धूमकेतूंची संख्या अत्यंत आहे असें महान् जोतिःशास्त्रज्ञ ह्मणतात. या अगाध व प्रचंड नभोजलधींत धूमपुच्छाचे असंख्य मत्स्य आहेत. त्यांपैकीं कांहीं आपण पाहतों, याचें कारण ते स्वेच्छेनें क्रीडा करीत असतां आपल्या प्रबळ सूर्यधीवराच्या आकर्षणसूत्रानें सूर्य-मालिकेंत ओढिले जातात. यांपैकीं बहुतेक पृथ्वी, गुरु, शनि इत्यादि धीवरबालकांच्या ओढाताणीनें निसटून जातात, व पुनः तोंड दाखवीत नाहींत. कांहीं पिलें सांपडतात तीं सर्वदा सूर्यमा-लिकेंत जखडलीं जातात.

सूर्यमालिकेंतील धूमकेतु अतिदीर्घ वर्तुळांत फिरतात, व त्यांचे सूर्याभोंवतीं प्रदक्षिणेचे काल भिन्न भिन्न आहेत. हॅलेचा प्रचंड धूमकेतु ७६ वर्षांत एक प्रदक्षिणा करितो. याची कक्षा सूर्य व शुक्र यांजमधून जाते. सूर्यापासून अत्यंत अंतरावर हा धूमकेतु असतांना सूर्याचा जो उजेड व उष्णता यांजवर पडते, त्यांच्या ३००० पट उजेड व उष्णता हा अत्यंत समीप असतांना यांजवर पडते. यावरून त्यांजवरील पदार्थांत किती व कसा फेरबदल होतो हें समजेल. इ० स० १६८० त एक धूमकेतु अगदीं सूर्या-जवळून गेला. त्यावेळीं त्याची उष्णता तापलेल्या लाल लोखंडाच्या २००० पट असावी असा न्यूटन साहेबांचा अंदाज आहे. याची प्रदक्षिणा ८८१४ वर्षांनीं एकदा होते. पण याहीपेक्षां दीर्घ-कालाच्या प्रदक्षिणा करणारे धूमकेतु आहेत. इ० स० १८४४ तल्या धूतकेतूच्या प्रदक्षिणेचा काल १०००० वर्षें आहे. तेव्हां हा धूमकेतु इसवी सन १०१८४४ या वर्षी दिसेल! साधारण

मध्यावर याची गति पृथ्वीच्या ४००० पट आहे ! पण १६८० तल्या धूमकेतूची गति सूर्येतर बिंदूजवळ सारी एका सेकंडास ९ फूटच आहे !

या विलक्षण व्योमसंचाऱ्यांबद्दल ज्योतिःशास्त्रास फारच थोडें ज्ञान आहे. विस्तीर्ण धूमकेतूचें पुच्छ ह्मणजे एक अत्यंत दीर्घ लहान लहान ग्रहांचा लोट, किंवा हायड्रोजन व कार्बानचा प्रचंड ढग असावा, आणि डोक्यांतील चकचकीत लहान बिंदु हा सोडियम, लोखंड वगैरेंचा प्रज्वलित लाल गोळा असावा, असें ह्मणतात.

धूमकेतूंच्या डोक्यांतील पदार्थांची सूर्याच्या भयंकर उष्णतेनें वाफ होऊन, ती सूर्यापासून उलट दिशेस एकसारखी पसरत असते. प्रथम वाफ सूर्याकडे जाते. तेथून विद्युच्छक्तीनें प्रतिसारण होतें. याप्रमाणें एकसारखें कित्येक युगें चालत असल्यामुळें, जितके वेळ धूतकेतु सूर्याजवळ येईल तितके वेळ प्रतिसारणास जोर मिळून धूमकेतु निःशक्त होत जातो, व त्याची शेपटी विदीर्ण होऊन अगदीं सूक्ष्म होत जाते. यामुळेंच हॅलेच्या धूमकेतूची शेपटी लहान लहान दिसत आली आहे, व यामुळेंच नेहमीं व जलद फिरणाऱ्या धूमकेतूची शेपटी आहे कीं नाहीं अशी दिसते. ३½ वर्षांत प्रदक्षिणा करणाऱ्या धूमकेतूची तर शेपटी अत्यंत सूक्ष्म असते. यावरून असा सिद्धांत निघतो कीं, धूमकेतु हे मूळचे आपल्या सूर्यमालिकेंतील नव्हत, तर ग्रहांच्या आकर्षणशक्तीनें बळेंच ओढिलेले आहेत. आणि याप्रमाणें आणखी किती येतील याचा नियम नाहीं. कारण जर हॅलेचा धूमकेतु फार पूर्वीपासून असता तर केव्हांच निःशक्त होऊन दिसेनासा झाला असता.

आपण सूर्य, चंद्र, गुरु, शुक्र, शनि वगैरेंचें वजन करून गणितानें तुलना करूं. परंतु धुमकेतूविषयीं कांहीं पक्कें समजत नाहीं.

धूमकेतूची स्वारी जर पृथ्वीजवळ आली, आणि जर का दोहोंची धडक झाली, तर आपली काय अवस्था होईल, हा धाक आतां फारसा वाटत नाहीं. कारण एक दोन वेळ पृथ्वी या विलक्षण व्योमसंचाऱ्यांच्या बहुतेक जवळून गेली व कांहीं झालें नाहीं. पण

कित्येक असें म्हणतात कीं, ही भीति अगदीं व्यर्थ आहे असें नाहीं. दोघांच्या टक्करींत धूमकेतूचा तर निःसंशय चुराडा होईल. पण पृथ्वीवर अत्यंत प्रज्वलित पदार्थ पडल्यानें, सर्व—किंबहुना बहुतेक—प्राणी नष्ट होतील. इ० स० १८१२ त पुष्कळ लोक भयभीत झाले होते, व १८६१ त पृथ्वी धूमकेतूच्या शेंपटींत घोंटाळल्यानें कांहीं यंत्रें व घड्याळें बंद पडलीं होतीं !

छत्रपति शिवाजीचे मरणसमयीं जो भयंकर धूमकेतु दिसत होता, त्याची प्रदक्षिणा ५७५ वर्षांनीं होते. हा धूमकेतु इ० स० २२५५ त पुनः दिसेल.

---

# यूरेनस व नेपच्यून.

## यूरेनस.

मागें आम्हीं सूर्याशिवाय इतर सर्व ग्रहांमध्यें जो श्रेष्ठ गुरु अथवा बृहस्पति त्यासंबंधानें माहिती सांगितली; तसेंच सूर्यकवच, धूमकेतु वगैरेंचीही आमच्या वाचकांस ओळख करून दिली आहे. खेरीज एके ठिकाणीं शनीविषयींही कांहीं माहिती दिली आहे. या स्थळीं या शंभर सव्वाशें वर्षांत शोध लागलेल्या यूरेनस व नेपच्यून या ग्रहांची हकीकत देणार आहों.

इ० स० १७८१ च्या मार्च महिन्याच्या तेराव्या तारखेस रात्रीं दहा अकरा वाजण्याचे सुमारास प्रसिद्ध ज्योतिषी डा० हर्शेल हे आपल्या दुर्बिणींतून मिथुन राशींतील नक्षत्रें पहात असताना त्यांना एक तारा दिसला व त्याजकडे त्याचें लक्ष लागलें. कांहीं वेळ त्याजकडे पाहिल्यानंतर त्यांना तो एक धूमकेतु असावा असें वाटलें. परंतु त्या संबंधानें त्यांनीं पूर्ण विचार केल्यानंतर तो एक ग्रह आहे असा सिद्धांत ठरविला. यूरेनस हा ग्रहमालेंत सहाव्या प्रतीचा ग्रह आहे. परंतु तो अतिशय दूर असल्यामुळें आपल्याला नेहमींच दिसतो असें नाहीं. कधीं कधीं मात्र दिसतो. परंतु दुर्बिणींतून त्याचें कवच स्पष्ट दिसून त्याच्या व्यासासंबंधानें वगैरे कांहीं सिद्धांत ठरवितां

येतात.त्याच्या प्रदक्षिणामार्गाचा आकार केवळ वर्तुलाकार नसून इतर ग्रहांप्रमाणेंच अंडाकृति आहे. ह्यामुळें सूर्यापासून ह्याचें अंतर कधीं कधीं १६७२२००००० व कधीं कधीं १८१९९००००० मैल असतें— ह्मणजे सरासरीनें पाहतां हा ग्रह सूर्यापासून १७९३८६९००० मैल आहे. आपली पृथ्वी व हा ग्रह ज्या वेळीं सूर्याच्या एकाच बाजूला असतात त्या वेळीं त्यांजमध्यें १,६६,२०,००००० मैल व एक एका बाजूस व दुसरा दुसऱ्या बाजूस असतो त्या वेळीं त्यांजमध्यें १,८४,९०,००००० मैल अंतर असतें. पृथ्वीपेक्षां हा ७४ पटीनें मोठा असून ह्याचा व्यास ३२२९० मैल आहे. डा० हर्शेल व माड्लर यांचें म्हणणें असें आहे कीं, हा आपल्या ध्रुवांकडे चापट झालेला आहे; परंतु हल्लींच्या ज्योतिषांस ह्या संबंधानें लागावे तसे शोध अद्यापि लागले नाहींत.

गुरु व शनि ह्यांची जशी एक छोटीशी उपग्रहमाला आहे तशीच ह्याचीही एक आहे. ह्या उपग्रहमालेंत कोणाच्या ह्मणण्याप्रमाणें आठ व कोणाच्या ह्मणण्याप्रमाणें चार चंद्र आहेत. हे आपल्या चंद्राप्रमाणें मुख्य ग्रहांभोंवती फिरत असून त्यांतील अगदीं जवळच्या चंद्राची दोन दिवसांत, व अगदीं दूरच्याची १०८ दिवसांत प्रदक्षिणा होते. यूरेनस सूर्यापासून फारच लांब असल्यामुळें आमच्या पृथ्वीवर जसा सूर्याचा उजेड पडतो तसा त्याजवर पडत नाहीं. यूरेनसवरून सूर्याकडे पाहिलें असतां सूर्य अगदीं लहान दिसतो; ह्मणजे आमच्या पृथ्वीवरून जेवढा मोठा दिसतो त्याच्यापेक्षां या ग्रहावरून तो ३७० पटीनें कमी दिसतो. साराश, आम्हीं रात्रीं आकाशाकडे पाहिलें असतां जसें आह्मांला एकादें नक्षत्र दिसावें त्याचप्रमाणें यूरेनसवरच्या लोकांना ( जर कदाचित् तेथें लोक असले तर. व त्याच्या शारीरिक स्थितीच्या मानानें पहातां तेथें नसावेत असेंच वाटतें, ) सूर्य दिसतो. सूर्यापासून त्याला उष्णताही आपल्या पृथ्वीपेक्षां ३७० पटीनें कमी मिळते. सर्व सूर्यमालेंत न आढळ- णारी अशी एक विशेष गोष्ट ह्याच्या चंद्रांसंबंधानें ही आहे कीं, ह्या सर्वांची गति आमच्या चंद्राच्या व ग्रहांच्या गतींच्या अगदीं

उलट आहे. ह्यांतील अगदीं जवळचा चंद्र मुख्य ग्रहापासून १२३००० मैल ( आमच्या चंद्राच्या सुमारें अर्ध्या अन्तरावर ) व अगदीं लांबचा ३०००० मैल दूर आहे. ह्याचे चार चंद्र जे स्पष्ट दिसतात त्यांतील अगदीं जवळच्या दोहोंचा शोध डा० लॅसेल ह्यांनीं व बाकीच्या दोहोंचा डा० हर्शेल यांनीं लाविला. ह्या दूरच्या चंद्राच्या प्रकाशावरून, व इतर ग्रहांचे जे चंद्र आहेत ते जसे आपल्याभोंवतीं फिरतात त्यावरून, हेही फिरत असतील, असें अनुमान केलें आहे. परंतु ह्याला खात्रीलायक पुरावा अद्यापि कांहींच मिळाला नाहीं; व गुरूच्या चंद्रांचीं जशीं ग्रहणें होतात तशीं ह्यांचीं जरी अद्यापि कोणीं पाहिलीं नाहींत तरी तीं होतात यांत कांहीं एक संशय नाहीं; आणि आमच्या चंद्राप्रमाणें यांचीही कलावृद्धि व कलाहानि होत असेल असें अनुमान आहे.

यूरेनसच्या शारीरिक स्थितीसंबंधानेंही अद्यापि कांहीं विशेष शोध लागले नाहींत. पृथ्वीपेक्षां हा वजनानें पंधरापट अधिक आहे. पृथ्वीचीं द्रव्यें ह्याच्या द्रव्यापेक्षां सहापट अधिक दाट आहेत. ह्मणजे ह्यावरील द्रव्यांची स्थिति बहुतेक बर्फासारखीच आहे, व ह्याची गुरुत्वाकर्षणशक्ति पृथ्वीच्या $\frac{९}{१०}$ आहे.

---

## नेप्च्यून.

हा सूर्यमालेंतील अगदीं शेवटचा ग्रह आहे. इतर ग्रहांप्रमाणें हा नुसत्या डोळ्यांनीं कधींच दिसत नाहीं. ह्याचें कारण तो अतिशय लांब आहे हेंच होय. सूर्यापासून हा २,७४,९९,९८,००० मैल अंतरावर आहे. ह्याच्या प्रदक्षिणेचा मार्ग बहुतेक वर्तुलाकृतिच आहे. ह्यासंबंधानें अद्यापि विशेष शोध कांहींच लागले नाहींत. ह्याची सूर्याभोंवतीं प्रदक्षिणा होण्यास सुमारें १६९ वर्षें लागतात.

यूरेनसच्या संबंधानें कांहीं सिद्धांत ठरवितांना ज्योतिषशास्त्रवेत्त्यांना ज्या कांहीं शंका आल्या त्यांवरून ह्याच्या ( यूरेनसच्या ) पलीकडे कोणी तरी ग्रह असला पाहिजे असें त्यांस

वाटलें. परंतु १८४६ पर्यंत त्याचा कांहीं एक पत्ता लागला नाहीं. त्यावर्षी प्रोफेसर ॲडॅम्स व एक लीव्हारिअर नांवाचा फ्रेंच ज्योतिषी ह्यांनीं हा ग्रह शोधून काढिला. ह्मणजे ह्याच्या प्रदक्षिणेचा $\frac{1}{3}$ भाग देखील अद्यापि संपला नाहीं. हा फार लांब असल्याकारणानें दिसण्यांत अगदीं हळू चालतो असें वाटतें. परंतु खरी गोष्ट तशी नसून तो दर तासास १२००० मैल चालतो. इतर ग्रहांप्रमाणें हाही पृथ्वीपासून लहानमोठा दिसतो. हा अति-दूर असतो त्यावेळीं २,८३,७५००००० मैल, व ज्यावेळीं अगदीं जवळ असतो त्या वेळीं २६,०४,५००००० मैल असतो. दुर्बि-णींतून ह्याच्याकडे पाहिलें असतां सूर्यमालेंत हा आठव्या प्रतीचा ग्रह दिसतो. परंतु वास्तविक पहातां हा तिसऱ्या प्रतीचा ग्रह आहे असें ह्मणतात. ह्याचा व्यास ३७००० मैल आहे, व ह्याचा आकार पृथ्वीच्या आकारापेक्षां १०५ पटीनें अधिक आहे. ह्या ग्रहाला सूर्यापासून जी उष्णता मिळते ती आमच्या पृथ्वीला मिळते त्यापेक्षां एक हजारपटीनें कमी आहे. ह्याच्या वाताव-रणासंबंधानें वगैरे अद्यापि कांहींच शोध लागले नाहींत.

इतर कांहीं ग्रहांना जसे उपग्रह आहेत तसा ह्यालाही एक उपग्रह मुख्य ग्रहापासून आमच्या चंद्राइतकाच ह्मणजे सुमारें २२०००० मैल लांब आहे. तो नेपच्यूनभोंवतीं सुमारें सहा दिवसांत प्रदक्षिणा घालतो. नेपच्यूनवरील द्रव्यें समुद्राच्या पाण्या-पेक्षां थोडीं अधिक दाट आहेत. ह्याची गुरुत्वाकर्षणशक्ति शनि व यूरेनस ह्यांच्या इतकीच बहुतेक आहे. हा आपल्याभोंवतीं फिरतो कीं नाहीं ह्याचा अद्यापि शोध लागला नाहीं.

---

## कडक थंडीचे अद्भुत चमत्कार.

आपल्या देशांत सर्वत्र उष्ण हवा असल्यामुळें, अतिशय थंडीनें होणारे चमत्कार आपल्या दृष्टीस पडत नाहींत. ते पहावयाचे असल्यास आपणास हिमालयपर्वतावर संचार केला पाहिजे. पण तसें करण्याचीं साधनें फारच थोड्यांस अनुकूल

असतात. सबब, ज्या शेंकडों जिज्ञासु लोकांस तीं कधींच प्राप्त होण्याचा संभव नाहीं, त्यांनीं आपल्या प्रांतांत क्वचित् प्रसंगीं दिसून येणाऱ्या गोष्टींचें लक्षपूर्वक अवलोकन करून, त्यांच्या साहाय्यानें तत्तुल्य इतर गोष्टींची कल्पना केली पाहिजे.

पावसाळ्याच्या आरंभास कधीं कधीं गारा पडतांना आपण पाहिल्या आहेत. या गारा कांहीं वेळ जमिनीवर राहिल्या ह्मणजे त्या वितळून जाऊन त्यांचें पाणी होतें. त्या वरून खालीं पडतात, येवढें मात्र आमच्या दृष्टीस पडतें. पण त्या वर कशा होतात, हें आह्मांपैकीं पुष्कळांस नीट ठाऊक असण्याचा संभव नाहीं. तसेंच त्या पावसाळ्याच्या आरंभासच कां पडतात, या प्रश्नाचें तरी यथास्थित उत्तर कितीजण देऊं शकतील ? तथापि नित्याच्या अनुभवावरून सर्वांस ही गोष्ट कबूल केली पाहिजे कीं, पाण्यास बरीच उष्णता लाविल्यानें त्यास उकळी फुटून अखेर त्याची वाफ होते, तसेंच याच वाफेस थंडी लाविली असतां तिचें पाणी होतें. गार स्लेट पाटीवर तोंडांतली वाफ सोडिली असतां एक प्रकारचें दंव जमतें, हें सर्वांनीं पाहिलेंच असेल. तसेंच आजारी मनुष्यासाठीं तापविलेल्या पाण्यावर, किंवा थालिपिठाच्या पातेल्यावर थंड भांडें ठेविलें असतां त्याचें बूड ओलें होतें, हेंही सर्वांच्या पहाण्यांत आहे. यावरून काय झालें कीं, पाण्याच्या उष्ण वाफेचा थंडीशीं संयोग झाला असतां, तिचें फिरून पाणी होतें. याच पाण्यास आणखी थंडी लाविली तर त्याचें बर्फ होतें. हें म्हणणें आमच्या लोकांस सहसा कळावयाचें नाहीं. प्रथम अशी शंका येणार कीं, ही फाजील थंडी आणावी कोठून ! लांकडें पेटविलीं असतां हवी तितकी उष्णता उत्पन्न करतां येते; पण थंडी कशी उत्पन्न करावी ! ही थंडी कशी उत्पन्न करतात, हें ज्यांस पहावयाचें असेल, त्यांनीं कृत्रिम बर्फ करण्याचा एकादा कारखाना जाऊन पहावा. उन्हाळ्यांत आपण बाजारांतून जें बर्फ विकत आणतों, तें येथल्या येथें पाण्यास थंडी लावून केलेलें असतें. बर्फ हें किती थंड असतें, याचा पुष्कळांना अनुभव असेलच. पण बर्फापेक्षांही विशेष थंड असें मिश्रण आपणांस मिठाच्या

साहाय्यानें करतां येतें. **ऐसक्रीम** पुष्कळांनीं चाखलें असेल. एकदा आह्मीं एका गृहस्थास असें विचारलें कीं, **ऐसक्रीम** कसें करतात, हें तुला ठाऊक आहे काय? त्यावर त्यानें उत्तर दिलें कीं, 'त्यांत हो काय? बर्फाचे तुकडे, दूध, आणि साखर हीं एके ठिकाणीं केलीं कीं **ऐसक्रीम** तयार होतें!' आणखी एका प्रसंगीं आमच्या पहाण्यांत एक गोष्ट आली ती तर याहूनही मौजेची असल्यामुळें, ती येथें थोडक्यांत सांगितल्यावांचून रहावत नाहीं. आमच्या एका मित्राच्या घरीं गेल्या उन्हाळ्यांत कांहीं सुशिक्षित व ठळक मंडळी संध्याकाळीं फराळास बोलाविली होती. पुण्यांत फार न दृष्टीस पडणारी, व वसंत ऋतूंत अत्यंत आल्हादकारक अशी कांहीं चीज मंडळीच्या सेवनास सादर करतां यावी, म्हणून **ऐसक्रीम** करण्याचें यंत्र आणवून त्यांत तें घरच्या घरीं करविण्याचें ठरविलें होतें. फराळ झाल्यावर मंडळी आराम करीत गच्चीवर बसली असतां, **ऐसक्रीमचें** यंत्र मालकानें मंडळींत आणून ठेविलें. दुर्दैवानें यंत्राच्या पंचपात्रास एक लहानसें भोंक होतें, व त्यांतून थोडथोडा स्राव होत होता. मंडळींपैकीं एका जिज्ञासु गृहस्थास काय उत्कंठा झाली कोण जाणे, त्यानें आपलें एक बोट त्या पंचपात्रांतून पडणाऱ्या द्रवांत बुडवून तोंडांत घातलें, आणि तें वेडेंवांकडें केलें! त्यावर मालकानें असें विचारलें कीं, 'कांहो, तोंड असें वेडेंवांकडें कां केलेंत?' त्यावर चाखणारा गृहस्थ प्रत्युत्तर करतो, 'मी मुंबईंत **ऐसक्रीम** घेत असे तें गोड लागे; तुमच्या येथलें असें खारट कां लागतें बरें?' यावर आमच्या विनोदी मित्रानें असें उत्तर केलें कीं, 'थोडा वेळ थांबा, तें अजून पुरतें थिजलें नाहीं; चांगलें थिजलें म्हणजे गोड लागूं लागेल!' तात्पर्य काय कीं, थंडीनें घडून येणाऱ्या ज्या गोष्टी येथें सहजगत्या दिसण्यासारख्या नाहींत, त्या ग्राज्वेटांस सुद्धां नीट समजून घेतल्याशिवाय लक्षांत येण्यासारख्या नाहींत! एक शेर बर्फाच्या चुरांत अर्धा शेर मीठ घातलें, तर तें मिश्रण बर्फापेक्षां फारच थंड होतें. असें मिश्रण एकाद्या लांकडी पंचपात्रांत घालून त्यांत साखर मिसळलेल्या दुधाचें भांडें ठेविलें, म्हणजे

तें दूध थिजून त्याचें **ऐसक्रीम** बनतें. दुधाच्या भोंवतालचें मिश्रण पराकाष्ठेचें थंड असल्यामुळें, दूधांतील उष्णता त्याला लागून, त्याचें खारट पाणी होतें. पण इकडे दुधांतील उष्णता नाहींशी झाल्यामुळें, ह्मणजे त्या मिश्रणाची थंडी त्यास लागल्यामुळें, तें सांखळून जाऊन त्याचें द्रवत्व नाहींसें होतें, व त्याच्या अंगीं जडत्व येतें. तेव्हां पाण्यास थंडी लाविल्यानें त्याचें प्रवाहित्व नष्ट होऊन त्याला घनत्व येतें, व उष्णतां लाविल्यानें वाफ होते, ह्मणजे त्याला वायुरूपता येते, हें सिद्ध आहे. व याच रीतीनें, ह्मणजे कमीअधिक थंडी व उष्णता आणि दाब यांच्या मदतीनें पाहिजे त्या पदार्थास या तीन स्थितींपैकीं पाहिजे ती स्थिति आणितां येईल, असें शास्त्रज्ञांचें ह्मणणें आहे. आणि बहुतेक पदार्थांस त्यांनीं त्या तीनही स्थिति आणून दाखविल्या आहेत.

आतां नैसर्गिक थंडीपासून होणारीं कांहीं अद्भुत कार्यें सांगून हा लेख पुरा करतों. **बेंजामिन फ्रांकलिनचें** नांव सर्वश्रुत आहे. हा गृहस्थ एका कडक हिंवाळ्यांत **कॉपरमाइन** नांवाच्या नदीच्या कांठीं होता. त्यावेळेस थंडी इतकी तीव्र होती कीं, धीवरांनीं पाण्याच्या बाहेर जाळीं काढलीं कीं, त्यांतले मासे थिजून जाऊन लांकडासारखे होत; आणि मग त्यांचे कुऱ्हाडींनीं तुकडे करावे लागत! तशांत एकादा मासा विस्तवापुढें धरला कीं, पुनः हालचाल करूं लागे! यावरून ज्या प्राण्याचें रक्त थंड असतें त्यांचें चैतन्य बरेच दिवस टिकून कसें रहातें, हें समजणार आहे. आपल्या साध्या जळूच्या अंगीं देखील थंडी साहण्याचें मोठेंच सामर्थ्य आहे असें म्हणतात. या जळवांचे पुंजकेच्या पुंजके इजा न होतां कित्येक दिवस बर्फाखालीं सजीव रहातात, असें पहाण्यांत आलें आहे. उत्तरध्रुवासभोंवतीं हिंडणाऱ्या एका प्रवाशाचें असें ह्मणणें आहे कीं, **ग्रीनलंडांत** माशाशिवाय पाहिजे त्या प्राण्याचें मांस धूर दिल्याशिवाय, भाजल्याशिवाय, किंवा मीठ घातल्याशिवाय, न कुजतां पुष्कळ दिवस टिकतें. स्कॉटलंड वगैरे देशांतून या बेटांत आणिलेल्या बैलाच्या, बकऱ्याच्या, किंवा डुकराच्या मांसाचे उघडे मुढे, आणि पंख न उपटलेलीं किंवा

मसाला न भरलेलीं पांखरें, जशींच्या तशीं रहातात! पाकसिद्धि करावयाची असल्यास हीं विळ्यांनीं तोडावीं लागतात! सारांश, येथील अतिशय थंडीमुळें तीं थिजून जाऊन कोणत्याही प्रकारें त्यांची रुचि कमी होत नाहीं. ज्या वेळेस खाण्यास काढावीं त्या वेळेस जणूं काय आतांच कापलीं आहेत कीं काय, असें वाटतें. प्राण्यांच्या मांसाप्रमाणेंच वनस्पतींचीं अंगेंही थंडीनें कुजत नाहींत. स्पिट्सबर्जेन येथें एक शंभर वर्षांचें लांकूड तिळमात्र न बिघडलेलें पहाण्यांत आलें होतें. इ० स० १६३५ त याच शहरीं एका तरीच्या कांठीं सात असामी पुरण्यांत आले होते. पुढें वीस वर्षांनीं कांहीं खलाशी ज्या ठिकाणीं हे सात इसम पुरले होते त्या ठिकाणींच उतरले, आणि त्यांचीं तीं सात प्रेतें जशींच्या तशीं त्यांच्या दृष्टीस पडलीं! याच कारणामुळें थंड देशांतील पर्वतांत प्रवास करणारे लोक एकाएकीं बर्फाचे कडे घसरूं लागले असतां त्यांच्याखालीं सांपडून गतप्राण होतात, व त्यांचीं शरीरें अनेक वर्षें दऱ्यांच्या तळाशीं जशींच्या तशीं रहातात. बर्फांत सांपडून मेलेल्याचें प्रेत सांपडणार नाहीं, अशी निराशा त्याच्यामागें राहिलेल्या आप्तांस कधींही होत नाहीं. तूप वगैरे प्रवाही पदार्थ थिजले असतां त्याचें घनफळ थोडें कमी होतें. पाण्याची तशी गोष्ट नाहीं; तें थिजलें असतां त्याचें घनफळ वाढतें. ह्मणजे कांठाकांठ भरून ठेवलेल्या तपेलींतील पाणी थिजलें, तर तें त्या तपेलीवर चढेल; थिजलेल्या तुपाप्रमाणें कांठाच्या आंत जाणार नाहीं. याचें कारण असें आहे कीं, पाण्याच्या परमाणूंत जितकें अंतर असेल त्याहून बर्फाच्या स्फटिकाकार कणांत अधिक अंतर असतें. स्फटिक अनेक आकारांचे असतात. पण त्या सर्वांत एक सामान्य गुण हा असतो कीं, त्यांस बहुशः सहा बाजू असतात. उदकस्फटिकाचा एक कण दुसऱ्या कणाशीं साठ अंशांच्या कोनानें भिडलेला असतो, असें कित्येकांचें ह्मणणें आहे. पाणी थिजलें असतां त्याचें घनफळ वाढतें, यामुळें पुष्कळदां अपघात होतात, व नुकसान होतें. पाण्याच्या तोट्यांस वाव नसल्यास त्या दुभंगतात; झाडांच्या रसवाहिन्यांतील रस एकदम थिजल्यास

तीं उकलतात; जमिनींतील पाण्याचें बर्फ झाल्यास तीवरील घरें उलथून पडतात; व कधीं कधीं खडकांच्या भेगांत सांपडलेलें पाणी थिजून फुगल्यामुळें, सुरुंगाप्रमाणें आवाज होऊन, त्यांचे कळपे सुटतात! थिजून फुगूं लागलेल्या पाण्याच्या अंगीं केवढा जोर येतो, हें पहाण्यासाठीं एका अमेरिकन लष्करी अंमलदारानें मोठ्या गमतीचे दोन प्रयोग केले. चवदा इंच व्यासाचा एक तोफेचा कुलपी गोळा घेऊन त्यांत त्यानें पाणी भरलें, आणि लोखंडाच्या घट्ट खुंटीनें त्याचें तोंड बंद करून तो गोळा कडक हिंवाळ्यांत उघड्या हवेंत कित्येक दिवस ठेविला. एके दिवशीं खुंटी शंभर यार्डांवर जाऊन पडली, आणि तिच्या पाठोपाठ तिच्या जाडीचें एक आठ नऊ इंच लांबीचें भरींव बर्फी पंचपात्र बाहेर पडलें! दुसऱ्या प्रयोगाचे वेळीं खुंटीनें टिकाव धरला; पण गोळ्याचें मध्यांग दुभंगून त्याच्या कमरेसभोंवतीं बर्फाचें एक कडें ठोकल्यासारखें झालें! प्रस्तुत लेख बराच लांबला आहे तरी, बर्फाच्या प्रसरण सामर्थ्याचें आणखी एक चमत्कारिक उदाहरण सांगण्याचें धाष्टर्य करतों आणि आटपतों. अमेरिकेंत केनेबेक नांवाची एक नदी आहे. तिची रुंदी एके ठिकाणीं सुमारें सातशें फूट आहे. या नदीचें पाणी समुद्राच्या भरतीओहोटीनें या ठिकाणीं सुमारें पांच फूट चढतें व उतरतें. याच ठिकाणीं ओहोटी असल्यास हिची कमींत कमी खोली सतरा फूट असते, व भरती आली असतां ती अगदीं खोल जागीं पंचवीस फूट होते. हिंवाळा पडूं लागला कीं हिचा पृष्ठभाग गोठूं लागून बर्फाच्या वेड्यावांकड्या राशी दोहों किनाऱ्यांवर ठिचूं लागतात. हा प्रकार पाहून, एका गृहस्थानें दोनही किनाऱ्यांकडे शंभर शंभर फूट जागा सोडून मधल्या पांचशें फुटांत शंभर फुटांच्या अंतरावर बर्फ फोडून पाण्याच्या तळास लागलेले असे पांच डांब पुरले. पुढें एका महिन्यानंतर असें दिसून आलें कीं, पहिल्यांत व दुसऱ्यांत आणि चवथ्यांत व पांचव्यांत शंभर फुटांच्या ऐवजीं एकशें एक फुटांचें अंतर पडलें आहे, व पहिल्यांत आणि पांचव्यांत पांचशें फुटांऐवजीं पांचशें तेरा फुटांचें अंतर पडलें आहे!!

# पेकिन शहराचें वर्णन.

चीनच्या राजधानीचें शहर जें पेकिन त्याविषयीं थोडीशी माहिती येथें देण्याचा विचार आहे. चिनी लोक पराकाष्ठेचे उद्योगी, सहनशील व चतुर आहेत, हें निर्विवाद आहे. पण येवढ्यावरून त्यांच्या रीतीभातींत, रहाण्यासवरण्यांत, शिल्पादि कलांत, किंवा दुसऱ्या कोणत्याही व्यवहारांत विशेष बहुविधता आहे, असें नाहीं. एकंदरीनें पहातां आमच्या लोकांहून हे लोक श्रेष्ठ आहेत यांत संशय नाहीं. परंतु आमच्या लोकांत जी एक गोम आहे ती यांच्यांतही पूर्णपणें भरली आहे. ज्याप्रमाणें आमच्या लोकांचे रीतरिवाज अनादिकालापासून चालत आल्यासारखे दिसतात, त्याप्रमाणें यांचेही दिसतात; व ज्याप्रमाणें आमच्या लोकांस त्यांत फेरफार करण्याचा स्वाभाविक कंटाळा आहे, त्याप्रमाणें यांसही आहे. कदाचित् या बाबतींत हे लोक आम्हांहूनही चिकट आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आमच्या देशावर अनेक लोकांच्या स्वाऱ्या झाल्या ह्मणून म्हणा, किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणामुळें ह्मणा, आमच्या लोकांच्या आचारपद्धतींत थोडाबहुत तरी फरक होत गेला आहे, व सध्यां तर तो बराच झपाट्यानें होत आहे. या देशाची तशी गोष्ट नाहीं. यावर म्हणण्यासारखीं परचक्रें न आल्यामुळें, व देशांतल्या देशांतही ह्मणण्यासारख्या राज्यक्रांत्या न झाल्यामुळें, याच्या आद्य ऋषींनीं घालून दिलेले, किंवा फार प्राचीन काळीं पडलेले जे रीतरिवाज ते ओतीव लोखंडाप्रमाणें ठाम होऊन बसले आहेत! अलीकडे युरोपिअन लोकांच्या विशेष संघट्टनामुळें या लोकांस, कित्येक गोष्टींत फेरफार केला तरच आपला निभाव लागणार आहे, असें वाटूं लागलें आहे; पण ही इच्छा अगदीं सूक्ष्म असून तिचा प्रादुर्भाव फारच थोड्या लोकांत झालेला आहे. राष्ट्र या नात्यानें हे लोक अद्यापि जागे झालेले नाहींत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्मणून एका पेकिनच्या वर्णनावरून वाचकांस चिनांतील इतर शहरांच्या स्थितीचीही चांगली अटकळ बांधतां येणार आहे.

लोकसंख्येच्या मानानें जगांत पहिलें शहर **लंडन** आहे, व त्याच्या खालोखाल **पेकिन** आहे. आशिया खंडांत सर्वांत मोठें शहर हेंच आहे. येथील वस्ती वीस लाखांवर आहे. युरोपांत याच्या बरोबरीचें **पारिस** शहर आहे. हें शहर फार जुनाट आहे. ख्रिस्ताचा जन्म होण्यापूर्वी हें बरींच वर्षें बांधलें असावें असें दिसतें. **पेकिन** या शब्दाचा अर्थ 'उत्तरेची कचेरी' असा आहे. हें **येन** परगण्याची राजधानी होतें. तार्तरी लोकांनीं तो परगणा जिंकल्यावर हें कांहीं वर्षें खालावलें होतें; पण पंधराव्या शतकाच्या आरंभास हें पुनः या देशाचें मुख्य शहर झालें. पूर्वी चीन देशाचे बादशहा **नांकिन** येथें रहात असत. पण तार्तार लोकांपासून फार त्रास होऊं लागल्यामुळें त्यांनीं तें शहर सोडून दिलें, व आपल्या राजधानीचें शहर बरेंच उत्तरेकडे असल्यास त्या लोकांचा बंदोबस्त करण्यास ठीक पडेल, असें वाटल्यावरून त्यांनीं पेकिन येथें राजकुल आणिलें. हें शहर **पीहो** नदीच्या कांठच्या रेताड मैदानांत वसलेलें आहे. याचे चार भाग आहेत. पैकीं एकास चिनी पेकिन व दुसऱ्यास तार्तर पेकिन असें म्हणतात. तिसऱ्या भागांत राजपरिवार रहातो. चवथा सरकारी अंमलदारांकडे आहे. या देशांतील इतर शहरांप्रमाणें हे चारही भाग उच्च नगरभिंतींनीं वेष्टित आहेत. चोहों दिशांस मोठमोठे दरवाजे असून त्यांच्या आंत तीन किंवा चार पोट दरवाजे आहेत. दक्षिणेकडील दरवाजा मानाचा आहे. बादशहास जाणेंयेणें पडल्यास मात्र तो उघडला जातो. बाकी तो नेहमीं बंद असतो. पेकिनच्या चार पोटभागांस ज्या भिंती आहेत, त्यांशिवाय सर्व शहरास वेढणारी एक सामान्य भिंत आहे. हिची लांबी सुमारें सोळा मैल आहे. हिला उत्तरेकडील बाजूस ह्मणजे तार्तरीच्या बाजूस तीन दरवाजे आहेत, व याशिवाय इतर बाजूंस सारे दोनच आहेत. पहिल्या तिहीं पैकीं मुख्य दरवाजाचें नांव **चीनमून** असें आहे. या दरवाजावर टोलेजंग इमारत बांधली असून तींत त्याच्या संरक्षणासाठीं बरेंच लष्कर ठेवलेलें आहे. या शहरांतील रस्ते फार रुंद आहेत. रस्त्यांच्या दोहों बाजूंस गटारें नाहींत. ते मध्यभागीं

उंचट असून दोहों बाजूंस त्यांस थोडासा ढाळ दिलेला असतो. हे उन्हाळ्यांत धुळीनें आणि पावसाळ्यांत चिखलानें आच्छादिलेले असतात. प्रत्येक रस्त्याच्या शेवटीं एक प्रकारचा लांकडी तट असतो, व त्यावर रात्रंदिवस खडा पहारा असतो. रात्रीं नवाच्या पुढें सबळ कारण दाखविल्यास फक्त चिनी लोकांस मात्र यांतून जाऊं येऊं देतात. लष्करी शिपाई व पोलिस मिळून रस्त्यांवर कोठेंही बिलकुल दंगाधोपा होऊं देत नाहींत. कोणी गिऱ्हाइकानें विशेष बडबड केल्यास त्याचें तोंड बंद करण्यासाठीं त्यास थोडेंसें चवदावें रत्न दाखविण्यास हे मागेंपुढें पहात नाहींत! शहराच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत जाणाऱ्या रहदारीच्या मुख्य रस्त्यांशिवाय शहरांतून बाहेर पडण्यास दुसऱ्या वाटा नाहींत. या रस्त्यांच्या दोहों बाजूंस झाडें लावलेलीं आहेत. रहाण्याचीं घरें आडरस्त्यांत व गल्ल्यांत आहेत. शहराप्रमाणें या घरांच्या-भोंवतींही भिंती असतात. व्यापारधंदा मात्र शहरांत चालतो. देवालयें, मठ, स्मशानभूमिका वगैरे नगरवेशीच्या बाहेर आहेत. रस्त्यांत जो दंगा चाललेला असतो, तो ऐकून अपरिचिताचें तर डोकें उठतें! त्याच्या दोहों बाजूंस ज्याला जेथें जागा सांपडेल तो तेथें तंबू ठोकून, पाल बांधून, किंवा एकादी मोठीशी छत्री उघडून दुकान मांडून बसलेला असतो! या दुकानांत खाण्याचा हरतऱ्हेचा जिन्नस तयार असतो. चारसहा आणे दिले ह्मणजे साधें जेवण यथेच्छ मिळतें. आपल्या देशांतील माळणीप्रमाणें, पाठीला हारे अडकविलेले किराणे व्यापारी इकडून तिकडे फिरत असून, हें पाहिजे काय, तें पाहिजे काय, ह्मणून सारखे ओरडत असतात. खटारे, घोडीं, खेचरें, व एकचाकी हातगाड्या यांची गर्दी होऊन गेली असल्यामुळें, सारी रथ्या विक्रेते आणि ग्राहक यांनीं गजबजून गेल्यासारखी दिसते! चांभार लोक जागा सांपडेल तेथें क्षणभर टेंकून, गिऱ्हाइकांच्या तब्यतीप्रमाणें तळवे लावीत असतात, व गोंठ भरीत असतात; लोहार लोक हत्यारें लावीत असतात, व खिळे मारीत असतात; आणि सामान्य लोक चारदोन पैसे टाकून चहाचें पाणी किंवा सागुतीचे घुटके घेत असतात!

चिनी लोकांत पुरुषांनीं वेण्या घालण्याचा प्रघात पडला तो तार्तरी लोकांनीं त्यांस जिंकिलें तेव्हां पडला. प्रथम वेणी घालणें हें दास्यतेचें चिन्ह होतें. पण आतां तें भूषण होऊन बसलें आहे! यामुळें ज्याची वेणी विशेष लांब त्याला मोठा अभिमान वाटतो. कित्येकांच्या वेण्यांचीं शेपटें चालतां चालतां रस्ता झाडतात! शेंडी कापणें ह्मणजे फार वाईट शिक्षा, असें चिनी लोक समजतात; व त्यामुळें ज्या अपराध्याचें वर्तन अत्यंत निंद्य असेल त्यासच ही देण्यांत येते.

बहुतेक दुकानांचीं तोंडें उघडीं असतात. या शहरांत मात्र कोठें कोठें त्यांस भिंगांचीं दारें लाविलेलीं आहेत. दुकानास चिनी भाषेंत **हांग** म्हणतात. या **हांग**च्या तोंडाशीं दुकानदार उभा राहून गिऱ्हाइकांची वाट पहात असतो. पुष्कळ वेळ चिकित्सा करून कांहीं न घेतां गिऱ्हाईक गेला तरी चिनी दुकानदार, आपल्या इकडल्या दुकानदारांप्रमाणें, त्यावर त्रासत नाहींत. दुकानाच्या दारावर मोठमोठ्या फळ्या लाविलेल्या असून, त्यांवर सोनेरी किंवा दुसऱ्या कसल्या तरी रंगाच्या शाईनें दुकानांत काय विकलें जातें, हें घातलेलें असतें. या सार्वत्रिक संप्रदायाचा सांचा पुढें दिल्याप्रमाणें असतो:—

| | | |
|---|---|---|
| फुंग | **टीइन** | पू |
| सीह | **यी** | टीएन |
| | **शून** | |
| | **टीन** | |

यांपैकीं जाड्या टैपांत घातलेल्या शब्दांचा अर्थ असा आहे कीं, जो दूरदर्शी असतो त्यास देव हात देतो. 'फुंग पू' ह्मणजे गिरद्यांचें दुकान; 'सीह टीएन' म्हणजे चटयांची वखार; व प्रत्येक दुकानावर 'पू' किंवा 'टीएन' हीं अक्षरें असल्याखेरीज निर्वाहच नाहीं. आपल्या देशांतील बाजाराप्रमाणें चीनच्या बाजारांतली विशेष वस्तूंची घडामोड विवक्षित ठिकाणीं करण्याची चाल आहे.

या देशांत उघड्या व झांकलेल्या गाड्या वापरण्याची चाल आहे. गाड्या बहुशः दुचाकी असतात, व त्यांचा फक्त श्रीमंत

लोक उपयोग करतात. गरीब लोक फार दूरचा प्रवास करावयाचा असेल किंवा फारच मोठें ओझें न्यावयाचें असेल तर भाड्याचीं घोडीं करतात. या देशांत लोकसंख्या फार झाल्यामुळें माणसांसच अन्न पोटभर मिळण्याची मारामार पडते, त्यामुळें जनावर सहसा कोणी बाळगीत नाहीं. नदी असली कीं ओझें वहाण्याचें काम होड्यांतून करतात. शेतकरी लोक शेतीच्या कामास बैल लावतात; पण ते देखील अगदीं कामापुरते. गरीब लोक आपल्या बायकांस एकचाकी हातगाड्यांत घालून त्या आपणच लोटतात, व थकलेल्या बायांस मुलगे ओढतात! घोड्यांच्या वगैरे गाड्यांचे कोचमन बहुशः गाडीवर बसत नाहींत, तर त्यांच्या बाजूनें चालत असतात. या घोड्यांस कधीं कधीं लगाम देखील घालण्याची गरज पडत नाहीं, इतकीं तीं गरीब असतात! चिनी लोकांस पतंग उडविण्याचा मोठा छंद आहे. चार वर्षांच्या पोरापासून चवऱ्याहत्तर वर्षांच्या म्हाताऱ्यापर्यंत हा खेळ प्रिय असतो! चिनी लोकांचे पतंग नानाप्रकारच्या किड्यांच्या, पक्ष्यांच्या, व जनावरांच्या आकृतीचे कापलेले असतात, व ते कापण्यांत ते फारच चतुराई दाखवितात. लहान मुलें भोंवरे, गोट्या, लपोऱ्या, सरकफळी वगैरे खेळ खेळतात. मोठे लोक इंग्रजी ब्याडमिंटनसारखा एक खेळ खेळतात. भेद इतकाच कीं, इंग्रजी खेळांत शटल्कॉक ब्याटानें उडविलें जातें, चिनी लोक त्याला कोंपराचा किंवा मनगटाचाच ठुसा देतात. चिनी लोकांस बाहुल्यांचा खेळ पहाण्याचाही मोठा शौक आहे. या बाहुल्या मागें लावलेल्या तारांनीं किंवा वर बांधलेल्या दोरांनीं नाचविण्यांत येतात.

हिंवाळ्यांतील कडक थंडीच्या निवारणासाठीं चिनी लोक आपलीं अंथरुणें शेगड्यांवर घालतात! निजावयाच्या खोलींत एक मोठा कट्टा असतो. या कट्ट्यांच्या पोटांत एक लोखंडी बरेंच मोठें पंचपात्र आडवें बसविलेलें असतें. या पंचपात्राच्या एका तोंडास धुराडें करून त्यांतील धूर आळ्यांतून काढून दिलेला असतो. पंचपात्राचें जें अंग जमिनीवर टेकलेलें असतें, त्यांत एक आडवी जाळी केलेली असते. या जाळीवर निखारे ठेऊन

त्यांवर बारीकसारीक ढलप्या घालतात. थोड्या वेळानें कट्टा गरम होतो. मग त्यावर चटया किंवा पातळ गाद्या पसरून त्यांवर चिनी लोक रात्रभर निजतात. एकंदरीनें ही शय्या फार सुखावह होत असावी, असें वाटतें.

## चीन देशाविषयीं कित्येक ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टी.

चीनदेशांत एकंदर तीन धर्मपंथ आहेत. त्यांत मुख्य दोन आहेत; एक **कानफ्यूशिअसपंथ** व दुसरा **बौद्धपंथ**. तिसऱ्या **टौपंथाचे** अनुयायी फार क्वचित् आहेत. ख्रिस्ती शकाच्या पूर्वी सुमारें ६०० वर्षें कानफ्यूशिअस नांवाचा मोठा वेदांती तत्त्ववेत्ता चीनदेशांत होऊन गेला. हा पराकाष्ठेचा बुद्धिवान् व तारतम्यज्ञ असल्यामुळें, अत्यंत लोकप्रिय होऊन स्वतंत्र धर्मस्थापक झाला. लोकांत नीतीची वृद्धि व्हावी, प्रजेनें राजनिष्ठ असावें, अपत्यांनीं मातापितरांच्या आज्ञेंत सर्वदा रहावें, लोकांनीं भ्रामक मूर्तिपूजारत होऊं नये, अशीं यानें स्थापिलेल्या पंथांतील मुख्य मतें होतीं. पण असा कोणता धर्म आहे कीं, तो अडाणी लोकांच्या हातीं पडल्यावर त्यांत बिघाड झाला नाहीं ? इतर धर्मस्थापकांप्रमाणें हा धर्मस्थापकही देवावतार ठरून, देवाप्रमाणें पूजाग्रहणास योग्य वाटूं लागला. गांवोंगांव कानफ्यूशिअस याचीं देवालयें बांधण्यांत येऊं लागून त्यांत त्याच्या मूर्तींची स्थापना होऊं लागली, आणि त्यानें जी मूर्तिपूजा नाहींशी करण्याचा प्रयत्न केला होता, ती फिरून पहिल्याप्रमाणें सर्वत्र दिसूं लागली ! तथापि ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, धर्माचरणापेक्षां नीतिप्रसाराकडे या पंथाचा विशेष कटाक्ष आहे. कानफ्यूशिअस हा धर्मस्थापक झाला ही गोष्ट खरी आहे ; पण वास्तविक पहातां तो सदाचारसंपन्न तत्त्ववेत्ता होता, यामुळें त्यानें स्थापिलेल्या पंथांत धर्मविधींची फारशी कटकट नाहीं, व देवतांचें प्राचुर्य नाहीं. कानफ्यूशिअसपंथी लोक

फक्त त्याची, व त्याहून श्रेष्ठ जो जगदात्मा परमेश्वर त्याची पूजा करितात. यांपैकीं पहिल्यास मात्र देवळें असून मूर्ति आहेत. दुसऱ्याचें सर्व पूजन मानसिक असतें. एकंदरीनें हा पंथ सुशिक्षित लोकांस मान्य झालेला आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

खालच्या प्रतीचे सारे लोक बुद्धधर्मानुयायी आहेत. ख्रिस्ती शकाच्या पूर्वीं सुमारें सातशें वर्षें सांख्यमुनि नांवाचा जो असाधारण पुरुष हिंदुस्थानांत होऊन गेला, ज्यानें ज्ञानसंपादनासाठीं व परोपकार करतां येण्यासाठीं राज्यपदावर लाथ मारून परमार्थवृत्तीचा अंगिकार केला; बुद्धीस अग्राह्य किंवा असंमत अशा कोणत्याही गोष्टीचा स्वीकार न करण्याचा निश्चय करून तो परिपूर्ण केल्यामुळें, ज्याच्या पंथास " बौद्ध " असें नांव पडलें; प्राणिमात्राचें हिताहित ईश्वराधीन न मानतां कर्माधीन मानिल्यामुळें, ज्या धर्मास कित्येकांनीं नास्तिक असें नांव ठेवलें असून, व त्याचा उच्छेद करण्यासाठीं नानातऱ्हेचे बरेवाईट प्रयत्न केले असून ' अहिंसा परमो धर्मः ' इत्यादि अत्यंत मान्य नीतितत्वांनीं परिपूर्ण असल्यामुळें ज्याचा बीमोड झाला नाहीं, तर आजमित्तीस पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याही धर्मापेक्षां ज्याची अनुयायीसंख्या मोठी आहे, व ज्यांतील सदाचारतत्त्वांचें प्रतिबिंब हिंदुधर्मांत व ख्रिस्तीधर्मांत स्पष्टपणें पडलें आहे, अशा सुंदर धर्माचा प्रस्थापक जो **गौतम बुद्ध** त्याची पूजा या देशांत सर्वत्र चालू आहे. जिकडेतिकडे बुद्धाचीं देवालयें आहेत, व त्यांत त्याच्या पूजेचा सपाटा चाललेला असतो. **लामापंथ** याच धर्मांतून निघाला आहे. जरी हा पंथ मुख्यत्वेंकरून **टिबेट** व **मोंगोलिआ** या प्रांतांत विशेष रूढ आहे, तरी तो या देशांत मुळींच अनुसृत नाहीं असें नाहीं. **लामाला** जिवंत बुद्ध किंवा बुद्धाचा जिवंत अवतार मानितात. देवाप्रमाणें लामाची पूजा करतात. एक **लामा** परलोकवासी झाला म्हणजे त्याच्या जागीं त्याचे पुजारी दुसऱ्या लामाची निवडणूक करतात. ही निवडणूक करण्यांत ज्या मुलाचें बाह्य स्वरूप समाधिस्थ झालेल्या लाम्याच्या स्वरूपासारखें असेल त्याला त्याच्या गादीवर बसविण्याचा विशेष

विचार होतो. अमूक एका मुलाचें स्वरूप लाम्यासारखें आहे, तेव्हां त्या लाम्यानें आपला आत्माही त्या मुलाचे ठायीं ठेवून परलोकप्रयाण केलें असावें, असें हे पुजारी अनुमान करतात. बुद्धालयाच्या गाभाऱ्यांत सिंहासनावर बुद्धाची नग्न मूर्ति असते. दाराच्या बाहेर आपल्या इकडील जयविजयांप्रमाणें दोन मूर्ति असतात. हे द्वारपालक होत. यांची पूजा ते करीत नाहींत. बुद्धाच्या मूर्तीपूढें कापूर, धूप, वगैरे सुगंधी व सहज पेटणारीं द्रव्यें जाळण्याचा मोठा धडाका चाललेला असतो. सगळें बुद्धालय व लामालय अशा प्रकारच्या धूमराशींनीं भरून गेलेलें असतें, व त्यांत फार वेळ राहिलें असतां श्वासोच्छ्वास बंद होईल कीं काय, अशी भीति वाटते! एकंदरीनें पहातां, दुसऱ्या देशांतील अडाणी लोकांत मूर्तिपूजेचें जितकें बंड दिसून येतें, तितकेंच तें येथेंही दिसतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आपल्याप्रमाणें बुद्धाच्या पायावर किंवा पुढें डोकें ठेवणें, हा प्रणामाचा अत्यंत प्रशस्त मार्ग, असें हे लोक समजतात.

मूर्तिपूजा फैलावत गेली कीं, तिच्याबरोबर देवतांची संख्याही फैलावत जाते, हें सर्वांस माहीत आहेच. आमच्या देशांतील देवतांची संख्या फार वाढली, त्या वेळेस लोकांनीं त्यांची एक व्यापक संख्या ठरवून टाकली, व तिच्यापुढें ती जाऊं द्यावयाची नाहीं असा निश्चय केला; आणि बहुशः जाण्याची गरज पडावयाची नाहीं. हिंदुस्थानच्या पंचवीस कोटी प्रजेपैकीं प्रत्येक पुरुषाला, स्त्रीला, व मुलाला एकेक निराळा देव दिला, तरी आणखी आठ कोटी देव आमच्यापाशीं शिलक आहेत! असो; चीनच्या चाळीस कोटी लोकसंख्येपैकीं प्रतिव्यक्तीस एक, या मानानें पुरण्याइतक्या देवता हे लोक मानतात किंवा नाहीं, हें ठाऊक नाहीं; पण या प्रकरणाविषयीं जो साधारण शोध झाला आहे, त्यावरून असें दिसून आलें आहे कीं, चीन देशांत हिंदुस्थानापेक्षां देवतांचे वर्ग व जाती तरी खचित कमी नाहींत. आपल्या देशांत ज्याप्रमाणें कोणतीही वस्तु अपूज्य आहे असें म्हणतां येणार नाहीं, त्याप्रमाणें या

लोकांचीही कल्पना असावी, असें यांच्या देवतांचा ‘ मस्तर-रोल ’ किंवा ‘ नांवनिशीपुस्तक ’ पाहिलें असतां दिसून येईल! पावसाचा देव, गडगडाटाचा देव, पैशाचा देव—म्हणजे वरुण, इंद्र, लक्ष्मी—इत्यादि देवता तर आहेतच आहेत. परंतु चोरांचा देव; मेघगर्जनांची देवी; आपल्या दहा सेवकगणांकडून मुलांस खेळण्यास, हंसण्यास, चालण्यास, व खाण्यास शिकविणारी कुं—फा नांवाची बायकांपोरांचें संरक्षण करणारी देवी; मदिरेश्वर; पावकेश्वर; अनुकंपा देवी; नाविकांची देवी; ‘ माता ’ नावांची फक्त मुलांची देवी; पाकदेव व गोंवराचा आणि फोड्यांचा देव वगैरे मंडळी ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ‘ ध्यानांत ठेवण्यासारखी ’ ह्मटलें, यावरून असले देव या देशांतच आहेत, आणि आमच्या देशांत नाहींत, म्हणून म्हटलें आहे असें नाहीं; तर कोणत्याही देशांतल्या अज्ञान व मूढमति लोकांच्या धर्मविषयक विचारांत किती साम्य असतें, व देवतांची कल्पना ते किती उपहासास्पद करून टाकितात, इकडे वाचकांचें लक्ष जावें, येवढ्यासाठीं म्हटलें आहे. आम्हांप्रमाणें चिनी लोक सूर्याची पूजा करणारे असून, शिवाय ते चंद्राची पूजाही करतात. या देशांत ठिकठिकाणीं चंद्राचीं देवालयें आहेत. यांखेरीज आणखी शेंकडों देव व देवता आहेत.

ज्याप्रमाणें चिनी लोक वृद्धांस मान देतात, त्याप्रमाणें दुसरे कोणतेही लोक देत नसतील. चीनदेशांत अजूनपर्यंत अविभक्त-कुटुंबपद्धतीचें माहात्म्य बरेंच असल्यामुळें, प्रत्येकास आपल्या दूरच्या देखील आप्तसोयऱ्यांचा परामर्ष घ्यावा लागतो. तशांत तो आप्त अतिशय वृद्ध असेल तर तो मग निकट असो, किंवा दूरचा असो, त्याची वास्तपुस्त करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे, असें चिनी लोक मानतात. दांत पडून गेल्यामुळें अन्न पचत नाहीं, दृष्टि मंद झाल्यामुळें दिसत नाहीं, शक्ति क्षीण होऊन शरीरयष्टीची धनुकली झाल्यामुळें हातपाय चालत नाहीं, अशा प्रकारच्या वयातीत स्त्रिया किंवा पुरुष अन्नान्न करीत दारोदार

फिरत आहेत, रस्त्यानें कोलमडून पडत आहेत, उन्हांत व्याकुळ होऊन पडले आहेत, किंवा नदीच्या कांठीं लोळत आहेत, अशा स्थितींत त्यांस पाहून पहाणाराच्या मनास जो उद्वेग होतो, तो चीन देशांत अगदीं अननुभूत आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्या वृद्ध स्त्रीस किंवा पुरुषांस डोली करण्याचें सामर्थ्य नाहीं, अशांस त्यांचे नातू किंवा पणतू खांद्यावर घेऊन वहाताहेत, व रस्त्यानें जाणारे येणारे तरुण लोक त्यांस आदरपूर्वक प्रणाम करीत आहेत, अशी रीत येथें प्रत्येक ठिकाणीं दृष्टीस पडते. कोणताही सुवृत्त मनुष्य ऐशीं, नव्वद, किंवा शंभर वर्षांचा होऊन मेला कीं, त्याच्या समस्थितींतले किंवा गांवांतले लोक लहानमोठ्या वर्गण्या देऊन त्याचें स्मारक करतात. असलीं स्मारकें चीन देशांत जागोंजाग दृष्टीस पडतात. सरकारही या कामीं मागें नाहीं इतकेंच नाहीं, तर उलट त्याला तें अनुकूल आहे. यामुळें रस्तोंरस्तीं राजदत्त पीतवस्त्र परिधान केलेले व रौप्यतुल्य श्वेत केशकलाप असलेले वृद्ध लोक मोठमोठ्यांकडून मुजरे घेत चालतांना दृष्टीस पडतात. जे विशेष वयातीत झाले आहेत त्यांस चीनचीं विश्वविद्यालयें ( युनिव्हर्सिट्या ) कधीं कधीं दीर्घायूबद्दल पदव्या ( डिगऱ्या ) देतात, ही एक येथील असामान्य तऱ्हा ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. आजमित्तीस अशा प्रकारचे पांच पन्नास तरी एल्. एल्. डी. चिनांत सांपडतील, याविषयीं शंका नाहीं ! एका प्रसंगीं चीनच्या बादशहानें देशांतील सर्व म्हातारे राजवाड्यांत आणून त्यांस एक बडी मेजवानी दिली. या मेजवानींत बादशहाच्या मुलांनीं आणि नातवांनीं मोठ्या प्रेमानें व हौसेनें वाढण्याचें काम केलें ! मेजवानी आटपल्यावर मोठा दरबार करून त्यांत वयाच्या मानानें प्रत्येक म्हाताऱ्यास कमीअधिक दक्षिणेसह पोषाख ( म्हणजे पिंवळा झगा ) देण्यांत आला; व सर्वांहून वडील जो १११ वर्षांचा म्हातारा होता त्याला येवढ्या मोठ्या वार्धक्यासाठीं बड्या अंमलदारीचा पोषाख आणि पदवी देण्यांत आली ! चीन देशांत तुह्मी कोठेंही जा, जिकडेतिकडे सर्व लोक वृद्धांस मान देण्यास अत्यंत आतुर असतात, असें

दिसून येईल. रस्त्यांत फार गर्दी झाली असली, आणि एकादी सवत्स स्त्री पुढें आली, तर ज्याप्रमाणें फ्रेंच लोक एका क्षणांत दुतर्फ होऊन तिला वाट करून देतात, त्याप्रमाणें चीन देशांत म्हाताऱ्याला कोठेंही जाण्यास कितीही दाटी असली तरी बिलकुल पंचाईत पडत नाहीं. त्याचे ते पांढरे केंस आणि सुरकुतलेलें तोंड त्यांच्या दृष्टीस पडलें कीं, त्याविषयीं त्यांच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होऊन, त्यास ते लागेल ती मदत देण्यास प्रवृत्त होतात. आशियांतलीं व युरोपांतलीं अनेक राष्ट्रें उदयास येऊन अस्तास गेलीं, तरी पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांत हें जुनें राष्ट्र असून अद्यापि चांगल्या स्थितींत आहे. तेव्हां याचें हें दीर्घायु स्त्रियांस व पुरुषांस जो बहुमान मिळतो त्यापासून उत्पन्न होणाऱ्या पुण्याईचें तर फळ नसेलना? नाहीं तर आमच्या देशांतली स्थिति पहा. कित्येक लोकांस आपलीं वृद्ध मातापितरें आपणांस शोभत नाहींत किंवा आपणांस निष्कारण ओझें झालीं आहेत असें वाटूं लागतें! असे लोक पारतंत्र्यपाशांत अनेक शतकें जखडले जाऊन दुःसह दास्यस्थितीचा अनुभव घेत असावे, यांत कांहीं नवल नाहीं!

ज्या शाळेंत आपला मुलगा घालावयाचा त्या शाळेचा मुख्याध्यापक कशा प्रकारचा आहे, हें चिनी लोक फार बारकाईनें पाहतात. त्याचें वर्तन नीतिशुद्ध नसेल, किंवा त्याला पूर्वऋषिप्रणीत मतांची चांगली माहिती नसेल, तर त्यांना तो पसंत पडत नाहीं. कांहीं लोक आपलीं मुलें खुद्द गुरूंच्या घरीं ठेवतात, व कांहीं त्यांच्या नजरेखालीं त्यांच्या जेवणाखाणाची दुसरीकडे सोय करून ठेवतात. याप्रमाणें दोहोंपैकीं कोणत्या व्यवस्थेनें मुलास ठेवायाचें वगैरे ठरल्यावर, त्याचीं मातापितरें, केवळ मुलाच्या अध्यापकासाठीं मेजवानीचा बेत करून त्याला आमंत्रण देतात. जेवणखाण आटोपल्यावर एकाद्या चांगल्याशा ज्योतिष्याकडून पंचांग पाहवून मुहूर्त ठरविण्यांत येतो. मग त्या दिवशीं सकाळीं हे छोटेखानी शिष्य नजर घेऊन गुरूकडे जातात. कॉनफ्युशिअस याच्या वाढदिवसास किंवा मृततिथीस कोणताही विद्यार्थी शाळेच्या वाटेला म्हणून फिरकावयाचा नाहीं. प्रत्येक

शाळेंत कॉन्फ्युशिअस याचें स्थंडिल केलेलें असतें. मुलानें शाळेंत पाऊल टाकलें कीं, त्याचें पहिलें कर्तव्य त्या स्थंडिलाकडे जाऊन कॉन्फ्युशिअस यास वंदन करावयाचें हें होय. तें झाल्यावर गुरूस मानपुरःसर प्रणाम करून, मग तो काय सांगेल तें ऐकावयाचें, आणि नंतर बांकांवर आपल्या जागीं जाऊन बसावयाचें, अशी सार्वत्रिक चाल आहे.

चीन देशांतील घरेंदारें, सार्वजनिक इमारती, सरकारी कचेऱ्या, व देवालयें या देशांतील हवामानास योग्य अशीं बांधलेलीं असतात. कित्येक इमारतींत आश्चर्य करण्यासारखें नकशीचें व कोरींव काम केलेलें असतें. कित्येक देवालयांवर चिनी लोकांनीं लाखों रुपये खर्च केले आहेत, व अशा सुंदर व भव्य इमारती दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं नसतील असा त्यांचा ग्रह झालेला आहे. पूर्वी सांगितल्याप्रमाणें चिनांत अद्यापि अविभक्तकुटुंबपद्धति बरीच अमलांत असल्यामुळें, एकाच कुटुंबाच्या अनेक शाखांचा गुजारा होण्यासारखीं मोठमोठीं घरें या देशांत ठिकठिकाणीं दृष्टीस पडतात. अशा घरांच्या निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या शाखा रहातात! अशा घराला बहुधा तीन दरवाजे असतात. त्यांपैकीं मधला सर्वांत मोठा असून त्यांतून आंत शिरलें ह्मणजे बाहेरील गृहस्थांच्या मुलाखती घेण्याचा दिवाणखाना लागतो. घराचा हा भाग दुसऱ्या कोणत्याही भागापेक्षां विशेष शोभिवंत असतो. याच्या भिंती कोठें कोठें रेशमाच्या पांढऱ्या पडद्यांनीं किंवा मखमालींनीं आच्छादिलेल्या असून त्यांवर उपदेशपर वाक्यें लिहिलेलीं असतात. याच्या कडीपाटास नानातऱ्हेचे कंदील कापसाच्या, व कधीं रेशमाच्या, दोऱ्यांनीं टांगलेले असतात. शिवाय मधून मधून हंड्याझुंबरेंही असतात. तथापि या लोकांस कंदिलांचाच विशेष शौक आहे, असें ह्मणण्याला हरकत नाहीं. मुख्य सामान म्हटलें ह्मणजे तऱ्हेतऱ्हेच्या लांकडी व वेताच्या खुर्च्या, निरनिराळ्या आकारांचीं टेबलें, अनेक प्रकारच्या रंगांचे वेलबुट्टीदार कापसाचे किंवा रेशमी पडदे, व भिंगाप्रमाणें लखलखणारीं शेंकडों जातींचीं जिल्हईचीं मृत्पात्रें, आणि अगणित

पंखे हे होत. बहुतकरून प्रत्येक घरांत छानदार बगीचा असतो. अगदीं गरीब लोक सुद्धां आपल्या घरासभोंवतीं लहानसा बाग करतात. पुष्कळ घरांस ऊंच जोत्याच्या पडव्या असतात. या पडव्यांत मांडलेल्या पायपसऱ्या खुर्च्यांवर पडून संध्याकाळचे वेळीं चिलीम ओढण्यांत चिनी लोकांस आपण स्वर्गसुखाचाच अनुभव घेत आहों काय, असें वाटतें ! शांघाई येथें जें जकातीचें हपीस आहे, तितकें सुंदर हपीस दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं नसेल; तसेंच या शहरांतील इतर इमारतीही पहाण्यासारख्या आहेत. नदीच्या कांठीं वसलेल्या कांहीं लहानमोठ्या शहरांत नदीच्या वहात्या पात्रांवर पोहतीं भोजनालयें बांधलेलीं असतात. रात्र होऊन जिकडेतिकडे दिवे लागले म्हणजे हीं फारच रमणीय दिसतात, आणि परमुलखी लोकांस तर तीं फारच सुखावह होतात. कारण नऊ वाजल्याबरोबर नगरवेशींचीं दारें बंद करण्याचा परिपाठ येथें सर्वत्र अमलांत असल्यामुळें, ज्यांना त्या वेळापुढें स्वातंत्र्यसुखाचा अनुभव घ्यावयाचा असेल त्यांना, या नदीपृष्ठभागस्थ भोजनालयांत स्वादु अन्न मिळून, तिच्या प्रवाहावरून वहाणाऱ्या शीतल व मंद अशा वायूनें भरलेल्या खोल्यांत निद्रासखीच्या समागमापासून होणाऱ्या आरामसुखानुभवाचीही सोय करून घेतां येते !

आतां एका प्रसिद्ध उत्सेधाचें [ टॉवरचे ] स्वरूप वर्णन करून हा लेख पुरा करतों. हा उत्सेध **यूंग लो** नांवाच्या बादशहानें १९ व्या शतकांत बांधला होता. **यूंग लो**ची आई मोठी सद्गुणी, चतुर, व राजकारस्थानी स्त्री होती. अशा आपल्या अद्वितीय मातेचें कांहीं तरी चिरस्थाई स्मारक असावें, अशा हेतूनें या बादशहानें १४१३ त एका सुमुहूर्तास हा उत्सेध बांधण्यास सुरुवात केली. याचें काम वीस वर्षे चाललें होतें. जमिनीच्या वर याची उंची दोनशें फुटांहून अधिक होती. याला एकंदर नऊ मजले असून त्यांवर घुमट होता, व घुमटावर शिखर होतें. खालपासून वरपर्यंत चोहों बाजूंनीं याचे गिलावे नानाप्रकारच्या रंगांच्या जिल्हईदार पक्क्या चिनी मातीचे केलेले होते. त्यामुळें यावर

सूर्यप्रकाश पडल्याबरोबर हा रक्त, पीत, हरित, नील, श्वेत इत्यादि वर्णांचा तेजोराशीच आहे कीं काय, असा भास होई. एक मजला संपून दुसरा मजला लागण्याच्या दरम्यान जो अष्ट-कोनाकृति गलथा होता त्याच्यावर वरच्या मध्यभागापासून कोनापर्यंत आणिलेल्या सांखळ्यांस आठ मोठ्या घंटा लाविलेल्या असत. याप्रमाणें यावर एकंदर ७२ घंटा होत्या. यांचा ध्वनि विस्तृत व मधुर असल्यामुळें तो होऊं लागला ह्मणजे आसमंतांतील लोक, कृष्णाच्या कर्णमनोहर मुरलिस्वनानें मोहून जाणाऱ्या व्रजवासी गोपगोपिका जनांप्रमाणें, वेडावून जात! "गगनमंड-लास व्यापून टाकणारी या उत्सेधाची कांति पुत्रपौत्रांच्या अंतःक-रणांतील दोषतिमिराचा विध्वंस करून त्यांस सुखी करील, व चंद्रसूर्य आहेत तोंपावेतों त्यांच्या तेजाशीं हा प्रतिस्पर्धा करीत राहील," असें एका चिनी कवीनें म्हटलें आहे! पण प्रमादशील मनुष्यांचा तर्क कोणीकडे आणि नश्वर वस्तूंची रहाटी कोणीकडे! १८९३ त चीन देशांत जी बंडाळी झाली तींत बंडखोर लोकांनीं नांकिन शहर अनेक वेळ हस्तगत करून घेऊन, त्यांतील भव्य इमारतींची दुर्दशा करून टाकली. सन १८९९ पर्यंत या उत्सेधास त्यांनीं हात लाविला नव्हता. पण या सालीं राजपक्षाचा पुरा सूड उगविण्याची त्यांस बुद्धि होऊन, त्यांनीं हें लोकोत्तर आकाशभ-वन रसातळास नेलें! आतां त्याचीं छकलें मात्र पहाण्यास सांपडतात!

---

## सशृंग मनुष्यें.

मनुष्यजातीमध्यें अशा प्रकारचे प्राणी फारच क्वचित् आढळून येतात. आपणां सर्वांस पुराणावरून माहित आहेच कीं पूर्वी आमच्या देशांत शृंगर्षि नांवाच्या एका ऋषीला एक शिंग होतें. त्यानंतरही कदाचित् आमच्या इकडे अशा प्रकारचीं कांहीं मनुष्यें झालीं असतील; परंतु आमच्या देशांत पदार्थसंग्रहालयें नसल्याकारणानें व लोकांनाही तीं स्थापन करण्याची आस्था नसल्याकारणानें आह्मांस खात्रीलायक माहिती कांहींच मिळत

नाहीं. परंतु युरोपखंडाची अशी स्थिति नाहीं. त्यांतील लोक, ज्या ज्या चमत्कारिक वस्तु त्यांना आढळतात त्या त्या वस्तूंचा पदार्थसंग्रहालयांमध्यें सांठा करून ठेवितात. हल्लीं एडिंबर्ग येथील पदार्थसंग्रहालयांत अशा प्रकारच्या मनुष्यांचीं चार शिंगें आहेत. ह्यांतील एक शिंग सात इंच लांब असून करांगुलीएवढें जाड आहे. हें शिंग इ० स० १६७१ मध्यें डॉक्टर टेंपल यांनीं एलिझबेथ लो नांवाच्या एका बाईच्या डोक्यावरून पुष्कळ लोकांसमक्ष कापून काढिलें. दुसरी एक मेरी डेव्हीस नांवाच्या बाईची गोष्ट अशी सांगतात कीं, तिच्या वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षीं तिच्या डोकीवर एक टेंगूळ उठलें. तीस वर्षांनंतर ह्यांतून मेंढ्याच्या शिंगांसारखीं दोन शिंगें वर आलीं. ह्यांतील एक शिंग नऊ इंच लांब असून त्याचा परिघ दोन इंच होता. दुसरा एक इंग्लिश ग्रंथकार असें ह्मणतो कीं, अठराव्या शतकाच्या शेवटीं इंग्लंडमध्यें शिंगें असलेल्या दोन बाया होत्या. त्यांतील एका बाईचे डोकीवर पांच इंच शिंग आल्यानंतर तिनें तें उपटून काढण्याचा प्रयत्न केला. परंतु तें मध्येंच मोडलें, व नंतर कांहीं दिवसांनीं तें नाहींसें झालें. परंतु त्याच ठिकाणीं दुसरीं कित्येक नवीन शिंगें येत होतीं. अशा प्रकारचीं दुसरींही कित्येक उदाहरणें घडून आलीं आहेत. परंतु ह्यांत एक विशेष गोष्ट एवढी आहे कीं, हा रोग बहुतकरून स्त्रियांनाच झालेला आढळतो. पुरुषांना क्वचित्. एकदां मात्र एका जर्मन सरदाराच्या पाठीच्या कण्यांतून एक शिंग आलें होतें.

---

## पेट घेणारा मासा.

उत्तर अमेरिकेंतील कांहीं नद्यांमध्यें एक प्रकारचे मासे आढळून आले आहेत. ह्या माशांत तेलाचा भाग इतका असतो कीं तेथील लोक हे मासे वाळवून त्यांचा मेणबत्त्यांसारखा उपयोग करितात. ह्यांचा रंग पांढरा असून लांबी सुमारें एक फूट असते. तेथील लोक असें सांगतात कीं, हा मासा इतर माशांपेक्षां फार

चवदार आहे. प्रत्येक वर्षी कांहीं कांहीं वेळीं ह्या माशांचा नद्यांला इतका पूर येतो कीं, लोक जाळीं टाकून लक्षावधि मासे पकडतात, व सुमारें तीन चार आठवडेपर्यंत लोकांची सर्व उपजीविका ह्या माशांवरच चालते. शिवाय पुढील तरतुदीकरितां हे मासे तेथील लोक वाळवून ठेवितात. ह्यांचें तेल औषधोपयोगी असून काड नांवाच्या माशाचे तेलापेक्षां फारच रुचकर असतें. ज्या ज्या वेळीं तेथील लोकांस दिव्याची अगर मशालीची जरूर लागते त्या त्या वेळीं ते ह्या सुकविलेल्या माशांपैकीं एक मासा घेऊन त्याची शेपटी पेटवितात, व मग तो मासा मेणबत्तीसारखा शांतपणें खालपर्यंत जळतो, व त्याचा प्रकाश किंबहुना मेणबत्ती-पेक्षांही जास्त पडतो. परंतु ह्यांचा मशालीऐवजीं फार उपयोग होतो. तेथील लोकांचा ह्यांवर मोठा व्यापार चालतो.

ह्या पृथ्वीतलावर खरोखरी कोठें काय वस्तु आहेत, आजपर्यंत किती वस्तूंचा शोध लागला आहे, व अद्यापि कितींचा लागावयाचा आहे हें बरोबर रीतीनें कोणासही सांगतां येणार नाहीं. कारण कीं, रोजच्या रोज कित्येक वस्तूंचा ह्या भूपृष्ठावरून लोप होत चालला आहे, व तो लोप त्यांच्यामध्यें कांहीं फरक होऊन, अथवा त्यांच्याहून अगदीं भिन्न अशा कित्येक नवीन वस्तूंचा आगम होऊन होत आहे. डारविन साहेबांच्या शोधाप्रमाणें जर पाहिलें तर आज मित्तीस जे आपण मनुष्य आपला अधिकार जिकडेतिकडे स्थापन करण्यास झटत आहों ते आपण सर्व माकडांपासून उत्पन्न झालों आहों. वर्षाकालामध्यें जे आपण सुरवंट ( अथवा कुसरूड ) नांवाचे केसाळ व स्पर्श झाला असतां कंडू उत्पन्न करणारे एक प्रकारचे कीटक पाहतों, ते कांहीं दिवसांनीं पतंग होऊन उडूं लागतात. असें प्रत्येक वस्तूचें सारखें कांहींना कांहीं तरी रूपांतर होत चाललें आहे. ह्याप्रमाणें कांहीं देशांत कांहीं नवीन जनावरें, व समुद्रांत कांहीं नवीन जलचर सांपडले आहेत व सांपडत आहेत. एकदा तर हंगेरिया प्रांतांत दोघा धीवरांना मनुष्याच्या आकृतीचा एक प्राणी सांपडला होता. तो त्याच्या आकृतीवरून दहा वर्षांच्या एका मुलाएवढा दिसत होता.

त्याचा बांधा मजबूत असून त्याचे अवयव साधारण मनुष्याचे अवयवांपेक्षां बरेंच लांब होते. त्याचीं बोटें तर मनुष्याच्या बोटांपेक्षां दुपटीनें लांब होतीं. त्याच्या त्वचेवर खवले असून ते फार कठिण होते. त्याचें मस्तक अगदीं वाटोळें, त्याचे डोळे ल्हान, लखलखीत व खोल गेलेले, नाक वर आलेलें, व तोंड फार मोठें होतें. त्याला धरून आणिल्यावर त्यास बोलण्यास शिकविण्याचे लोकांनीं पुष्कळ प्रयत्न केले, परंतु ते सर्व निष्फल झाले. एका वर्षानंतर तो कपडे वापरूं लागला व आपलें पूर्वीचें अन्न जें गवत तें टाकून देऊन शिजलेलें अन्न खावयास लागला. त्याला संदकामध्यें पोहतांना फार आनंद होई, व त्यामध्यें तो इतक्या सफाईनें बुडे व पोहत असे कीं, लोकांना तें त्याचें जणू काय घरच आहे असें वाटे; व त्यांतून त्याला बाहेर काढण्यास फार आयास पडत. कांहीं दिवसांनंतर त्याला मोकळीक दिली. परंतु ही स्वतंत्रता प्राप्त झाल्यानंतर तो लागलींच पळून गेला. पुढें धीवर लोकांना दोनतीन वेळां तो आढळला होता. परंतु तो कोणाच्याही हातीं लागला नाहीं.

---

## शरीरांत फिरणाऱ्या सुया.

डाक्तर लोकांच्या पाहण्यांत असे कांहीं रोगी आले आहे कीं ते कांहीं कारण नसतां शरीरास अपाय करून घेण्यास न पचणाऱ्या पदार्थांचें सेवन करितात. कोणीही स्त्री किंवा पुरुष जाणूनबुजून टांचण्यांचें किंवा सुयांचें आंथरूण करून त्यावर निजण्याचा प्रयत्न करील असें होणें शक्य आहे, असें कोणासही वाटणार नाहीं. तथापि अशा कांहीं मुली व बायका पहाण्यांत आल्या आहेत कीं, त्यांनीं आपल्या शरीराच्या त्वचेच्या आंत टांचण्या व सुया टोंचून भरल्या इतकेंच नाहीं, तर एकाद्या पदार्थाप्रमाणें खाण्याच्या घशावाटें त्या गिळण्यासही सोडिलें नाहीं! आतां हें कबूल केलें पाहिजे कीं, असलीं बहुतेक उदाहरणें ज्या रोग्यांस अपस्मार झालेला असतो, त्यांत दृष्टीस पडतात,

आणि ह्मणून अशांविषयींचे बहुतेक लेख वेड्यांच्या इस्पितळांत सांपडतात. तथापि कित्येकदां असेंही दिसून आलें आहे कीं, दिसण्यांत ज्यांच्या मनास कोणत्याही प्रकारचा भ्रम झालेला नाहीं, अशांनींही कित्येक प्रसंगीं केवळ चैनीसाठीं सूचिभक्षण केलें आहे !

एकादे वेळेस सुई किंवा टांचणी मोडून मांसांत शिरली तर ती काढणें शस्त्रवैद्यांस फार कठिण जातें; कारण ती एकदा त्वचेखालीं गडप झाली ह्मणजे तिचा कांहीं एक मागमूस रहात नाहीं. यामुळें अदमासानें ती बाहेर काढण्यासाठीं मांसांत चिमटा घातला असतां ती बाहेर न निघतां अधिकच आंत जाते. यासाठीं धातूंचे तुकडे डोळ्यांत उडाले असतां ते काढण्यासाठीं बलवान् लोहचुंबकाचा उपयोग करितात. ज्या बाबतींत हे शरीरांतर्गत धातूंचे तुकडे कोठें असतील याचा बरोबर निश्चय करितां येत नाहीं, त्या बाबतींत दिङ्निर्णायक यंत्रांतील सूचीच्या कलावरून शरीरस्थ धातूंचा स्थाननिश्चय करण्यास पुष्कळ साहाय्य होतें.

अलीकडे दुसरी अशी एक युक्ति काढली आहे कीं, एका हस्तिदंती शलाकेंत दोन तारा बसवून त्या विद्युन्मय घंटांस लाविलेल्या असतात. त्यामुळें ही शलाका मांसांतून जाऊं लागली म्हणजे तीस जोडलेल्या तारांच्या शरीरांतील धातूच्या तुकड्यांशीं स्पर्श झाला कीं घंटा वाजूं लागतात. त्याबरोबर अमुक ठिकाणीं धातूचा तुकडा असावा असा निश्चय करितां येतो.

शरीरांत धातूचा एक तुकडा गेला असतां तो शोधून काढण्यास जर इतका त्रास पडतो, तर ज्या रोग्यांच्या शरीरांत शेंकडों सुया भ्रमण करीत असतील त्यांच्या यातना दूर करणें किती कठिण आहे बरें ! एका फ्रेंच डाक्तरानें एका बाईविषयीं असें लिहून ठेविलें आहे कीं, ती मेली त्या वेळेस तिच्या शरीराच्या निरनिराळ्या भागांतून पंधराशें सुया काढिल्या ! दुसऱ्या एका मुलीच्या आंगांतून तीनशें वीस सुया काढण्यांत आल्या. त्या तिनें गिळल्या होत्या किंवा मांसांत टोंचून घेतल्या होत्या याचा निर्णय कधींच करितां आला नाहीं. या गोष्टींत एक चमत्कार दिसून

येतो तो हा कीं, असल्या पदार्थांपासून या नादिष्ट लोकांच्या प्रकृतीस कोणत्याही प्रकारची क्षिणता आल्याचें चिन्ह दिसत नाहीं. वर ज्या मुलीचें उदाहरण सांगितलें आहे तिची तर कांहीं विलक्षणच स्थिति होती. तिच्या शरीरांतील सुया एकामागून एक त्वचेंतून आपलीं डोकीं वर काढीत व पुनः अदृश्य होत. या रीतीनें एके दिवशीं साठ सुया दृष्टीस पडल्या, व त्या दृष्टीस पडण्यापूर्वीं तिचें अंग थोडेंसें तिडकल्यासारखें होऊन तिला थोडा तापही आला होता. दुसऱ्या एका मुलीची एक अत्यंत विश्वसनीय गोष्ट आहे. तिनें पुष्कळच सुया आणि टांचण्या गिळल्या होत्या व त्या तिच्या शरीरांत असल्याचें कांहींएक चिन्ह न दृष्टीस पडतां, त्यांत त्या दोन वर्षें भटकत होत्या. दोन वर्षें नऊ महिने झाल्यावर सुमारें दोनशें सुया व टांचण्या तिच्या हाताच्या, दंडाच्या, गळ्याच्या, आणि इतर ठिकाणच्या त्वचेंतून बाहेर निघाल्या. डब्लिन येथील एका शास्त्रीय मंडळीपुढें एका बाईचें प्रेत आणिलें होतें, तिच्या शरीरांतून तीनशें सुया काढल्या व त्यांनींच ती मेली असावी, असें मंडळीनें आपले दप्तरीं लिहून ठेविलें आहे. परंतु विशेष आश्चर्य करण्याजोगी गोष्ट ही कीं, बहुतेक बाबतींत अशा प्रकारच्या मूर्खपणाच्या वागणुकीचा परिणाम चैतन्यक्रियेवर फारसा होत नाहीं, व त्याहूनही विशेष अद्भुत गोष्ट ही कीं, अशा प्रकारचे लोक मेल्यावर त्यांचीं शरीरें कापून पाहतां ते या सुयांमुळें मेले असावेत असें दिसून येत नाहीं !

---

## न्यूयार्क येथील हवेंत चालणाऱ्या आगगाड्या.

ज्या लोकांस असें वाटत असेल कीं, इंग्लंडांत जी विपुल संपत्ति आहे ती तेथील लोकांना हिंदुस्थानामुळें प्राप्त झाली आहे, त्यांनीं, इंग्लंडांतील चारपांच कोटी लोक किती माल उत्पन्न

करितात, त्यांच्या हातून व्यापाराची केवढी घडामोड होते, व ती सुलभ व सुखावह होण्यासाठीं त्यांनीं केवढ्या खर्चाच्या व युक्तीच्या सोयी केल्या आहेत, याचा क्षणभर विचार केला असतां, त्यांचा तो भ्रम तेव्हांच दूर होईल. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें, ज्यांना युनायटेड स्टेट्स असें ह्मणतात, हीं तर हिंदुस्थानासारख्या देशावर राज्य करणारीं नाहींतना ? तथापि तेथील लोक प्रतिवर्षी किती संपत्ति उत्पन्न करितात तें पहा, ह्मणजे राष्ट्राची भरभराटी ही त्यानें जिंकलेल्या देशावर अवलंबून असत नाहीं तर, खुद्द त्यांतील लोकांच्या परिश्रमावर व कल्पकतेवर अवलंबून असते, हें स्पष्टपणें दिसून येईल. ही गोष्ट वाचकांच्या ध्यानांत बरोबर रीतीनें उतरून देण्यासाठीं आह्मी आज न्यूयॉर्क येथील आकाशगामी आगगाड्यांची थोडी हकीकत देण्याचा विचार केला आहे.

न्यूयार्क शहराचा विस्तार व तेथील लोकसंख्या हीं लंडनच्या विस्ताराहून व लोकसंख्येहून फारच कमी आहेत, तरी लंडनच्या लोकांप्रमाणें न्यूयार्कच्या लोकांसही सामान्य रस्त्यांनीं व्यापाराची घडामोड करण्याची व एकमेकांशीं दळणवळण ठेवण्याची जी सोय असते, तीहून दुसरी एकादी विशेष बरी सोय निघाली तर बरें, असें त्यांस वाटून त्यांनीं ही खांबांवर घातलेल्या आडव्या तुळवटांत बसविलेल्या रुळांवरून आगगाड्या चालविण्याची युक्ति काढली. लंडन येथें या कामासाठीं पातालगामी आगगाड्या केल्या आहेत. एका दृष्टीनें पाहतां खांबांवर चालणाऱ्या गाड्या जमिनीखालीं चालणाऱ्या गाड्यांपेक्षां बऱ्या; कारण एक तर ह्या गाड्या फारच हलक्या व हवाशीर असून त्यांना धुळीचा मुळींच उपद्रव होत नाहीं; आणि जमिनीखालच्या रस्त्यापेक्षां यांच्या रस्त्याला खर्चही कमी पडतो; कारण हें करण्यांत नाले, पाण्याच्या तोट्या, धुराच्या नळ्या किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कोणत्याही गोष्टींची दिशा बदलावी लागत नाहीं; तसेंच मोठमोठीं घरें विकत घ्यावीं लागत नाहींत, किंवा प्रकाश आणि हवा हीं मिळण्याची अडचण पडत नाहीं. दुसऱ्या पक्षीं या गाड्या कितीही हलक्या व सुरेख केल्या तरी त्यांच्यामुळें रस्त्यास ज

वैरूप्य येतें तें कांहीं कमी होत नाहीं. शिवाय, हेंहीं कबूल केलें पाहिजे कीं, अगदीं अरुंद गल्ल्यांतून या गाड्या नेतांना फार पंचाईत पडते, आणि गाडी चालली असतां खालच्या जमिनीवरील रस्त्यानें चालणाऱ्या गाड्यांचें घोडे आणि इतर जनावरें फार बुजतात.

या रस्त्यांचीं एक दोन चित्रें देण्याची सोय आह्मांपाशीं असती तर तीं पाहून त्यांची कल्पना आमच्या वाचकांच्या मनांत ती जितकी स्पष्ट उतरती, तितकी ती त्या रस्त्यांचें कितीही वर्णन केलें तरी उतरण्याचा संभव नाहीं. तथापि, ‘ दगडापेक्षां वीट मऊ, ’ या न्यायानें केवळ शब्दानें थोडीशी कल्पना देण्याचा प्रयत्न करितो. या गाड्या रुळांवरून खालीं येऊं नयेत ह्मणून रुळांपासून थोड्या उंचीवर भक्कम लोखंडी तुळया मधून मधून बसविलेल्या असतात. अलीकडे जे रस्ते बांधले आहेत त्यांवर या तुळया रुळांच्या बाहेर न घेता आंत घेतल्या आहेत; आणि बाहेरच्या अंगास मोठमोठीं लोखंडी तुळवटें बसविलीं आहेत. एकदा असा विचार केला होता कीं, एका ठिकाणीं स्थाईक असलेल्या इंजिनानें आणि साखळदंडानें या गाड्या चालवाव्या, पण पुढें तो रद्द होऊन गाडीबरोबर जाणारींयेणारीं इंजिनें लावण्याचाच बेत कायम झाला; मात्र हीं इंजिनें फार हलकीं असावीं असें ठरलें. अमेरिकेंतील गाड्या लांबच लांब असल्यामुळें प्रत्येक डब्यास पुढल्या दोन चाकांवर तीं हवीं तशीं फिरवितां येण्याची सोय केलेली असते. त्यामुळें साध्या गाड्यांप्रमाणें आगगाड्यांचे डबे थोड्या जागेंत पाहिजे तसे वळवितां येतात. भाड्याच्या दरांची व्यवस्था फारच सोपी केली आहे. सकाळचे पांच आणि आठ, व संध्याकाळचे साडेचार आणि साडेसात यांचे दरम्यान पाहिजे त्या स्टेशनाहून दुसऱ्या पाहिजे त्या स्टेशनास जाण्यास एक आणा आठ पै द्याव्या लागतात, व इतर वेळीं तीन आणे चार पै द्याव्या लागतात. हें भाडें दूरच्या अंतरावर जावयाचें असलें म्हणजे बरें पडतें, पण जवळपास कोठें जावयाचें असतां ट्रॅमवेनें जाणें अधिक हलकें पडतें. या गाड्यांचे दर सर्व ठिकाणीं जाण्यास सारखेच असतात, पण ते वरच्या दरांपेक्षां निम्मे आहेत. यावरून पहातां

असें दिसतें कीं, आगगाडीनें किंवा ट्रॅमवेनें न्यूयॉर्क येथें प्रवास करणें हें लंडन येथील प्रवास करण्यापेक्षां थोडें महाग आहे; पण कसेंही झालें तरी यांच्या ऐवजीं घोड्यांची गाडी करणें बरें पडत नाहीं. या गाडीस पहिल्या दान मैलांकरितां दोन रुपये एक आणा चार पै पडतात व त्यापुढें प्रत्येक तासास तितकेंच भाडें द्यावें लागतें. न्यूयॉर्क शहराचा नकाशा पुढें ठेविला असतां असें दिसून येईल कीं, तें शहर साडेतेरा मैल लांब व सव्वादोन मैल रुंद अशा एका नागमोडी किनाऱ्याच्या बेटावर बांधिलेलें आहे. त्याचें क्षेत्रफळ सरासरी बावीस मैल आहे, आणि लांबीस धरून तें नैऋत्य दिशेकडून ईशान्य दिशेकडे वसत गेलेलें आहे. तें पाहिल्या-बरोबर जी गोष्ट एकदम लक्षांत येते ती ही कीं, तेथील आडवे उभे रस्ते अत्यंत सरळ रेषेंत असल्यामुळें, व ते एकमेकांस वलांडून गेले असल्यामुळें, सारें शहर, इमारतींनीं गजबजलेल्या चौकोना-सारखें दिसतें. आडव्या रस्त्यांचीं पहिलीं नांवें कायम ठेविलीं असून प्रत्येकावर त्याचा नंबर असतो. उभ्या रस्त्यांस अळ्या असें नवें नांव ठेवून त्यांवरही नंबर घातले आहेत. या प्रकारचे बारा उभे आणि एकशें नव्वद जुने असे रस्ते आहेत. यांपैकीं दुसऱ्या, तिसऱ्या आणि सहाव्या आणि नवव्या रस्त्यां-वरून आगगाड्यांचे रस्ते बांधले आहेत. यांचा नैऋत्य टोंकास आरंभ आणि ईशान्य टोंकास शेवट होतो. याखेरीज आगगाड्यांचे आडवे रस्ते बरेच आहेत. शहराच्या मध्यभागीं दोनशें पन्नास यार्डांच्या अंतरावर आकाशगामी आगगाड्यांचे दोन समांतर रस्ते पांच मैल लांबीचे काढिले आहेत. चार वर्षांपूर्वीं हे रस्त जेमतेम नऊ मैल होते. आजमित्तीस सव्वीस मैलांवर आगगाड्या चालू आहेत. या आकाशस्थ रस्त्यांशिवाय न्यूयॉर्क येथें चवदा पंधरा मैल लांबीचे लोखंडी रस्ते जमिनीवर आहेत.

केवळ लोकसंख्येचाच विचार केला असतां इतक्या लोखंडी रस्त्यांची गरज दिसत नाहीं. सन १८८० सालीं न्यूयॉर्क येथें १२०६५०० लोक होते. पण यावरून याची लंडनशीं तुलना करणें बरोबर नाहीं. लंडनप्रमाणें याच्या आसमंतांतील वाड्यांच्या

वस्तीचा समावेश केला तर याची लोकसंख्या पंचवीस लक्षांजवळजवळ येईल. या वाड्यांत लोक केवळ राहतात असेंच नाहीं; त्यांत कामधंदाही पुष्कळ चालतो. न्यूयॉर्क येथून त्यांस जाण्याकरितां क्वचित् स्थलीं पूल बांधले आहेत, व होड्या मात्र सर्वत्र आहेत. पुनः व्यापारदृष्टीनें ज्यांस या शहराचें महत्व समजण्याची इच्छा असेल त्यांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, युनायटेड् स्टेटस्‌च्या परदेशांशीं होणाऱ्या व्यापाराच्या तीन पंचमांशाचा संबंध या शहराशीं घडतो; आणि येथें प्रतिवर्षी वीस हजार जहाजें येतात आणि येथून जातात.

या सर्व गोष्टींचा विचार करितां असें दिसून येईल कीं, वर वर्णिलेल्या लोखंडी रस्त्यांशिवाय या शहरांत ट्रामवेचे रस्तेही अनेक असावेत, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ट्रामवेचे एकंदर सव्वाशें रस्ते आहेत, पैकीं सतरा आडवे व नऊ उभे आहेत; यांखेरीज निरनिराळ्या देशांत यांच्यासारख्या शाखा आहेत, तथापि व्यापार जो होतो तो बहुशः या आश्चर्योत्पादक आकाशगामी अथवा ( खेचर ) आगगाड्यांनीं होतो.

---

## ऊंस व साखर.

आपल्या अन्नांत साखर अगदीं अवश्य आहे, असा समज हल्लीं प्रत्येक सुधारलेल्या देशांत झाला आहे. ज्या देशांत गेल्या शंभर दीडशें वर्षांपूर्वी साखर हा केवळ औषधी पदार्थ मानला जात असे, तेथें सध्यां हजारों खंडी साखर खपते. जगांत एकंदर जी साखर वर्षास खपते ती एकत्र जमा करून तिचा शंकूसारखा ढीग केला तर त्याची उंची १८०० फूट होईल व पायाचे वर्तुलाचा व्यास ६६० फूट होईल! निरनिराळ्या देशांची संपत्ति व सुधारणा यांची तुलना करणें झाल्यास कांहीं एक प्रकारचा जिन्नस त्यांत किती खपतो हें पाहतात. कोणी ह्मणतात कीं, साबण किती खपतो हें पहावें. बहुतेक लोक देशांत कागद किती खपतो, हें पाहून त्यांची संपत्ति व सुधारणा ताडितात.

हेंच अनुमान धरून आपण चाललों, तर अमेरिकेंतील लोकसत्ताक राज्य पहिलें येतें. तेथें दरवर्षास ९९०००० टन कागद खपतो! याखालोखाल जर्मनी. तेथें २४०००० टन कागद खपतो, व याखालीं दुसरीं राष्ट्रें. पण साखरेवरून जर देशाच्या संपत्तीचा अंदाज केला तर इंग्लंड देशाचा नंबर पहिला येतो. तेथें दरवर्षी माणशीं ७२ पौंड ह्मणजे ३६ शेर साखर लागते! दुसरें अमेरिकेंतील युनायटेड स्टेट्स् हें राष्ट्र. येथें माणशीं ४४ पौंड ह्मणजे २२ शेर साखर खपते. तिसरा फ्रान्स देश, येथें माणशीं सारी २४ पौंड ह्मणजे १२ शेर, व चवथा जर्मनी देश, येथें माणशीं अवघी १५ च पौंड ह्म० ७॥ शेर साखर लागते.

जगांत जी साखर खपते ती सारी उंसाचीच करितात असें नाहीं. एकंदर पांच सहा झाडांपासून ती काढितात. पण मुख्यत्वें **ऊंस** व **बीट** यांपासून साखर काढण्याचे कारखाने फार आहेत. सर्व देशांत एकंदर अदमासें जी १०६२६०००००० पौंड साखर खपते त्यांपैकीं उंसापासून ९०३८०००००० पौंड व बीट झाडापासून ९९८८०००००० पौंड साखर काढितात.

पहिल्यानें उंसापासूनच साखर काढण्याचा प्रचार होता. प्राचीन व अर्वाचीन ग्रंथ आणि दुसरे आधार यांवरून असें दिसतें कीं, हिंदुस्थान व चीन देश यांतच उंसाची लागवड करून साखर काढण्याची चाल असे. या देशांत निदान दोन हजार वर्षांपूर्वी तरी साखरेची माहिती लोकांस होती, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. **इजिप्त, फिनीशिया** व **जूडिया** यांतील अत्यंत प्राचीन ग्रंथांत कोठेंही साखरेविषयीं कांहीं लिहिलेलें सांपडत नाहीं. युरोपखंडांतील लोकांस इकडील ज्या वस्तूंची माहिती झाली त्यांतील साखर ही पहिली होय. ग्रीक वैद्यांस प्रथम इकडील साखर पाहण्यास मिळाली, व ते साखरेस हिंदी मीठ ह्मणत असत! तेराव्या शतकाचे सुमारास जेव्हां इकडील व्यापाऱ्यांनीं अरबस्थानाशीं व्यापार सुरू केला तेव्हां साखर पहिल्यानें तिकडे जाऊं लागली. तेव्हांची साखर गुळा-सारखी किंवा अगदीं हलक्या प्रतीच्या खडीसाखरेसारखी होती.

**म्युसिरिस, ऑरमस** वगैरे ठिकाणीं जेव्हां इकडून प्रथम ही साखर गेली तेव्हां तेथील लोकांस हा कांहीं विलक्षण पदार्थ आहे असें वाटलें! इकडील व्यापारी त्यांस अर्थातच साखर कशापासून व कशी काढितात हें सांगेनात! तेथील कांहीं लोकांनीं तर्क केला कीं, हा एक प्रकारचा मध असावा! कोणी ह्मणाले कीं, गारांचा वर्षाव होतो, किंवा झाडांचे पानावर दंव सांचतें, त्याप्रमाणें ह्याची उत्पत्ति असावी; व कोणी तर असें ह्मणालें कीं हा एकाद्या झाडाचा डिंक असावा!

प्रथम पश्चिमेकडील लोकांस बरेच दिवस साखर कशी व कशाची करितात, हें कळलें नाहीं. परंतु पुढें तिकडील कांहीं लोक जेव्हां इकडे आले तेव्हां ते ती सर्व माहिती घेऊन गेले. पंधराव्या शतकाच्या अंतीं **व्हेनीशिअन** लोक युरोपखंडांत ही कला घेऊन गेले. इंग्लंड देशांत साखरेचा कारखाना प्रथम इ० स० १५४४ त सुरू झाला. यानंतर तिकडे पुष्कळ नवीन युक्त्या निघून हल्लीं साखर करण्याचीं उत्तम यंत्रें व गिरण्या निघाल्या आहेत. पण इकडे व चीन देशांत जीं अत्यंत पूर्वी साखर किंवा गूळ करण्याचीं साधनें होतीं तीं तशींच आहेत! हल्लीं हल्लीं कोठें थोडी थोडी सुधारणा होत आहे. पूर्वींचा जो लांकडी चरक, अतिशय बोजड, लौकर मोडणारा व मैल दीडमैलावरून ऐकूं येणारा तो सध्या पुण्यांतील बऱ्याच शेतकऱ्यांनीं सोडिला आहे, व त्याच्या ऐवजी ते लोखंडी चरक घेऊं लागले आहेत. हा चरक येथील बुद्धिमान् कारागीर सुबराव रावजी यांणीं केला आहे. यांत घर्षणापासून नुकसान होऊं नये अशी तजवीज केली आहे व याचे तुकडे करून बैलाच्या गाडींतून नेऊन शेतांत पुनः हा उभा करितां येतो.

आमच्या शेतकऱ्यांची दरिद्रता, जमिनीची दैना, व सावकारांचा जुलूम यामुळें उंसापासून हवें तितकें उत्पन्न होत नाहीं. येथील वुड्रो साहेबांचें असें मत आहे कीं, एक एकरभर उंसांत खपणाऱ्या शेतकऱ्यास साधारण मजुराच्या वेतनापेक्षां सारे २० किंवा पराकाष्ठा ३० रुपयेच एकंदर जास्त मिळतात. पुण्याच्या

आसपास इरिगेशन खात्याकडून पाणी घेतलें, किंवा विहिरींचें पाणी मोटेनें काढिलें, तरी खर्च साधारण तितकाच येतो. एक एकर उंसास साधारणपणें १७९२० ग्यालन पाणी द्यावें लागतें व ऊस कांपणीस येईपर्यंत तीस वेळां पाणी द्यावें लागतें. विहिरींची उंची अदमासें २५ फूट धरून, मोटेनें २००० ग्यालन पाणी काढण्याची मजुरी २ आणे धरिली, तर एकंदर खर्च ३३ रुपये ९ आणे ७ पै येतो. इरिगेशन खात्याकडून पाणी घेतलें तर एक एकरास २५ रुपये पडतात. पण विहिरींच्या पाण्याच्या खर्चांत जे ८ रुपये ९ आणे ७ पै जास्त येतात त्यांत बैल बिनमजुरी तेथल्या तेथें चारणीस असतात. एकूण कोणत्याही पाण्यास तितकाच खर्च येतो. याशिवाय पाणी फोडण्याची मजुरी एक एकरास २३ रुपये येते. जमीन नांगरणें, फाळणें, वगैरेबद्दल २६ रुपये लागतात. यांतच मातीचीं ढेंकळें वगैरे फोडून जमीन तयार करण्याचा खर्च आपण धरूं. खतास निदान १२० रुपये पडतात. साधारणतः लोक आतां जें खत घेतात त्याचा हा खर्च लिहिला आहे. खतामध्यें हाडांचा उपयोग करावा किंवा नाहीं; त्याचा खर्च किती येईल; तसेंच माशांचें खत सध्यां ३८॥ रुपये टनप्रमाणें मिळतें, त्याचा उपयोग केला तर किती खर्च येईल; वगैरे गोष्टींचा विचार सध्या आपण करीत नाहीं. लागणीस जें उंसाचें बेणें द्यावें लागतें त्याचा खर्च रु० ३०, उंसाची लागवड वगैरेची मजुरी रु० १२; उंसाच्या भोंवतीं कुंपण करण्यास व राखणावळ मिळून रु० १०. इतके रुपये आपल्या शेतकऱ्यास कर्जी काढावे लागतात. त्यांचें व्याज २७॥ रुपये, व जमिनीचा फाळा रु० २५. याप्रमाणें एकंदर उंसाची लागवड करून ऊस कांपणीस येईपर्यंत खर्च २९८ रु० ८ आणे लागतो. एकरभर उंसाचें गुऱ्हाळ बहुतेक सोळा दिवस जातें. आतां ऊस कापून फडांतून गुऱ्हाळाकडे नेण्यास १० मनुष्यांची ५ आणे प्रमाणें मजुरी रु० ५०. उंसाचा घाणा जर भाड्यानें घेतला तर दिवसास १ रुपयाप्रमाणें भाडें द्यावें लागतें. शिवाय, गुळी व जळी व गडी यांची मजुरी रु० १४, बैलाच्या किमतीचें

व्याज रु० ८, व किरकोळ खर्च कापड, दिवा, छप्पर वगैरेस रु० ३. एकूण गूळ तयार करण्यास खर्च ८३ रु० ८ आणे व उंसाचे लागवडबिद्दल वगैरे खर्च रु० २९८—८ मिळून रु० ३८२ लागतो.

आतां एका एकरांत सरासरी ३०४८ शेर गूळ होतो. एक पल्ला ह्मणजे १२०· शेर, व वाढाव्याबद्दल ७ शेर पल्ल्यावर जास्त द्यावे लागतात, म्हणजे शेतकऱ्यास एका एकरांतील गुळास २४ पल्ल्यांची किंमत येते. दर पल्ल्यास १२ आणे दलाली वजा करून, १६ रु० ४ आणे पल्ल्याप्रमाणें गुळाची मिळकत ३९० रु० व पालापाचोळा वगैरे मिळून एकंदर उत्पन्न ४०२ रु० होतें, व खर्च वर दाखविल्याप्रमाणें रु० ३८२ होतो. ह्मणून शेतकऱ्यास सरासरी २० रुपयेच फायदा होतो! काटकसर बरीच केली तर, पराकाष्ठा ३० रुपये प्राप्ती होईल! यावरून पहा कीं, इतके श्रम करून व इतकें जोखमीचें काम करून बिचाऱ्यास मिळकत अगदींच कमी! मेहनत कमी झाली, किंवा कोठें कसूर झाली अगर राखण्यांत ढिलाई झाली, तर जमाखर्च बरोबर, व बिचारा कोरडा तो कोरडाच, किंबहुना एकादे वेळीं आंतबट्ट्याचाच धंदा व्हावयाचा!

---

# झोंप.

प्राणिमात्राचे श्रम परिहार करणारी, दुःखांस व यातनांस विसर पाडणारी, क्षणमात्र चिंता दूर करणारी, व मनास आणि शरीरास आराम देणारी अशी अजब चीज कोणती आहे बरें? अर्थात निद्रा. ज्यांना ही निद्रा सहज-प्राप्त होते, त्यांना तिचें कांहींच महत्व वाटत नाहीं. पण ज्यांना ती हवी असते, त्यांना ती न मिळाल्यास अतिशय त्रास भोगावा लागतो. या कुंभकर्ण-प्रियेचा साराच क्रम अगदीं विचित्र आहे! भव्य मंदिरें, दिव्य शरीरलावण्य, अनंत लक्ष्मी, इत्यादि जिनसांस सामान्य कामिनी लुब्ध होतात; गरीबगुरीबांकडे त्यांना ढुंकून सुद्धां पहावेंसें वाटत नाहीं! निद्रेची तशी गोष्ट नाहीं. राजवाड्यांतील

पुष्पखचित शय्या तिचें आवडतें विलासस्थान असत नाहीं! दुपारपर्यंत ओरओरडून पांखरें हांकतां हांकतां थकून गेलेल्या कुणब्याचा माळा, किंवा मासे पागतां पागतां शिणून जाऊन आंग टाकण्याविषयीं उत्कंठ झालेल्या धीवराचा नदीच्या कांठचा तापलेला काळा ठिक्कर खडक, किंवा चारही दिशांनीं वाहणाऱ्या वाऱ्यास ज्यांत आंत बाहेर हव्या तितक्या वेगानें जाण्यायेण्याची पूर्ण परवानगी असते असें एकाद्या भिकार धनगराचें मोडकळीस आलेलें खोंपट हीं या निद्रेस जितकीं आवडतात, तितके रुप्याचे छपरपलंग आणि त्यांवरील किनखापाच्या गाद्या आवडत नाहींत! सारांश, ही सांपडूं नये तेथें सांपडते, व ज्यांना भाळूं नये त्यांना भाळते!

असें जरी आहे तरी हिची थोडीबहुत कृपा असल्याशिवाय मनुष्यास फार दिवस जिवंत राहतां येणार नाहीं. आपल्या वाणीनें श्रोतृसमुदायाच्या मनोवृत्तींस कधीं भरती व कधीं ओहटी आणणाऱ्या महान् वक्त्यास, तोफांच्या व बंदुकांच्या गोळ्यांच्या वर्षावास तोंड देऊन जिवाची पर्वा न करतां हातावर शीर घेऊन शत्रूवर चालून जाणाऱ्या वीरास, शांत व एकांत स्थानीं बसून अनेक तास शास्त्रचिंतन करणाऱ्या अथवा ग्रंथ लिहिणाऱ्या तत्वज्ञान्यास, द्रव्यार्जनासाठीं कृष्णपक्षांतील मध्यरात्रीच्या सुमारास वेषांतर करून व सशस्त्र होऊन, धनाढ्यांचीं घरें फोडण्यास निघणाऱ्या चोरास, सारांश, या पृथ्वीतलावरील प्रत्येक स्थितींतील व वर्गांतील मनुष्यास निद्रेवांचून फार दिवस कंठितां येत नाहींत. ज्यावर तिची पूर्ण अवकृपा झाली त्याचें दुर्दैव पुरें ओढवलें म्हणून समजावें! ज्याला ही बराच काल प्राप्त झाली नाहीं तो ती प्राप्त होण्याकरितां काय पाहिजे तें बोलण्यास व करण्यास तयार होईल!

यावरून झोंप ही मनुष्याच्या अनामयास किती अवश्यक आहे हें वाचकांच्या लक्षांत आल्याखेरीज राहणार नाहीं. झोंप लागली म्हणजे थकलेल्या गात्रांस विश्रांति सांपडून तीं ताजींतवानीं होतात, आणि तीं तशीं झालीं म्हणजे आपणांस पुनः उद्योगास लागावेंसें वाटतें. झोंपेशिवाय शरीराची वाढ चांगल्या प्रकारची व्हावयाची नाहीं; झोंपेशिवाय प्रकृति निरोगी रहावयाची नाहीं; झोंपेशिवाय

मनाचे व शरीराचे व्यापार नीट चालावयाचे नाहींत. निश्चित प्रमाणापेक्षां ही अधिक व कमी घेण्यानें नुकसान होतें. अगदीं लहान मुलास बारापासून पंधरा तास झोंप पाहिजे. तरुण पुरुषास सातपासून आठ, व तरुण स्त्रीस आठपासून नऊ तास झोंप पाहिजे. वृद्ध पुरुषांस व स्त्रियांस चार किंवा पांच तास झोंप बस होते. नुकतींच उपजलेलीं मुलें अठरा किंवा वीस तासपर्यंत निजतात. तात्पर्य, वयाच्या व उद्योगाच्या मानानें हवी तितकी झोंप मिळाली तरच प्रकृति नीट रहाण्याचा संभव असतो. झोंप न येणें व फार येणें हीं दोन्ही प्रकृति नीट नसल्याचीं किंवा तींत कांहीं तरी बिघाड होऊं लागल्याचीं चिन्हें होत. असो; आतां या कुंभकर्ण-प्रियेच्या विशेष कृपेचीं कांहीं उदाहरणें देऊन तिचा निरोप घेतों. सन १७५६ त इंग्लंडांतील कांहीं वैद्यांपुढें **इलिशाबेथ आरविन** नांवाच्या एका बाईच्या रोगाची चिकित्सा झाली तींत असें निष्पन्न झालें कीं, ही बाई दहा वर्षेपर्यंत प्रत्येक दिवशीं चोवीस तासांपैकीं सतरा तास निजत असे, व १७३८ सालीं ही चार दिवस एकसारखी निजली होती! डाक्टर **बॉडी** असें म्हणतो कीं, या बाईस जागें करण्यासाठीं नानातऱ्हेचे उपाय केले—तिच्या पाठीला मध चोपडून ती मधमाशांकडून चावविली, टांचण्या टोंचल्या, व चाबूक ओढून पाहिले, पण ती म्हणून कांहीं केलें तरी जागी झाली नाहीं! पुढें जेव्हां ती आपोआप जागी झाली तेव्हां ती जणू काय पुरेशी झोंप न मिळाल्यामुळें खिन्न झाल्यासारखी व संतापून गेल्यासारखी दिसली! याच वैद्याच्या पहाण्यांत दुसरी एक बाई आली होती, तिची हकीकत फारच विलक्षण आहे. या बाईचें वय सुमारें तेवीस वर्षांचें असून ती अगदीं निरोगी होती. एकदा हिच्या एका मैत्रिणीच्या शरीरावर शस्त्रवैद्यांनीं विशेष अवघड असा शस्त्रप्रयोग करण्याचा विचार ठरविला. तो हिच्या मनांत पहाण्याची इच्छा उत्पन्न झाल्यामुळें तो करतांना हिला जवळ उभें राहूं द्यावें असें ठरलें. पुढें उद्यां तो प्रयोग होणार तर आज ही बाई त्याचें चिंतन करीत आंथरुणावर जी पडली ती त्या

प्रयोगाच्या यातनांच्या कल्पनेनें अगदीं भांबावून गेली, व अखेरीस सकाळ होण्यापूर्वीच तिला अपस्माराचा झटका येऊन जी झोंप लागली ती त्रेसष्ट तासपर्यंत राहिली! मोठमोठे डाक्तर आले व त्यांनीं परीक्षा करून असें ठराविलें कीं, हिला जागी करण्यास तुंबडी लाविली पाहिजे. त्याप्रमाणें तुंबडी लावून तिला जागी केल्याबरोबर पुनः अपस्माराचा झटका आला, व त्यासरशी तिला जी गाढ झोंप लागली ती एक सगळा पंधरवडा टिकली! पुढें सुमारें एक वर्षभर ती नेहमींप्रमाणें सात आठ तास निजत असे. पण त्यानंतर कांहीं कारण नसतां एकाएकीं तिची प्रकृति बिघडली, व पुनः लांब झोंपेचा प्रकार सुरू झाला; तो असा कीं, बारा वर्षांत ती सारखी तीसपासून चाळीस तास निजत असे! यानंतर ती पुनः पूर्वस्थितीवर आली, व त्या स्थितींत सहा महिने गेल्यावर फिरून अठ्ठेचाळीस तास निजूं लागली! हा शेवटचा विकार होण्यापूर्वीं तिला दोनतीन महिने मुळींच झोंप आली नाहीं. हिच्या लांब झोंपेचा आरंभ सुमारें मध्यरात्रीच्या सुमारास होई, व तींतून ती उठली म्हणजे तिला जागें रहाण्याची मोठी भीति वाटे!

याच बाईसारखी **नॉर्फॉक** नांवाच्या कौंटींतील **इलिझाबेथ परकिन्स** नांवाच्या बाईची गोष्ट सांगतात. ही बाई आठव-ड्यापैकीं एकच दिवस जागी असे! एकदा ती झोंपेंतून उठली ह्मणजे तिला जागी ठेवण्यास, व एकदा निजली म्हणजे तिला पुनः जागी करण्यास फार प्रयास पडत. पुढें एका ‘नाडीपरीक्षद रसशेंदुरमात्रावैद्या’ नें तिची परीक्षा करून तिच्या आप्तांची अशी खात्री केली कीं, ‘ही झोंपेचें थोतांड करीत आहे; हिची झोंप खरी नाहीं. परवानगी मिळेल तर हिचा रोग काढून टाकण्यासारखा आहे.’ वैद्यबुवांनीं अशा प्रकारची खाशी थाप दिल्यामुळें आप्तांनीं प्रयत्न करून पहाण्यास रुकार दिला. तेव्हां या राजश्रीस उपाय करणें भाग पडलें. टाण्याटोण्यांनीं जागी होत नाहीं असें पाहून, या गध्ध्यानें कांहीं तीव्र विषारी वनस्पतींच्या मुळ्यांचा रस काढून तिच्या नाकांत घातला! या रसानें ती जागी तर झाली नाहींच; पण बिचारीच्या नाकाला, ओंठाला,

आणि चेहऱ्याला मोठमोठे फोड येऊन चामड्याचे कळपे निघाले!

ब्रिटिश संग्रहालयांत एक पुस्तक ठेविलें आहे, त्यांत **निकोलास हार्ट** नांवाच्या एका **डचमन्**विषयीं अशी गोष्ट सांगितली आहे कीं, याचा जन्म होण्यापूर्वीं याची आई पांच दिवस अहोरात्र निजली होती, व याचा जन्म झाल्याबरोबर बाळबाळंतिणीस पुनः पांच दिवस गाढ झोंप लागली! पुढें प्रतिवर्षीं आगष्ट महिन्यांत वाढदिवसाचे रात्रीं या मुलास झोंप लागे ती पांच दिवस टिके!

दीर्घ निद्रेच्या गोष्टी अगदीं अलीकडच्या आहेत असें नाहीं. ग्रीक व रोमन लोकांतील जिज्ञासु गृहस्थांनीं आपल्या पहाण्यांत आलेल्या व लिहून ठेवलेल्या गोष्टींपैकीं कित्येक अद्यापि प्रसिद्ध आहेत. **प्लुटिरसा**च्या वेळेस एक गृहस्थ तीन दिवस एकसारखा निजून होता. **ॲरिस्टॉटल्नें** एका बाईविषयीं असें लिहून ठेविलें आहे कीं, ती घरांतील माणसांचा डोळा चुकवून कोठें तरी जाऊन निजे ती दोन किंवा तीन महिने! अकराव्या **ग्रेगरी** नांवाच्या पोपाच्या कारकीर्दींत एक गृहस्थ भिंतीमागें लपविलेल्या एका पेटींत सात वर्षें निजून राहिला! घरच्या माणसांस तो कोठें तरी निघून गेला असावा, असें वाटलें होतें. पण जेव्हां तो जागा झाला तेव्हां असें म्हणूं लागला कीं, फार निजलों असें काय ह्मणतां? माझ्या समजुतीप्रमाणें फार झालें तर मी एक रात्र आणि अर्धा दिवस इतका काय तो निजलों असेन! जर्मनींतील थकलेला भागलेला एक कुणबी उन्हाळ्यांतील एके दिवशीं गवताच्या एका खोलींत जाऊन जो निजला तो पुढला एक पावसाळा व हिंवाळा उलटून गेला तरी उठला नाहीं! **प्लिनी** असें ह्मणतो कीं, **एपिमिनिडीस** नांवाचा कोणी ग्रीक तत्त्ववेत्ता एका प्रसंगीं रागावून व थकून गेल्यामुळें एका गुहेंत जाऊन जो निद्रित झाला तो सत्तेचाळीस वर्षें या अंगचा त्या अंगावर झाला नाहीं!

**वाशिंग्टन् इर्विंग्** म्हणून अमेरिकेंत जो प्रसिद्ध निबंधकार होऊन गेला त्यानें आपल्या पुस्तकांत **रिप व्हॅन विंकल** नांवाच्या एका मानवी कुंभकर्णाची जी मनोरंजक गोष्ट लिहिली आहे तिला बहुशः या **एपिमिनिडिसच्या** गोष्टीचा आधार घेतला असावा.

# सिडने स्मिथ यांचे स्त्रीशिक्षणाविषयीं विचार.

'एडिम्बरो रिव्ह्यू' नांवाच्या प्रसिद्ध मासिकपुस्तकाचे प्रथम चालक सिडने स्मिथ, यांनीं सुमारें ७९ वर्षांपूर्वी, स्त्रीशिक्षण या विषयावर एक उत्कृष्ट निबंध लिहिला आहे. तो लिहिण्याच्या वेळची तेथील स्थिति, व आजची आमची स्थिति यांत बरेंच साम्य आहे. स्त्रियांस थोडेंबहुत तरी शिक्षण देणें अवश्य आहे, असें आमच्यांतील पुष्कळ लोकांस वाटूं लागलें आहे. मग तें त्याची अवश्यकता भासून वाटो, किंवा लाजेकाजेस्तव वाटो. परंतु त्यांस वरिष्ठ शिक्षण देण्याविषयीं एकंदर समाजाचा काय रोंख आहे, हें येथील फीमेल हायस्कूल स्थापण्याच्या वेळीं चांगलें व्यक्त झालें आहे. तो रोंख बदलावा, व इंग्रज लोकांचे दुराग्रह दूर होऊन तेथील स्त्रियांस जसा वरिष्ठ शिक्षणाचा लाभ होऊं लागला आहे, त्याप्रमाणेंच इकडेही घडून यावें, या हेतूनें सदई निबंधांतील मुख्य मुख्य मुद्दे भाषांतररूपानें आमच्या वाचकांकरितां देण्याचें आह्मीं योजिलें आहे:——

स्त्रियांस आतांहून अधिक ज्ञान देण्याच्या बाबतींत अशी एक अडचण दाखवितात कीं, त्यांस पुरुषाप्रमाणें फुसतर नसते. परंतु जरासा विचार केला असतां, ही सबब निराधार आहे असें दिसून येईल. वकील, न्यायाधीश, वैद्य यांस आपापल्या धंद्यांसंबंधानें जितका वेळ खर्चावा लागतो त्यापेक्षां त्यांच्या स्त्रियांस आपापलीं कामें उरकण्यास अधिक वेळ लागत नाहीं. आपल्या कुळांशीं घासाघीस करण्यांत, किंवा रोग्यांच्या घरोघर हेलपाटे घाल-ण्यांत वकिलांच्या व वैद्यांच्या जितक्या काळाचा व्यय होतो त्याहून मुलांबाळांची देखरेख ठेवण्यांत, किंवा स्वयंपाक करण्यांत, अधिक वेळ जातो, असें कोणासही ह्मणतां येणार नाहीं. आतां हें खरें कीं, स्त्रियांच्या वेळास अगदीं मोलच नाहीं असें समजून, त्यांस वाटेल तीं क्षुल्लक कामें करण्यास लाविलें, चार आठ आणे वांचविण्याच्या बुद्धीनें मुलींस शाळेंत न धाडतां, त्यांची वेळ

शिवणकामादि गोष्टींतच मुरवून टाकली व शिक्षणाचें महत्व मुळींच ध्यानांत आणिलें नाहीं, तर मग त्यांस फुरसत नाहीं असें वाटणार आहे. तेव्हां, ज्यांना गरिबीमुळें दमडी अधेल्याकडेही पाहिल्यावांचून गत्यंतरच नाहीं, व पुरुषांप्रमाणें सकाळपासून संध्याकाळपर्यंत खपल्यावांचून ज्यांस आपल्या मुलांबाळांचा चरितार्थ चालविण्यास दुसरा मार्गच नाहीं, अशा दुर्दैवी स्त्रिया खेरीज करून, खाऊनपिऊन सुखी असणाऱ्या कुटुंबांतील स्त्रियांस फुरसत नसते, हें खरें नाहीं.

स्त्रीपुरुषांच्या ग्राहकशक्तींत स्वभावतः मोठा फरक आहे, असें पुष्कळ लोकांनीं पुष्कळपरी ह्मटलेलें आमच्या ऐकिवांत आहे. परंतु आह्मांस तर तें सर्व मनःकल्पितच आहे असें वाटतें. आतां आजमित्तीस आपल्या भोंवतालीं दिसणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या बुद्धिमत्तेंत अंतर दिसून येतें, ही गोष्ट कोणासही कबूल असली पाहिजे. परंतु त्यावरून तें अंतर नैसर्गिकच आहे असें काल्पनिक अनुमान काढण्याचें प्रयोजन नाहीं. तें परस्परांच्या व्यवसायवैचित्र्याचें फळ होय. लहानपणीं मुलें व मुली एका ठिकाणीं खेळत असतां त्यांच्या बुद्धिचातुर्यांत अगदीं तफावत नसते. परंतु पुढें जर उभयतांस अगदीं वेगळाला आयुष्यक्रम लावून दिला, तर ज्या व्यवसायास ज्या बुद्धिशाखेची अवश्यकता असेल ती बुद्धिशाखाच प्रगल्भ व्हावी, व व्यासंग नसल्यामुळें बाकीच्या शाखा मुग्धावस्थेंत रहाव्या हें अगदीं साहजिक आहे. तेव्हां हल्लीं दिसून येणाऱ्या बुद्धिवैचित्र्याचें कारण इतकें उघड असतां, तें शोधून काढण्यास इतक्या गूढ वेदांतांत शिरण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. शिवाय आज पुरुषांस जे जे विषय शिकविले जातात, ते सर्व स्त्रियांसही शिकवावे किंवा नाहीं, असा वाद असता तर मात्र त्यांची बुद्धि अगदीं तंतोतंत सारखी आहे किंवा नाहीं, या गूढ विचारांत शिरणें कदाचित् योग्य झालें असतें. परंतु परस्परांच्या ज्ञानांत आजमित्तीस दिसून येणारें विलक्षण वैषम्य असेंच राहूं द्यावें किंवा नाहीं, या प्रश्नाचा विचार करितांना, साधारणपणें स्त्रीपुरुषांची बुद्धि

स्वभावतः सारखीच असते, असें गृहीत धरण्यास हरकत नाहीं, व ह्मणून हा शुष्क वाद एकीकडे ठेवून, स्त्रियांस उच्च प्रतीचें शिक्षण न देण्याविषयीं जीं कांहीं कारणें दाखविण्यांत येतात, त्यांचा विचार करणें अगत्याचें आहे.

आजपर्यंत स्त्रियांस कोणीं उच्च प्रतीचें शिक्षण दिलें नाहीं, हा प्रकार अगदीं नवीन आहे, व ह्मणूनच तो आह्मांस नको, असें ह्मणणाऱ्या लोकांस आह्मी उत्तर देत बसत नाहीं. एक वरिष्ठ शिक्षणापासून वाईट परिणाम होण्याची भीति आहे, किंवा त्यापासून काडीमात्र उपयोग होणार नाहीं, असें जर कोणाचें मत असेल, तर तें मात्र विचारणीय आहे. तथापि 'नवमित्यवंद्यं' या पक्षाचा अंगिकार करणाऱ्या लोकांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, एका काळीं प्रत्येक स्थितींतील व प्रत्येक दर्जाच्या पुरुषांस सुद्धां ज्ञान ही वस्तु अगदीं नवीन होती. खेडेगांवांतील लोकांस इतकें चांगलें लिहितांवाचतां येईल, व त्यांस प्राचीन व अर्वाचीन इतिहासाचें साधारण ज्ञान होईल असें एका शतकापूर्वीं कोणास वाटलें होतें ? तात्पर्य, भूतस्थिति व भविष्यस्थिति ह्या सारख्याच असल्या पाहिजेत; जें आज आहे त्याहून अधिक कांहींच शक्य नाहीं; असा खोटाच ग्रह करून घेऊन, कोणीं एकादी नवीन गोष्ट पुढें आणिली असतां ,' छे हो, ही अगदीं अशक्य आहे, हें तुमचें केवळ वेड आहे ! ' असें ह्मणून प्रथम थट्टा करावी, व ती गोष्ट एकदा घडून आल्यावर ' काय हो, पहिल्यानेंच इतकी उघड गोष्ट लोकांस कशी सुचली नाहीं? ' म्हणून आश्चर्य करीत बसावें हें सामान्य जनांच्या अगदीं अंगवळणी पडून गेलें आहे.

असो; शिक्षणापासून स्त्रियांवर जे अनिष्ट परिणाम घडतात अशी समजूत आहे त्यांपैकीं एक असा आहे कीं, त्याच्या योगानें स्त्रिया बढाईखोर व छांदिष्ट होतात; आणि त्यांच्या ठायीं साहजिक असणाऱ्या विनयमर्यादादि गुणांचा अतिक्रम करून, त्या आपल्या ज्ञानाचा तोरा मिरवून पुढें पुढें करतात, व गर्विष्ठ होतात. आतां हें कदाचित् खरें असेल; परंतु असें न होण्यास

उपाय इतका सुलभ व जगजाहीर आहे कीं, त्याची पुनरुक्ति करण्यासही आमचें मन घेत नाहीं. मला दोन हात व दोन पाय आहेत, ह्मणून कोणीं कधीं गर्व केला आहे काय ? नाहीं. कारण, प्रत्येकास दोन हात व दोन पाय आहेतच. तेव्हां इतरांहून आपणास कांहीं अधिक आहे असें वाटल्यावांचून कोणी गर्व करीत नाहीं. म्हणून, एक दोघी स्त्रियांस ज्ञान मिळालें तर मात्र त्या गर्विष्ठ होण्याची भीति आहे; पण तेंच ज्ञान पुष्कळ स्त्रियांस प्राप्त झालें म्हणजे अर्थातच गर्वास जागा रहाणार नाहीं. आपण कांहीं केलें तथापि गर्वादि मनोविकारांचें अस्तित्व अगदीं नाहींसें करणें अशक्य आहे. परंतु तें मर्यादित राहण्यास उपाय ह्मटला ह्मणजे ज्ञानाचा विस्तार हाच होय. पुष्कळ लोकांत पुष्कळ ज्ञानाचा फैलाव झाला, ह्मणजे अंगीं बरीच योग्यता आणल्यावांचून कोणास गर्वच करितां येणार नाहीं; व दीर्घ परिश्रम व खरी विद्या यांवांचून गर्वाचें अस्तित्वच अशक्य झालें, म्हणजे 'ज्ञानलववदुर्विदग्ध ' स्त्रियाही दृष्टीस पडणार नाहींत, व गर्वादिकांपासून जे अनिष्ट परिणाम घडण्याचा संभव आहे तेही फार आकुंचित व मर्यादित होतील. तात्पर्य, ज्ञानप्राप्तीनें स्त्रिया गर्विष्ठ होतात हें खरें असल्यास, त्यांस आतांहून अधिक ज्ञान देऊन, ज्ञानप्राप्त झालेल्या स्त्रियांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न करणें, हेंच त्याच्या प्रतिकारार्थ उत्तम साधन होय.

दुसरा एक आक्षेप असा आहे कीं, बायकांस एकदा विद्येची गोडी लागली कीं त्यांचें संसाराकडे दुर्लक्ष होईल; व घरांतील सर्व बारीकसारीक गोष्टी त्यांच्यावरच पडत असल्यामुळें, व लहानपणीं मुलांची सर्व काळजी वहाणें त्यांचें कर्तव्य असल्यामुळें, त्यांस एकदा ' ज्ञानवृक्षाचें फळ ' चाखूं दिलें कीं, या सर्व गोष्टींवर पाणी पडलेंच म्हणून समजावें ! ह्याच्या योगानें कुटुंबांतील सर्व लोकांस वाऱ्याकडे तोंडें करण्याचा प्रसंग येणार ! हे व अशाच प्रकारचे दुसरे आक्षेप आणणाऱ्या लोकांची अशी समजूत असल्यास न कळे, कीं जगामध्यें जी कांहीं व्यवस्था आज दृष्टीस पडते ती सर्व मनुष्यकृत संस्थांचेंच फळ आहे; मनुष्यांच्या

नैसर्गिक मनोवृत्तींचा त्यांत अगदीं भाग नाहीं; स्त्रिया आपल्या पोटच्या मुलांची जी काळजी वहातात, त्याचें कारण त्यांस ग्रीक भाषा किंवा गणित येत नाहीं हेंच होय; नाहींतर त्या खुशाल मुलांस रडत टाकून समीकरणें सोडवीत बसतील! आमची तर आजपर्यंत अशी समजूत आहे कीं, आपल्या मुलांबद्दल स्त्रिया जी कळकळ बाळगितात तिचें कारण त्या अज्ञान असतात हें नव्हे; तर निसर्गतःच त्यांच्या अंतःकरणांत जें अपत्यप्रेम वास करीत असतें, त्याचेंच तें फळ होय. शाळेंतील शिक्षणाचा सृष्टि-नियमांवरही परिणाम घडतो व त्याच्या योगानें स्वभावजन्य मनोवृत्तींचा उच्छेद होतो ही कल्पना आम्हांस अगदीं वेडगळ दिसते. तसेंच, स्त्रिया ज्या संसाराविषयीं दक्ष असतात, त्याचें कारण त्या शाळेंत जात नाहींत हें खचित नाहीं. आपण आपल्या संसारास जपलें नाहीं तर सर्व गोंधळ होऊन, आपणांस दारिद्य येईल या भीतीनें संसाराची काळजी त्या घेतात, व शिक्षणाच्या योगानें तर हा विचार विशेष स्पष्ट रीतीनें मनांत येण्याचा संभव आहे. अज्ञानामुळें जी उधळपट्टी व अविचार घडतो, व त्या योगानें जे अनर्थ उद्भवतात, ते उलटे शिक्षणानें प्रतिबंधित होण्याचाच संभव आहे. तेव्हां शिक्षणाच्या योगानें स्त्रिया आपल्या पोटच्या मुलांची हेळसांड करूं लागतील किंवा आपल्या संसारास जपणार नाहींत, हे दोनही आक्षेप भ्रममूलक होत.

दुसरें असें कीं, मागें सांगितल्याप्रमाणें शिक्षणापासून जर वाईट परिणाम होण्याचा संभव आहे, तर आजपर्यंत तो झालेला कोठेंच दिसून येत नाहीं. एका शतकापूर्वीं स्त्रियांची शिक्षणाच्या बाबतींत जी स्थिति होती तिजपेक्षां आज पुष्कळ बरी स्थिति आहे; परंतु त्यामुळें एकंदर गृहकृत्यांविषयीं त्या बेपर्वा झाल्याचें मुळींच आढळून आलें नाहीं. सारांश, या सर्व गोष्टींचा शांतपणें विचार केला असतां आपणांस असें दिसून येईल कीं, स्त्रीशिक्ष-णावर आजपर्यंत जे आक्षेप आणले आहेत ते वास्तविकपणें मनुष्यस्वभावास लागू आहेत. ज्ञानाची आणि ज्यांची ओळख नाहीं असे शेतकरी, शिपाई, खलाशी वगैरे सर्व ह्मणजे गर्वादि

मनोविकारांपासून अलग आहेत असें नाहीं. तसेंच शिक्षित पुरुषही गर्विष्ठ, छांदिष्ट, किंवा निष्काळजी असे सांपडतातच. तेव्हां शिक्षणावर जर कांहीं आक्षेप योग्य रीतीनें लागू करितां येतील, तर ते स्त्रियांच्या शिक्षणावरच तेवढे कां लागू करावे ? पुरुषांच्या शिक्षणावरही कां करूं नयेत ! सारांश, गर्वादि मनोवृत्ति मनुष्यांस नैसर्गिक असल्यामुळें, जशा त्या अशिक्षितांतही दृष्टीस पडतात, किंवा शिकलेल्या परंतु जात्याच मूर्ख अशा पुरुषांत दृष्टीस पडतात, त्याप्रमाणें कांहीं मूर्ख स्त्रियाही गर्विष्ठ होणारच, व त्याचें कारण त्यांचा मूळ स्वभावच होय, शिक्षण नव्हे; तर उलट शिक्षणाची वृद्धि झाली असतां तुटपुंज्या ज्ञानानें लोकांस गर्वही करतां येणार नाहीं, व खरी विद्या व गर्व यांची आपण सांगड घालून दिली म्हणजे त्यापासून अनिष्ट परिणामही घडून येणार नाहींत. खरे विद्वान् लोक किती विनीत, मर्यादशील व सालस असतात हें ध्यानांत आणलें असतां आपली अशी खातरी होईल कीं, विद्येच्या योगानें, स्त्रियांस भूषण देणाऱ्या विनयमर्यादादि गुणांचा ऱ्हास न होतां ते उलटे विशेष संस्कृत होऊन आपणांस अधिक आनंददायक होतील.

स्त्रीशिक्षणाविरुद्ध जो एवढा गवगवा झालेला आहे, त्याचें खरें बीज शिक्षणांतच कांहीं गोम आहे, हें नव्हे. तें दुसरीकडेच सांपडणारें आहे. ज्ञान प्राप्त करून घेण्यास जो उद्योग करावा लागतो व जीं साधनें अवश्य असतात, तीं साधनें नाहींत ह्मणून म्हणा, किंवा तो उद्योग करण्याचा कंटाळा म्हणून ह्मणा, पुष्कळ पुरुष स्वतांच अज्ञान असतात; व आपण स्त्रियांपेक्षां वरिष्ठ आहों, असा सर्व पुरुषांचा कायमचा ग्रह होऊन बसल्यामुळें, आपणांस कांहीं ज्ञान नसून स्त्रिया ज्ञानी झाल्या असतां आपली धडगत रहाणार नाहीं, आपला पदोपदीं पाणउतारा होईल, अशा भीतीनें स्त्रीशिक्षणाविरुद्ध होईल तितकी ओरड करण्यास ते नेहमीं एका पायावर उभे असतात. परंतु अशा लोकांस आह्मी पूर्ण अभिवचन देतों कीं, स्त्रीशिक्षणवाद्यांनीं सर्व स्त्रियांस शिक्षण मिळण्याविषयीं हरप्रयत्न केले, कितीही हायस्कुलें किंवा कॉलेजें स्थापन केलीं,

तथापि त्यांच्यानें अज्ञानी स्त्रियांचा अगदीं बीमोड कधींही होणार नाहीं. विद्यासंपादनाचीं इतकीं साधनें असूनही आपण अज्ञानी रहाण्याची जशी कित्येक पुरुषांनीं खबरदारी घेतली आहे, त्याप्रमाणें ज्ञानाचा आपणांस विटाळ न होऊं देणाऱ्या स्त्रियांचीही संख्या नेहमीं मोठी रहाणारच. तेव्हां अज्ञानाचें जगांतून समूळ अस्तित्व नाहींसें झाल्यास आपली काय वाट होईल अशी भीति कोणास बाळगण्याचें प्रयोजन नाहीं. त्यांस पाहिजेत तितक्या अज्ञानी स्त्रिया मिळतील, व त्यांचा पाणउताराही होणार नाहीं !

ज्या स्त्रिया या विद्योद्यानांत प्रथम संचार करूं लागतील त्यांस निवळ अडाणी लोकांपासूनच त्रास होईल असें नाहीं, शिक्षित ह्मणविणाऱ्यांपैकींही कित्येक त्यांच्याशीं शत्रुत्वाचें आचरण करण्यास मागेंपुढें पहाणार नाहींत. आपल्यास ग्रीक भाषेंतील कांहीं क्रियापदांचीं रूपें सांगतां येतात वगैरे क्षुल्लक गोष्टींवरूनच ज्यांस मोठी प्रौढी मारितां येते व आपण मोठे विद्वान् आहों असें वाटतें, असे लोक आज पुष्कळ आहेत. परंतु ह्या गोष्टी एकाद्या १८ वर्षांच्या पोरीलाही शिकतां येतात, ( आमच्या इकडे ' अठरा वर्षांच्या पोरीला ' हे शब्द मोठे विसंगत दिसतात ! कारण अठरा वर्षांची पोरगी तर इकडे चार मुलांची आई बनते ! ) असें लोकांस एकदां समजलें, ह्मणजे मग आपली थोरवी कोठें राहिली ? मग आपणांस कोण विद्वान् ह्मणायाला बसलें आहे ? वगैरे गोष्टी मनांत येऊन त्यांनीं शिक्षित स्त्रियांची स्पर्धा करण्यास तयार व्हावें, व त्यांच्याबद्दल हवी तशी नालस्ती करावी, हें अगदीं साहजिक आहे. परंतु खऱ्या विद्वान् लोकांस स्त्रियांची उन्नति पाहून आनंदच होईल व त्यांच्या गुणांबद्दल विषाद न वाटतां, उलट त्यांच्याविषयीं अत्यंत आदरबुद्धि जागृत होईल, यांत संशय नाहीं.

आतांपर्यंत ज्या आक्षेपांचा विचार केला त्यांत कांहीं तथ्य आहे असें मानल्यास, असा एक सिद्धांत त्यापासून ध्वनित होतो कीं, अज्ञान हें एक मोठें सुधारणेचें साधन होय. स्त्रियांची

चालचलणूक, त्यांचें भाषण वगैरे विशेष सभ्य कां? त्या अज्ञान म्हणून! त्यांस घरांत टापटीप कां ठेवतां येतें? त्या शाळेंत जात नाहींत म्हणून! त्या आपल्या मुलांबाळांची काळजी कां घेतात? त्यांस विद्या नाहीं ह्मणून! आम्हीं प्रांजलपणें कबूल करतों कीं, अज्ञानापासून इतके चांगले परिणाम घडतात या महातत्त्वाविषयीं आह्मी आजतागाईत अज्ञानच आहों! आम्ही तर आजपर्यंत असें समजत आलों कीं, विनय, मर्यादा, सभ्यता वगैरे सर्व सद्गुण शिक्षणाचेंच फळ होत. आपण पुरुषांस प्रिय व्हावें, अशी जी बळकट इच्छा स्त्रियांच्या अंतःकरणांत वास करीत असते, त्यामुळेंच त्या विनीत, नम्र, व मर्यादशील असतात; व ही इच्छा जगाच्या अंतापर्यंत स्त्रीपुरुषांच्या मनांतून नाहींशी होणें अशक्य असल्यामुळें, शिक्षण मिळाल्यानें स्त्रिया पुरुषांची स्पर्धा करूं लागतील असें मानण्याचें अगदीं कारण नाहीं. ‘समानशील व्यसनेषु सख्यं’ या न्यायानें शिक्षणरूप समानव्यवसायापासून स्त्रीपुरुषांच्या प्रेमांत अंतर न पडतां तें उलटें वृद्धिंगतच होईल.

आमच्या वरील विचारांवरून, शिक्षणापासून कोणत्याही स्थितींत केवळ चांगलेच परिणाम झाले पाहिजेत, त्यापासून यत्किंचित्‌ही अहित होणार नाहीं, असें प्रतिपादन करण्याचा आमचा हेतु आहे, असें कोणींही समजूं नये. जगांत अशी एकही गोष्ट नाहीं कीं जिच्यापासून सर्वतोपरी व सर्वकाळीं केवळ इष्ट परिणामच घडून येतात. योजकाच्या मूर्खपणामुळें चांगल्याही साधनांचा दुरुपयोग होतो, हें आम्हांस कबूल आहे. त्याप्रमाणें प्रसंगविशेषीं शिक्षणाचाही दुरुपयाग होईल, हें आम्हांस कबूल आहे. आमचें ह्मणणें इतकेंच आहे कीं, आज ज्यांस कांहीं काम करण्याची फारशी अवश्यकता नाहीं अशा निदान ९०००० स्त्रिया ग्रेटब्रिटन देशांत आहेत, व प्रत्येक सुधारलेल्या देशांतही आपल्या मुलांबाळांची व्यवस्था करून व आपलीं गृहकृत्यें संभाळून ज्यांचा बराच काळ व्यवसायावांचून निरर्थक खर्च होतो, अशा पुष्कळ स्त्रिया नेहमीं असणारच. त्यांचा वेळ जाण्याचे

जे कांहीं अन्य उपाय आहेत त्यांमध्यें शिक्षणासारखा निर्दोष उपाय दुसरा कोणताही नाहीं. यापासून मनुष्यमात्राची योग्यता वाढण्यासारखी आहे, व हा उपयुक्त असून अन्य उपायांपेक्षां खचित कमी अपाय करणारा आहे. दुसरें असें कीं, स्त्रियांचा संबंध नेहमीं घराशींच असल्यामुळें त्यांस बाह्य जगाची थोडीच ओळख असते, व साधारणपणें त्यांस एकांतवासच कंठावा लागतो, असें म्हणण्यास हरकत नाहीं; व कधीं कधीं पुरुषांच्या हातीं त्यांस हालअपेष्टा सोसाव्या लागत असून त्यांबद्दल कोठें कुरकुर करण्यासही जागा नसते; तेव्हां अशा स्थितींत आपलें कसें तरी समाधान करून घेण्याचें, व आपला कंटाळवाणा वेळ घालविण्याचें योग्य साधन त्यांचें त्यांच्याच स्वाधीन असण्यास त्यांस ज्ञान प्राप्त करून देण्यासारखा दुसरा मार्ग नाहीं, हें विचाराअंतीं प्रत्येकास दिसून येईल.

आतां स्त्रियांस ज्ञान मिळालें असतां त्यांनीं पुस्तकें लिहूं लागावींत, व अमक्या स्त्रीनें अमुक पुस्तक लिहिलें म्हणून तिच्या नांवाची जिकडेतिकडे टिमकी वाजत रहावी हें चांगलें नाहीं, वगैरे जे आक्षेप घेण्यांत येतात, त्यांस उत्तर इतकेंच कीं, आज जितक्या पुरुषांस विद्या मिळाली आहे, त्यांपैकीं ग्रंथकार किती आहेत याचा त्यांनीं विचार करावा. दुसऱ्यांकरितां पुस्तकें लिहिणारांपेक्षां, विद्येच्या योगानें ज्यांनीं आपलीं स्वतांचीं मनें संस्कृत केलीं आहेत अशांचीच संख्या फार मोठी आहे; व त्या मानानें पुस्तकें लिहिणाऱ्या स्त्रिया एकंदर संख्येच्या मानानें पहातां केवळ शून्यवतच असतील हें उघड आहे; व आम्हीही जो स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार करितों तो त्यांनीं ग्रंथ लिहावे या उद्देशानें करीत नाहीं. आमचा मुख्य हेतु ह्मटला म्हणजे त्यांच्या स्वतांच्या सुखांत व कुटुंबसुखांत भर पडावी एवढाच आहे. स्त्रियांस नृत्यगायनादि कला अवगत असल्या, किंवा त्यांस चित्रकलेचें ज्ञान असलें ह्मणजे त्यांनीं नाटकांत नाचावें, किंवा गाणींबजावणीं करावीं, किंवा प्रदर्शनांत चित्रें पाठवावीं, असा सिद्धांत काढणें मूर्खपणाचें आहे. या सर्व कलांचा उद्देश त्यांचें सुख वाढावें व

स्वतांची करमणूक व्हावी इतकाच आहे. शिवाय स्त्रियांनीं पुस्तकें लिहून त्यांच्या नांवाची चर्चा व्हावी हेंच जर मोठें अनिष्ट असेल तर त्याचा परिणाम फारच थोड्या स्त्रियांवर घडण्याचा संभव आहे. मिस एजवर्थ, मिसेस बारबाल्ड, किंवा मिसेस हॅमिल्टन (या सर्व प्रसिद्ध ग्रंथकर्त्या होऊन गेल्या, व यांपैकीं पहिलीचे ग्रंथ तर प्रख्यात कादंबरीकार सर वाल्टर स्काट यासही फारच आदरणीय झाले) यांच्या नांवाची जशी आज चर्चा होत आहे, तशी स्थिति कांहीं स्त्रियांस प्राप्त झाल्यास मोठें दुर्दैव खरें! परंतु ती स्थिति त्या मोठ्या धैर्यानें सहन करतील, असेंही आम्हांस वाटतें!

दुसरें असें आहे कीं, पुरुष मूळचे अशिक्षित असले तथापि त्यांचा सर्व जगाशीं अवश्य संबंध पोहोंचत असल्यामुळें, व आपल्या मस्तकास श्रम देण्याचे त्यांस वारंवार प्रसंग येत असल्यामुळें, शेवटपर्यंत ते केवळ अडाणी रहाण्याचा संभव कमी असतो. बऱ्यावाईटाचा विचार करणें, सावधगिरी बाळगणें, बारीक गोष्टींवरही नजर ठेवणें वगैरे गुण, त्यांच्यावर जोखीम पडत असल्यामुळें, त्यांस हळूहळू प्राप्त होतात. परंतु स्त्रियांचें तसें नाहीं. त्यांचें जगाशीं दळणवळण अगदीं नसतें, व त्यांचा सर्व वेळ घरांतच जाणारा असतो. म्हणून शाळेंत मिळणाऱ्या शिक्षणक्रमांत ज्या कांहीं काल्पनिक अडचणी येतात, व ज्यांच्या योगानें मनाचा गोंधळ होतो त्यांतून पार पडण्याची त्यांस संवय लागली तरच त्यांच्या बुद्धीस संस्कार होऊन ती प्रगल्भ होण्याचा संभव आहे. नाहीं तर त्या नेहमीं अप्रबुद्ध रहाणार. तेव्हां स्त्रियांच्या बुद्धीचा विकास होणें अवश्य असेल तर त्यांस शाळेंत पाठविल्यावांचून गत्यंतर नाहीं; व यावरूनच बायकांना जर नोकऱ्या, व इतर धंदे करावयाचे नाहींत तर त्यांस शाळेंत जाऊन काय करावयाचें आहे, ही समजूत किती चुकीची आहे हेंही व्यक्त होतें.

आजमित्तीस स्त्रीशिक्षणाचा एकंदर रोंख म्हटला ह्मणजे त्या पुरुषांस अधिक प्रिय कशा होतील इतक्यापुरताच आहे. गायन, नर्तन, चित्रकला यांतच स्त्रियांस प्राविण्य मिळविण्याविषयीं विशेष श्रम घेण्यांत येतात. परंतु या सर्व कलांचा उपयोग

अर्थातच मर्यादित असला पाहिजे. तारुण्यांत असतांना पुरुषांचें मन सुप्रसन्न करून आपण त्यांस आवडत्या व्हावें, व पुढेंही थोडा काळपर्यंत उभयतांस करमणूक व्हावी यापलीकडे या कलांचा फारसा उपयोग नाहीं. आतां या कलांवरच उपजीविका करण्याचा ज्यांचा उद्देश असेल त्यांनीं त्यांचा अभ्यास करण्यांतच सर्व वेळ खर्च केल्यास तें खचित गैरवाजवी होणार नाहीं. ( येथें एक गोष्ट सांगणें अवश्य आहे कीं, इंग्लंड देशांत गाण्याबजावण्यावर उपजीविका करणाऱ्या सर्व स्त्रिया इकडल्याप्रमाणें वेश्यावर्गांतीलच नसतात. ) परंतु ज्यांस तो धंदा करावयाचा नाहीं अशा स्त्रियांचा सर्व वेळ त्यांतच मुरविणें शहाणपणाचें नाहीं. सर्व जन्मभर गात नाचत बसण्याचे प्रसंग फारच थोडे असतात. प्रत्येक कुटुंबाचा आयुष्यक्रम म्हणजे सतत चालणारा 'आलिंपिकगेम' नसतो. मुलेंबाळें झाल्यावर स्त्रियांस या कलांचा उपयोग नाहीं. निसर्गतःच मोहक असणारें तारुण्य अधिक मोहक होण्यास मात्र काय तो त्यांचा उपयोग. त्यांच्या योगानें आपल्या मुलांच्या शिक्षणास स्त्रियांस फारशी मदत होत नाहीं हें कोणीही कबूल करील. आजारीपण फारसें जड जाऊं नये, एकांतवास कंटाळवाणा होऊं नये, वृद्धपणीं ज्यानें त्यानें आपला तिरस्कार करूं नये, आपले आयुष्याचे दिवस विशेष महत्वाचे व उपयुक्त असे व्हावे, व मरणकाल विशेष भीतिप्रद होऊं नये, असें जर वाटत असेल तर स्त्रियांचा सर्व काल गायननर्तनादिकांत घालणें चांगलें नाहीं. आतां या सर्व विचारांवरून आम्ही या कलांचें महत्व मानीत नाहीं, असें मात्र कोणीं समजूं नये. आमचें म्हणणें इतकेंच आहे कीं, ज्ञानाविषयीं एकदा प्रीति जडली असतां त्यापासून ज्या नाना सुविचारांचा अखंड प्रवाह वाहील, तो जसा चिरकाल राहील व त्यापासून होणारें सौख्य जसें श्रेष्ठ व विस्तृत असेल तसें वरील कलांच्यानें हाण नाहीं. त्यांपासून फार तर तास दोन तास करमणूक होईल व तीही जोंपर्यंत त्यांस तारुण्याची मदत आहे तोंपर्यंतच शक्य आहे. एकदा तारुण्य गेलें कीं त्याबरोबर त्यांची बहुतेक शोभा लयास गेलीच पाहिजे. याकरितां स्त्रियांची

बुद्धि भिंतीवर टांगून राहण्यापेक्षां, किंवा मंजुळ वाद्यांच्या तारांमध्यें तरंगित होण्यापेक्षां, किंवा वायुवश होऊन राहण्यापेक्षां, ज्या रीतीनें त्या आपल्या स्वतांस, आपल्या कुटुंबास, किंवा सर्व समाजासही भूषण होतील त्या रीतीनें त्यांच्या वेळेचा उपयोग करणें हें फार महत्वाचें आहे.

वरील विचारांचा आमच्या सद्यःस्थितीशीं संबंध अगदीं नाहीं हें कोणासही कळण्यासारखें आहे. इंग्लंड देशांतील स्त्रियांचा बहुतेक काल गायनवादनांतच खर्च होत होता, तो मर्यादित करण्याच्या उद्देशानें वरील विचार निबंधकारांनीं प्रदर्शित केले आहेत. आमच्या इकडे तर याच्या अगदीं उलट प्रकार आहे. येथील स्त्रीशिक्षणांत या कलांचा अतिरेक झाला नाहीं इतकेंच नाहीं, तर त्यांचा अजून प्रवेशच होणें आहे; व तो अंशतः होऊन त्यापासून स्त्रियांचें स्वतांचें मनोरंजन होऊन त्यांच्या पतींसही करमणूक होऊं लागली, व तेणेंकरून बाहेरख्यालीपणावर कांहीं अनुकूल परिणाम घडला, तर तें इष्टच आहे.

स्त्रियांस चांगलें शिक्षण मिळूं लागलें असतां पुरुषांच्या शिक्षणासही मदत होणारी आहे. मुलांच्या बाल्यावस्थेंत त्यांचा आईशीं किती निकट संबंध असतो, व पुढें मनुष्य चांगला किंवा वाईट निपजणें हें त्याच्या लहानपणच्या गृहशिक्षणावर किती अवलंबून असतें, याचा जो क्षणभर विचार करील त्यास असें दिसून आल्यावांचून रहाणार नाहीं कीं, हल्लींप्रमाणें स्त्रिया अशिक्षित राहणें हें मोठें दुर्दैव होय. शिक्षणाच्या योगानें त्यांचीं स्वतांचीं मनें जर प्रगल्भ झालेलीं नसलीं, तर मुलांस गृहशिक्षण मिळावें कसें! व त्यांस चांगली दिशा लागावी कशी? मुळीं आडांतच जर पाणी नाहीं तर पोहऱ्यांत यावें कोठून? आणि भावी देशसुधारणा गृहशिक्षणावर पुष्कळ अंशानें अवलंबून आहे हें जर खरें आहे, व गृहशिक्षणाचा पाया जर सर्वस्वी स्त्रीशिक्षणावरच असणें साहजिक आहे, तर देशाची स्थिति सुधारावी अशी ज्यांची इच्छा आहे त्यांनीं स्त्रीशिक्षणाच्या आड येणें ह्मणजे पायाशिवाय इमारत बांधण्याच्या विचारासारखें आहे!

कोणत्याही देशांत ज्ञानवान् लोकांची संख्या जितकी अधिक असेल तितकें त्या देशाचें अधिक हित झालें पाहिजे. आणि मनुष्यजातींतील अर्ध्या भागास आम्हीं मुद्दाम ज्ञानहीन राहूं देण्याचा आग्रह धरल्यानें आह्मी आपला अर्धा फायदा बुडवीत आहों. ईश्वरानें जर स्त्रियांसही पुरुषांप्रमाणें बुद्धि दिली आहे तर त्या बुद्धीचा पुरुषांच्या बुद्धीप्रमाणें देशास उपयोग व्हावा असें गृहीत धरून चालण्यास हरकत नाहीं. बुद्धि हा पदार्थ जर चांगला आहे असें प्रत्येकास कबूल आहे, तर अमुक ठिकाणीं तिचा विकास होऊं देऊं नये असें म्हणतां येत नाहीं. तेव्हां पुरुषांच्या बुद्धीचा विकास झाला असतां अमुक फायदे होतात, परंतु स्त्रियांच्या बुद्धीचा विकास झाल्यास मात्र अमुक अनर्थ उद्भवतील असें स्पष्ट सिद्ध करून देण्याची जोखीम स्त्रीशिक्षण-द्वेष्ट्यांवरच आहे, व तसें केल्यावांचून स्त्रीशिक्षणास दोष देणें हें निवळ आग्रहाचें व हटवादीपणाचें आहे हें उघड आहे !

वृद्धावस्थेंत मनुष्यास मान मिळून त्याचा आदर होण्यास ज्ञानासारखी दुसरी कोणतीच चीज नाहीं. कांहीं तरी योग्यता अंगीं असल्यावांचून कोणी आदरास पात्र होत नाहीं. आणि या दृष्टीनें विचार केला असतां स्त्रियांस ज्ञानप्राप्तीची किती अवश्यकता आहे हें कोणासही दिसून येणार आहे. तारुण्य, डागडागिन्यांनीं येणारी शोभा, गायनवादनादि कलांचें ज्ञान, हीं सर्व सतत टिकणारीं नाहींत. तारुण्य व त्याचा विकास करणारे त्याचे अनुयायी हीं परस्परांवर अवलंबून असतात ; व एकदा तारुण्याचा लोप होऊन तोंडावर सुरकुत्या पडल्या ह्मणजे तारुण्यांत मिळविलेल्या सर्व जयजयकारांचा लोप होऊन जातो. मग जे ते तिरस्कार करूं लागतात. परंतु ज्ञानाच्या बळावर ज्यानें योग्यता मिळविली असते, व ज्याची वाहवा झाली असते असा मनुष्य वृद्ध झाला व त्याची बुद्धिही वयोमानानें ऱ्हास पावली असली तथापि एकदा जी विद्वत्ता त्याचे अंगीं होती तिच्या नुसत्या स्मरणानें तो सर्वांस वंद्य असतो, व त्याच्या मृत्यूनंतरही त्याचें स्मरण झालें असतां त्याच्याबद्दल आदरबुद्धि जागृत होते. आणि म्हणून

स्त्रियांच्या वृद्धावस्थेंत जी त्यांची दैना आज दृष्टीस पडते ती नाहींशी करणें जर महत्वाचें असेल, व त्यांची वृद्धावस्था सुखांत जावी अशी जर इच्छा असेल, तर त्यांस शिक्षण देणें फार अगत्याचें आहे.

वास्तविक पाहतां धार्मिकता किंवा नीति यांचा अज्ञानाशीं अगदीं संबंध नाहीं, परंतु स्त्रियांस शिक्षण दिलें असतां त्या अधार्मिक व अनीतिमान् होतील अशी एक भीति कित्येकांच्या मनांत शिरलेली दिसते. आतां ही त्यांची भीति पाहून अशी कल्पना करणें भाग पडतें कीं, धर्म व नीति यांसंबंधी सर्व नियम केवळ फसवणुकीचे व लबाडीचे आहेत, व ह्मणून ते होतील तितके गूढ राहतील तेवढे चांगले. ज्ञानवृद्धि होऊन एकदा का त्यांतील लबाडी लोकांच्या लक्षांत आली, कीं मग जिकडेतिकडे अधर्म व अनीति यांचा प्रसार होऊन एकच हाहाकार होईल व विशेषतः स्त्रियांवर तर या ज्ञानवृद्धीनें मोठे दुर्धर अनर्थ ओढव-तील. परंतु आह्मांस ही सर्व भीति निराधार दिसते. धर्म व नीति यांचा उच्छेद करणारें असें ज्ञानाच्या अंगीं काय गूढ तत्व आहे याचा जर आह्मांस चांगला उमज पडता तर आह्मीही शिक्ष-णाचे कट्टे द्वेष्टे बनलों असतों. आह्मांस तर उलटें असें वाटतें कीं, नीतिविषयक जे जे कांहीं नियम मनुष्यमात्रास लावून दिलेले आहेत ते सर्व शहाणपणाचेंच फळ होत; व त्या सर्वांचा उद्देश मनुष्याचे सुखाची वृद्धि व्हावी हाच आहे. आणि यांत जर चूक नसेल, तर स्त्रियांस अधिक शिक्षण मिळालें असतां, त्या नियमांचें खरें रहस्य अधिक स्पष्टपणें कळून, व अनीतीचे दुष्ट परिणाम विशेष पूर्णतेनें मनावर ठसून त्यायोगें स्त्रिया अधिक धार्मिक व अधिक नीतिमान् होतील हेंच विशेष साहजिक दिसतें. नुसत्या ज्ञानाच्याच अंगीं सर्वांस नीतिमान् करण्याची योग्यता पूर्णत्वानें नाहीं हें आह्मांसही कबूल आहे. ज्ञान ही एक शक्ति आहे, व जसें इतर शक्तीपासून योजकाच्या मूर्खपणामुळें प्रसंगविशेषीं अहित होतें तसें या शक्तीपासूनही होईल हें उघड आहे. अग्नीपासून जशी पाकनिष्पत्ति होते, तशींच घरेंही जळ-

तात, म्हणून अग्नीचा उपयोग करूं नये असें कोणी प्रतिपादन करीत नाहीं. शिकलेले लोक खोटे कागद करितात ह्मणून सर्व शाळा बंद कराव्या असें कोणाचें मत नाहीं. तात्पर्य, सुशिक्षित स्त्रियांपैकीं एकादी आपल्या शिक्षणाचा दुरुपयोग करील ह्मणून स्त्रियांस मुळींच शिक्षण देऊं नये असा आग्रह धरणें केवळ अविचाराचें आहे.

---

## आफ्रिकेंतील हिऱ्यांच्या खाणी.

पृथ्वींत अनेक ठिकाणीं हिऱ्यांच्या खाणी आहेत. आमच्या गोवळकोंड्याच्या खाणींची फार प्राचीन कालापासून प्रसिद्धि आहे. पण ज्याप्रमाणें अलीकडे हिंदुस्थानाचा पाय साऱ्याच कामांत मागें पडल्यासारखा झाला आहे, त्याप्रमाणें त्याच्या खनिज द्रव्यानांही मंदाई आली आहे कीं काय कोण जाणे! तें कसेंही असो, येवढें खरें आहे कीं, आजमित्तीस आमची संपत्ति आह्मांस पारखी झाली आहे. इंग्लिश लोकांच्या कंपन्या येथें येऊन लोखंड काढतील, कोळसा काढतील, सोनें काढतील, मोत्यें काढतील, माणकें काढतील, पाहिजे तर हिरेही काढतील! आम्हांस मात्र पोटापुरतें जमिनींतून धान्य काढतां येईनासें झालें आहे! कित्येक नेटिव लोक या आमच्या दुर्दशेबद्दल इंग्लिश लोकांस दोष लावीत असतात. पण त्यांच्या मनांत असा विचार येत नाहीं कीं, आह्मीं इंग्लिश लोकांस आपली अशी दुर्दशा कां करूं दिली? आह्मी आपलें स्वातंत्र्य संभाळण्यास समर्थ असतों तर आमच्या खाणी उकरण्याचे कष्ट इंग्रज लोक कशाला करते? पण आह्मी जितके परावलंबी व निरुद्योगी आहों, तितकेच स्वावलंबी व उद्योगी इंग्लिश लोक असल्यामुळें, त्यांनीं आम्हांस व आमच्या जन्मभूमीस पादाक्रांत केलें आहे इतकेंच नाहीं, तर त्यांनीं आपल्या पराक्रमानें आणि उद्योगानें पृथ्वीचा बहुतेक भाग आपल्या आधीन करून सोडला आहे. जगांतील मोठमोठ्या नाक्यांच्या जागा, सुपीक बेटें, व्यापाराचे समुद्रावरील किंवा खुष्कीचे राजमार्ग—हे सारे

इंग्रजांच्या ताब्यांत आहेत. पृथ्वीच्या तीनही कटिबंधांतील पाहिजे तो प्रदेश घ्या, त्यांत आंग्लतनय मिजासीनें वागत नाहीं असें दिसून येणार नाहीं. हें सारें त्याच्या करामतीचें फळ होय. अशांना निष्कारण दोष देत बसण्यापेक्षां आपल्याच वर्तनांतील दोष हुडकून काढून ते नाहींसे करण्याचा प्रयत्न करावा, आणि अशांचें उदाहरण पाहून त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करावा, म्हणजे केव्हांना केव्हां तरी आपणांस चांगला दिवस उगवेल यांत तिळमात्र संशय नाहीं.

ज्यांना इंग्लिश लोकांच्या उद्योगपरायणतेचें अनुकरण करण्याची इच्छा असेल त्यांनीं, या लोकांनीं आफ्रिकाखंडांत चालविलेल्या नाना प्रकारच्या उद्योगांची हकीकत वाचावी, अशी आह्मी शिफारस करतों. निदान तेथें तरी ते आपल्या निढळाच्या घामानें, बुद्धिकौशल्यानें, आणि असामान्य कष्टाळूपणानें संपत्ति कमावीत आहेत, असें आह्मां हेवेखोर व निरुद्योगी नेटिव लोकांना कबूल करणें भाग पडेल. इंग्लिश लोकांनीं त्या अप्रसिद्ध खंडाचा शोध लावण्याच्या कामीं, तेथील उष्ण प्रदेश सुखावह करण्याच्या कामीं, तेथील मोठमोठ्या अरण्यांपासून आपलें हित करून घेण्याच्या कामीं, व तेथील सुपीक जमिनीपासून आणि नानाप्रकारच्या पशुपक्ष्यांपासून आपला फायदा करून घेण्यासाठीं असंख्य प्रयत्न चालविले आहेत. त्या प्रयत्नांपैकीं फक्त एकाविषयीं ह्मणजे हिऱ्यांच्या खाणींतून हिरे काढण्यासाठीं इंग्रज लोकांनीं तेथें केवढाले टोलेजंग कारखाने घातले आहेत, त्याविषयीं चार शब्द येथें लिहिण्याचा आमचा विचार आहे.

हिरा हा एक दगड आहे हें सर्वांस ठाऊकच आहे ! रसायनशास्त्रवेत्ते त्याला दगड न ह्मणता कोळसा ह्मणतात. तेव्हां तो खरोखरी कोळसा आहे किंवा दगड आहे, याचा निश्चय करणें अंमळ कठिण आहे ! पण आपणांला त्या निश्चयाच्या उठाठेवींत पडण्याची गरज नाहीं. कारण, हिरा हा दगड असो किंवा कोळसा असो, तो फार मौल्यवान् आणि मोहक चीज आहे याविषयीं मुळींच मतभेद नाहीं. या मत-

भेदाच्या अभावामुळें विद्वान् आणि अविद्वान् या उभयतांसही त्याचा संग्रह करण्याविषयीं अत्यंत उत्कंठा असते, व या त्यांच्या उत्कंठेमुळें बाजारांत त्याला फार चांगला भाव येतो. बाजारांत ज्या वस्तूला पुष्कळ मागणी आहे, ती कितीही कष्ट-साध्य असली तरी बाजारांत आल्याखेरीज रहात नाहीं. युरोप-खंडांतील मोठमोठ्या बाजारांत या चकचकणाऱ्या कठिण दगडाच्या जाड चुराला इतक्या मागण्या आहेत कीं, हिऱ्याच्या खाणी आफ्रिकाखंडांत न सांपडतां, जेथें सहा महिने निबिड रात्र व सहा महिने संध्याप्रकाशासारखा दिवस असतो, व जमीन नेहमीं हिमाच्छादित असते, अशा प्रदेशांत जरी त्या सांपडल्या, तरी लोभी, कष्टाळू, व साहसी मनुष्यानें तेथें जाऊन त्यांचें विदारण केलें असतें, आणि त्यांच्या उदरांतून हे सतेज पाषाणाचे तुकडे तो घेऊन आला असता! आफ्रिकेंत हिऱ्यांच्या बऱ्याच खाणी आहेत; पण त्यांत प्रमुख दोनच आहेत. एक **डीबीर्स** व दुसरी **किंबर्ले.** बहुधा या खाणींयेवढ्या दुसऱ्या मोठ्या खाणी जगांत दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं नसतील! यांपैकीं पहिलीच्या तोंडाचें क्षेत्र तेरा एकर आहे, व तिची खोली चारशें पन्नास फूट आहे. दुसरीचें क्षेत्र व खोली याहीपेक्षां अधिक आहेत. प्रस्तुत या खाणींत तोंडाकडून उतरत नाहींत, तर त्यांच्या तळांशीं जाऊन पोहोंचण्यासाठीं तोंडांपासून बऱ्याच अंतरावर निराळीं भोंकें पाडतात, आणि त्यांत शिरून पांचशेंपासून बाराशें फुटांच्या लांबीच्या आडव्या वाटांनीं निळ्या जमिनीला येऊन ठेपतात.

वर ‘ निळ्या जमिनीला येऊन ठेपतात ’ असें जें ह्मटलें आहे, ती निळी जमीन **डीबीर्स** आणि **किंबर्ले** या खाणींच्या तळांशा लागलेली आहे. याच जमिनींत हिरे सांपडतात. हे हिरे शोधून काढण्याचें काम फार प्रयासाचें व खर्चाचें आहे. या खाणींपासून बऱ्याच अंतरावर एक विस्तीर्ण मैदान तयार केलेलें आहे. याचा परिघ सुमारें ६०० एकर आहे. हें सहाशें एकरांचें क्षेत्र फर-शीसारखें गुळगुळीत व कठिण केलेलें आहे. निळी जमीन उक-रून तींतील खंडोगणती माती या प्रचंड क्षेत्रांत आणून पसरतात.

या निळ्या मातीचा सुमारें एक फूट उंचीचा थर साऱ्या क्षेत्रभर झाला, ह्मणजे नवीन माती आणून घालण्याचें काम बंद करतात. आणून घातलेल्या मातीनें बरींच उन्हें खाल्लीं ह्मणजे तींतील हिऱ्यांचीं ढेंकळें आपोआप फुटूं लागतात. पण ही थराच्या वरच्या भागांतील ढेंकळें वर येण्याकरितां नांगर घालावे लागतात, आणि बरेच दिवस हें सहाशें एकरांचें कृत्रिम शेत पुनः पुनः नांगरण्याचें काम चालतें. उन्हानें, नांगरानें आणि जनावरांच्या व माणसांच्या तुडवण्यानें साऱ्या ढेंकळांचा चूर झाला, ह्मणजे नांगर काढून घेतात. नंतर सोनाराच्या शेगडींतील राखेप्रमाणें हिऱ्यांच्या या धुळीस धुण्याचा सपाटा सुरू होतो. हें धुण्याचें काम करण्याकरितां मोठ्या खर्चाचीं फार नाजुक यंत्रें केलेलीं आहेत. निरनिराळ्या चाळणींतून माती काढून टाकतां टाकतां शंभर पोत्यांच्या जागीं एक पोतें माती रहातें! हा संशोधनविधि संपतो तेव्हां निळ्या आणि काळ्या वाळूच्या खड्यासारखे खडे मागें रहातात. नंतर **पलसेटर** ह्मणून एका प्रकारच्या यंत्रांत घालून ते खडे चाळले, म्हणजे आकाराच्या मानाप्रमाणें त्यांचे चार वर्ग होतात. या चार वर्गांत ही सारी मंडळी जाऊन बसली ह्मणजे मग त्यांच्या गुणांप्रमाणें व रंगाप्रमाणें निवड करण्याच्या कामास सुरुवात होते. हें निवड करण्याचें काम ओलेपणीं गोरे लोक टेबलावर करतात व वाळल्यावर हबशी लोक करतात. निवडीचें काम एका प्रकारच्या करणीनें होत असतें, व तें करण्यांत ते लोक इतके तरबेज झालेले असतात कीं, भलत्याच रंगाचा खडा भलत्याच खड्यांत कधींही मिसळला जात नाहीं. हिऱ्याचा रंग पांढराच असतो असें नाहीं; सर्व प्रकारच्या रंगांचे हिरे आहेत; तथापि हिरव्या, निळ्या, पिंगट, पिंवळ्या, केशरी, किंवा दुसऱ्या कोणत्याही रंगापेक्षां पांढरा रंगच सर्वांस विशेष प्रिय झाला आहे. सर्वांत लहान हिरा टांचणीच्या डोक्यायेवढा असतो. आजपर्यंत या खाणींत जो सर्वांत मोठा हिरा सांपडला त्याचें वजन ४२८½ क्यारट भरलें. (दोन गुंजा ह्मणजे एक क्यारट.) याला पैलू

पाडून हा पारिसच्या प्रदर्शनांत ठेविला तेव्हां त्याचें वजन $२२८\frac{१}{२}$ क्यारट म्हणजे ४९७ गुंजा किंवा $४\frac{३}{४}$ ताळ भरलें !

याप्रमाणें निवड झाल्यावर या हिऱ्यांची किंमत करण्यासाठीं फौजेची कुमक देऊन त्यांस किंमत करणाऱ्यांच्या हपिसांत पाठवितात. ही किंमत करण्यापूर्वी ते त्यांस सल्फ्युरिक आणि नैट्रिक ॲसिडचें स्नान घालतात. या स्नानामुळें त्यांच्या अंगावरील फालतू मळ बिलकुल नाहींसा होऊन ते आपल्या नैसर्गिक तेजानें-चमकूं लागतात. हें स्वरूप त्यांस प्राप्त होऊन आकारें, रंग, वजन यांच्या मगदुराप्रमाणें त्यांचा आंकडा ठरला कीं, **डीबीर्स** कंपनीचे हपिसांत विक्रीकरितां त्यांची मांडणी करण्यांत येते. या हपिसांत पाय टाकल्याबरोबर, दृष्टीची व मनाची काय स्थिति होत असेल याचा वाचकांनींच विचार करावा ! **डीबीर्स** कंपनी प्रतिदिवशीं सुमारें ९,९०० क्यारट वजनाचे हिरे काढते, व दुकानांत सुमारें ६०,००० क्यारट वजनाचे हिरे बहुधा शिलक ठेविते.

हिरे काढण्याचें काम वर्षांतून सुमारें तीन महिने चालतें. या तीन महिन्यांपुरते जे नेटिव हबशी लोक नोकरीस ठेवण्यांत येतात, त्या बिचाऱ्यांस ते तीन महिने केवळ सक्त मजूरीच्या शिक्षेचें होत असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण भारी मजूरी मिळत असल्यामुळें त्या गरीब लोकांस त्याचें कांहींच वाटत नाहीं. प्रत्येक दिवशीं संध्याकाळीं कामावरून परत आल्यावर सगळा पोषाख काढून ठेवायाचा, आणि शुद्ध दिगंबर बनावयाचें ! अशा स्थितींत कांहीं अंतरावर कोंडलेल्या जागा असतात त्यांत गेल्यावर तोंड, नाक, कान, शेंडी, खांका वगैरे शरीरांत थोडाबहुत अवकाश असणाऱ्या प्रत्येक भागाची कडकडीत तपासणी झाल्यावर त्यांस एका प्रकारच्या जाडी घोंगड्या नेसावयास देतात, आणि मजूरी देऊन टाकतात. या घोंगड्या नेसून हे लोक त्यांच्यासाठीं दुकानें घातलेलीं असतात त्यांत आवडेल तो जिन्नस विकत घेण्यासाठीं जातात. खाणेंपिणें झाल्यावर कंपनीनें बांधून दिलेल्या खोल्यांत

ते जाऊन निजतात. त्यांच्यामागें त्यांनीं काढून ठेवलेल्या कपड्यांची मोठ्या बारकाईनें तपासणी करतात. दुसरे दिवशीं त्यांनीं फिरून आपापले कपडे घालावे, आणि कामावर जावें अशी शिस्त आहे.

युरोपियन लोक प्राण गेला तरी पैशासाठीं अशी कदर किंवा कैद सहातील काय ? कधीं नाहीं. कंपनी त्यांवर इतकी सक्ती करीत नाहीं इतकेंच नाहीं, तर त्यांच्या सुखाकरतां व ऐषआरामाकरितां हरएक प्रकारची तजवीज करते. लायब्ररी, खेळाची जागा, वर्तमानपत्रें, विश्रांतिस्थान वगैरे सर्व गोष्टी त्यांना कंपनीच्या खर्चानें पुरविल्या जातात. काळ्या लोकांस पाणी, रहाण्याच्या जागा, व दुखणेंबाहणें आलें असतां औषधें वगैरे कंपनी फुकट देते.

इतका बंदोबस्त ठेविला आहे, व हिऱ्याची चोरी ह्मणजे सदोष मनुष्यवधाचा गुन्हा समजून तो करणारास एकपासून पंधरा वर्षेंपर्यंत काळ्यापाण्याची शिक्षा देण्याची चाल आहे, तरी दगलबाजी ही झाल्याशिवाय रहातच नाहीं ! शेंकडा दहा किंवा पंधरा रुपये किमतीचे हिरे चोरीस जातात असें ह्मणतात. हिरे काढण्याचा ऋतु संपून नेटिव लोकांस आपापल्या घरीं जाऊं द्यावयाची वेळ आली ह्मणजे त्यांनीं अखेरच्या एकदोन दिवसांत जर कांहीं हिरे खाल्ले असतील, तर ते बिनचुक सांपडावें म्हणून जी शोधाची अमंगळ पद्धत घातली आहे, तिचें वर्णन करण्यापेक्षां वाचकांनीं तिची कल्पना करावी, हेंच बरें !

हिऱ्यांचा सट्टा बहुतकरून युरोपांतील व्यापाऱ्यांचे एजंट करतात. चोरलेले हिरे खरेदी करणारे व्यापारी इंग्लिश लोकांच्या कायद्याची परवा न करतां तसला माल खरेदी करून **फ्रीस्टेट्स**मध्यें बेलाशक चालते होतात. ट्रॅन्सव्हालची सीमा ओलांडून फ्रीस्टेट्सच्या सीमेच्या आंत त्यांचें पाऊल पडलें, ह्मणजे इंग्रजी पोलिसाचें कांहीं एक चालत नाहीं ! एकदा अशा प्रकारच्या बिलंदर चोरानें फारच मौज केली. त्यानें चोरीचा माल खरेदी केला असावा, अशी पोलिसास शंका आल्यावरून त्यांनीं त्याचा झाडा घेतला, पण त्यांत कांहीं निष्पन्न झालें नाहीं. तेव्हां पोलिस लोक निराश होऊन मागें परतले. त्या गब्रूनें फ्रीस्टेट्सच्या सीमेच्या

आंत पाऊल टाकल्याबरोबर त्यांस हांका मारून उभें केलें, आणि त्यांच्या डोळ्यांदेखत आपल्या घोड्याचें पोट कापून त्यांतून काढलेले हिरे त्यांस दाखविले !

सोनें, रुपें वगैरे उपयुक्त धातूंच्या कारखान्यांत मनुष्यांनीं कोट्यावधि रुपये घालावे, आणि अतोनात परिश्रम करावे यांबद्दल त्यांस फारसा दोष लावतां येणार नाहीं. पण रानटी लोकांच्या स्त्रियांप्रमाणें तेजोमय दगडांनीं स्वशरीरें विभूषित करणाऱ्या स्त्रियांच्या कौतुकासाठीं आह्मां सुधारलेल्या लोकांनीं इतका पैसा आणि इतके श्रम व्यर्थ खर्च करावे, हें किती लाजिरवाणें आहे बरें ? बरें इतकेंही करून या कांतिमान् पाषाणशकलांनीं तरुण, रूपवती, व गुणवती स्त्रियांचे देहच सालंकृत होते तर अशा प्रकारची टीका करणें केवळ न्याय्य झालें नसतें, परंतु तसेंही होत नाहीं. तेव्हां अखेरचा सिद्धांत काय काढावा लागतो कीं, पुरुषांची उत्पत्ति कशापासूनही झाली असो, स्त्रियांची उत्पत्ति तरी माकडापासूनच झाली असली पाहिजे ! निदान लॉर्ड रॅन्डॉल्फ चार्चिल यांचें असें म्हणणें आहे !

समाप्त.

टिळक ग्रंथसंग्रहालय
क्र. 14850
040/144
वाई जि. सातारा

९८(४०/ [illegible] । ३३